१६५

...च्या पुस्तकांतील

# गद्यपद्यार्थबोध

नं. ७५



आवृत्ति दुसरी

किंमत १० आणे

७५

किरकोळ

पुणे "आर्यविजय" छा. छा.

( नवीन मराठी सहाव्या पुस्तकांतील )

# गद्यपद्यार्थबोध.

हें पुस्तक


नारायण धोंडदेव जोशी,

शिक्षक, पुणें ट्रेनिंग कालेज;

व

महादेव नारायण जोशी,

क्लार्क, एज्युकेशनल इन्स्पेक्टर मध्यभाग,


यांनीं तयार केलें.


इसवी सन १८९५.

आवृत्ति दुसरी.



सर्व अधिकार स्वाधीन ठेविले आहेत.


किंमत १० आणे.

पुणें एथें

'आर्यविजय' छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

हें पुस्तक यापूर्वींच छापून प्रसिद्ध व्हावयाचें, परंतु तें तयार करण्यापूर्वी ज्या अडचणी येण्याचा संभव होता त्याहिपेक्षां जास्त अडचणी तें तयार करितांना उद्भवल्या. शिवाय पुस्तक तयार होत असतांना शिक्षक लोकांकडून मधून मधून बऱ्याच सूचना आल्या त्या सर्वांचा चांगला विचार करून हीं आवृत्ति छापिली आहे. हिचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत गद्यपद्यांच्या धड्यांतील कठीण शब्द, त्यांचे अर्थ, पदच्छेद, व्युत्पत्ति, समास वगैरे दिले असून दुसऱ्या भागांत कवितांचा अन्वय व अर्थ सांगितला आहे. पहिल्या भागांत मूळ शब्दामागें आंकडा दिला असून तोच तो शब्द पुढें ज्या ठिकाणीं आला त्या ठिकाणीं मागचा आंकडा देऊन उल्लेख केला आहे. कांहीं ठिकाणीं शब्द सारखा असून अर्थ जुळत नाहीं तेथें तो शब्द मागील आंकड्यानें दर्शवून त्या शब्दापुढें त्याचा लागू पडणारा अर्थ दिला आहे. मूळ शब्द कोणत्या भाषेंतील आहे हें त्यापुढें त्या भाषेचें संक्षिप्त नांव घालून सांगितलें आहे. जेथें शब्दाचें अस्सल रूप माहीत आहे तेथें त्या भाषेंतील तो शब्द कंसांत लिहून त्यापुढें त्याची व्युत्पत्ति दिली आहे. ( उदाहरणार्थ १५ हेर, ४३ विनवणी, १५९ भाकित, १६६ वर्चस्व इ० शब्द पहा ). विद्यार्थ्यांस व्युत्पत्तीची फारच अडचण पडते ह्मणून वहुतेक सर्व संस्कृत शब्दांची व्युत्पत्ति सांगितली आहे. कोठें कोठें अवघड शब्दांतील समास दिले आहेत. पदच्छेद करितांना त्या शब्दांतील निरनिराळीं पदें देऊन त्यांस लागलेले प्रत्ययहि कांहीं ठिकाणीं वेगळे काढिले आहेत. हे प्रत्यय व धातूंचा एक कोश शेवटीं जोडण्याचा आमचा विचार होता, परंतु पुस्तक प्रसिद्ध होण्यास फार विलंब लागल्यामुळें तो वेत तूर्त रहित करावा लागला. तथापि समासाच्या केवळ अंतीं येणारे व जे मराठींत स्वतंत्र सांपडत नाहींत असे शब्द ( उदा० ज, ग, क, कर, गम, गामी, इ० ) पदच्छेदांत वेगळे दाखवून त्यांचे धातु व अर्थहि दिले आहेत.

दुसऱ्या भागांत सबंध कविता न लिहितां तिचा एक पाद अथवा चरण घेऊन त्यापुढें अन्वय व अर्थ सांगितला आहे व जागजागीं माहितीच्या टीपा दिल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटीं पहिल्या भागांत दिलेल्या शब्दांची सूचि जोडली आहे. सारांश मराठी सहाव्या यत्तेंतील उमेदवारांस लागणारी माहिती या पुस्तकांत बरीच दिलेली आहे. हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास जितका अवधि सांपडावा तितका न सांपडल्यामुळें ह्यांत चुका राहण्याचा संभव आहे त्याबद्दल सज्जन आह्मास

क्षमा करितील अशी आशा आहे. या पुस्तकांत कांहीं दोष आढळल्यास व ते कोणी कृपा करून आह्मांस कळविल्यास त्यांचा पुढील आवृत्तीचे वेळीं अवश्य विचार करूं.

ह्या पुस्तकाची लेखी प्रत पुणें ट्रेनिंग कालेजचे व्हाइस प्रिन्सिपाल रा. रा. **नारायण बाळकृष्ण गोडबोले** यांणीं आपला अमूल्य वेळ खर्चून तपासून दिली व पुस्तकाच्या उपयुक्ततेबद्दल कांहीं मार्मिक सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे फार फार आभार मानून ही प्रस्तावना संपवितों.

पुणें,
तारीख २५ जुलै १८९४ इसवी.

**ना. धों. जोशी.**
**म. ना. जोशी.**

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

पहिल्या आवृत्तींत राहिलेले बरेच अवघड शब्द, त्यांतील व्युत्पत्ति, समास वगैरे, देऊन ही आवृत्ति छापिली आहे. हींत प्रत्येक शब्दामागें क्रमवार अंक दिला असून तोच शब्द पुनः आला असतां तो गाळून टाकिला आहे. तथापि कोणताहि शब्द पहाणें झाल्यास तो प्रथम सूचींत पहावा ह्मणजे लागलींच सांपडेल. कवितांच्या अन्वयार्थांत जागोजागीं योग्य फेरफार केला आहे. विद्यार्थ्यांस हें पुस्तक विकत घेण्यास सुलभ जावें ह्मणून किंमतहि कमी केली आहे. पुणें ट्रेनिंग कालेजांतील वे. शा. **नारायण शास्त्री साठे** यांनीं केलेल्या सूचना आभारपूर्वक स्वीकारून त्यांचा या आवृत्तींत समावेश केला आहे. मागच्या आवृत्तींत राहिलेलीं सर्व अशुद्धें दुरुस्त करून ही आवृत्ति फार लक्षपूर्वक तपाशिली आहे. तथापि कोठें कांहीं अशुद्धें राहिलीं असल्यास त्यांबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील व तीं आह्मांस कळवतील तर आह्मी त्यांचे मोठे आभारी होऊं. तसेंच, आणखी दुसरे फेरफार किंवा महत्वाच्या सूचना केल्यास त्यांचाही आह्मी आभारपूर्वक स्वीकार करूं.

**पुणें,**
तारीख २२ आगष्ट सन १८९५.

**ना. धों. जोशी.**
**म. ना. जोशी.**

# सांकेतिक खुणांचा अर्थ.

सं.–संस्कृत.
म.–मराठी.
हिं.–हिंदुस्तानी.
उ.–उर्दू.
फा.–फारशी.
आ.–आरबी.
इं.–इंग्रजी.
ला.–लॅटिन.
फ्रें.–फ्रेंच.
ग्री.–ग्रीक.
पो.–पोर्तुगीज.
तु.–तुर्की.
क. स.–कर्मधारय समास.
ब. स.–बहुव्रीहि ,,
द्वं. स.–द्वंद्व ,,
द्वि. स.–द्विगू ,,
अ. स.–अलुक् ,,
द्वि. त. स.–द्वितीया तत्पुरुष समास.
तृ. त. स.–तृतीया तत्पुरुष समास.
च. त. स.–चतुर्थी ,, ,,
पं. त. स.–पंचमी ,, ,,
ष. त. स.–सप्तमी ,, ,,
न. त. स. / नञ् त. स. } नञ् ,, ,,
पं. ब. स.–पंचमी बहुव्रीहि समास.
ष. ब. स.–षष्ठी ,, ,,
स. ब. स.–सप्तमी ,, ,,
न. ब. स. / नञ् ब. स. } नञ् बहुव्रीहि समास.
सहा. ब.–सहार्थी बहुव्रीहि समास.
अव्य. स.–अव्ययीभाव समास.
स. अ. त.–सप्तमी अलुक् तत्पुरुष समास.
अ. क. स.–अव्यय पूर्वपद कर्मधारय समास.
म. प. लो.–मध्यम पदलोपी समास.

# मराठी सहाव्या पुस्तकांतील गद्य व पद्य यांतील कठीण शब्दांचे पर्यायशब्द, व्युत्पत्ति, समास इत्यादि.

## १. सृष्टिनियम.

### भाग १ ला (पृ० १).

१. पुस्तक, सं. (पुस्त्–बांधणें); ग्रंथ; मान्यवस्तु.

२. सृष्टिनियम, सं. उत्पन्न केलेलें जें (जग) त्याचे नियम. ष. त. स.

३. सृष्टि, (सृज्–उत्पन्न करणें); उत्पत्ति; जग.

४. नियम (नि+यम्–स्वाधीन ठेवणें); निर्बंध; ठराव.

५. मानवी, सं. (मानवीय); मनुष्याचें.

६. महत् (मह्–पूजा करणें; मान देणें); मोठें.

७. अंतर (अंत+रा–देणें); तफावत; अवकाश.

८. अंत–(अत्–बांधणें); शेवट; आंतील भाग; निर्णय.

९. उल्लंघन, सं. (उत्+लंघन); मोडणें, न पाळणें, दुर्लक्ष करणें, पलीकडे जाणें.

१०. उत्–वर, पलीकडे, उत्तम.

११. लंघन, सं.(लंघ्–पलीकडे जाणें); न पाळणें.

१२. योग्य, सं. (युज्–जोडणें); नेमकें; ठरीव; उचित.

१३. शासन, सं. (शास्–शिकविणें); शिक्षा; दंड; शिकवणूक.

१४. सृष्टिनियुक्त, सं. (सृष्टि+नियुक्त); सृष्टीनें ठरविलेलें. तृ. त. स.

१५. नियुक्त, सं. (नि+युक्त) ठरविलेलें.

१६. नि–अत्यंत, जवळ.

१७. युक्त (युज्–नेमणें, ठेवणें); योजलेलें.

१८. कायदा, आ.–नियम.

१९. अपराध, सं. (अप+राध्–विरुद्ध वागणें); विरुद्ध वर्तन.

२०. निरपराधी, सं. (निरपराध=निर्+अपराध); निर्दोष. पं. ब. स.

२१. निर्–गेलेला.

२२. तरबेज, आ. (तरबेत); ज्ञाता; जाणता; माहीतगार.

२३. हेर, सं. (हेरिक=ह्–आणणें; चोरणें); बातमीदार.

२४. न्यायासन, सं. (न्याय+आसन); न्याय देण्याची जागा.

२५. न्याय, (नि+इ–जाणें); नीति; सत्य.

२६. आसन (आस्–बसणें), जागा; बैठक; बसकर.

२७. स्थापणें, सं. (स्थापन=स्था-रहाणें); ठेवणें; मांडणें; ठरवणें.

२८. तजवीज, आ.–व्यवस्था ; योजना.
२९. पूर्णता, सं. ( पूर्ण+ ता ); शेवटास गेलेली स्थिति.
३०. पूर्ण, सं. ( पूर्–भरणें ); भरलेलें; संपलेलें.
३१. अंमल, ( अमल ); अधिकार; तावा.
३२. निःपक्षपात, सं. ( निस्+पक्षपात ); कोणतीहि वाजू न धरणें. अ. क. स.
३३. निस्–नाहीं.
३४. पक्षपात ( पक्ष+पात ); वाजू पतकरणें.
३५. पक्ष ( पक्ष्–स्वीकारणें ); वाजू, पंख, पंधरवडा.
३६. पात ( पत्–पडणें ); स्वीकार; पतकरणें; पडणें ; ( पंक्ति–ओळ ).
३७. विनहरकत, उ.–हरकतींशिवाय. अव्य. स.
३८. विन, सं. ( विना ); शिवाय.
३९. हरकत, आ.—अडचण ; धोका.
४०. योजना, सं. ( युज्–जोडणें ); उपयोग.
४१. सांप्रतची, सं. ( सांप्रत+ची ); सध्याची; हल्लींची.
४२. जनस्थिति, सं. ( जन+स्थिति ); लोकांची स्थिति. ष. त. स.
४३. जन ( जन्–उत्पन्न होणें ); लोक.
४४. स्थिति, ( स्था–रहाणें ); अवस्था; राहणें.
४५. साध्य, सं. ( साध्–पूर्ण करणें ); शेवटास नेण्याजोगें ; होण्याजोगें.
४६. कार्यकारणरूप, सं. ( कार्य+कारण+रूप ); हेतु व परिणाम यांचें सूचक. कार्यकारण–द्वं. स. कार्यकारणरूप–ष. व. स.
४७. कार्य ( कृ–करणें ); परिणाम.
४८. कारण ( कृ–करणें ); हेतु ; मूळ.
४९. रूप ( रूप्-दाखवणें ); दर्शक; उदाहरण; प्रतिमा; चेहरा.
५०. तपास, आ. ( तपहस ); शोध ; चौकशी.
५१. व्यवस्था, सं. ( वि+अव+स्था–योग्य रीतीनें ठेवणें ; राहणें ); योग्य तजवीज ; योग्य उपाय.
५२. वि–गेलेला, आधिक्य, वाईट.
५३. अवस्था–स्थिति.
५४. अव–विशेषेंकरून कमी.
५५. विरुद्ध, सं. ( वि+रुध्–प्रतिबंध करणें ); प्रतिकूल.
५६. वर्तन, सं. ( वृत्-वागणें ); वागणूक, वळणें.
५७. न्यायाधीश, सं. ( न्याय+अधीश ); स. त. स.; न्यायाविषयीं मुख्य.
५८. अधीश ( अधि+ईश ); श्रेष्ठ; मुख्य; अ. क. स.
५९. अधि–ठायीं.
६०. ईश ( ईश्-समर्थ होणें ); अधिकारी ; श्रेष्ठ.
६१. माफी, आ.–ज्याबद्दल कर देणें पडत नाहीं ; क्षमा.
६२. निदान, सं. ( नि+दा–देणें ); कमींत कमी.
६३. अल्प, सं. ( अल्–प्रतिबंध करणें ); थोडें.

गाथा ठो १०८



६४. विनवणी, सं. ( विनमन=वि +नम्–लवणें.); विनंति; आर्जव.

६५. तोल, सं. ( तुल्–वजन करणें ); वजन; कल.

६६. गुरुत्वशक्ति, सं.–जडपणाची शक्ति. ष. त. स.

६७. गुरुत्व, सं. ( गुरु+त्व ); जडपणा.

६८. गुरु ( गॄ–बोलणें ); जड.

६९. शक्ति, सं. ( शक्–समर्थ होणें ); सामर्थ्य.

७०. वेग, सं. ( विज्–जाणें ); गति.

७१. शोधन, सं. ( शुध्–स्वच्छ होणें ); तपास; विचार; शुद्ध.

७२. विद्युत्, सं. ( वि+द्युत्–प्रकाशणें ); वीज.

७३. व्यापार, सं. ( वि+आ+पॄ–उद्योग करणें ); उद्योग; देशादेशाशीं देवघेव.

७४. वास्तव्य, सं. ( वस्+तव्य ); ठिकाण; रहावयास योग्य.

७५. निमिषमात्र, सं. ( निमिष+मात्र ); डोळे लवण्याइतका काळ.

७६. निमिष ( नि+मिष्–मिटणें ); डोळे मिटणें.

७७. मात्र ( मा–मोजणें ); परिमाण, यत्ता.

७८. विश्रांति, सं. ( वि+श्रम्–दमणें ); विसावा.

७९. शिलाशकल, सं. ( शिला+शकल ); शिळेचा कपरा. ष. त. स.

८०. शिला–दगड.

८१. शकल–तुकडा.

८२. अज्ञेय, सं. ( न+ज्ञेय ); कळण्यास कठीण; दुर्बोध; नञ् त. स.

८३. न–नाहीं.

८४. ज्ञेय, सं. ( ज्ञा–जाणणें ); कळण्यासारखें.

८५. अनादि, सं. ( न+आदि ); ज्याला आरंभ नाहीं. नञ् ब. स.

८६. आदि–आरंभ, मुख्य.

८७. अस्खलित, सं. ( न+स्खलित ); स्पष्ट; न. त. स.

८८. स्खलित ( स्खल्–गळणें ); चुकीचा, चुकलेला.

८९. निरवधि, सं. ( निर्+अवधि ); अनंत. पं. ब. स.

९०. अवधि, सं. ( अव+धा–पोसणें ); अवकाश, मर्यादा.

९१. अव्याहत, सं. (न+व्याहत); निष्प्रतिबंध, विनधोक. न. त. स.

९२. व्याहत, सं. ( वि+आ+हन्–अडथळा करणें ); अडलेलें.

९३. अवलोकन, सं. ( अव+लोक्–पाहणें ); बारकाईनें पाहणें.

९४. तदनुरूप, सं. ( तत्+अनुरूप ); त्याप्रमाणें.

९५. तद्–तें.

९६. अनुरूप, सं. ( अनु+रूप ); प्रमाणें; योग्य; अव्य. स.

९७. अनु–प्रमाणें; मागून.

९८. यत्किंचित्, सं. ( यत्+किंचित् ); थोडें देखील, जेवढें.

९९. यत्–जें; जितकें.

१००. किंचित्, सं. (किम्+चित्); थोडें; अल्प.

१०१. प्रत्यक्ष, सं. ( प्रति+अक्षि ); डोळ्यासमोर; अव्य. स.

१०२. प्रति–बद्दल, प्रत, समोर, विशेष.

१०३. अक्षि–सं. ( अश्+व्यापणें ); डोळा.

१०४. तावडतोब, उ. ( तावडतो-ड ); लागलेंच; तत्क्षणींच.
१०५. जाणूनबुजून, म. ( जाणून+बुजून); समजूनउमजून.
१०६. जाणणें+बुजणें ( ज्ञान+बोधन ); मुद्दाम करणें.
१०७. प्रथम दर्शन, सं. ( प्रथम+दर्शन ); पहिली भेट. क. स.
१०८. प्रथम–पहिलें.
१०९. दर्शन( दृश्–पाहणें ); पाहणें.
११०. प्रवृत्त, सं. ( प्र+वृत्–वळणें ); तयार; तत्पर; उद्युक्त; वळलेला.
१११. कालांतर, सं. ( काल+अंतर ); दुसरी वेळ. क. स.
११२. काल, सं. ( कल्–जाणें ); वेळ; समय.
११३. निमूटपण, म. ( निमूत+पण=नि+मू–बांधणें ); गुपचीपपणा; स्तब्धता.
११४. शारीरशास्त्र, सं. ( शारीर+शास्त्र ); शरिराचें शास्त्र; क. स.
११५. शारीर ( शरीर+अ ); शरीरसंबंधीं.
११६. शरीर, सं. ( शॄ–विदारणें ); देह.
११७. शास्त्र ( शास्–शिकणें ); विद्या.
११८. भयंकर, सं.–भय करणारें–देणारें. द्वि त. स.
११९. भय ( भी–भिणें ); भीति.
१२०. कर, ( कृ-करणें ); करणारा; हात; धारा; खंडणी.
१२१. बाधा, सं. ( बाध्–पीडा करणें ); पीडा.
१२२. आहार, सं. ( आ+हृ–घेणें); खाणें.
१२३. व्यायाम, सं. ( वि+आ+यम्–ताब्यांत ठेवणें ); श्रम; मेहनत.
१२४. निद्रा, सं. ( नि+द्रा–झोंप घेणें ); झोंप.
१२५. आरोग्य, सं. ( अरोग+य ); निरोगीपणा.
१२६. अरोग ( न+रोग ); रोगरहित. न. ब. स.
१२७. रोग ( रुज्–रोग होणें ); दु:ख; पीडा.
१२८. आवश्यक, सं. ( अवश्य+अक ); ताब्यांतील नव्हे; अनिवार्य.
१२९. अवश्य ( न+वश्य ); अगत्याचें; अनिवार्य. न. त. स.
१३०. वश्य ( वश्–ताब्यांत ठेवणें ); स्वाधीन.
१३१. शारीरिक, सं. ( शरीर+इक ); शरीरसंबंधीं.
१३२. व्यासंग, सं. ( वि+आ+सञ्ज्–लागणें; चिकटणें ); निदध्यास; आसक्ति; दृढ अभ्यास.
१३३. अन्नपचनादि, सं. ( अन्न+पचन+आदि ); अन्नपचन वगैरे. अन्नपचन=ष. त. स. अन्नपचनादि=स. ब. स.
१३४. अन्न ( अद्–खाणें ); खाणें.
१३५. पचन, ( पच्–शिजवणें ); पचणें; जिरणें.
१३६. व्याधि, सं. ( वि+आ+धा-वाईट रीतीनें पोसणें ); रोग.
१३७. ग्रस्त, सं. ( ग्रस्–खाणें ); गिळलेला.
१३८. अल्पायुषी, सं. ( अल्पायुस्+इन् ); थोडे दिवस वांचणारा.
१३९. अल्पायुस्, सं. ( अल्प+आयुस् ) थोडें आयुष्य. क. स.

१४०. आयुस् ( अय्–जाणें ); आयुष्य; जगण्याचा काळ.
१४१. क्षीणता, सं. ( क्षीण+ता ); अशक्तता.
१४२. क्षीण, सं. ( क्षि–झिजणें ); झिजलेला; अशक्त.
१४३. संतति, सं. ( सम्+तन्–प्रसरणें ); वंश.
१४४. परिपक्व, सं. ( परि+पक्व ); अतिशय पूर्णदशेस आलेलें.
१४५. परि–अत्यंत, भोंवतीं, उलट, परंतु, सारखें, प्रकार.
१४६. पक्व ( पच्–शिजवणें ); शिजवलेलें; पूर्ण झालेलें.
१४७. क्रमशः, सं. ( क्रम+शः ); क्रमानें; पायरीपायरीनें; हळूहळू.
१४८. क्रम ( क्रम्–जाणें ); रांग, शेज.
१४९. दुर्व्यसन, सं. ( दुर्+व्यसन ); वाईट नाद; खोड. अ. क. स.
१५०. दुर्–वाईट.
१५१. व्यसन ( वि+अस्–टाकणें ); खोड; नाद; संकट.
१५२. गणित, सं. ( गण्–मोजणें ); मोजणें; मानणें; मोजण्याची विद्या; मोजलेलें; मानलेलें.
१५३. दुष्परिणाम, सं. ( दुस्+परिणाम ); वाईट परिणाम; अ. क. स.
१५४. दुस्–वाईट.
१५५. परिणाम, सं. ( परि+नम्–लवणें; उत्पन्न होणें ); शेवट निकाल, फळ.
१५६. प्रतीकार, सं. प्रति+कृ–विरुद्ध करणें ); विरुद्ध करणें; नाश. अ. क. स.
१५७. स्वाधीन, सं. (स्व+अधीन); ताब्यांतील. ष. त. स.
१५८. स्व–आपलें; आपण.
१५९. अधीन ( अधि+इ–जाणें ); वश.
१६०. मोहक, सं. ( मुह्–वेडें होणें ); भुलविणारें.
१६१. भिन्न, सं. (भिद्–फोडणें) ; फोडलेलें; वेगळें.
१६२. चटक, सं. ( चट्–आच्छादणें, पीडा देणें ); गोडी; व्यसन.
१६३. लुब्ध, सं. ( लुभ्–आशा करणें ); मोहित; आशाबद्ध.
१६४. संपत्ति, सं. ( सम्+पद्–श्रीमान् होणें ); धन; पैसा.
१६५. परवा, फा.–काळजी.
१६६. दुर्व्यसनजन्य, सं. ( दुर्व्यसन+जन्य ); वाईट नादापासून होणारें; पं. त. स.
१६७. जन्य ( जन्–उत्पन्न होणें ); उत्पन्न होणारें.
१६८. दूरापास्त, सं. ( दूर+अपास्त ; दूर टाकिलेलें ; दुर्घट ; अ. क. स.
१६९. दूर–पलीकडे, लांब.
१७०. अपास्त ( अप+अस्त ) वाईट रीतीनें टाकलेलें.
१७१. अस्त ( अस्–टाकणें ) ; टाकलेलें ; नाहींसें होणें.
१७२. लंपट, सं.–आसक्त ; नादी.
१७३. दुःसह, सं. ( दुस्+सह्–सोसणें ) ; सहन करण्यास कठीण.
१७४. हानि, सं ( हा–टाकणें ) ; नाश.
१७५. तिरस्कार, सं. ( तिरस्+कृ–धिक्कार करणें ) ; कंटाळा. अ. क. स.
१७६. सुज्ञ, सं. ( सु+ज्ञ ); उत्तम जाणणारा ; अ. क. स.
१७७. सु–स्वल्पतेनें; अत्यंत; उत्तम.
१७८. ज्ञ ( ज्ञा–जाणणें ); जाणता.

## २. सृष्टिनियम.

### भाग २ रा (पृ० ५)

१७९. निर्दय, सं. ( निर+दया ); ज्याला दया नाहीं तो; पं. व. स.

१८०. दया ( दे–रक्षण करणें ); कृपा.

१८१. प्रेम, सं. (प्री–संतुष्ट करणें); आवड; प्रीति.

१८२. उग्र, सं. (उच्–एकत्र करणें); भयंकर; त्रासदायक.

१८३. परिश्रम, सं. परि+श्रम्–थकणें ); अत्यंत मेहनत.

१८४. संपादन, सं. ( सम्+पद्–मिळवणें ); मिळवणें.

१८५. सौंदर्य, सं. ( सुंदर+य ); शोभा ; सुंदरपणा.

१८६. सुंदर–सुरूप ; सुलक्षण.

१८७. कवि, सं. ( कु–ग्रंथरचना करणें ); ग्रंथ रचणारा.

१८८. वाक्चातुर्य, सं. ( वाक्+चातुर्य ); बोलण्याचा चतुरपणा ; ष. त. स.

१८९. वाक्, सं. ( वच्–बोलणें ) ; वाणी.

१९०. चातुर्य, सं. ( चतुर+य ); चतुराई.

१९१. चतुर, ( चत्–इच्छिणें ) ; शहाणा.

१९२. रमणीय, सं. ( रम्–आनंद देणें ) ; आनंददायक.

१९३. देखावा, हिं. ( देख+आवा ); शोभा ; रचना.

१९४. हुबेहुब, आ. ( हूबहू ); अगदीं सारखें.

१९५. चितारी, सं. ( चित्रकारी= चित्र+कृ–करणें ); चित्रें करणारा—काढणारा.

१९६. पराकाष्ठा, सं. ( परा+काष्ठा ); अत्यंत मर्यादा.

१९७. परा–अत्यंत, मागें, विरुद्ध, पलीकडे.

१९८. काष्ठा–दिशा, मर्यादा.

१९९. उल्हास, सं. ( उत्+ल्हस्–आनंद पावणें ) ; आनंद; उत्साह.

२००. वृत्ति, सं. ( वृत्+वर्तणें ); स्थिति, राहणें.

२०१. आल्हाद, सं. ( आ+ल्हाद्–आनंद पावणें); आनंद; उ-उत्साह.

२०२. विवंचना, सं. ( वि+वंचना ); काळजी.

२०३. वंचना ( वंच्–फसवणें ); फसवणूक.

२०४. क्षुब्ध, सं. (क्षुभ्–रागावणें); खवळलेला.

२०५. मनोवृत्ति, सं. ( मनस्+वृत्ति ); मनाची स्थिति. ष. त. स.

२०६. मनस् ( मन्–चिंतन करणें ); मन; चित्त.

२०७. शांत, सं. (शम्–थंड होणें); स्थिर.

२०८. उदात्त, सं. ( उत्+आ-दा–देणें ); प्रौढ, उंच जातीचा; चढवलेला.

२०९. अंकुर, सं. ( अंक्–चिन्ह करणें ); कोंब, चिन्ह.

२१० लक्षपूर्वक, सं. ( लक्ष+पूर्व+क ); लक्ष ठेवून. स. व.

२११. लक्ष ( लक्ष्–पहाणें ); चित्त; १००००० संख्या.

२१२. पूर्व–अगोदर; पहिला; अगोदरचा.

२१३. प्रयोग, सं. ( प्र+युज्–जोडणें ); उपयोग; योजना.

२१४. वर्गीकरण, सं. (वर्ग+ई+कृ-वेगळें करणें, भेद दाखविणें ); वर्ग बांधणें.

२१५. वर्ग ( वृज्-टाकणें ); जाति

२१६. कार्यकारणभाव, सं. ( कार्य+कारण+भाव ); कार्य आणि कारण यांचा संबंध कार्यकारण-द्वंद्व स. कार्यकारणभाव-ष. त. स.

२१७. भाव ( भू-होणें ); धर्म असणें, भक्ति.

२१८. संज्ञा, सं. ( सम्+ज्ञा-जाणणें ); नांव.

२१९. अनुकूल, सं. ( अनु+कूल्-राखणें ); इच्छेप्रमाणें वागणारें.

२२०. सहायभूत, सं. ( सहाय-भूत ); मदत झालेला क. स.

२२१. सहाय ( सह+अय्-जाणें ); मदत करणारा.

२२२. भूत ( भू-होणें ); झालेला प्राणी, पदार्थ, पिशाच.

२२३. समर्थ, सं. ( सम्+अर्थ्-शक्तिवान् होणें ); शक्तिमान्

२२४. कल्पक, सं. ( कृप्-समर्थ होणें; विचार करणें ); विचार करणारा.

२२५. वैद्य, सं. ( विद्-जाणणें ); शारीरशास्त्र जाणणारा.

२२६. ज्योतिषी, सं. ( ज्योतिस्-ई ); ताऱ्यांची गति जाणणारा.

२२७ ज्योतिस् ( ज्युत्-प्रकाशणें ); तेज; तारा.

२२८. प्राचीन, सं. ( प्र+अञ्च्-जाणें ); मागील.

२२९. शास्त्रवेत्ता, सं. ( शास्त्र+वेत्ता ); शास्त्र जाणणारा ष. त. स.

२३०. वेत्ता ( विद्-जाणणें ); जाणणारा.

२३१. खनिज, सं. ( खनि+ज ); खाणींतून निघणारा. पं. त. स.

२३२. खनि ( खन्-खणणें ); खाण.

२३३. ज ( जन्-उत्पन्न होणें ); उत्पन्न होणारा.

२३४. उद्भिज्ज, सं. ( उद्भिद्+ज ) जमीन फोडून निघणारा, झाडापासून उत्पन्न होणारा, झाडांपैकीं. पं. त. स.

२३५. उद्भिद् ( उत्+भिद्-फोडून वर निघणें ); झाड.

२३६. औषधिरस, सं. ( ओषधि+रस ); वनस्पतींचा रस. ष. त. स.

२३७. ओषधि ( उष्-जाळणें ); झाडपाला.

२३८. रस ( रस्-रुचि देणें ); अंगचें पाणी; गोडी.

२३९. ग्रह, सं. ( ग्रह्-घेणें ); दुसऱ्याचें तेज घेणारा असा आकाशांतील गोल; समजूत; कल.

२४० ऋतु, सं. ( ऋ-जाणें ); दोन महिन्यांचा काळ; योग्य काळ.

२४१. भाकित, सं. ( भाषितं=भाष्-बोलणें ); भविष्य बोलणें.

२४२. प्रचंड, सं. ( प्र+चंड्-रागावणें ); अति भयंकर; अतिमोठा.

२४३. हस्तगत, सं. (हस्त+गत ); मुठींत; ताब्यांत द्वि. त. स.

२४४. हस्त ( हस्-हांसणें ); हात.

२४५. गत ( गम्-जाणें ); गेलेला.

२४६. प्राबल्य, सं. ( प्रबल+य ); श्रेष्ठता.

२४७. प्रबल ( प्र+बल ); शक्तिवान्. ष. ब. स.

२४८. प्र–विशेष.
२४९. बल ( बल्–बांधणें ); शक्ति.
२५०. राष्ट्र, सं. (राज्–शोभणें ); जनसमुदाय.
२५१. शास्त्रप्रवीण, सं. ( शास्त्र+ प्रवीण ); शास्त्रें जाणणारा. स. त. स.
२५२. प्रवीण ( प्र+वि+इ–जाणें ); निष्णात; हुशार; तरबेज.
२५३. वर्चस्व, सं. ( वर्चस्=वर्च्– प्रकाशणें ); श्रेष्ठपणा.
२५४. कलाकौशल्य, सं. (कला+ कौशल्य ); कला जाणणें.
२५५. कला ( क+ला–देणें ) युक्ति.
२५६. क–सुख.
२५७. कौशल्य ( कुशल+य ); चतुराई.
२५८. कुशल ( कुश्–प्रकाशणें ); शहाणा; खुशाल.
२५९. स्वातंत्र्य, सं. ( स्वतंत्र+ य ); मोकळेपणा.
२६०. स्वतंत्र ( स्व+तंत्र ); स्वच्छंदी; मोकळा. ष. ब. स.
२६१. तंत्र ( तंत्र्–अधिकार चालवणें ); धोरण.
२६२. उत्कर्ष, सं. ( उत्+कृष्– ओढणें ); भरभराट.
२६३. सिद्धांत, सं. ( सिद्ध+अंत ); ठरलेलें मत. क. स.
२६४. सिद्ध ( सिध्–साधणें ); ठरलेलें.

## ३. सृष्टींतील चमत्कार इ० ( पृ. ७ ).

२६५. चमत्कार, सं. ( चमत्+कार ); नवल वाटण्याजोगी क्रिया–गोष्ट
२६६. चमत्–अव्यय आश्चर्यार्थी.
२६७. कार (कृ–करणें ); क्रिया, करणें.
२६८. जिज्ञासा, सं. ( ज्ञा–जाणणें ); जाणण्य ची इच्छा; उत्कंठा; हौस.
२६९. उत्तेजन, सं. ( उत्+तिज्– चेतवणें; प्रेरणा करणें ); चढ; भर; मदत.
२७०. सोपा, सं. ( स्वल्प=सु+ अल्प); सहज कळण्यासारखा
२७१. खुबी, फा.–विशेष; आधिक्य.
२७२. झटणें, सं. ( यतन=यत्–प्रयत्न करणें ); खपणें; प्रयत्न करणें.
२७३. प्रौढ, सं. ( प्र+वह्–वाहणें ); वयस्कर; वृद्ध; अनुभवी.
२७४. मजा, आ.–मौज; गम्मत.
२७५. प्रश्न, सं. (प्रच्छ्–विचारणें); विचारणें; पुसणें.
२७६. नवीन, सं. ( नु–स्तुति करणें ); नवा.
२७७. शक्त्यनुसार, सं ( शक्ति+ अनुसार ); शक्तीप्रमाणें; यथाशक्ति.
२७८. अनुसार ( अनु+सृ–जाणें ); प्रमाणें; मागें जाणें.
२७९. समाधान, सं. ( सम्+आ+ धा–धारण करणें ); तृप्ति; पूर्णता.
२८०. रीति, सं. (रि–जाणें); मार्ग; क्रम; तऱ्हा.
२८१. सचेतन, सं. ( स+चेतना ); ज्यांस चलनवलन करण्याची शक्ति आहे.
२८२. स–सहित; तुल्य; सम.
२८३. चेतना (चित्–जीव असणें); जीव, चलनवलनशक्ति.

२८४. संवय, सं. ( सम्+वे-गुंतवणें; गुंफणें ); नाद ; छंद ; वहिवाट.

२८५. आनंद, सं. (आ+नंद्-हर्षयुक्त करणें ) ; हर्ष.

२८६. साधारण, सं. ( स+आ+धृ-धरणें ); समान. सहार्थी ब. स.

२८७. धर्म, सं. ( धृ-धरणें ); गुण; धरलेले.

२८८. सृटिकर्ता, सं. ( सृष्टि+कर्ता ); जगाचा उत्पन्नकर्ता.

२८९. कर्ता ( कृ-करणें ); करणारा.

## ४. पदार्थांच्या तीन स्थिति. ( पृ. ९ ).

२९०. पदार्थ, सं. ( पद+अर्थ ); वस्तु. ष. त. स.

२९१. पद ( पद्-जाणें ); वस्तु, पाऊल, भाग.

२९२. अर्थ ( अर्थ्-मागणें ); नांव; लाभ; प्राप्ति.

२९३. घन, सं. ( हन्-दृढ करणें ); कठीण; पातळ नव्हे; दाट; हातोडा.

२९४. द्रवरूप, सं. ( द्रव+रूप ); पातळ; प्रवाही. ष. ब. स.

२९५. द्रव ( द्रु-ओलें होणें ); पातळ पदार्थ.

२९६. वायुरूप, सं. ( वायु+रूप ); वाऱ्यासारखा. ष. ब. स.

२९७. वायु. ( वा-वाहणें ); वारा.

२९८. उष्णमान, सं. ( उष्ण+मान); उष्णतेचें मान. ष. त. स.

२९९. उष्ण ( उष्-जाळणें); ऊन्ह.

३००. मान ( मा-मोजणें ); प्रमाण; यत्ता. ( मन्-विचार करणें ); गर्व, प्रतिष्ठा.

३०१. दाब, सं. ( दर्प=दृप्-पीडा देणें ); वजन; जोर.

३०२. विषय, सं. ( वि+षि-बांधणें ); गोष्ट, संबंध.

३०३. विवेचन, सं. ( वि+विच्-निर्णय करणें ); स्पष्टीकरण; निवड; खुलासेवार माहिती.

३०४. लोखंड, सं. ( लोहखंड ); लोह; धातुविशेष.

३०५. कागद, फा. ( कागज ); चिंध्या वगैरे कुटून केलेला एक पातळ व लिहिण्यास उपयोगी असा पदार्थ.

३०६. दगड, सं. ( दृषद् ); धोंडा; शिळा.

३०७. निदर्शक, सं. ( नि+दृश्-पहाणें; दाखविणें ); दाखविणारें.

३०८. व्यापणें, सं. ( व्यापन=वि+आप्-मिळवणें ); अडवणें ; भरून टाकणें; भरणें.

३०९. निर्बंध, सं. ( निर्+बंध्-बांधणें ); अटकाव; नियम.

३१०. प्रयत्न, सं. ( प्र+यत्-झटणें ); खटपट; आयास.

३११. विरोध ( वि+रुध्-प्रतिकूल होणें ); प्रतिबंध; अडथळा; अडचण.

३१२. घटक, सं. ( घट्-रचना करणें ); रचना करणारा; बनविणारा.

३१३. परमाणु, सं. ( परम+अणु ); फार बारीक कण. क. स.

३१४. परम-मोठा.

३१५. अणु ( अण्-वांचणें ); बारीक कण.

३१६. एकमेक, सं. ( एकम्+एक ); परस्पर, आपापण.

३१७. आकार, सं. ( आ+कृ-करणें; रूप देणें ); रूप.

३१८. भांडें, सं. ( भाण्ड ); पात्र.
३१९. भंग, सं. ( भञ्ज्–मोडणें ); फोड; तोड; नाश.
३२०. मोकळा, सं. ( मुक्त=मुच्–सोडणें ); खुला; स्वतंत्र.
३२१. अप्रवाही, सं ( न+प्रवाही); न वाहणारा, प्रवाही नसणारा.
३२२. प्रवाही ( प्र+वह्–वाहणें ); वाहणारा.
३२३. रिकामी, सं. ( रिक्तकामा=रिक्त+काम ); खुली, न भरलेली.
३२४. रिक्त ( रिच्=रिकामें होणें ); पोकळ, रिकामें, न भरलेलं.
३२५. काम (कम्-इच्छिणें ); इच्छा, उपयोग, धंदा.
३२६. समावेश, सं. ( सम्+आ+विश–शिरणें ); मावणें; व्यापणें.
३२७. फरक, आ.–बदल; अंतर.
३२८. सूक्ष्ममापक, सं. ( सूक्ष्म+मापक ); लहान पदार्थ मोजणारें. ष. त. स.
३२९. सूक्ष्म ( सूच्–चहाडी करणें); बारीक.
३३०. मापक ( मा–मोजणें ); मोजणारें.
३३१. वस्तुतः, सं. ( वस्तु+तस् ); खरोखर.
३३२. वस्तु ( वस्–राहणें ); पदार्थ.
३३३. असंकोच्य, सं ( न+सं+कोच्य ); आकारानें कमी न होणारें. न. त. स.
३३४. संकोच्य, ( सम्+कुच्–कमी होणे ); दबणारें.
३३५ दुःसंकोच्य, सं. ( दुस्+संकोच्य ); मोठ्या कष्टानें कमी होणारें, दबणारें. अ. क. स.
३३६ संकोचन, सं. ( सम्+कुच्=कमी होणें ); आकारानें कमी होणें; दबणें.
३३७. स्थितिस्थापक, सं. ( स्थिति+स्थापक ); दाब कमी करितांच ज्याला मूळची आकृति येते असा. ष. त. स.
३३८. स्थापक ( स्था–रहाणें ); ( पूर्वस्थिति ) ठेवणारा.
३३९. प्रसरण, सं. ( प्र+सृ–पसरणें ); वाढ; वृद्धि.
३४०. हिंडणें, सं ( हिंडन=हिंड्-फिरणें ); फिरणें.
३४१. भाग, सं. ( भाग्य=भज्–सेवा करणें ); जरूर; अवश्य; प्रदेश.
३४२. घसरणें, सं. ( कुसरण = सृ–सरणें ); निसरणें.
३४३. ओढ, सं. ( उढि=वह्–नेणें ); गति; आकर्षण.
३४४. गुरुत्वाकर्षण, सं. ( गुरुत्व+आकर्षण ); मोठ्या पदार्थाची ओढ.
३४५. आकर्षण ( आ+कृष्–ओढणें ); ओढ.
३४६. गतिस्वातंत्र्य, सं. ( गति+स्वातंत्र्य ); पाहिजे तिकडे जाण्याची मोकळीक.
३४७. गति ( गम्–जाणें ); गमन, जाणें.
३४८. पुंजका, सं. ( पुंजक=पुंज् ढीग करणें ); गोळा; जमाव.
३४९. नियमन ( नि+यम्–स्वाधीन ठेवणें ); ताब्यांत ठेवणें.
३५०. आकर्षणरूप–सं. ( आकर्षण+रूप ) आकर्षण नांवाची.
३५१. स्नेहाकर्षण, सं. ( स्नेह+आकर्षण ); परमाणूंतील परस्परांस ओढण्याची शक्ति.

३५२. स्नेह ( स्निह्–प्रेम करणें, माखणें ); मैत्री.
३५३. निकट, सं.–जवळ; समीप.
३५४. बलवत्तर, सं. ( बलवत्+तर ); अधिक जोरदार.
३५५. बलवत् ( बल+वत् ) बळकट.
३५६. नष्ट, सं. ( नश्–नाश पावणें ); नाहींसा झालेला.
३५७. काठिन्य, सं. ( कठिन+य ); कठीणपणा.
३५८. सामान्य, सं. ( समान+य ); साधारण.
३५९. समान ( स+मान ) सारख्या प्रमाणाचें; सारखें.

## ५. गुरुत्वाकर्षणाचा नियम काढण्याविषयीं ( पृ. १२ )

३६०. विद्वान्, सं. ( विद्–जाणणें ); शहाणा; पंडित.
३६१. कल्पना, सं. ( क्लृप्–समर्थ होणें ); विचार.
३६२. पदार्थविज्ञान, सं. ( पदार्थ+विज्ञान ); पदार्थांच्या गुणधर्मांचें शास्त्र.
३६३. विज्ञान, सं. ( वि+ज्ञा–जाणणें); विशेष ज्ञान; माहिती.
३६४. विलक्षण, सं. ( वि+लक्षण ); विशेष तऱ्हेचे.
३६५. लक्षण ( लक्ष्–पाहणें ); स्थिति, चिन्ह.
३६६. निवारण, सं. ( नि+वार्–टाळणें ); काढून टाकणें, दूर करणें.
३६७. लोकोत्तर, सं. ( लोक+उत्तर ); लोकांत विशेष महत्वाची. स. त. स.
३६८. लोक, सं. ( लोक्–पहाणें ); जन, जग, स्वर्गांतील स्थान.
३६९. उत्तर, ( उत्+तर ); फार; ( उत्+तॄ–तरणें ) जबाब.
३७०. आधार, सं. ( आ+धृ=धरणें ); आश्रय; रक्षण.
३७१. भ्रांति, सं ( भ्रम्-फिरणें ); संशय; शंका; मोह.
३७२. चलनवलन, सं. ( चलन+वलन ); हालचाल.
३७३. चलन ( चल्–हालणें ); हालणें.
३७४. वलन ( वल्–हालणें); हालणें.
३७५. चालक, सं. ( चल्–चालणें ); हालविणारा; फिरविणारा.
३७६. निर्जीव, सं. ( निर्+जीव ); अचेतन; प्राणरहित.
३७७. जीव ( जीव्–जगणें ); प्राण.
३७८. तर्क, सं. ( तर्क्–कल्पना करणें ); कल्पना; अनमान.
३७९. अधोगति; सं. ( अधः+गति ); खालीं पडणें. अ. त. स.
३८०. अधः–खालीं.
३८१. कल, सं. ( कल्–जाणें ); ओढ, गति, रेत.
३८२. पृथ्वीकृत, सं. ( पृथ्वी+कृत ); पृथ्वीनें केलेलें. तृ. त.
३८३. पृथ्वी (पृथु+ई); भुई, माती.
३८४. पृथु ( पृथ्–फेकणें ); मोठें.
३८५. कृत ( कृ–करणें ); केलेलें.
३८६. ईश्वर, सं. ( ईश्–समर्थ होणें ); देव; समर्थ; श्रेष्ठ.
३८७. अधःपतन, सं.(अधः+पतन); खालीं पडणें.
३८८. पतन ( पत्–पडणें ); पडणें.
३८९. अधांतर, सं. ( अधोन्तर=अधः+अंतर ); मध्येंच पोकळी.

३९०. निःसंशय, सं. ( निस्+संशय ); खात्रीनें; संशयाशिवाय. पं व. स.

३९०. (अ) संशय, ( सम्+शी-शंका घेणें ); शंका.

३९१. द्रव्यपरिमाण, सं. ( द्रव्य+परिमाण ); पदार्थांच्या परमाणूंची यत्ता.

३९२. द्रव्य ( द्रु-पातळ होणें ); पदार्थ.

३९३. परिमाण ( परि+मान ); माप; यत्ता.

३९४. मेज, आ.-चौरंग; टेबल.

३९५. समोरासमोर, सं. (समोर-समोरः=स+उरस् ); एकमेकांकडे ऊर करून. स. व. स.

३९६. सम (सम्-घोटाळा न होणें); सारखा.

३९७. उरस्-ऊर; छाती.

३९८. प्रकृत्यंश, सं. ( प्रकृति+अंश ); मूळ द्रव्याचे भाग किंवा परमाणु.

३९९. प्रकृति ( प्र+कृ-करणें ); मूळ द्रव्य, मूळ स्वभाव.

४००. अंश ( अंश्-विभागणें ); भाग.

४०१. प्रतिबंध, सं. ( प्रति+बंध्-अटकाव करणें ); अटकाव, हरकत.

४०२. लोहचुंबक, सं. ( लोह+चुंबक ); लोखंडास ओढणारा एक धातु ष. त. स.

४०३. लोह-लोखंड.

४०४. चुंबणें ( चुंब्-चुंबणें, ओढणें ); ओढणारा.

४०५. सुई, सं. ( सूचि=सूच्-चहाडी करणें ); शिवण्याचें एक साधन.

४०६. माड, सं.-नारळीचें झाड.

४०७. शेवट, सं. ( सीमांत=सीमा+अंत ); अखेर; संपण्याची जागा.

४०८. सीमा ( षी-बांधणें ); मर्यादा, हद्द.

४०९. आकाश, सं. ( आ+काश्-प्रकाशणें ); आभाळ, आपल्या डोक्यावर निळें जें दिसतें तें.

४१०. तारा, सं. ( तृ-तरणें; नक्षत्र ); चांदणी

४११. वस्तुगत्या, सं. ( वस्तु+गति+आ ); साहजिक रीतीनें.

४१२. आरपार, सं. (अवर+पार); ह्या बाजूपासून त्या बाजूपर्यंत.

४१३. अवर-अलीकडील.

४१४. पार-( पर+अ ) पलीकडील ( बाजू ).

४१५. पर-दुसरी, उत्तम, पलीकडील.

४१६. प्रत्यय, सं. (प्रति+इ-जाणें); अनुभव.

४१७. लक्षावधिपट, सं. ( लक्ष+अवधि+पट ) ; लाखोंपट.

४१८. पट, ( पट्-वेष्टणें; गुंडाळणें ); आवृत्ति, वस्त्र.

४१९. क्षुल्लक, सं. (क्षुल्ल+क)लहान; अल्प; क्षुद्र.

४२०. सर्वव्यापक, सं.( सर्व+व्यापक ); सर्वांशीं लागू पडणारा; सर्वसाधारण. ष. त. स.

४२१. सर्व-सगळा.

४२२. व्यापक (वि+आप्-मिळणें ); सर्वांशीं लागू पडणारा; सर्वसाधारण.

## ६. द्रवरूप पदार्थांचा पृष्ठभाग इ० ( पृ. १७ ).

४२३. पृष्ठभाग, सं. ( पृष्ठ+भाग ); पाठीची जागा; मागचा भाग; वरचा भाग. ष. त. स.

४२४. पृष्ठ–पाठ; वरील बाजू.
४२५. भाग (भंज्–फोडणें); प्रदेश; अंश; तुकडा.
४२६. क्षितेज, सं. ( क्षिति+ज ); सपाट मैदानांत उभें राहिलें असतां पृथ्वी व आकाश ज्या ठिकाणीं मिळाल्याचा भास होतो ती वक्र रेषा.
४२७. क्षिति ( क्षि–नाश पावणें ); पृथ्वी.
४२८. समांतर, सं. ( सम+अंतर ); सारख्या अंतरावरचा. ष. ब. स.
४२९. क्षणमात्र, सं. (क्षण+मात्र ); पळभर.
४३०. क्षण ( क्षि–जाणें; नाश होणें ); पळ.
४३१. स्थिर, सं. ( स्था–राहणें ); शांत; निश्चल.
४३२. पुरता, सं. ( पूरित=पृ–भरणें ); पूर्ण; हवा तेवढा; पक्का.
४३३. घर्षणविरोध, सं. ( घर्षण+विरोध ); एक पदार्थ दुसऱ्याशीं घासत गेल्यानें त्यास होणारा प्रतिबंध किंवा अडथळा.
४३४. घर्षण ( घृष्–घासणें ); घासणें.
४३५. सपाटी, म. ( सपाट+ ई ); जीवर खळगा किंवा उंचवटा नाहीं अशी सारखी जमीन किंवा पृष्ठभाग.
४३५. ( अ ) सपाट, सं. ( सपृष्ठ=स+पृष्ठ ); ज्याचे पृष्ठावर उंचवटा किंवा खळगा नाहीं.
४३६. नीच, सं.–खालचा; उतरता; हलका.
४३७ खालावणें, म. ( खालीं+आव+णें ); उतरणें; खालीं होणें.
४३८. लंबरेषा, सं. ( लंब+रेषा ); आडव्या रेषेशीं काटकोन करणारी उभी रेषा. क. स.
४३९. लंब ( लंब्–लोंबणें ); काटकोनात असणारी रेषा, लांबट.
४४०. रेषा ( रिष्–पीडा देणें ); रेघ.
४४१. काटकोन, म.–९० अंशांचा कोन; लंब रेषेच्या दोहों बाजूंस आडव्या रेषेवर होणाऱ्या कोनापैकीं एक.
४४२. पाणसळ, सं ( पानीयशलाका=पानीय+शलाका ); स्थिर पाण्याची सपाटी ज्याच्या योगानें कळते असें यंत्र.
४४३. पानीय ( पा–पिणें ); पाणी.
४४४. शलाका ( शल्–जाणें ); रेघ; सळई.
४४५. समुद्रगामिनी, सं. (समुद्र+गामिनी ); समुद्रास मिळणारी.
४४६. समुद्र ( सम्+उद्–ओलें होणें ); सागर.
४४७. गामिनी ( गामिन्+ई ); जाणारी.
४४८. गामिन् ( गम्–जाणें ); जाणारा.
४४९. पातळी, म.–पातळ पदार्थाची स्थिरता दाखविणारें साधन;–स्थिति.
४५०. व्यवहार, सं. ( वि+अव+हृ–वागणें ); वर्तन; व्यापार; उद्योग.
४५१. क्षेत्र, सं. ( क्षि–झिजणें ); स्थल; जागा.
४५२. बैठक, उ.– चौकी; आसन; बसणें; व्यवस्था.
४५३. विवक्षित, सं. ( वि+वच्–बोलणें ); बोलूं इच्छिलेलें.

४५४. कारंजें, फा. ( कारेज ); पाण्याची विशेष तोटी; विशेष रचना.

४५५. उच्छ्वास, सं. (उत्+श्वास ); पाणी चढवून सांठवून ठेवण्याची जागा.

४५६. श्वास ( श्वस्–श्वास घेणें; चढवणें ); दम.

४५७. हजारा, फा. ( हजारह ); कारंजांतून पाणी वर उडण्याकरितां नळीच्या तोंडाशीं अनेक भोंकांची तवकडी बसविली असते ती किंवा तशा तोटीचें कारंजें.

४५८. काक, इं.–तोटी; पातळ पदार्थ असलेल्या भांड्याला किंवा नळीला जोडलेलें बंद करण्याचें किंवा सोडण्याचें साधन.

४५९. उगम, सं. ( उद्गम=उत्+गम्–जाणें ); उत्पत्ति.

४६०. तळें, सं ( तल्ल=तल्–स्थिर होणें; पूर्ण होणें ); सांचविलेल्या पाण्याची जागा.

४६१. सान्निध्य, सं. ( सन्निधि+य ); शेजार.

४६२. सन्निधि, ( सम्+नि+धा–ठेवणें; पोसणें ); जवळची जागा.

## ७. विशिष्टगुरुत्व. (पृ. २१)

४६३. विशिष्ट, सं. ( वि+शिष्–अधिक होणें ; विशेष पदार्थांच्या वजनाशीं तोललेलें.

४६४. तरंगणें, सं. ( तरंग+णें ); तरंगाप्रमाणें न बुडतां वर राहणें.

४६५. तरंग ( तॄ–तरणें ); सांका; लाट.

४६६. ओतणें, सं. ( अवतरण=अव+तॄ–तरणें ); पातळ पदार्थ वरून सोडणें.

४६७. वजन, आ.–भार; ओझें.

४६८. सबंध, सं. ( स+बंध ); सगळा. सहार्थी ब. स.

४६९. घनाकार, सं. ( घन+आकार ); ज्याची लांबी, उंची व जाडी सारखी अशा आकाराचा.

४७०. परस्परविरुद्ध, सं ( परस्पर+विरुद्ध ); एकमेकांशीं उलट.

४७१. परस्पर ( पर+पर ) एकमेक.

४७२. समतोलन, सं. ( सम+तोलन ); सारखे तोलाचें.

४७३. तोलन ( तुल्–तोलणें ); वजन.

४७४. थर, सं. ( स्तर=स्तॄ–पसरणें ); रचना; मांडणं; लेप.

४७५. क्षेत्रफळ, सं. ( क्षेत्र+फल ); क्षेत्राच्या लांबीरुंदीचा गुणाकार; मोजणी.

४७६. फल ( फल्–उत्पन्न होणें ); माप; सिद्धि; परिणाम.

४७७. उद्धरणशक्ति, सं. ( उद्धरण+शक्ति ); वर उचलून धरण्याची शक्ति.

४७८. उद्धरण ( उत्+धृ–उचलून धरणें ); वर उचलणें.

४७९. तोटी, सं. ( त्रोटी=त्रुट्–फोडणें ); चोंचीच्या आकाराचें तोंड.

४८०. तवकडी, उ. ( तवक+डी ); लहान तवक.

४८१. सुटी, हिं. [ सं. ( सृष्ट )=सृज्–टाकणें; मोकळें सोडणें+(म) ई ]; मोकळी; न बसविलेली.

४८२. दाट, सं. ( दृढ=दृह्-वळकट करणें ); ज्याचे परमाणु फार जवळ आहेत, घट्ट.

४८३. विरळ, सं. (विरल); ज्याचे परमाणु दूर दूर असतात.

४८४. सांद्रता, सं. ( सांद्र+ता ); घट्टपणा; दाटपणा.

४८५. सांद्र ( स+अन्द्र=अंद्-बांधणें ); घट्ट.

४८६. वैरल्य, सं. ( विरल+य ); विरलपणा.

४८६. (अ) बाटली, इं. ( बाटल ); मोठी कुपी.

४८७. पोहणें, सं. ( प्लवन=प्लु-तरणें; उड्या मारणें ); पाण्यावर तरून जाणें.

४८७. ( अ ) शक्य, सं.-(शक्-समर्थ होणें ); होण्याजोगें.

४८८. गुदमरणें, सं. ( गूढमरण=गूढ+मरण); श्वास कोंडल्यानें मरायला होणें.

४८९. गूढ, सं. ( गुह्-लपविणें; वेष्टणें ); वेष्टिलेलें; कोंडलेलें.

४९०. मरण ( मृ-मरणें ); जीव जाणें.

४९१. मुकणें, सं. ( मुंचन=मुञ्च्-सोडणें; ); सोडणें; टाकणें.

४९२. इंद्रिय, सं. ( इंद्-ऐश्वर्य असणें ); शरिरांतील ज्ञानाचें किंवा कर्माचें साधन.

४९३. बुडणें, सं. ( बोलन-बुल्-बुडणें ); पाण्यांत जाणें.

४९४. भरींव, म.-भरलेलें.

४९५. आघात, सं. ( आ+हन्-मारणें ); धक्का; तडाका.

४९६ मध्यंतर, सं. ( मध्यांतर=मध्य+अंतर ); मध्य; मधली जागा. क. स.

४९६. ( अ ) मध्य-मधला भाग.

४९७. भाता, सं. ( भस्त्रा=भस्-खाणें ); वारा फुंकण्याचें एक साधन; बाण ठेवण्याची जागा.

## ८. कविता-उत्तम गुणलक्षणें ( पृ. २६ ).

४९८. कविता, सं. (कवि+ता);पद्य.

४९९. ओंवी, म. ( ओंव-गुंफणें ); विशेष पद्यरचना.

५००. दासबोध, सं. (दास+बोध); रामदासाचा लोकांस ( शिष्यांस ) बोध.

५०१. दास ( दास्-सेवा करणें ; देणें ); सेवक.

५०२. बोध, सं. ( बुध्-जाणणें ); उपदेश; ज्ञान.

५०३. उत्तम, सं. ( उत्+तम ); उत्कृष्ट.

५०४. गुण, सं. ( गुण्-बोलावणें ); धर्म.

५०५. श्रोता, सं. ( श्रु-ऐकणें ); ऐकणारा.

५०६. सावधान, सं. ( स+अवधान ); एकचित्त; लक्षयुक्त; एकाग्र; जागृत.

५०७. अवधान (अव+धा-लक्ष देणें ); लक्ष; जागृति.

५०८. बाणणें, सं. ( बाणन=बण्-शब्द करणें ); बिंबणें; मनांत भरणें; शिरणें.

५०९. वक्ता, सं. ( वच्-बोलणें ); बोलणारा.

५१०. ऐक्यता, सं. ( ऐक्य+ता ); एकी.

५११. ऐक्य ( एक+य ); एकपणा.

५१२. तोंडाळ, म. ( तोंड+आळ ); तोंडाचा वाईट उपयोग करणारा; भांडखोर.

५१३. तोंड ( तुंड्–फाडणें ); मुख.
५१४. तंडणें, सं. ( तंडन=तड् मारणें ); वाद करणें; भांडणें.
५१५. अंतर्याम, सं. ( अंतर्+याम=यम्–ताब्यांत ठेवणें ); हृदय ; अंतःकरण.
५१६. अंतर्–आंत.
५१७. याम ( यम्–स्वाधीन ठेवणें ) ; दाब.
५१८. पुरुषार्थ, सं. ( पुरुष+अर्थ ); पराक्रम. ष. त. स.
५१९. पुरुष–मनुष्य.
५२० वाष्कळपणा, सं. ( वाष्कळ+पणा ) ; वाष्कळ ह्मणून एक ऋग्वेदाची शाखा आहे त्या शाखेचे लोक फार अव्यवस्थित असतात त्यावरून वाष्कळपणा ह्मणजे अव्यवस्थितपणा.

५२१. होड, सं. ( होड्=धिक्कारणें ); पण; करार.
५२२. अदेखणेपण, म. (न+देखणेपण ) ; दुष्टपणा.
५२३. देखणा–म. सुरेख.
५२४. अंगबळ, सं. ( अंग+बळ ); अंगचा जोर. ष त. स.
५२५. अंग ( अग्–जाणें ) ; शरीर; अवयव.
५२६. बळ ( बल–बल्–वांचणें ; देणें ) ; शक्ति.
५२७. पिशुन, सं. ( पिश्–आकृति देणें ) ; चहाड ; नीच.
५२८. ग्वाही, फा.–साक्ष ; खातरजमा.
५२९. उणें, सं. ( ऊन=ऊन्–कमी करणें ) ; कमी.
५३०. अप्रमाण, सं. ( न+प्रमाण ); ज्यावर भरंवसा ठेवतां येत नाहीं ; निराधार. न. ब. स.
५३१. प्रमाण ( प्र+मा–मोजणें ); आधार.
५३२. दुश्चितपणा, म. ( दुश्चित्त+पणा ) ; हयगय ; दुर्लक्ष्य.
५३३. दुश्चित ( दुस्+चित्त ) ; बिघडलेल्या मनाचा. ष. ब. स.
५३४. चित्–( चिंतणें ) ; लक्ष ; मन.
५३५. अवकाळ, सं. ( अवकाल=अव+काल ); अयोग्य वेळ. अ. पू. क. स.
५३६. अवलक्षण, सं. ( अव+लक्षण ) ; वाईट लक्षणाचा. ष. ब. स.
५३७. समास, सं. ( सम्+अस् एकत्र करणें ) ; अध्याय ; भाग.

## ९. गिरसाप्पाचा धबधबा.

( पृ. २८. )

५३८. धबधबा, म. ( धब+धब+आ); पाणी पडतांना धबधब शब्द करणारा पाण्याचा झोत.
५३९. सरहद्द, फा. ( सर+हद्द ); शीव.
५४०. सर–मुख्य.
५४१. हद्द–मर्यादा.
५४२. आसपास, सं. ( पार्श्व ); अलीकडे पलीकडे. ( पास शब्दाची द्विरुक्ति ).
५४३. चंड, ( चड्–रागावणें ); रागीट.
५४४. दुथडी, सं. ( दु+थडी=द्वि+तट ) ; दोन्ही तीरें.
५४५. द्वि–दोन.
५४६. तट ( तट्–बांधणें, उंच करणें ); तीर; कांठ; जमीन; प्रांत.

५४७. अकटोविकट, सं. (अकट:+ विकट: ); अत्यंत भयंकर.
५४८. अकट ( अ+कट ); निरर्थक.
५४९. विकट ( वि+कट ); फार वाईट.
५५०. आच्छादित, सं. ( आ+ छद्–झांकणें ); वेष्टित; झांकलेलें.
५५१. भव्य, सं. ( भू–होणें ); मोठा.
५५२. कानठळी, सं. ( कर्णस्थली= कर्ण+स्थली); कानाचा प्रांत; कर्णेंद्रिय.
५५३. कर्ण ( कर्ण्–ऐकणें ); कान.
५५४. स्थली ( स्थल्–राहणें ); प्रांत; देश.
५५५. प्रवाशी, सं.(प्र+वस्–राहणें); गांवोगांव फिरणारा.
५५६. आवरण, सं. ( आ+वृ–झांकणें ); आच्छादन.
५५७. परावर्तन, सं. ( परा+वर्तन ); मागें वळणें. अ. पू. क.
५५८. भूगव्हर, सं. ( भू+गव्हर ); दरी; भूमींतील सखल प्रदेश; खळगा. स त. स.
५५९. भू ( भू–होणें ) पृथ्वी.
५६०. गव्हर ( गाह्–लपणें ); दरी; गुहा.
५६१. रावण, सं. रु–ओरडणें ); ओरडणारा.
५६२. काळाकभिन्न, म. ( काळा+ कभिन्न ); काळाभोर; अतिकाळा.
५६३. काळा, सं. ( काल ) कोळसा व काजळ यांच्या रंगाचा.
५६४. दाह, सं. ( दह्–जाळणें ); उष्णता.
५६५. तुषार, सं. ( तुष्–संतुष्ट होणें ); बारीक कण.
५६६ धोतं, सं. ( धौत=धाव्–पळणें ); प्रवाह; ओघ.
५६७. निश्चित, सं. ( निस्+चि–जमविणें ); ठाम; पक्कें.
५६८. दरड, सं. ( दरद=दर+द ); नदीच्या अथवा ओढ्याच्या कांठावरील उंच व भयंकर जागा; कडा; डोंगर.
५६९. दर ( दृ–फाडणें ); भय.
५७०. द ( दा–देणें ); देणारें.
५७१. भास, सं. ( भास्–वाटणें ); कल्पना.
५७२. कल्होळ, सं. ( कल्लोल ); गोंगाट; गर्जना
५७३. धूमकेतु, सं. ( धूम+केतु ); शेंडेनक्षत्र. ष. त. स.
५७४. धूम ( धू–कांपणें ); धूर.
५७५. केतु(केत्–बोल वणें);निशाण.
५७६. उल्कापात, सं. ( उल्का+ पात ); ताऱ्याचें पडणें–गळणें. ष. त. स.
५७७. उल्का–तारा.
५७८. प्रकाशमाला, सं. ( प्रकाश+ माला ); तेजाची ओळ; रांग. ष. त. स
५७९. प्रकाश ( प्र+काश्–तेज पाडणें ); उजेड; तेज.
५८०. माला–(माल्–धारण करणें); ओळ; रांग.
५८१. स्वयंप्रकाश, सं ( स्वयं+ प्रकाश ); आपल्या तेजानें चमकणारे. ष. ब. स.
५८२. स्वयं–स्वत:चा.
५८३. पादावलंबी, सं. ( पाद+ अवलंबी ); पायापर्यंत लोंबणारा; पायघोळ.
५८४. पाद ( पद्–जाणें ), पाय.
५८५. अवलंबी(अव+लंब्–लोंबणें); लोंबणारा.

५८६. उज्ज्वल, सं. ( उत्+ज्वल्-प्रकाशणें ); चकचकणारा; स्वच्छ; सुरेख.

५८७. परिधान, सं. ( परि+धा-वापरणें ); धारण; नेसणें.

५८८. दृष्टिगोचर, सं. ( दृष्टि+गो+चर ); दृष्टीस पडणारा. द्वि. त. स.

५८९. दृष्टि ( दृश्-पहाणें ); पहाणें; नेत्र.

५९१. गो–इंद्रिय, गाय.

५९२. चर ( चर्–चालणें ); जाणारा.

५९३. इंद्रधनुष्य, सं. ( इंद्र+धनुष्य ); आकाशांतील एक धनुष्यकार चमत्कार.

५९४. इंद्र ( इंद्–ऐश्वर्य असणें ); देवांचा राजा.

५९५. धनुष्य, (धन्–शब्द करणें); तीरकमठा.

५९६, जादू, फा.–भूतचेष्टा.

५९७. शृंग, सं. ( शृ–विदारणें; फाडणें ); शिखर.

५९८. तुषारस्तंभ, सं. ( तुषार+स्तंभ ); तुषारांचा खांब, समुदाय.

५९९. स्तंभ ( स्तंभ्–थांबवणें ); खांब.

## १०. हिमनद्या व हिमशिलापात ( पृ० ३४).

६००. हिमनदी, सं. (हिम+नदी ); पाणी गोठून उत्पन्न झालेली नदी.

६०१. हिम ( हन्–गुणणें ); गोठलेलें पाणी, बर्फ.

६०२. नदी–( नद्–शब्द करणें ); पाण्याचा मोठा प्रवाह.

६०३. निराकृति, सं. ( निर्+आकृति ); आकाररहित. प. व. स.

६०४. आकृति ( आ+कृ–करणें ); आकार, मूर्ति.

६०५. बर्फ, फा.–गोठलेलें पाणी.

६०६. घनीभवन, सं. ( घनी+भवन ); घन ( घट्ट ) नसतां घन होणें. घनी ( घन+ई ); नसतां होणें या अर्थी बहुतेक नामांपुढें ‘ कृ ’ ‘ भू ’ आणि ‘ अस् ’ हे धातु असतां नामाच्या अंत्यास ‘ ई ’ विकार होऊन नामसाधित धातु होतात; परंतु उकारांत नामास दीर्घादेश होतो. जसें:–घनीभवन; बाष्पीभवन; वायूभवन इ०.

६०७. वर्षाव, हिं. ( वृष्–शिंपडणें); पाऊस पडणें; शिंपडा.

६०८. संघात, सं. ( सम्+हन्–मारणें; एकत्र जमणें ); समूह.

६०९. अंतर्गत, सं. ( अंतर्+गत); आंत गेलेलें, आंतील.

६१०. अत्युच्च, सं. ( अति+उच्च ); अतिशय उंच. अ. पू. क. स.

६११. अति–फार, पर्लीकडे.

६१२. उच्च–( उच्–एकत्र होणें ); उंच.

६१३. हिममर्यादा, सं. ( हिम+मर्यादा ); जेथ हिमास आरंभ होतो ती पर्वताची उंची.

६१४. मर्यादा, ( मर्या+दा–देणें ); सीमा; हद्द.

६१५. मर्या–हद्द.

६१६. बाष्परूप, सं. (बाष्प+रूप); वाफेचें रूप.

६१७. बाष्प—वाफ.

६१८. समशीतोष्ण, सं. ( सम+शीत+उष्ण ); जेथें थंडी व उष्णता सारखी असते. स. व. स.

६१९. शीत–थंड.

६२०. कटिबंध, सं. ( कटि+बंध ); पृथ्वीच्या पृष्ठाचे शीतोष्णाच्या संबंधानें कल्पिलेले भाग. ष. त. स.

६२१. कटि–कमर.

६२२. बंध, सं.–बांधणी, बांधण्याची वस्तु.

६२३. रेखांकित, सं. ( रेखा+अंकित ); रेघा काढलेला; रेघा मारलेला. तृ. त. स.

६२४. रेखा–रेघ.

६२५. अंकित ( अंक्–चिन्ह करणें ); खूण केलेला.

६२६. डांब, सं. ( स्तंभ=स्तंभ्–थांबणें ); मेख; खुंटी.

६२७. पिस्तूल, फ्रें.–लहान बंदूक.

६२८. आकस्मिक, सं. ( अकस्मात्+इक ); एकाएकीं झालेलें.

६२९. उध्द्वस्त, सं. ( उत्+ध्वस्त ); ओसाड झालेलें; नाश पावलेलें.

६३०. ध्वस्त (ध्वंस्–नाश पावणें ); नाश पावलेलें.

६३१. चेष्टा, सं. ( चेष्ट्–हलणें; तडफडणें ); प्रकार; व्यापार; क्रिया.

६३२. हिमौघ, सं. ( हिम+ओघ ); बर्फाचा प्रवाह. ष. त. स.

६३३. ओघ–( उच्–एकत्र होणें ); प्रवाह.

६३४. पर्वतप्राय, सं. ( पर्वत+प्राय ); पर्वतासारखा; पर्वततुल्य. तृ. त. स.

६३५. पर्वत–डोंगर.

६३६. प्राय ( प्र+अय्–जाणें ); सारखा; सदृश.

६३७. उष्णतर, सं. ( उष्ण+तर ); अधिक उष्ण.

६३८. पलटी, सं. ( पर्यस्ति–परि+अस्ति ); उलथापालथ.

६३९. अस्ति–( अस्–टाकणें ); टाकणें.

## ११. वातावरण ( पृ. ४०. )

६४०. वातावरण, सं. ( वात+आवरण ); पृथ्वीस तिच्या सभोंवतीं जें वायूचें वेष्टन आहे तें.

६४१. वात ( वा–वाहणें ); वारा.

६४२. विवरण, सं. ( वि+वृ–स्पष्ट सांगणें ); स्पष्टीकरण; अर्थ.

६४३. उपलब्ध, सं. ( उप+लब्ध); मिळण्यासारखी.

६४४. उप–जवळ; पोटचें; विशेष.

६४५. लब्ध( लभ्–मिळणें ); मिळालेला.

६४६. प्रयास, सं. (प्र+यस्–प्रयत्न करणें); यत्न; श्रम.

६४७. अनुमानसिद्ध, सं. ( अनुमान+सिद्ध ); तृ. त. स. अजमासानें ठरविलेलें.

६४८. अनुमान, ( अनु+मा–मोजणें ); तर्क.

६४९. निश्चयात्मक, सं. ( निश्चय+आत्मन्+क ); निश्चयाचें; ठरींव. ष. व. स.

६५०. निश्चय, ( निस्+चि–गोळा करणें ); ठरींव मत.

६५१. आत्मन्, ( अत्–बांधणें ); जीव, इंद्रिय.

६५२. संधिप्रकाश, सं. ( संधि+प्रकाश); सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर जो थोडा प्रकाश राहतो तो.

६५३. संधि, (सम्+धा–ठेवणें); दिवस किंवा रात्र होण्यापूर्वींचा वेळ.

६५४. चंचलता, सं. (चंचल+ता); चंचलपणा.

६५५. चंचल (चञ्च्–हालणें); अति हालणारा.

६५६. कक्षा, सं.–ग्रहांचा सूर्याभोंवतीं फिरण्याचा मार्ग.

६५७. आक्रमणें, सं. (आक्रमण= आ+क्रम्–चालणें); जाणें; फिरणें.

६५८. वावटळ, सं. (वातुल–वायुस्थल); वाऱ्याची घोटाळलेली गति.

## १२. वातावरणाचा दाब. (पृ० ४२).

६५९. यथार्थ, सं. (यथा+अर्थ); खरा; रीतीचा. अ. स.

६६०. यथा–जसा.

६६१. यांत्रिक, सं. (यंत्र+इक); यंत्रसंबंधीं.

६६२. यंत्र (यंत्र्–संकुचित करणें); साधन.

६६३. वाताकर्षक, सं. (वात+आकर्षक); वारा ओढून घेणारें. ष. त. स.

६६४. आकर्षक, (आ+कृष्–ओढणें); ओढून घेणारें.

६६५. निर्वात, सं. (निर्+वात) जेथें वारा नाहीं असें. पं. व. स.

६६६. मण, तु.–वजनी चाळीस शेर.

६६७. सोट, सं. (शुद्ध=शुध्–शोधणें); उभा सरळ खांब.

६६८. मणकी, म. (मण+की); मणाचें वजन.

६६९. तंतोतंत, सं. (ततानुतत); पूर्णांशीं बरोबर; सारखें.

६७०. तत (तन्–पसरणें); वाढलेलें.

६७१. अनुतत (अनु+तत); तितकें वाढलेलें.

६७२. मज्जा, सं. (मस्ज्–बुडणें); मेंदू; मांदें; वीर्य उत्पन्न करणारी धातु.

६७३. रंध्र, सं. (रध्–पीडा देणें); भोंक; छिद्र.

६७४. रक्ताभिसरण, सं. (रक्त+अभिसरण); रक्ताचें चलनवलन. ष. त. स.

६७५. रक्त–(रञ्ज्–रंगविणें); शरीरांतील तांबड्या रंगाचा द्रवरूप धातु.

६७६. अभिसरण, (अभि+सृ–पुढें जाणें); पसरणें, वाहणें.

६७७. अभि–अत्यंत; जवळ; समोर.

६७८. कातडें, सं. (कृत्ति–कृत्–कापणें); सालटें; साल.

६७९. पतंग, सं. (पतत्+अंग); फुलपांखरूं.

६८०. पतत् (पत्–पडणें; उडणें); उडणारें.

६८१. सावण, आ.–स्वच्छ करणारा एक पदार्थ.

६८२. विकृत, सं. (वि+कृत); विकार झालेलें; वाईट केलेलें.

६८३. अपाय, सं. (अप+इ–जाणें); बाधा; पीडा.

## १३. वायुभारमापक यंत्र. (पृ० ४६.)

६८४. वायुभारमापक, सं. (वायु+भार+मापक); हवेचें वजन मोजणारें (यंत्र).

६८५. भार (भृ–भरणें); वजन.

६८६. वंब, हिं. ( वंबा ); पाणे उंच उडविण्याचें साधन.

६८७. ड्यूक, इं.–इंग्लंदांतील वडे लोकांतील एक पदवी.

६८८. विहीर, सं. ( विकिर=वि+कॄ–फेकणें ); पाण्याकरितां खणलेला बांधीव खळगा.

६८९. तत्ववेत्ता, सं. ( तत्व+वेत्ता ); मुख्य गोष्ट जाणणारा.

६९०. तत्त्व ( तत्+त्व ); मर्म; मुख्याची गोष्ट; खरी गोष्ट.

६९१. वेत्ता (विद्–जाणणें ); ज्ञानी.

६९२. सयुक्तिक, सं. ( स+युक्ति+क ); योग्य; उपयोगी पडणारें; लागू.

६९३. युक्ति ( युज्–योजणें; जोडणें ); योजना.

६९४. अभिप्राय, सं. ( अभि+प्र+इ–जाणें ); हेतु.

६९५. धर्माभिमानी, सं. ( धर्म+अभिमानी ); धर्माचा अभिमान वाळगणारा. ष. त.

६९६. अभिमानी ( अभिमान+ई ); अभिमान वाळगणारा.

६९६. ( अ. ) अभिमान–( अभि+मन्–मानणें ); गर्व.

६९७. छळ, सं. ( छल्–पीडा देणें); पीडा; त्रास.

६९८. विशाळवुद्धि, सं. ( विशाल+वुद्धि ); मोठी वुद्धि.

६९९. विशाल–उंच; मोठी.

७००. वुद्धि ( वुध्–जाणणें ); शहाणपण; ज्ञान.

७०१. ख्याति, सं. ( ख्या–सांगणें ); कीर्ति; प्रसिद्धि.

७०२. समर्पक, सं. ( सम्+ऋ–जाणें ); योग्य; चोख.

७०३. फिकीर, आ. ( फकर ); काळजी.

७०४. तत्कालीन, सं. ( तत्+काल+ईन ); त्या वेळचा; तेव्हांचा. तत्–तो.

७०५. प्रयोगशून्य, सं. ( प्रयोग+शून्य ); अनुभव न घेतलेलें; प्रयोग वगैरे करुन न पाहिलेलें. तृ. त. स.

७०६. शून्य–रहित; शिवाय.

७०७. उपहास, सं. ( उप–हस–हसणें ); निंदा; थट्टा.

७०८. तदनुरोध, सं. ( तत्+अनुरोध ); त्याचा आधार.

७०९. अनुरोध, ( अनु+रुध्–प्रमाणें वर्तन करणें ); आधार; धोरण.

७१०. तारिसेलीनिर्मित, हिं. ( तारिसेली+निर्मित ); तारिसेली नामक ग्रीक तत्त्ववेत्त्यानें तयार केलेली.

७११. निर्मित, सं. ( निर्+मा–उत्पन्न करणें ); उत्पन्न केलेली.

७१२. पारदस्तंभ, सं. ( पारद+स्तंभ ); पाऱ्याची उंची.

७१३. पारद–पारा.

७१४. प्रतीति, सं. (प्रति+इ–जाणें); प्रत्यय; अनुभव; प्रचीति.

७१५. लंबरूप, सं. ( लंब+रूप ); लंबाप्रमाणें सारखा उभा. ष. व. स.

७१६. तुफान, आ.–वादळ.

७१७. भावी, सं. ( भाविन्–भू–होणें ); पुढें होणारी.

७१८. अंदाज, फा. ( अंदाजा ); अनुमान.

७१९. वेधशाळा, सं. ( वेध+शाला ); ग्रह, तारे यांचें अवलोकन करण्याकरितां जमिनीवर उंच किंवा जमिनींत खोल बांधलेली जागा.

७२०. वेध ( व्यध्–भोंक पाडणें ); नेम; लक्ष्य.
७२१. शाला, ( शल्–जाणें ); गृह, जागा.
७२२. लंवक, सं. ( लंब्–लोंवणें ); लोंवणारा.
७२३. प्रघात, सं. ( प्र+हन्–मारणें ); चाल; रीति.

## १४. विमान किंवा आकाशयान. ( पृ. ४९. )

७२४. विमान, सं. (वि+मा–मोजणें ); आकाशांतील वाहन.
७२५. आकाशयान, सं. ( आकाश+यान ); आकाशांतून जाणारें; हवेंतून जाण्याचें साधन.
७२६. यान ( या–जाणें ); जाणारें.
७२७. दुर्बीण (न ), फा.–दूरची वस्तु पाहण्याचें साधन.
७२८. यंत्रसामग्री, सं. ( यंत्र+सामग्री ); साहित्य.
७२९. सामग्री, सं. ( समग्र+ई ); साहित्य; सामान
७३०. समग्र–संपूर्ण.
७३१. उड्डाण, सं. ( उत्+डी–उडणें ); वर जाणें; उडणें.
७३२. रवर, इं. ( रब्–घासणें ); पेनसलीनें लिहिलेलें घासून काढणारा पदार्थ.
७३३. रोगण, फा. ( रोगन ); कोणत्याहि वस्तूला पूट लावावयाचा एक तेलकट पदार्थ.
७३४ हैड्रोजन, इं.–पाणी उत्पन्न करणारा वायु.
७३५. वैमानिक, सं. ( विमान+इक ); विमान उडविणारा.
७३६. कोलग्यास, इं. ( कोल+ग्यास ); खनिज कोळशांतून उत्पन्न होणारा वायु.
७३७. कोल–कोळसा.
७३८. ग्यास–वायु.
७३९. काळेठिकर, म. ( काळा+ठिकर ); काळे दगड किंवा त्याप्रमाणें अत्यंत काळे.
७४०. गांठ, सं. ( ग्रंथि=ग्रंथ्–बांधणें ); बंध.
७४१. पाराचूट, इं.–एक प्रकारची छत्री.
७४२. छत्री, सं. ( छत्र ); ऊन किंवा पाऊस यापासून रक्षण करण्याचें साधन.
७४३. फुगीर, म.–फुगलेला.
७४४. हिमालय, सं. ( हिम+आलय ); एक पर्वत.
७४५. आलय ( आ+ली–चिकटणें; घडी करणें ); घर; जागा.
७४६ वेशुद्ध, हिं. (वे+शुद्ध ); ज्याला शुद्धि ( सावधपणा ) नाहीं असा. प. व. स.•
७४६ (अ) वे–फा. नाहीं, नव्हे.
७४७. शुद्धि, सं. ( शुध्–निर्मळ असणें ); सावधपणा.
७४८. अर्धांगवायु, सं. ( अर्ध+अंग+वायु ); ज्या रोगांत अर्धे शरीर वधिर किंवा वेशुद्ध होतें असा. अर्धांग–क. स. अर्धांगवायु. स. त. स.
७४९. अर्ध–निम्मा.
७५०. अवयव, सं. (अव+यु–जोडणें ); भाग.
७५१. कवुतर, फा.–पारव्यांतील जातिविशेष.
७५२. घिरटी, म.–घिरट्याप्रमाणें भोंवतीं फिरणें.
७५३. एकदम, फा.–( एक+दम ); न थांबतां ; लगलीच ; एके वेळेस.
७५४. दम, फा.–श्वास.

## १५. कविता–तुकारामाचे अभंग ( पृ० ५३ ).

७५५. श्वान, सं.–कुत्रें.
७५६. सूकर, सं.–डुक्कर.
७५७. मळ, सं. ( मल=मल्–धारण करणें ); घाण, वाईट.
७५८. निर्मिणें, सं. ( निर्माण=निर्+मा–उत्पन्न करणें ); उत्पन्न करणें.
७५९. काया, सं ( काय–कै–शब्द करणें ); देह.
७६०. नाठवणें, सं. (न+आठवणें); न आठवणें.
७६१. आठवणें, सं. ( आस्थापन=आ+स्था–रहाणें ); स्मरणें.
७६२. मृत्यु, सं. ( मृ–मरणें ); मरण.
७६३. जाचणें, सं. ( जर्चन–जर्च–धमकावणें ); पीडा.
७६४. गृह, सं. ( गृह्–घेणें ); घर.
७६५. सुत, सं. ( सू–प्रसवणें ); मुलगा.
७६६. दारा, सं. ( दॄ–फाडणें ); बायको.
७६७. पामर, सं.–नीच; मूर्ख.
७६८. सावध, सं. ( सावधान=स+अवधान=अव+धा-पोसणें ); जागृत.
७६९. हृदय, सं. ( हृ–हरण करणें ); चित्त; मन.
७७०. शुद्ध, सं. ( शुध्–पवित्र करणें ); स्वच्छ ; निर्मळ.
७७१. शेजार, सं. ( शय्यागार–शय्या+आगार ); सोवत; संगत.
७७२. शय्या, ( शी–निजणें ); शेज; आंथरूण.
७७३. आगार ( आ+गृ–बोलणें ); घर.
७७४. पाझर, सं. ( प्रझर=झृ–कमी होणें ); ओघळ; प्रवाह.
७७५. मैलागिरी, सं. ( मलयगिरि–मलय+गिरि ) ; मलयपर्वत; सह्याद्रीचा विशेष भाग.
७७६. मलय–एक पर्वत.
७७७. गिरि–पर्वत.
७७८. भुजंग, सं. ( भुज+ग ) ; वांकडा होऊन चालणारा ; सर्प.
७७९. भुज ( भुज्–उपयोग करणें, वांकडा होणें ); सर्पाचें अंग, हात.
७८०. ग ( गम्–जाणें ); जाणारा.
७८१ विश्व, सं. ( विश्–व्यापणें ); जग.
७८२. कासावीस, सं. ( कालाविष्ट=कास+आविष्ट ) ; खोकल्यानें व्याकूल, घाबरा.
७८३. कास ( कास्–वाईट शब्द करणें ) ; खोकला.
७८४. आविष्ट ( आ+विश्–व्यापणें ); व्याकूळ; घाबरा.
७८५. विघ्न, सं. ( वि+हन्–अडथळा करणे ); संकट; अडचण.
७८६. प्रीति, सं. ( प्री–आवडणें ) ; लोभ; आवड.
७८७. फुका, सं. ( पुष्कर ); विन-आयासानें.
७८८. सांकडें, सं. ( संकट ) ; अडचण.
७८९. चिंतन, सं. ( चित्–विचार करणें ) ; विचार.
७९०. भगवान्, सं. ( भग+वत् ); ईश्वर; कल्याण करणारा.
७९१. मंगळ, सं. ( मंगल ) उत्तम; शुभ.

७९२. वांव, सं. ( वायु ) ; व्यर्थ.
७९३. पसारा, सं. (प्रसार=प्र+सृ-सरणें ); व्यवहार; विस्तार; खटपट.
७९४. कई, सं.( कदा ); केव्हां.
७९५. जीवन, सं.( जीव्-वांचणें ); पाणी; उपजीविका.
७९६. पलंग, सं. ( पल्यंक); उंचावर निजण्याचें विशेष साधन; माचा; मंचक.
७९७. शयन, सं. ( शी-निजणें ); निजण, बिछाना.
७९८. भोज्य स. ( भुज्-खाणें ); खाण्याजोगें
७९९. वाहन, सं. ( वह्-वाहणें ); नेण्याचें साधन, वाहणारा.
८००. अनवाणी, सं. ( अवाहन=न+वाहन ); नुसत्या पायांनीं; जोडा वगैरे न घालतां.
८०१. प्रावर्ण, सं. ( प्रावरण=प्र+आ+वृ-आच्छादणें ); वस्त्र.
८०२. वसन, सं. ( वस्-वापरणें ); वस्त्र.
८०३. जीर्ण, सं. ( जॄ-कमी होणें ); जुनें ;फाटकें; झिजलेलें.
८०४. अवलंबणें, सं. ( अवलंबन=अव+लंब्-धरणें ); स्वीकारणें.
८०५. उपेक्षणें, सं. (उपेक्षण-उप+ईक्ष्-दुर्लक्ष करणें ); दुर्लक्ष्य; हयगय.
८०६. विश्वंभर, सं ( विश्व+भर ); देव; जगाचा पोसणारा. द्वित. स.
८०७. भर ( भृ-पोसणें ); पोसणारा; पुष्टता; हंगाम.
८०८. उदंड, सं. ( उद्दंड+दंड ); विपल.
८०९. नेणणें, म.-न जाणणें.
८१०. तुरंग, सं. (तुरं+गम्-जाणें); घाईनें चालणारा; घोडा.
८११. संडणें, सं. ( सर्जन=सृज्-सोडणें ); टाकणें; सोडणें.
८१२. जवळिकें, म.-जवळ; पाशीं.
८१३. संसाटि, सं. ( संसृष्टि ); सारखेपणा, मिसळ.
८१४. व्यवसायी ( व्यवसाय+ई ); उद्योग करणारा; धंदेवाला.
८१५. व्यवसाय-( वि+अव+सो-यत्न करणें ); धंदा .
८१६. नातळणें, म. ( न+आतळणें ); न चिकटणें; न रहाणें; न ठेवणें.
८१७. आतळणें, सं. (आतलन=आ+तल्-स्थापन करणें );राहणें.
८१८. वडिवार, सं. ( वड्+वार ); मोठेपणा.
८१९. वड्-मोठें.
८२०. वार ( वृ-स्वीकारणें ); संग्रह; स्वीकार; धर्म.
८२१. वाजागिरी, फा. ( बाजीगरी ); गारुड्याचा खेळ.
८२२. उरी, सं. ( उर्वरित=उर्व्-पीडा देणें ); शिल्लक; बाकी.
८२३. सावज, सं. ( श्वापद=श्वन्+पद ); प्राणी; पशु.
८२४. मथन, सं. ( मंथन=मथ्-घुसळणें ); घुसळणें.
८२५. सळा, स. ( शलाका ); दंड; काठी.
८२६. रिघणें, सं. ( रिंगण=रिंग्-जाणें ); जाणें.
८२७. गौरवणें, सं. ( गौरव+णें ); लाड करणें; मोठें मानणें.
८२८. गौरव ( गुरु+अ ) मोठेपणा; वैभव.
८२९. गोमटें, म. सुंदर.

## १६. विषुवप्रदेशावरील अरण्यें ( पृ. ९७. )

८३०. विषुवप्रदेश, सं. ( विषुव+प्रदेश ); जेथें रात्र आणि दिवस सारखे असतात असें ठिकाण.
८३१. विषुव ( विषु+व ); जेथें रात्रि व दिवस सारखे असतात.
८३२. विषु–सारखे.
८३३. प्रदेश ( प्र+दिश्–दाखविणें ); देश; भाग.
८३४. अरण्य, सं. ( ऋ–जाणें ); रान.
८३५. अस्तित्व, सं. ( अस्ति+त्व=अस्–असणें; होणें ); वास करणें; रहाणें; असणें.
८३६. आद्यकाळ, सं. ( आद्यकाल=आद्य+काल ); पहिला काळ.
८३७. आद्य ( आदि+य ) पहिला.
८३८. तीव्रता, सं. ( तीव्र+ता ); प्रखरता; कडकपणा.
८३९. तीव्र ( तीव्–मोठें होणें ); प्रखर; तीक्ष्ण.
८४०. विपुल, सं. ( वि+पुल्–मोठें होणें ); अत्यंत.
८४१. विषुवगामी, सं. ( विषुव+गामिन् ); विषुवांकडे जाणारा.
८४२. गामिन् ( गम्–जाणें ); जाणारा.
८४३. यथेष्ट, सं. ( यथा+इष्ट ); पाहिजे तेवढा. अ. स.
८४४. इष्ट ( इष्–इच्छिणें); इच्छिलेला; पाहिजे तेवढा.
८४५. परावृत्त, सं. ( परा+वृत्–मागें वळणें;–असणें); फिरलेले; उलटलेले; मागें वळलेले. अ. क. स.
८४६. उल्लेख, सं. ( उत्+लिख्–लिहिणें ); लिहिणें; संबंध.
८४७. मध्याह्न, सं. (मध्य+अहन्); दिवसाचा मध्य. ष. त. स.
८४८. अहन्, सं.–दिवस.
८४९. तुरळक, सं. विरळ; क्वचित्.
८५०. किरणशलाका, सं. (किरण+शलाका ); किरणांची रेषा; कवडासा. ष. त. स.
८५१. किरण ( कॄ–फेंकणें ); प्रकाशरेघ.
८५२. डबकें, उ.–सांचलेल्या पाण्याचें ठिकाण.
८५३. रुतणें, सं. ( रोटन=रुट्–जाणें ); अडकणें; शिरणें.
८५४. ओढा, सं. ( वोढा=वह्–नेणें; वाहणें ); वाहणारा.
८५५. बुंधा, सं. ( बुध्न=बुध्–जाणणें ); खोड.
८५६. गुंफा, सं. ( गुंफ्–गुंतणें ); गुंतागुत.
८५७. दुरुस्त, फा. ( दुरूस्त ); साफ; नीट; व्यवस्थित.
८५८. श्वापद, सं. ( श्वन्+पद ); सावज; वनांतील जनावर.
८५९. श्वन्–कुत्ता.
८६०. परिचय, सं. ( परि+चि–जमा करणें ); माहिती; ओळख; ज्ञान.
८६१. निर्जन, सं. ( निर्+जन ); बिनवस्तीचें; ओसाड. पं. ब.
८६२. निरंतर, सं. (निर्+अंतर); सदोदीत; नेहमीं. पं. ब. स.
८६३. सुपीक, म. ( सु+पीक ); उत्तम उत्पन्नाचा. पं. ब.
८६४. पीक–उत्पन्न.
८६५. प्रखर, सं. (प्र+खर ); अति तीक्ष्ण; कडक.
८६६. खर–तीक्ष्ण.

८६७. सर्द, फा. ( सरद ); थंड; गार.
८६८. अपरिचित, सं. ( न +परिचित ); अनोळखी; गैरमाहितीचें.
८६९. परिचित, ( परि+चि–गोळा करणें ); माहितीचा; ओळखीचा.
८७०. डुरकणी, म. आरोळी; गर्जना.
८७१. उद्विग्नता, सं. ( उद्विग्न+ता); खिन्नता; असंतुष्टता.
८७२. उद्विग्न ( उत्+विज्–भिणें ); खिन्न; दुःखी.
८७३. काळाभोर, म. ( काळा+भोर ); काळाकभिन्न; काळाकुळकुळीत; अत्यंत काळा.
८७४. वर्षमेघ, सं. ( वर्ष+मेघ ); पाऊस पाडणारा ढग.
८७५. वर्ष ( वृष्–शिंपडणें ); शिंपडणारा.
८७६. मेघ, ( मिह्–शिंपडणें ); ढग.
८७७. पटल, सं. ( पट्–झांकणें ); आच्छादन.
८७८. अनिवार, सं. ( अनिवार्य=न+निवार्य ); टाळण्यास कठीण.
८७९. निवार्य, ( नि+वृ–टाळणें ); टाळण्याजोगें.
८८०. लक्क, म. चक्क, सप्रकाश.
८८१. भयभीत, सं. ( भय+भीत); भयानें भ्यालेला. पं. तं. स.
८८२. भीत (भी–भिणें); भ्यालेला.

## १७. ध्वनि–भाग १ ला.
## ( पृ० ६१ ).

८८३. ध्वनि, सं. ( ध्वन्–शब्द करणें ); शब्द.
८८४. कंप, सं. ( कंप्–हालणें ); हालणें.
८८५. शीघ्र, सं. जलद; वेगाचा.
८८६. मिलाफ, उ. एकत्र होणें; जोड.
८८७. वाद्य, सं. ( वद्–बोलणें ); वाजवण्याचें साधन.
८८८. ग्रहण, सं. ( ग्रह्–घेणें ); घेणें.
८८९. प्रतिमा, सं. ( प्रति+मा–मोजणें ); रूप; आकार; सारखवटपणा.
८९०. नानाविध, सं. ( नाना+विधा ); नानाप्रकारचे. स.व.
८९१. नाना–निरनिराळे.
८९२. विधा ( वि+धा–ठेवणें ); प्रकार.
८९३. कृत्रिम, सं. ( कृ–करणें ); मनुष्यानें घडविलेलें.
८९४. अलगूज, फा. ( अलगुजाह); नळीचें एक वाद्य.
८९५. बाह्य, सं. ( बहिर्+य ); बाहेरील; वरच्या अंगचें.
८९६. बहिर्–बाहेर.

## १८. ध्वनि–भाग २ रा.
## ( पृ. ६२ ).

८९७. परात, सं. ( परायत=परा+आ+यम्–स्वाधीन ठेवणें ); विशेष रुंद व पसरट भांडें.
८९८. उशी, उ. उंची.
८९९. वर्धमान, सं. ( वृध्–वाढणें); वाढणारी; वाढत जाणारी.
९००. केंद्र, सं. मध्यबिंदु.
९०१. संचार, सं. ( सम्+चर्–चालणें ); चलन; गमन; भ्रम.
९०२. वायुलहरी, सं. ( वायु+लहरी ); वाऱ्याची लाट. ष. त.
९०३. लहरी–लाट.

९०४. कीर्तन, सं. ( कृत्- चांगलें सांगणें ); ईश्वराचे वगैरे गुणानुवाद सांगणें.

९०५. मृदग, सं. ( मृद्+अंग ); कातड्याचें एक वाद्य. ष.व.

९०६. मृद्-( मृद्-चूर्ण करणें ); माती.

९०७. वीणा, सं. ( वीण्-वाजविणें; गाणें ); एक तंतुवाद्य.

९०८. सारंगी, सं.-एक तंतूचें किंवा तारांचें वाद्य.

९०९. हरिदास, सं. ( हरि+दास ); देवभक्त; कथेकरी. ष. त.

९१०. हरि ( ह-हरण करणें ); ( पातक ) वगैरे हरण करणारा ; विष्णु ; सिंह इ.

९११. पृथक्पण, म. [ ( सं ) पृथक्+( म ) पण ]; वेगळेपणा.

९१२. पृथक्-वेगळें, निराळें.

९१३. थक्क, म. चकित ; विचार-रहित.

९१४. स्थलांतर, सं. ( स्थल+अंतर ); दुसरी जागा ; एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाणें.

९१५. स्थल ( स्थल्-राहणें ); जागा.

९१६. आंदोलन, सं. ( आंदोल्-झोके खाणें ); हेलकावणें ; झोके खाणें.

९१७. खोवण, म.-लाकूड वगैरे पोखरून त्यांत दुसरा पदार्थ बसविण्याकरितां जी खळगी करितात ती; पन्हळी.

९१८. अंतःक्रिया, सं. ( अंतर्+क्रिया ); आंत चालू असलेला व्यापार.

९१९. क्रिया ( कृ-करणें ); कृति, व्यापार.

९२०. वेटोळें, सं. ( वर्तुल ); वाटोळी आकृति.

९२१. पांगणें, सं. ( अपांगन ); दूर होणें.

९२२. वाहक, सं. ( वह्-वाहणें ); नेणारा ; वाहणारा.

९२३. टेलिफोन, ग्री. लांबचा ध्वनि ऐकूं येण्याचें साधन.

## १९. ध्वनि-भाग ३ रा.

## ( पृ. ६९. )

९२४. अक्षर, सं. ( न+क्षर ); ज्याचा नाश होत नाहीं तो; स्वर किंवा व्यंजनसहित स्वर.

९२५. पुष्टीकरण, सं. ( पुष्ट+ई+करण ); पुष्ट नसतां पुष्ट करणें.

९२६. पुष्ट-( पुष्-पोसणें ); स्थूल; वळकट; पोसलेलें.

९२७. वेष्टन, सं. ( वेष्ट्-गुंडाळणें ); झांकण; आच्छादन.

९२८. गाभारा, सं. ( गर्भागार=गर्भ+आगार ); देवळांतील पोकळी.

९२९. गर्भ-पोकळी; आंतील भाग.

९३०. अष्टपैलू, हिं. ( अष्ट+पैलू ); आठ बाजूंचा; आठ कोनांचा.

९३१. अष्ट, सं. ( अष्टन् ); आठ.

९३२. पैलू, फा.-कोन; कोपरा.

९३३. सज्जा, सं. ( सज्ज-जाणें ); तयार केलेली किंवा माडीबाहेर राखलेली जागा.

९३४. घुमट, फा. ( घुमझ् ); जींत शब्द घुमतो अशी इमारत.

९३५. वेडावणें, सं. ( विडंबन=वि+डंब्-नक्कल करणें; चेष्टा करणें ); दुसऱ्यासारखी क्रिया करणें.

९३६. पायरी, सं. ( पादाहरी ); पायठा; क्रम.

९३७. फोनोग्राफ, ला. उच्चारलेले शब्द लिहून घेणारें किंवा ठेवणारें यंत्र.

९३८. ध्वनिलेखक, सं. ( ध्वनि+ लेखक ); उच्चारलेले शब्द लिहून घेणारें यंत्र.

९३९. लेखक ( लिख्–लिहिणें ); लिहिणारें.

९४०. कमानदार, फा. कमानीसारखें वांकविलेलें.

९४१. कमान–धनुष्य.

९४२. विराम, सं. ( वि+रम्–विसांवा घेणें; थांबणें ); विसांवा.

९४३. फोटोग्राफी, इं.–प्रकाशानें दूरचा देखावा लिहून घेण्याची कला.

९४४. प्रकाशलेखनकला, सं. ( प्रकाश+लेखन+कला ); प्रकाशानें दूरचा देखावा लिहून घेण्याची कला.

९४५ लेखन ( लिख्–लिहिणें ); लिहिणें.

९४६. द्वीपांतर, सं. (द्वीप+अंतर ); इतर द्वीप; दुसरें बेट; खंड.

९४७. द्वीप–(द्वि+आप् ) बेट; खंड.

९४८. सुलभता, सं. ( सुलभ+ता); सोय; सोपेपणा.

९४९. सुलभ ( स+लभ्–मिळणें ); सोपा. सहज मिळणारें.

## २०. अंगांत विनय असणें इ० ( पृ० ७२. )

९५०. विनय, सं. ( वि+नी–लवणें ); नम्रता; मऊपणा.

९५१. अकल, आ. ( अक़्ल ); ज्ञान; समज.

९५२. व्यंग, सं. ( वि+अंग ); कमीपणा; उणेपणा. अ. क.

९५३. तन्मूलक, सं. (तत्+मूलक); त्यापासून उत्पन्न होणारें. ष. ब.

९५४. मूल् ( मूल–स्थापन करणें ); आरंभ करणारें.

९५५. सापेक्ष, सं. ( स+अपेक्षा ); दुसऱ्याशीं संबंध ठेवणारा. सहार्थी. ब. स.

९५६. अपेक्षा ( अप+ईक्ष्–इच्छिणें; ) इच्छा; आशा.

९५७. विशद, सं. ( वि+शद्–जाणें ); स्वच्छ; मलहीन; स्पष्ट.

९५८. अफाट, सं. (आस्फात=आ+स्फाय्–वाढणें ); विस्तीर्ण; मोठा; वाढलेला.

९५९ सागर, सं. ( सगर+अ ) समुद्र; ( सगर नांवाच्या राजानें आपले पूर्वज शोधण्याकरितां पृथ्वी खणतां खणतां झालेल्या खड्यांतून पाणी सांचून झालेले समुद्र).

९६०. लीन, सं. ( ली–वितळणें ); गरीब, नम्र.

९६१. संकोचवृत्ति, सं. ( संकोच+ वृत्ति ); लाजत लाजत किंवा भीत भीत वागणें. ष. त. स.

९६२. संकोच, ( सम्+कुच्–लहान होणें ); मन मोकळें न करणें; आंखडून धरणें.

९६३. अनन्यभाव, सं. ( न+अन्य+ भाव ); दुसऱ्या ठिकाणीं भक्ति नसणें. अन्यभाव–स. त. अनन्यभाव–न. त.

९६४. अन्य–दुसरा.

९६५. अक्षय्य, सं. ( न+क्षय्य ); चिरकाल रहाणारें ; नाश न पावणारें. न. त. स.

१६६. क्षय्य ( क्षि—नाश पावणें ); नाश पावणारें.

१६७. इतिहास, सं. ( इति+ह+ 'आस—अस्—असणें ); असें निश्चयानें होतें; वृत्तान्त.

१६८. अलौलिक, सं. ( न+लौकिक ); विलक्षण; लोकांत न सांपडणारा.

१६९. लौकिक ( लोक+इक ); लोकांतील; लोकांत सांपडणारा.

१७०. शिरसामान्य, सं. ( शिरसा +मान्य ); सम्मत; प्रमाण.

१७१. शिरसा, ( शिरस् शब्दाची संस्कृतांतलि तृतीया ); डोक्यानें.

१७२. मान्य, सं. ( मान्—पूजा करणें ); पूज्य; कबूल; रुजू.

१७३. अशाश्वत, सं. ( न+शाश्वत ); न टिकणारें; सदा न राहणारें.

१७४. शाश्वत ( शश्वत्+अ ); टिकणारें; राहणारें.

१७५. शश्वत्—निरंतर.

१७६. विनाशी, सं. ( वि+नश्—नाश पावणें ); नाशवंत; नश्वर.

१७७. उपहासास्पद, सं. ( उपहास+आस्पद ); निंद्य; तुच्छ मानण्याजोगें; अमान्य. ष. ब.

१७८. आस्पद ( आ+स्+पद्—जाणें ); ठिकाण.

१७९. निर्वाण, सं. ( निर्+वा—नाश पावणें ); नाश; अंतकाळ; शेवट; अखेर.

१८०. सुकृत, सं. ( सु+कृ—करणें ); चांगलें कृत्य, पुण्य.

१८१. विगलित, सं. ( वि+गल्—गळणें ); विशेष गळलेलें; निःशक्त; निरुपयोगी.

१८२. गलित ( गल्—गळणें ); गळालेला.

१८३. इहलोक, सं. ( इह+लोक ); हा लोक; मृत्युलोक.

१८४. इह—एथें.

## २१. कविता-साधूंचीं लक्षणें ( पृ० ७९. )

१८५. आपपर, सं. ( आत्मपर—आत्म+पर ) आपलें व दुसऱ्याचें.

१८६. चैतन्य, सं. ( चेतना+य ) चलनवलनादि व्यापाराचें साधन, कारण.

१८७. अधम, सं. नीच; दुष्ट.

१८८. अव्हेरणें, सं. ( अवहेलन= अव+हेल्—अपमान करणें ); अपमान; दुर्लक्ष.

१८९. वसुधा, सं. ( वसु+धा—ठेवणें ); पृथ्वी.

१९०. वसु—द्रव्य.

१९१. चाळणें, सं. ( चालन=चल्—हलणें ); हालवणें.

१९२. रंक, सं. दरिद्री; गरीब.

१९३. परौतें, सं. ( परतः ); पलीकडे; दूर.

१९४. गाळणें, सं. ( गालन=गल्—गळणें ); टाकणें.

१९५. पै, सं. ( वै ); प्रमाणें, जसें.

१९६. तृषा, सं. ( तृष्—तहान लागणें किंवा इच्छिणें ); तहान.

१९७. तोय, सं. ( तु—पूर्ण करणें ); पाणी.

१९८. अवघा, म. सर्व; सगळा.

१९९. धरित्री, सं. ( धृ—धरणें ); भूमि; आसरा.

१०००. निर्भर, सं. ( निर्+भृ—पूर्ण भरणें ); पूर्ण भरलेला; व्याप्त.

१००१. निरुपचार, सं. ( निर+उपचार ); ज्याला कांहीं साहाय्य नाहीं. पं. ब. स.

१००२ उपचार, सं. ( उप+चर्-चालणें ); उपाय; इलाज.

१००३ संतोषी, सं. ( सम्+तुष्-आनंद पावणें ); आनंदी; उल्हासी.

१००४. उदास, सं. ( उत्+आस-निरिच्छ होणें ); निरिच्छ.

१००५. संसारव्यथा, ( संसार+व्यथा ); संसारसंबंधीं पीडा.

१००६. संसार ( सम+सृ-सरणें ); प्रपंच; जग.

१००७. व्यथा ( व्यथ्-दुखणें ); दुःख.

१००८. फिटणें, सं. ( स्फिटन=स्फिट्-नाश करणें; तुच्छ मानणें ); मोकळा होणें; नाहींसें करणें.

१००९. नैराश्य, सं. (निराश+य ); निराशपणा.

१०१०. निराश, ( निर+आशा ); खिन्न. पं. ब. स.

१०११. आशा (अश्-व्यापणें); इच्छा.

१०१२. विनटणें, स. ( विनटन=वि+नट्-वागणें, शोभणें ); बनणें; बांधणें; शोभणें. अ. त.

१०१३. नटणें, ( नटन-नट्-वेष घेणें ); वेष घेणें; बनणें; शोभणें.

१०१४. व्याध, सं. (व्यध्-भोंक पाडणें ); पारधी.

१०१५. विहंग, सं. ( विहायस्+ग ); आकाशांत उडणारा पक्षी. द्वि. त. स.

१०१६. विहायस्-आकाश.

१०१७. आत्मलाभ, सं. ( आत्मन्+लाभ ); आत्म्याविषयींचें ज्ञान.

१०१८. लाभ ( लभ्-मिळणें ); फायदा.

१०१९. योगविशेख, सं. ( योग+विशेष ); विशेष योजना; योगसाधन.

१०२०. योग (युज्-जोडणें ); संबंध; संयोग; ईश्वरप्राप्तीचा एक उपाय.

१०२१. विशेष, सं. (वि+शिष्-राहणें ); अधिक; कांहींएक.

१०२२. हरिखणें, सं. ( हर्षण=हृष्-आनंद पावणें ); हर्ष मानणें; आनंद पावणें.

१०२३. वोखटें, सं. ( विकृत=वि+कृ-वाईट करणें ); वाईट; विघडलेलें.

१०२४. नुमटणें, सं. ( न+उमटणें); न समजणें; न कळणें; न उठणें.

१०२५. उमटणें, (उन्मज्जन=उत्+मस्ज्-बुडणें ); कळणें; समजणें; उठणें.

१०२६. घटणें, सं. ( घटन-घट्-रचना करणें); कमी होणें.

१०२७. वैषम्य, सं. ( विषम+य ); अधिकपणा.

१०२८ विषम ( वि+सम ); जास्त.

१०२९ सरिसा, सं. ( सदृश-स+दृश्-पहाणें ); सारखा.

१०३० पाड, सं. ( पात=पत्-पडणें ); किंमत; मोल; तुलना.

१०३१. पराविया, म. परक्यास; दुसऱ्यास.

१०३२. खांडणें, सं.(खंडन=खण्ड्-तुकडे करणें ); तोडणें.

१०३३. घाव, सं. ( घात=हन्-मारणें ); ठोका; तडाका.
१०३४. लावणी, म.-लागवड; लावणें.
१०३५. ना तरी, म.-अथवा.
१०३६. ना-नाहीं.
१०३७. तरी ( तर्हि ) तर, पेक्षां.
१०३८. इक्षुदंड, सं. ( इक्षु+दंड ); ऊंस.
१०३९. इक्षु-ऊंस.
१०४०. दंड-(दण्ड्-मारणें); काठी.
१०४१. पाळणें, सं. ( पालन=पाल्-राखणें ); राखणें.
१०४२. गोड, सं. ( गुड ); गोड; मधुर.
१०४३. घाणा, सं. ( घर्षण=घृष्-दळणें ); चरक.
१०४४. चांद्रिका, सं. ( चंद्र+इक+आ ); चांदणें.
१०४५. चंद्र ( चंद्-प्रकाशणें ); प्रकाशणारा; पृथ्वीचा उपग्रह; उपग्रह.
१०४६. सरिसी, सं. ( सदृशी-सदृश+ई ); सारखी; समान.
१०४७. सदृश-सारखें.
१०४८. सेव्य, सं. ( सेव्-सेवा करणें; उपयोग करणें ); घेण्यास योग्य.
१०४९. आकांक्षणें, सं. ( आकांक्षण-आ+कांक्ष्-इच्छिणें ); इच्छिणें.
१०५०. श्लाघणें, सं. ( श्लाघन=श्लाघ्-प्रशंसा करणें ); स्तुति करणें.
१०५१. लेप, सं. ( लिंप्-लिंपणें; लावणें; लागणें ); पूट.
१०५२. विचारणें, सं. ( विचरण-वि+चर्-चालणें ); वागणें; वर्तणें.
१०५३. प्राणवृत्ति, सं.(प्राण+वृत्ति); प्राणवायूची स्थिति.
१०५४. प्राण ( प्र+ अण्-जगणें ); जीव.
१०५५. तोषणें, सं. ( तोषण=तुष्-आनंद पावणें-मानणें );आनंद मानणें.
१०५६. पारुषणें, म. [ ( सं. ) परुष+(म.) णें ]; कठोर होणें: दुःखी होणें.
१०५७. सुषणें, सं. ( शोषण=शुष्-वाळणें ); सुकणें; वाळणें.
१०५८. पाडे, सं. ( परि ); पेक्षां; ज्यास्त.
१०५९. थोडकें, सं. ( स्तोकक ); किंचित्.
१०६०. पढियंता, सं. ( प्रीणयत्=प्री-संतुष्ट करणें ); आवडता.
१०६१. सोयरें, म. आप्त; नातलग.
१०६२. साचोकार, सं. ( सत्याकार ); सत्यपणा; खरेपणा.

## २२. गुरुत्वमध्य (पृ. ७७).

१०६३. अग्रभाग, सं. ( अग्र+भाग ); शेवटचा भाग; टोंकाकडील भाग.
१०६४. अग्र-शेवट; अणकुची; बाजू.
१०६५. पहिलवान, फा. ( पहलवान ); तालीमबाज, शूर.
१०६६. चतुष्पाद, सं. ( चतुष्+पाद ); ज्यांना चार पाय आहेत ते; पशु; ष ब.
१०६७. चतुर्-चार.
१०६८. झांप, सं. ( झंपा=झंप्-उडी मारणें ); उडी; झेंप.

## २३. उष्णतेचें स्वरूप व तिचे परिणाम ( पृ. ७९ ).

१०६९. परिस्फुटता, सं. ( परि-स्फुट+ता ); फोड करून सांगणें; पूर्ण माहिती देणें.

१०७०. परिस्फुट ( परि+स्फुट्-उघड करणें ); उघड.

१०७१. अपवादक, सं. ( अप+वद्-विरुद्ध बोलणें ); विरुद्ध बोलणारा-सांगणारा.

१०७२. अनिर्मेय, सं. ( न+निर्मेय ); जें उत्पन्न करितां येत नाहीं तें. न. त. स.

१०७३. निर्मेय ( निर्+मा-उत्पन्न करणें ); उत्पन्न करितां येतें तें; उत्पन्न करण्याजोगें.

१०७४. वंगण, सं. ( व्यंजक=वि+अंज्-माखणें ); तेल देणें.

१०७५. गतिरोधक, सं. ( गति+रोधक ); गति थांबविणारें. ष. त. स.

१०७६. रोधक ( रुध्-अडथळा करणें ); थांबविणारें.

१०७७. अन्योन्यजनकत्व, सं.( अन्योन्य+जनक+त्व ); एकमेकांस उत्पन्न करण्याचा धर्म. प. त. स.

१०७८. अन्योन्य ( अन्यः+अन्य); एकमेक.

१०७९. जनकत्व ( जनक+त्व ); उत्पन्न करण्याचा धर्म.

१०८०. जनक ( जन्-उत्पन्न होणें ); उत्पन्न करणारा, बाप.

१०८१. दृश्य, सं. ( दृश्-पाहणें ); दिसणारी; दृष्टीस पडणारी.

१०८२. परस्परोत्पादकता, सं. ( परस्पर+उत्पादक+ता ); एकमेकांस उत्पन्न करण्याचा धर्म. परस्परोत्पादक-ष. त. स.

१०८३. उत्पादक ( उत्+पद्-उत्पन्न होणें ); उत्पन्न करणारी.

१०८४. पलटण, इं. ( बटेलियन ); शिपायांचा विशेष समुदाय.

१०८५. डुलणें, सं. ( दोलन=दुल्-हेलकावे खाणें ); हेलकावे खाणें.

१०८६. मिश्रगति, सं. ( मिश्र+गति ); मिसळलेली गति. क. स.

१०८७. मिश्र ( मिश्र्-मिसळणें ); मिसळलेली.

१०८८. लोप, सं. ( लुप्-नाहींसें होणें ); न दिसणें.

१०८९. उथळ, सं. ( उत्+तल ); अगदीं थोड्या खोलीचें. ष. ब. स.

१०९०. तल ( तल्-स्थापन करणें ); सपाटी; बुडाचा भाग.

१०९१. घनकणमय, सं. ( घन+कण+मय ); दाट परमाणूंची झालेली.

१०९२. कण ( कण्-शब्द करणें ); अणु; अंश.

१०९३. शंक्काकार, सं. ( शंकु+आकार ); खिळयाच्या आकाराचा; निमुळता; टोंकाचा.

१०९४. शंकु, सं. ( शक्-समर्थ होणें ); खिळा.

१०९५. अजीबात, आ. ( आज+बात ); अगदीं; समूळ.

१०९६. बाद, फा.-रद्द, वजा.

## २४. पदार्थांस उष्णता प्राप्त कशी होते (पृ. ८४.)

१०९७. त्वगिंद्रिय, सं. ( त्वच्+इंद्रिय ); त्वचा अथवा कातडें हेंच इंद्रिय ( स्पर्शेंद्रिय ). क. स.

१०९८. त्वच् ( त्वच्—वेष्टणें ); कातडी, साल.

१०९९. परस्परापेक्षी, सं. (परस्पर+ अपेक्षिन् ); एकमेकांशीं संबंध ठेवणारे. ष. त. स.

११००. अपेक्षिन् ( अप+ईक्ष्—इच्छिणें ); इच्छिणारा.

११०१. उष्णवहन, सं. ( उष्ण+वहन ); उष्णता वाहणें; ष. त.

११०२. वहन (वह्+वाहणें); वाहणें.

११०३. मंदवाहक, सं. ( मंद+वाहक); ज्यांतून उष्णता मंदपणें वाहते असे पदार्थ-अ. क.

११०४. मंद ( मंद्—आळसावणें ); सावकाश.

११०५. शेक, म.—ऊब, उष्णता.

११०६. किरणद्वारा, सं. ( किरण+द्वारा ); किरणमार्गानें; किरणरूपानें.

११०७. द्वार-( द्वृ—फाडणें )(द्वारा हें संस्कृत द्वार् शब्दाचें तृतीयेचें एकवचन आहे. ) मार्गानें.

११०८. विक्षेप, सं. ( वि+क्षिप् ) टाकणें; सोडणें.

११०९. अंतरि ( री ) क्ष, सं. (अंतर्+ईक्ष्—पाहाणें ); आकाश; गगन; ज्यांतून पलीकडे दिसतें.

१११०. निग्रहण, सं. ( नि+ग्रह्-बाळगणें ); स्वाधीन ठेवणें; बाळगणें.

११११. किरणनिग्राहक, सं. ( किरण+निग्राहक ); किरण बाहेर न जाऊं देणारे; किरण कोंडून ठेवणारे. ष. त. स.

१११२. निग्राहक ( नि+ग्रह्—बाळगणें ); जवळ ठेवणारे, बाळगणारे.

१११३. अंशुविक्षेपण, सं. ( अंशु+विक्षेपण ); किरण बाहेर सोडणें किंवा टाकणें.

१११४. अंशु ( अंश्—विभागणें ); किरण.

१११५. विक्षेप (वि+क्षिप्—टाकणें); टाकणें; फेंकणें.

१११६. आगमनिर्गम, सं. ( आगम+निर्गम ); येणें—जाणें. द्वंद्व स.

१११७. आगम ( आ+गम्—येणें ); येणें.

१११८. निर्गम (निर्+गम्—जाणें); बाहेर जाणें.

## २५. किरणरूप लहरी. (पृ० ८७).

१११९. इंद्रियग्राह्यता, सं. ( इंद्रिय+ग्राह्यता ); इंद्रियांनीं घेण्याजोगी स्थिति; ष. त. स.

११२०. ग्राह्यता ( ग्राह्य+ता ); घेण्याजोगी स्थिति.

११२१. ग्राह्य ( ग्रह्—घेणें ); घेण्यास योग्य.

११२२. रसायनव्यापार, सं. ( रसायन+व्यापार ); भिन्न जातींच्या परमाणूंचा एकमेकांशीं संबंध झाल्यानें जी नवीन क्रिया उत्पन्न होते ती. ष. त. स.

११२३. रसायन (रस+अयन); अनेक रसांचें एकीकरण.

११२४. अयन (अय्–जाणें); वनणें; जाणें; स्थळ.

११२५. आष्ट्र, सं. (अश्–व्यापणें); सर्व ठिकाणीं व्यापून राहणारें, आकाश.

११२६. अगम्य, सं. (न+गम्य); जेथें जातां येत नाहीं, न जाण्याजोगें. न. त. स.

११२७. गम्य (गम्+जाणें); जाण्याजोगें.

११२८. अभेद्य, सं. (न+भेद्य); फोडण्यास कठीण.

११२९. भेद्य (भिद्–फोडणें); फोडण्याजोगें.

११३०. एकसमयावच्छेद, सं. (एक+समय+अवच्छेद); एकच काळ; एकदम. एकसमय-क. स. एकसमयावच्छेद–ष. त. स

११३१. समय (सम्+इ–जाणें); वेळ; काळ.

११३२. अवच्छेद (अव+च्छिद्–भेदणें); तोडणें; मर्यादा.

११३३. पारदर्शक, सं. (पार+दर्शक); पलीकडील बाजू दाखविणारें.

११३४. दर्शक (दृश्–पहाणें); दाखविणारें.

११३५. खगोल, सं. (ख+गोल); आकाशगोल. ष. त. स.

११३६. ख–आकाश.

११३७. गोल–गोळा.

११३८. तेजःपुंज, सं. (तेजः+पुंज); तेजाचा गोळा. ष. त.

११३९. तेजस्–(तिज्–पाजवणें; प्रकाशित करणें); तेज.

११४०. पुंज–गोळा.

११४१. अतिदूरवर्ती, सं. (अति+दूरवर्ती); अति दूर असणारा. अ. क. स.

११४२. वर्ती (वृत्–राहणें; असणें); राहणारा; असणारा; वात, तंतु.

११४३. स्तब्ध, सं. (स्तंभ्–कुंठित करणें); स्थिर.

११४४. कल्पांत, सं. (कल्प+अंत); कल्पाचा शेवट.

११४५. कल्प–ब्रह्मदेवाचा एक दिवस.

११४६. दुर्धर, सं. (दुर्+धर); धरण्यास कठीण; आंवरण्यास कठीण. अ. क. स.

११४७. धर (धृ–धरणें); धरणारें.

११४८. गतिसंक्रमण, सं. (गति+संक्रमण); गतीचा वेग.

११४९. संक्रमण (सम्+क्रम्–जाणें); जाणें.

## २६. तेजःकिरणांचें परावर्तन (पृ० ९०).

११५०. निष्क्रमण, सं. (निस्+क्रम्–निघणें); निघून जाणें.

११५१. निष्क्रांत, सं. (निस्+क्रम्–निघून जाणें); बाहेर पडलेले निघालेलें.

११५२. निगृहीत, सं. (नि+ग्रह्–ताब्यांत घेणें); स्वाधीन केलेलें.

११५३. जिल्हई, आ. (जिल्हाई); चकाकी.

११५४. प्राप्तकिरण, सं. (प्राप्त+किरण); आलेला किरण.

११५५. प्राप्त (प्र+आप्–मिळणें); मिळालेलें.

११५६. आख्यायिका, सं. (आ+ख्या–सांगणें); कथा; गोष्ट.

## २७. तेजःकिरणांचें वक्रीभवन (पृ० ९५).

११५७. वक्रीभवन, सं. ( वक्र+ई+भवन ); वांकडें नसतां वांकडें होणें.

११५८. वक्र (वक्-वांकडें जाणें); वांकडें.

११५९. तिरपा, सं. ( तिर्यक्=तिरि+अंच्-वांकडें होणें ); वांकडा; तिरकस.

११६०. एकवट, सं. ( एकवत् ); एकत्र; एके ठिकाणीं.

११६१. अभ्यास, सं. ( अभि+अस्-शिकणें; वहिवाट ठेवणें ); अध्ययन; शिकणें; परिपाठ.

११६२. व्यक्त, सं. ( वि+अञ्ज् स्पष्ट करणें ); उघड; स्पष्ट.

## २८. मृगजळ (पृ. ९७.)

११६३. मृगजळ, सं. ( मृगजल=मृग+जल ); दोनप्रहरीं रानांत पशूंस भासणारें पाणी.

११६४. मृग ( मृग्-शोधणें ); पशु; हरिण.

११६५. जल, (जल्-वेष्टणें); पाणी.

११६६. रखरखीत, सं. ( रुक्षरक्षित=रुक्ष्-वाळवणें ); कोरडें; निर्जल.

११६७. संसर्ग, सं. ( सम्+सृज्=संबंध ठेवणें ); संबंध.

११६८. विपरीत, सं. ( वि+परि+इ-विरुद्ध होणें ); उलट; निराळा.

११६९. प्रतिबिंबित, सं. ( प्रति+बिंब्-उठणें ); प्रतिमा पडलेली; पडछाया पडलेली.

११७०. भूल, हिं-भास; विस्मरण.

११७१. सफर, आ.-प्रवास.

११७२. व्याकुल, सं. ( वि+आ+कुल्-व्याप्त होणें ); घावरा; उतावीळ.

११७३. कारवान, फा.-लमाण; व्यापारी लोकांचा तांडा.

११७४. जीवित, सं. (जीव्-जगणें); जीव; प्राण.

११७५. वाळवंट, सं. ( वालुमत् ); वाळूनें भरलेला.

११७६. आधण, सं. ( आ+धण्-शब्द करणें ); उकळी फुटून वाजणारें ( पाणी. )

## २९. वाक्चातुर्य (पृ. ९९).

११७७. आनुकूल्य, सं. ( अनुकूल+य ); साहाय्य; उपयोगी पडण्याचा धर्म.

११७८. अवगत, सं. ( अव+गम्-जाणणें); माहीत; ठाऊक.

११७९. वक्तृत्वकला, सं. ( वक्तृत्व+कला ); भाषण करण्याची कला; व्याख्यान देण्याची कला.

११८०. वक्तृत्व ( वक्तृ+त्व ) बोलण्याचा किंवा भाषण करण्याचा गुण.

११८१. वक्तृ ( वच्-बोलणें ); बोलणारा.

११८२. प्रजासत्ताक, सं. ( प्रजा+सत्ता+क ) प्रजेच्या सत्तेचें.

११८३. प्रजा-( प्र+जन्-उत्पन्न होणें ); लोक; रयत.

११८४. सत्ता-( सत्+ता ) अधिकार; हुकूम.

११८५. सत् ( अस्-असणें); असणारें; चांगलें.

११८६. राजसत्ताक, सं. ( राजन्+सत्ता+क ); राजानें चालविलेलें.

११८७. राजन् (राज्–शोभणें; प्रकाशणें ); राजा; स्वामी.

११८८. रुकार, हिं. ( रु+कार ); रुजू करणें; मान्य करणें; कबूल करणें.

११८९. बहुलोकसमाज, सं. ( बहु+लोक+समाज ); पुष्कळ लोकांचा समुदाय.

११९०. बहु–फार.

११९१. समाज–(सम्+अज्–जाणें); मंडळी; समूह.

११९२. उपपादन, सं. (उप+पद्–सांगणें ); विवेचन; स्पष्ट करणें; प्रतिपादन.

११९३. नामांकित, सं. ( नामन्+अंकित ); प्रसिद्ध; नांवाजलेला.

११९४. नामन् ( नम्–लवणें ); नांव.

११९५. प्रशंसा, सं. ( प्र+शंस्–सागणें ); कीर्ति; स्तुति; प्रसिद्धि.

११९६. करंडा, सं. ( करंड ) विशेष प्रकारचें भांडें.

११९७. उंची=[ (सं.) उच्च+(म.) ई] ( ई ) ]; बहु मोलाची; किमतीची; उंच प्रतीची.

११९८. मनोरम, सं. ( मनस्+रम ); मनास रमविणारी; आल्हादकारक.

११९९. रम ( रम्–रंजविणें ); रमविणारी; आनंद देणारी.

१२००. तादृश, सं. ( तन्+दृश्–पहाणें ); तितका; फारसा.

१२०१. वहा, सं. ( चाय=चाय्–मान देणें ); वाहवा; कीर्ति; आवड.

१२०२. मान्यता, सं. ( मान्य+ता ); मोठेपणा; आदर; मान.

१२०३. जाळी; सं. ( जाल ); झाडांनीं वेढलेलें स्थळ.

१२०४. प्रस्तुत, सं. (प्र+स्तु–प्रशंसा करणें ); चालू असलेलें; हल्लींचें; सध्यांचें.

१२०५. सरसकट, हिं. [फा.(सर)+सं. सकट ]; उत्तम आणि कनिष्ठ.

१२०६. सकट, सं. नीच.

१२०७. कमावणें, म. पूर्णतेस आणणें; बनविणें किंवा श्रम घेणें.

१२०८. कोती, फा.–अपुरी; अपूर्ण; पोक्त नव्हे अशी.

१२०९. लक्षून, म. (लक्ष्–पहाणें ); उद्देशून; संबंधाचें.

१२१०. रसाविर्भाव, सं. ( रस+आविर्भाव ); रस प्रकट करणें किंवा उमटणें.

१२११. आविर्भाव ( आविर्+भू–प्रकट होणें ); स्पष्ट होणें; उघड होणें.

१२१२. आविस्–स्पष्टपणें.

## ३०. कविता-वर्षाकालाचें वर्णन (पृ० १०४ ).

१२१३. वर्षाकाल, सं. ( वर्षा+काल ); पर्जन्याचा काळ किंवा समय. ष. त.

१२१४. वर्षा ( वृष्–शिंपडणें ); पर्जन्यकाळ.

१२१५. मृच्छकटिक, सं. ( मृद्+शकट+इक ); ष. त. स. मातीच्या गाड्यासंबंधी. मृच्छकट–ष. त.

१२१६. शकट–(शक्–समर्थ होणें); गाडा.

१२१७. मेघोदर, सं. ( मेघ+उदर); मेघाचें पोट; ष. त;

१२१८. उदर ( उत्+ऋ–जाणें ); पोट.

१२१९. रजत, सं. (रंज्–शोभणें ); रुपें.

१२२०. विद्युल्लता, स. विद्युत्+लता ); वीज. क. सं. (

१२२१. लता–वेल.

१२२२. अंबरपट, स. ( अंबर+पट ); आकश हेंच वस्त्र, आकशरूपी वस्त्र. क. स.

१२२३. अंबर–आकाश.

१२२४. दशा, सं. ( दंश्–चावणें ); पदराचे न विणलेले तंतु; स्थिति.

१२२५. हंस–मयूर–काक–बकसे, सं. ( हंस+मयूर+काक+बक )+म. ( असे ); हंस, मोर, कावळे, व बगळे यांसारखेक्रा- द्वं. स. तृ. त. स.

१२२६. हंस–विशेष पक्षी.

१२२७. मयूर–मोर.

१२२८. काक ( कक्–चपळपणा करणें ); कावळा.

१२२९. बक–बगळा.

१२३०. नक्र, सं. ( न+क्रम्–जाणें ); मगर; सुसर.

१२३१. मीन, सं. ( मी–हिंसा करणें ); मासा.

१२३२. पर्वतवृक्षतुंगशिखरप्रासादसे, सं. ( पर्वत+वृक्ष+तुंग+शिखर+प्रासाद )+म. (असे) पर्वत, झाडें, उंच शिखरें व राजवाडे यांसारखे. द्वं. स. पर्वतवृक्ष–द्वं. स. तुंगशिखरें–क. स. पर्वत–शिखरें–ष. त. पर्वत–प्रासाद. द्वंद्व. स.

१२३३. वृक्ष–झाड.

१२३४. तुंग–उंच.

१२३५. शिखर-(शिखर+रा–देणें); शेंडा; अग्र.

१२३६. शिखा–शेंडी, तुरा.

१२३७. प्रासाद–राजवाडा.

१२३८. नभ, सं. ( नभस् ); आकाश.

१२३९. शैलशिखर, सं. ( शैल+शिखर ); पर्वताचें शिखर. ष. त.

१२४०. शैल ( शिला+अ ); पर्वत.

१२४१. लंबमान, सं. ( लंब्–लोंबणें ); लोंबणारें.

१२४२. दुंदुभि, सं. ( दुंदु+भा–प्रकाशणें ); दुम्दुम् वाजणारा नगारा.

१२४३. शिखि, सं. ( शिखिन्–शिखा+इन् ) मोर.

१२४४. वीजणें, सं. ( वीज्–हालवणें); वारा घालणें; हालवणें.

१२४५. मणिमयव्यजन, सं. ( मणिमय+व्यजन ); रत्नखचित पंखा.

१२४६. मणिमय–( मणि+मय )रत्नांनीं भरलेला—खचलेला; रत्नखचित.

१२४७. मणि–रत्नें.

१२४८. व्यजन (वि+अज्–हालवणें ); पंखा.

१२४९. पवन, सं. ( पू–शुद्ध करणें ); वारा.

१२५० जवन, सं. ( जु–वेगानें जाणें ); वेगवान्.

१२५१. तुरग, सं. ( तुरं+गम्–जाणें ); त्वरेनें जाणारा; घोडा. अ. क. स.

१२५२. स्तनित, सं. ( स्तन्–गर्जना करणें ); मेघगर्जना; मेघध्वनि.

१२५३. विद्युत्पताक, सं. ( विद्युत्+पताका ); वीज हेंच निशाण. क. स.

१२५४. पताका–निशाण.

१२५५. करसमूह, सं. ( कर+समूह ); किरणांचा समुदाय.

१२५६. समूह ( सम्+ऊह–जमविणें ) ; समुदाय ; जमाव.

१२५७. क्षुभित, सं. ( क्षुभ्–रागावणें ) ; खवळलेले.

१२५८. नीलाभ, सं. ( नील+आभा ) ; ज्यांचा निळा रंग आहे. प. ब. स.

१२५९. नील–निळा.

१२६०. आभा–( आ+भा–प्रकाशणें ); कांति.

१२६१. अभ्यंतर, सं. ( अभि+अंतर ); मध्यभाग;मध्य. अ. त.

१२६२. उदधि, सं. ( उद+धा–पोसणें ) ; समुद्र.

१२६२. ( अ ) उद–( उंद–ओलें होणें ); उदक ; पाणी.

१२६३. गंधोद्दामा, सं. ( गंध+उद्दामा ) ; गंधानें भरलेली ; सुवासानें भरलेली. तृ. त. स.

१२६४. गंध ( गंध्–पीडा देणें ; चूर्ण करणें ); वास.

१२६५. उद्दामा, ( उत्+दम् जिंकणें ) ; भरलेली ; परिपूर्ण.

१२६६. हरिततृणसस्यांकुरवती, सं. ( हरित+तृण+सस्य+अंकुर+वत्+ई ); जीवर गवत व धान्य यांचे हिरवे अंकुर आहेत. तृणसस्य–द्वं. स. हरिततृणसस्य–क. स. हरित... सस्यांकुर–ष. त. स.

१२६७. हरित–हिरवें.

१२६८. तृण ( तृण्–खाणें ); गवत.

१२६९. सस्य–धान्य.

१२७०. धाराशरशतविदीर्णा, सं. ( धारा+शर+शत+विदीर्णा ); धारारूप शेंकडों बाणांनीं फोडलेली; धाराशर–क. स. धाराशरशत–ष. त. धाराशरशतविदीर्णा–तृ. त. स.

१२७१ धारा–ओघ, प्रवाह.

१२७२. शर–बाण.

१२७३. शत–शंभर, शेंकडों.

१२७४. विदीर्णा ( वि+दृ–फाडणें); फाडलेली; फोडलेली.

१२७५. वसुमती, सं. ( वसु+मत्+ई ); पृथ्वी; जींत नानाप्रकारचीं द्रव्यें आहेत अशी.

१२७६. वाहणें, सं. ( वल्हन=वल्ह्–बोलणें ); बोलावणें.

१२७७. बलाकतति, सं. ( बलाक+तति ); बगळ्यांचा समुदाय. ष. त. स.

१२७८. बलाक–बगळा.

१२७९. तति ( तन्–पसरणें ) ; ओळ.

१२८०. सोत्कंठ, सं. (स+उत्कंठा); उत्सुकतेसहित सहार्थी ब.स.

१२८१. उत्कंठा ( उत्+कंठ्–इच्छिणें ); उत्सुकता, इच्छा.

१२८२. पंकज, सं. (पंक+ज);चिखलांतून उगवणारें कमल.पं. त.

१२८३. पंक–चिखल.

१२८४. घनांधकार, सं. ( घन+अंधकार );मिट्ट काळोख. क.स.

१२८५. अंधकार ( अंध+कार–कृ–करणें ) ; काळोख.

१२८६. प्राप्तनवश्रीपुरुष, सं. ( प्राप्त+नव+श्री+पुरुष ) ; ज्याला नवी संपत्ति मिळाली आहे असा पुरुष. नवश्री–क. स. प्राप्तनवश्री–च. ब. प्राप्त नव–पुरुष–क. स.

१२८७. नव–नवी.

१२८८. श्री ( श्रि–आश्रय करणें ); संपत्ति; लक्ष्मी; शोभा.

१२८९. विद्युज्जिव्हा, सं. ( विद्युत्+जिव्हा ); वीज हीच जीभ. क. स.

१२९०. जिव्हा–जीभ.

१२९१. इन्द्रचापभुज, सं. ( इंद्र+चाप+भुज ); इन्द्रधनुष्य हाच हात. इंद्रचाप–क. स. इंद्रचापभुज–क. स.

१२९२. चाप–धनुष्य.

१२९३. मेघहनुवटी, सं. ( मेघ+हनु )+म. ( वटी ); मेघ हीच हनुवटी. क. स.

१२९४. हनु–तोंडाचा खालचा विशेष भाग.

१२९५. वलाकसंघ, सं. ( वलाक+संघ ); वगळयांचा समुदाय.

१२९६. संघ ( सम्+हन्=गुणणें ); समुदाय.

१२९७. वायुभ्रम, सं. ( वायु+भ्रम); वायूचें फिरणें ष.त.स.

१२९८. भ्रम (भ्रम्–फिरणें); संचार; फिरणें.

१२९९. निःश्वसणें, सं. ( निःश्वसन=निस् + श्वस्–श्वासोच्छ्वास करणें ); श्वास टाकणें.

१३००. मातणें, सं. ( मादन=मद्–गर्व होणें ); माजणें; वाढणें; अति होणें.

१३०१. कर्दम, सं. ( कर्द्–वाईट शब्द करणें ); चिखल.

## वामनी स्फुट श्लोक.

## ( पृ० १०९ ).

१३०२. विपत्काळ, सं. ( विपत्+काळ ); दारिद्र्याची वेळा; गरिबी. ष. त. स.

१३०३. विपद् ( वि+पद्–खालावणें ); गरिबी.

१३०४. प्रभुपण, [ (सं. ( प्रभु )+म. ( पण ) ] मोठेपणा; ऐश्वर्य.

१३०५. प्रभु ( प्र+भू–होणें ); समर्थ.

१३०६. सहिष्णुत्व, सं. ( सहिष्णु+त्व ); सोशीकपणा.

१३०७. सहिष्णु ( सह्–सहन करणें ); सहन करणारा.

१३०८. वरवें, सं. ( वरं ); वरें; चांगलें.

१३०९. प्रसर, सं. (प्र+सृ–जाणें ); विस्तार; प्रसार.

१३१०. मिरवणें, सं. ( मर्वण=मर्व् जाणें; भरणें ); उघड होणें.

१३११. प्रचुर, सं. (प्र+चुर्–विपुल होणें ); पुष्कळ; अतिशय.

१३१२. रति, सं. ( रम्–रमणें; मजा मारणें ); हौस; इच्छा; आवड.

१३१३. विद्याव्यसन, सं. ( विद्या+व्यसन ); विद्येचा नाद. ष. त स.

१३१४. विद्या (विद्–जाणणें); ज्ञान.

१३१५. वानणें, सं. ( वर्णन=वर्ण्–वर्णन करणें ); स्तुति करणें.

१३१६. सुनीतिमंत, सं. ( सु+नीति+मत ); चांगला नीतिमान्; नीतिवाला; व्यवहार जाणणारा.

१३१७. नीति ( नी–नेणें ); योग्य वर्तणूक.

१३१८. कमला, सं ( कम्–इच्छिणें ); संपत्ति; लक्ष्मी.

१३१९. युगांत, सं. ( युग+अंत ); युगाची अखेर. ष. त. स.

१३२०. युग ( युज्–जोडणें ); नियमित काळ; जोडी.

१३२१. भला, सं. ( भद्र ); सज्जन; शहाणा.
१३२२. लाधणें, सं. ( लंभन=लभ्-मिळणें ); मिळणें.
१३२३. प्रगट, सं. ( प्रकट=प्र+कट्-जाणें ); स्पष्ट; मूर्तिमंत.
१३२४. दुणावणें, म. ( दूण+आव+णे ); दुप्पट होणें, वाढणें.
१३२५. दूण-दुहेरी घडी.
१३२६. लेश, सं. ( लिश्-कमी होणें ) ; अंश.
१३२७. निधन-सं. ( नि+धा-नाश पावणें ); मरण; नाश.
१३२८. विद्याभिध, सं. ( विद्या+अभिधा ); ज्याला विद्या हें नांव आहे. ष. ब. स.
१३२९. अभिधा ( अभि+धा-पोसणें ); नांव.
१३३०. प्रतिभटणें, सं. ( प्रतिभटन-प्रति+भट्-भांडणें ); स्पर्धा करणें; भांडणें.
१३३१. तोरा, म. डौल.
१३३२. वारण, सं. ( वृ-निवारण करणें ); हत्ती.
१३३३. वारणें, सं. ( वृ-वारणें; वांधणें ); बांधणें; धरणें; मरणे.
१३३४. सुनीतिपथ, सं. ( सुनीति+पथ ); न्यायमार्ग.
१३३५. पथ ( पथ्-जाणें ); मार्ग.
१३३६. सेवणें, सं. ( सेवन=सेव्-भजणें; पतकरणें); पतकरणें.
१३३७. असिव्रत, सं. ( असि+व्रत ); तलवारीच्या धारेप्रमाणें तीव्र नियम. म. स. स.
१३३८. असि-( अस्-फेंकणें ); तलवार.
१३३९. व्रत-( वृ-स्वीकारणें); नियम.
१३४०. कलत्र, सं.-( कल ( वीर्य )+त्र=त्रै-रक्षण करणें ); वीर्यरक्षण करणारी, बायको.
१३४१. गडी, सं. ( गति=गम्-जाणें ); मित्र; स्नेही.
१३४२. विद्यासमन्वित, सं. ( विद्या+समन्वित); विद्येनें युक्त. तृ. त. स.
१३४३. समन्वित ( सम्+अनु+इ-जाणें ); युक्त.
१३४४. बुध, सं. ( बुध्-जाणणें ); शहाणा; ज्ञाता.
१३४५. विमल, सं. ( विमल ); स्वच्छ; तेजस्वी. ष. ब. स.
१३४६. मल, ( मल्-बाळगणें ); घाण.
१३४७. उत्तमांग, सं. ( उत्तम+अंग ); मस्तक; डोकें. क. स.
१३४८. अंतरंग, सं. ( अंतर्+अंग ); हृदय; मन.
१३४९. अवचट, सं. ( अवचित्त ); अकल्पित; एकाएकीं.
१३५०. क्षुधित, सं. ( क्षुध्-भूक लागणें ); भूक लागलेला.
१३५१. गजहन्ता, सं. ( गज+हन्ता ); हत्तींना मारणारा ( सिंह ). ष. त. स.
१३५२. गज, ( गज्-वेडें होणें ); हत्ती.
१३५३. हन्ता ( हन्-मारणें ); मारणारा.
१३५४. जंबुक, सं. ( जम्-खाणें ); कोल्हा.
१३५५. अवसर, सं. ( अव+सृ-सरणें ); समय; वेळ.
१३५६. क्षुद्रता, सं. ( क्षुद्र+ता ); हलकेपणा; नीचपणा.
१३५७. क्षुद्र ( क्षुद्-चूर्ण करणें ); हलका.

१३५८. हित, सं. ( धा–पोसणें ); कल्याण ; फायदा ; कल्याणकारक.

१३५९. पापकर्म, सं. ( पाप+कर्म ); दुष्ट कर्म ; वाईट कर्म.

१३६०. पाप–वाईट ; दुष्ट.

१३६१. कर्म ( कृ–करणें ); काम.

१३६२ कुकर्म, सं. ( कु+कर्म ); वाईट कर्म ; दुष्ट कर्म.

१३६३. कु–वाईट.

१३६४. संतप्तलोह, सं. ( संतप्त+लोह ); तापलेलें लोखंड. क. स.

१३६५. संतप्त ( सम्+तप्-तापणें ); तापलेला.

१३६६. नलिनीदल, सं. ( नलिनी+दल ); कमलाचें पान.

१३६७. नलिनी–कमळाचें झाड.

१३६८. दल ( दल्–फुटणें ); पत्र ; पान ; दाळिंवी.

१३६९. सन्मौक्तिक, सं. ( सत्+मौक्तिक ); चांगलें मोतीं. क. स.

१३७०. मौक्तिक—( मुक्त+इक ) मोतीं.

१३७१. मुक्ता–(मुच्-सोडणें) मोतीं.

१३७२. स्वाती, सं.–एक नक्षत्र आहे.

१३७३. अब्धिशुक्तिपुटक, सं. (अब्धि+शुक्ति+पुटक) ; समुद्रांतील शिंपल्याचें पूड.

१३७४. अब्धि ( अप्+धा–धारण करणें ); समुद्र.

१३७५. अप्–पाणी.

१३७६. शुक्ति ( शुच्–प्रकाशणें ); शिंपला.

१३७७. पुटक–पूड, घर.

१३७८. नेटकें, सं. ( नेत्रक ); सुरेख ; चांगलें.

१३७९. उत्तममध्यमाधम, सं. ( उत्तम+मध्यम+अधम ); उत्कृष्ट, साधारण व कनिष्ठ.

१३८०. मध्य– ( मध्यम+म ); साधारण.

१३८१. दोंपरि, म. ( दों+परि ); दोन प्रकार.

१३८२. दों–दोन.

१३८३. साची, सं. ( सत्या ); खरी.

१३८४. शम, सं. ( शम्–शांत करणें ); शांति; क्षमा; तह.

१३८५. श्रुत, सं. ( श्रु–ऐकणें ); ऐकलेलें; विद्या; शास्त्र.

१३८६. निर्दंभता, सं. ( निर्दंभ+ता ); साधूपणा; सरळपणा; बिनढोंगीपणा.

१३८७. निर्दंभ ( निर्+दंभ ); बिनढोंगी. पं. व. स.

१३८८. दंभ ( दंभ्–ढोंग करणें ); ढोंग.

१३८९. सच्छील, सं. ( सत्+शील ); चांगला स्वभाव.

१३९०. शील–स्वभाव.

१३९१. तत्वतां, सं. ( तत्वतः= तत्व+तः ); खरोखर ; सत्यपणें.

१३९२. स्वकार्यविषय. सं. ( स्व+कार्य+विषय ); आपलें काम. ष. त. स.

१३९३. विध्वंसणें, सं. विध्वंसन= ( वि+ध्वंस्–नाश करणें ); नाश.

१३९४. दुर्मती, सं. ( दुर्+मति ); दुर्जन ; दुष्ट. ष. ब. स.

१३९५. मति ( मन्–विचार करणें ); बुद्धि.

१३९६. श्रोत्र, सं. ( श्रु–ऐकणें ); कान.

१३९७. कुंडल, सं. ( कुड्–वेष्टणें ); कानांतील एक भूषण.
१३९८. कंकण, सं. ( कक्–जाणें ); कंडें; हातांतील एक भूषण.
१३९९. साजणें, सं. ( सज्जन= सस्ज्–तयार होणें); शोभणें.
१४००. आन, सं. ( अन्य ); इतर; दुसरा.
१४०१. चंदन, सं. ( चंद्–आल्हाद करणें ); गंध; उटी.
१४०२. जठर, सं.–पोट.
१४०३. हस्तिप, सं. ( हस्तिन्+ प ); महात. द्वि. त. स.
१४०४. हस्तिन् ( हस्त+इन् ); हत्ती.
१४०५. प ( पा–पालन करणें ); पालन करणारा.
१४०६. आळवणें, सं.–( आलपन= आ+लप्–बोलणें ); विनवणें; गुण गाणें; बोलण्यांत गुंतवणें.
१४०७. बाप, सं. (वप्र=वप्–पेरणें); बावा.
१४०८. भाई, सं. ( भ्रातृ ); दादा; भाऊ.
१४०९. बढाई, ऊ. ( वडा+आई); मोठेपणा.
१४१० वडा, सं. ( वड् ); मोठा.
१४११. भूधेनुका, सं. ( भू+धेनुका ); पृथ्वी हीच गाय. क. स.
१४१२. धेनुका–( धेनु+का );- लहान गाय.
१४१३. धेनु–गाय.
१४१४. वात्सल्य, सं. ( वत्सल+ य ); दयाळूपणा.
१४१५. वत्सल–दयालु.
१४१६. शेख, सं. ( शेष=शिष्– बाकी रहाणें ); शेवट.
१४१७. प्रमोद, सं. (प्र+मुद्—आनंद होणें ); हर्ष; आनंद.
१४१८. खड्गाग्रतुल्य, सं. ( खड्ग+ अग्र+तुल्य);तरवारीच्या धारेप्रमाणें ( तीव्र ). खड्गाग्र– ष. त; खड्गाग्रतुल्य तृ. त. स.
१४१९. खड्ग–तलवार.
१४२०. तुल्य–सारखें.
१४२१. विधु, सं. ( व्यध्–भोंक पाडणें ); चंद्र.
१४२२. महोन्नति, सं. ( महत्+ उन्नति); वृद्धि; मोठेपणा. क. स.
१४२३. उन्नति ( उत्+नम्–वांकविणें); वृद्धि; श्रेष्ठत्व.
१४२४. दुबळीक, सं. ( दुर्बल )+ म. ( ईक ); कठीण स्थिति; दारिद्र्य; गरिबी.
१४२५. दुर्बल ( दुर्+बल ); अशक्त; गरीब.
१४२६. टवाळी, म. ( टवाळ+ई ); खोडी; चेष्टा; द्वाडपणा.
१४२७. टवाळ–द्वाड; खोडाळ.
१४२८. कष्टदशा, सं. ( कष्ट+दशा ); ष. त. स.; वाईट स्थिति.
१४२९. कष्ट–हाल; दुःख.
१४३०. अपार, सं. ( न+पार ); न. ब. स.; अत्यंत; अमर्याद.
१४३१. धैर्य, सं. ( धीर+य ); धीटपणा.
१४३२. धीर, ( धी+ईर्–प्रेरणा करणें ); धीट.
१४३३. धी–( धी–विचार करणें ); बुद्धि.
१४३४ पोत, सं. ( प्रोत=प्र+वेविणणें; वांधणें ); मशाल.

१४३५. ज्वाला, सं. ( ज्वल्–जळणें ); जाळ; ज्योत.

१४३६. उफाळणें, सं. ( उत्फालन= उत्+फल्–वर जाणें ); वर जाणें; वर होणें.

## कृ० चि० कृत अन्योक्ति· ( पृ० १०९. )

१४३७. अन्योक्ति, सं. ( अन्य+ उक्ति ); दुसऱ्यास उद्देशून केलेलें भाषण. च. त. स.

१४३८. उक्ति ( वच्–बोलणें ); भाषण.

१४३९. परिमळ, सं. ( परिमल– परि+मल्–स्वीकारणें ); सुवास; गंध.

१४४०. सुरतरु, सं. ( सुर+तरु ); देवांचें झाड, कल्पवृक्ष. ष. त. स.

१४४१· सुर–देव.

१४४२. तरु–वृक्ष.

१४४३. कृती, सं. ( कृ–करणें ); सुज्ञ; शहाणा.

१४४४. पिक, सं. ( अपि+कै–शब्द करणें ); कोकिळ. अपि आणि अव यांच्या अकाराचा लोपहि होतो. उ०–पिक ( अपिक ); पिधान (अपिधान); वतंस (अवतंस).

१४४५. तरुकोटर, सं. ( तरु+कोटर ); झाडाची ढोल. ष. त.

१४४६. कोटर–पोकळी.

१४४७. काकावलि, सं. ( काक+ अवलि; कावळ्यांची पंक्ति, मेळा.

१४४८. अवलि–पंक्ति.

१४४९. विखरणें, सं. विक्षरण= वि+क्षर्–झिरपणें ); पसरणें, वाहणें.

१४५०. ऐसें, सं. ( ईदृश ); असें.

१४५१. मानी, सं. ( मान+ई ) अभिमानी; गर्विष्ठ.

१४५२. दवानल, सं. ( दव+अनल ); वणवा ( रानांतला अग्नि ). ष. त. स.

१४५३. दव–अरण्य.

१४५४. अनल–अग्नि.

१४५५. मेवा, फा.-फळ.

१४५५. (अ) कनकपंजर, सं. (कनक+पंजर ); सोन्याचा पिंजरा. ष. त. स.

१४५६. कनक–सोनें.

१४५७. पंजर–पिंजरा.

१४५८. अहर्निश, सं. ( अहन्+ निशा+अ ); अहोरात्र; रात्रंदिवस. अ. स.

१४५९. निशा–रात्र.

१४६०. वनवृत्ति, सं. (वन+वृत्ति); वनवास; रानांत राहणें. स. त. स.

१४६१. वन–रान; अरण्य.

१४६२. मांसखंड, सं. ( मांस+ खंड ); मांसाचा तुकडा. ष. त. स.

१४६३. मांस–मास.

१४६४. खंड (खंड्–तुकडे करणें); तुकडा.

१४६५. खरतरनखर, सं. ( खरतर +नखर ); फार तीक्ष्ण नख. क. स.

१४६६. खरतर ( खर+तर ); फार तीक्ष्ण.

१४६७. नखर–नख.

१४६८. धाणें, म.–तृप्त होणें.

१४६९. गजवर, सं. ( गज+वर ); गजश्रेष्ठ; मोठा हत्ती. स.त.स.

१४७०. वर–(वृ–स्वीकारणें ) श्रेष्ठ; स्वीकारणारे.

१४७१. मंगलप्रद, सं. ( मंगल+प्र+द ) ; शुभदायक. द्वि. त. स.
१४७२. क्षीण, सं. (क्षीण=क्षि–क्षिजणें ) ; थकवा; श्रम.
१४७३. सुधा, सं. ( सु+धा–पोसणें ) ; अमृत.
१४७४. द्विजकुल, सं. ( द्विजकुलं=द्विज+कुल ) ; पक्ष्यांचा समुदाय.
१४७५. द्विज ( द्वि+ज ) ; दोनदां जन्मलेला ; पक्षी ; ब्राह्मण ; क्षत्रिय ; वैश्य.
१४७६. कुल–( कुल्–जमणें ) ; समुदाय.
१४७७. शार्दूलादिक, सं. ( शार्दूल+आदि+क ); व्याघ्र इत्यादि. स. व. स.
१४७८. शार्दूल ( शृ–हिंसा करणें ); व्याघ्र ; वाघ.
१४७९. वरिवरी, सं. ( उपरि+उपरि ) ; वरवर ; उंच उंच.
१४८०. शारदश्री, सं. ( शारद+श्री ) ; शरदृतूंतील शोभा.
१४८१. शारद ( शरद्+अ ) शरदृतूसंबंधी.
१४८२. शरद्–आश्विन व कार्तिक.
१४८३. पद्मवृंद, सं. ( पद्म+वृंद ); कमळांचा समुदाय.
१४८४. पद्म–कमल.
१४८५. वृंद–समुदाय.
१४८६. मधुरफलभर, सं. ( मधुर+फल+भर ) ; गोड फळांचा भर-समुदाय.
१४८७. मधुर–गोड.
१४८८. चित्तापहारी, सं. ( चित्त+अपहारिन् ) ; चित्ताचें आकर्षण करणारा. ष.त. स.
१४८९. अपहारिन् ( अप+हृ–हरण करणें ) ; दूर करणारा; चोरणारा.
१४९०. मानस, सं. ( मनस्+अ ) ; मानससरोवर ; मन.
१४९०. ( अ ) पंकिल, सं. ( पंक+इल ) ; चिखलानें भरलेलें.
१४९१. पल्वल, सं. ( पल्–जाणें ); पाण्याचें डबकें.

## ३१. विद्युत्–भाग १ ला. ( पृष्ठ २११ ).

१४९२. सुधारणा, सं. (सु+धारणा); चांगलें करणें.
१४९३. दृष्टोत्पत्ति, सं. ( दृष्ट+उत्पत्ति ); नजर; अवलोकन.
१४९४. दृष्ट ( दृश्–पहाणें ) ; पाहिलेलें, पहाणें.
१४९५. उत्पत्ति ( उत+पद्–होणें. निघणें ) ; बीज; परिणाम.
१४९६. वसाहत, आ. ( वसात ) ; वस्ती केलेला प्रांत.
१४९७. श्वासक्रिया, सं. ( श्वास+क्रिया ); श्वासोच्छ्वास घेणें किंवा करणें.
१५००. लाख, सं. ( लाक्षा ) ; पिंपळाचा वगैरे डिंक.
१५०१. अभिवृद्धि, सं. ( अभि+वृध्–वाढणें ) ; वाढ ; उत्तेजन ; प्रसार.
१५०२. लोहचुंबकता, सं. ( लोह+चुंबकता ) ; लोखंडास आकर्षण करण्याचा धर्म.
१५०३. चुंबकता ( चुंबक+ता ) ; ओढणें.
१५०४. विस्तीर्ण, सं. ( वि+स्तृ–पसरणें ) ; पसरलेलें ; मोठें.

१५०५. घडवंची, सं.(घटमंच); मड-
कीं ठेवण्याकारितां एक साधन.
१५०६. घट—मडकें.
१५०७. मंच—माचा, बैठक.
१५०८. भिरकुंड, म.-वोरूंतील
किंवा कडब्याच्या ताटांतील
गाभा किंवा तसा दुसरा
हलका पदार्थ.
१५०९. उत्सारण, सं. ( उत्+सृ-
सरणें ); दूर ढकलणें किंवा
दूर लोटणें.
१५१०. धनविद्युत्, सं. ( धन+
विद्युत् ); काचेवर उत्पन्न
होणारी वीज.
१५११. धन-(धन्-फलद्रूप होणें);
सांठविलेलें, द्रव्य.
१५१२. ऋणविद्युत् सं. ( ऋण+
विद्युत् ); लाखेवर उत्पन्न
होणारी वीज.
१५१३. ऋण-(ऋण्-कर्ज काढणें);
कर्ज, कर्ज काढलेली=रक्कम.
१५१४. सांठा, सं. ( संस्था=सम्+
स्था-राहणें ); ठेवा; संचय.
१५१५. विद्युद्रहित, सं. ( विद्युत्+
रहित); विजेशिवाय; ज्यांत
वीज नाहीं असा. तृ. त. स.
१५१६. रहित ( रह्-सोडणें );
शिवाय; खेरीज.
१५१७ पृथक्करण, सं. ( पृथक्+
करण ); निरानिराळें करणें.
१५१८. करण, (कृ-करणें); करणें;
क्रिया.

## ३२. विद्युत्-भाग २ रा. ( पृ० ११६ ).

१५१९. अनुकर्षण, सं. ( अनु+
कर्षण ); घासणें; ओढणें;
पदार्थांवर वेगवेगळे प्रका-
रची वीज जाणें.
१५२०. कर्षण(कृष्-घासणें ); घा-
सणें; ओढणें.
१५२१. विद्युद्धारक, सं. ( विद्युत्+
धारक); वीज धरणारा
किंवा घेणारा.
१५२२. धारक. (धृ-धरणें ); धर-
णारा किंवा घेणारा.
१५२३. अनुकृष्ट ( अनु+कृष्ट ); अ-
नुकर्षणानें घासून घेतलेली
वीज.
१५२४. कृष्ट, (कृष्-ओढणें;घासणें);
घासून घेतलेले.
१५२५. उदासीन, सं. ( उत्+आ-
स्-आशा न करणें ); वर
तोंड करून असलेला; नि-
राश.

## ३३. विद्युत्-भाग ३ रा. (पृ० १२०.)

१५२६. जस्त, सं. (जसद );
विशेष धातु.
१५२७. सल्फ्युरिक, इं.-गंधकाचा.
१५२८. सल्फर-गंधक.
१५२९. आसिद, इं.---क्षार.
१५३०. विद्युत्पात्र, सं. ( विद्युत्+
पात्र ); वीज उत्पन्न कर-
ण्याचें भांडें.
१५३१. पात्र ( पा-रक्षण करणें );
भांडें.
१५३२. बॅतरी, इं.-वीज उत्पन्न
करण्याच्या पात्रांचा समूह.
१५३३. अंतिम, सं. ( अंत+इम )
शेवटची.
१५३४. कानस, सं. ( कर्षिणी=कृ-
ष्-पीडा देणें ); घासण्याचें
धन.
१५३५. आक्सिजन, इं.-प्राणवायु;
आम्लता उत्पन्न करणारा
असा वायु.

१५३६. मोरचूद, सं. ( मयूरतुत्थ ); हिरव्या रंगाचा विशेष खनिज पदार्थ.

१५३७. मुलामा, आ. ( मुलमह ); वस्तूवर धातूचें पाणी चढवणें.

१५३८. होकायंत्र (होका+यंत्र ) खलाशी लोकांचें उत्तर दिशा ओळखण्याचें यंत्र.

१५३९. होका-दिशा ओळखण्याचें लोहचुंबकाचें केलेलें एक साधन.

१५४०. ध्रुव, सं. (ध्रु-निश्चित किंवा स्थिर करणें ); स्थिरबिंदु.

१५४१. उदीचीन, सं. ( उदीच्+ ईन ); उत्तरेकडील.

१५४२. उदीच् ( उत्+अंच्-जाणें ); उत्तर.

१५४३. अवाचीन, सं. ( अवाच्+ ईन ); दक्षिणेकडील.

१५४४. अवाच् ( अव+अंच्-जाणें ); दक्षिण..

१५४५. अपघात, सं. (अप+हन्-वाईट रीतीनें नुकसान होणें); एकाएकीं होणारें नुकसान.

१५४६. गाडी, सं. (गंत्री-गम्-जाणें ); वाहून नेण्याचें एक साधन.

१५४७. जलसामर्थ्य, सं. ( जल+ सामर्थ्य ); पाण्याचें सामर्थ्य-कार्य.

१५४८. सामर्थ्य (समर्थ+य ); शक्ति; कार्य.

१५४९. उमेद, फा.-भरंवसा; आशा, उत्तेजन.

## ३४. रसायनशास्त्राचें महत्त्व. (पृ. १२५.)

१५५०. महत्त्व, सं. ( महत्+त्व ); मोटेपणा.

१५५१. ज्योतिषशास्त्र ( ज्योतिस्+ अ+शास्त्र );आकाशांतील तेजस्वी गोलांचें शास्त्र. प. त.

१५५२. साहाय्य, सं. ( सहाय+ य ); मदत.

१५५३. ऐषआराम, आ. ( ऐष )+ फा. ( आराम ); सुख; चैन; आनंद.

१५५४. ऐष-सुख.

१५५५. आराम-सुख.

१५५६. अग्निकार्य, सं. ( अग्नि+ कार्य ); अग्नीपासून उत्पन्न होणारें कार्य.

१५५७. अग्नि-(अग्-वांकडें जाणें); विस्तव.

१५५८. यादृच्छिक, सं. (यदृच्छा+ इक ); अकस्मात्, अवचित, सहज.

१५५९. यदृच्छा ( यत्+ऋच्छ्-जाणें ); स्वेच्छा; स्वच्छंद.

१५६०. मृत्तिकारूप, सं. ( मृत्तिका+रूप ); मातीच्या रूपाचें. प. व. स.

१५६१. मृत्तिका (मृद्-बारीक करणें ); माती.

१५६२. शास्त्रयुक्त, सं. ( शास्त्र+ युक्त ); शास्त्राच्या नियमाप्रमाणें झालेलें; शास्त्रसिद्ध. तृ. त स.

१५६३. ग्लानि, सं. (ग्लै-सुकवणें); निस्तेजता; फिक्केपणा.

१५६४. ठोकताळा, म. ( ठोक+ ताळा ); अनुभव; उघड प्रमाण. क. स.

१५६५. ठोक-चोख; बरोबर.

१५६६. ताळा-( तोल-तुल्-मोजणें ); प्रमाण.

१५६७. पिढीजाद, (पिढी+जाद); वंशपरंपरेनें चालत आलेलें; पं. त. स.
१५६८. पिढी, सं. ( पीठिका ). वंश.
१५६९. जाद, सं. ( जात=जन्-उत्पन्न होणें ); झालेला.
१५७०. पाश्चात्य, सं. ( पश्चात्+य ); पश्चिमेकडील; मागील.
१५७१. पश्चात्–मागें; पश्चिम.
१५७२. पौरस्त्य, सं. (पुरस्+त्य); पूर्वेकडील.
१५७३. पुरस्—पुढें; पूर्व.
१५७४. सांगड, सं. ( संगत=सम्+गम्--मिळून जाणें ); जोड.
१५७५. पोषक, सं. ( पुष्–पोसणें ); पोसणारें.
१५७६. निकेल, ला.--विशेष धातु.
१५७७. प्लातिनम्, ला.-विशेषधातु; शुभ्र सुवर्ण.
१५७८. अलुमिनियम्, ला.--विशेष धातु.
१५७९. युरेनियम्, ला.--विशेष धातु.
१५८०. फास्फरस, इं.-एक ज्वालाग्राही पदार्थ.
१५८१. अल्कोहोल, आ.-मद्यार्क.
१५८२. क्लोरोफार्म, इं.-जो धातु हुंगल्यानें शुद्धि नाहींशी होते तो.
१५८३. ईथर, इं.-फार पातळ वायु; एक ज्वालाग्राही पातळ पदार्थ.
१५८४. ब्लीचिंग पावडर, इं.--( ब्लीचिंग+पावडर ); पांढरें शुभ्र करणारी पूड.
१५८५. ब्लीचिंग--शुभ्र करणारी.
१५८६. पावडर–पूड.
१५८७. आधुनिक, सं. ( अधुना +इक ); अलीकडील; हल्लींचें.
१५८८. अधुना--हल्लीं; सांप्रत.

## ३९. रसायनशास्त्राचा इतिहास व लव्हायसियरचें चरित्र–भाग १ ला.

( पृ० १२८ ).

१५८९. चरित्र, सं. (चर्-चालणें); वृत्त, इतिहास.
१५९०. पंचमहाभूतें, सं. ( पंचमहाभूत=पंचन्+महाभूत ); पांच मूलतत्त्वें; पांच मूल द्रव्यें.
१५९१. पंचन्—पांच.
१५९२. महाभूत ( महत्+भूत ) मोठें द्रव्य-मूलतत्व.
१५९३. आप, सं. ( आप्-संपादणें ); पाणी.
१५९४. मृन्मय, सं. ( मृद्+मय ); मातीचें.
१५९५. सर्वथैव, सं. ( सर्वथा+एव ); एकंदरींतच; सर्वांशींच.
१५९६. सर्वथा (सर्व+था); सर्वांशीं.
१५९७. अर्क, सं. ( अर्क्-तापणें; स्तुति करणें ); तापवून काढलेलें तत्व.
१५९८. पंचम, सं. ( पंचन्+म ); पांचवा.
१५९९. अमृतसंजीवनी, सं. ( अमृत+संजीवनी ); अमृताप्रमाणें जीव आणणारी. क.स.
१६००. अमृत ( न+मृत ); जें प्यालें असतां मरण येत नाहीं असें द्रव्य.
१६०१. संजीवनी ( संजीवन+ई); जिवंत करणारी.
१६०२. संजीवन ( सम्+जीव्-जगणें ); जिवंत राहणें.

१६०३. मात्रा, सं. ( मा–मोजणें; गणणें ); औषधि किंवा रसायन; प्रमाण.

१६०४. भट्टी, सं. ( भृष्टि=भ्रस्ज्-भाजणें ); भाजण्याचें स्थान-किंवा क्रिया.

१६०५. गूढवादी, सं. ( गूढ+वादी );अस्पष्ट भाषण करणारा.

१६०६. वादी ( वद्–बोलणें ); बोलणारा.

१६०७. किमया, फा.–रसायन.

१६०८. युरोपीय, हिं. ( यूरोप+ईय ); युरोपांतील.

१६०९. युरोप–पृथ्वीचें एक खंड.

१६०९. (अ). शैली, म. (शील+ई); रीति; चाल.

१६१०. पार्थिव, सं. (पृथिवी+अ); मातीचा.

१६११. पृथिवी ( पृथ्–फेंकणें ); जमीन; भूमि.

१६१२. विचारपद्धति, सं. ( विचार+पद्धति ); विचारसरणी, विचाराची रीति.

१६१३. विचार, ( वि+चर्–चिंतन करणें ); मनन.

१६१४. पद्धति (पद्+हन्–मारणें); चाल; रस्ता.

१६१५. उच्छेद, सं. ( उत्+छिद्-नाश करणें ); नाश.

१६१६. प्राविण्य, सं. (प्रवीण+य); शहाणपणा; वाकबगारी.

१६१७. टिप्पण, स. ( टिप्–टाकणें ); टांचण.

१६१८. निःसंदेह, सं. ( निस्+संदेह ); निःसंशय. पं. व. स.

१६१९. संदेह, ( सम्+दिह्–शंका घेणें ); संशय.

१६२०. परिपाठ, सं. ( परि+पठ्-आवृत्ति देणें; प्रचार.

१६२१. एकीकरण, सं. ( एक+ई+करण ); एक नसतां एक करणें.

१६२२. मौलिक, सं. ( मूल+इक ); मूळचा.

१६२३. ज्वलनक्रिया, सं. ( ज्वलन+क्रिया ); जळण्याचा व्यापार; जळणें. क. स.

१६२४. ज्वलन, ( ज्वल्–जळणें ); दाह; ज्वलन.

१६२५. नैत्रोजन, इं.–एक वायु.

## ३९. रसायनशास्त्राचा इतिहास इ०—भाग २ रा. ( पृ० १३२ ).

१६२६. परिभाषा, सं. (परि+भाष् संकेतानें बोलणें ); सांकेतिक भाषण किंवा ठरविलेलें बोलणें.

१६२७. राज्यक्रांति, सं. ( राज्य+क्रांति ); राज्य जाणें.

१६२८. राज्य, ( राजन्+य ); अधिकार; सत्ता.

१६२९. क्रांति (क्रम्–जाणें); जाणें.

१६३०. गिलोतिन, इं.–ज्याच्या योगानें ५०, १००, २०० माणसें एकदम मारितां येतात असें एक मनुष्यवधाचें साधन.

१६३१. तंबाखू, सं. ( ताम्रकूट ); वनस्पतिविशेष.

१६३२. मारेकरी, म. ( मारकारी =मार+कारी ); घात करणारा.

१६३३. मार, सं. ( मार=मृ+मरणें ); हनन; ताडन.

१६३४. कारी, ( कृ–करणें ); करणारा.

१६३५. संस्थापक, सं. (सम्+स्था–उभारणें ; स्थापणें); निर्माण करणारा किंवा स्थापन करणारा.

१६३६. अनुयायी, सं. (अनु+या–मागून जाणें); मागील पाहून वागणारा ; मागून जाणारा ; सेवक.

१६३७. अध्ययन, सं. (अधि+इ–अभ्यास करणें); अभ्यास, शिकणें.

## ३७. रसायनाकर्षण. (पृ० १३६).

१६३८. वस्त्रगाळ, म. (वस्त्रगालित=वस्त्र+गालित); तृ. त. स. ; वस्त्रानें गाळलेली.

१६३९. वस्त्र (वस्–वेष्टणें); कापड.

१६४०. गालित (गल्–गळणें); गाळलेलें.

१६४१. पिंड, सं. (पिंड्–गोळा करणें); गोळा.

१६४२. अविभाज्य, सं. (न+विभाज्य); विभाग करण्यास अशक्य.

१६४३. विभाज्य (वि+भाज्य); फोडण्यास योग्य.

१६४४. भाज्य, (भंज्–तुकडे करणें); तुकडे करण्याजोगें.

१६४५. तफावत, आ.–फेर ; बदल ; भेद ; अंतर.

१६४६. परमाणुद्वय, सं. (परमाणु+द्वय); परमाणूंची जोडी.

१६४७. द्वय–जोडी.

१६४८. रसायनाकर्षी, सं. (रसायन+आकर्षिन्); रसायनशक्तीनें आपल्याकडे ओढणारा. तृ. त. स.

१६४९. आकर्षिन् (आ+कृष्–ओढणें); ओढणारा.

## ३८. कविता–हंसकाकीय कथानक (पृ. १४०).

१६५०. हंसकाकीय, सं. (हंस+काक+ईय); हंस आणि कावळा यांसंबंधीं.

१६५१. कथानक, सं. (कथ्–सांगणें); लहान गोष्ट.

१६५२. स्पर्धा, सं. (स्पर्ध्–द्वेष करणें); बरोबरी ; द्वेष.

१६५३. मद, सं. (मद्–माजणें ; वेडें होणें); गर्व.

१६५४. पथ्य, सं. (पथिन्+य); हिताचें ; चांगलें.

१६५५ पथिन्, (पथ्–जाणें); मार्ग.

१६५६. तथ्य, सं. (तथा+य); खरें.

१६५७. तथा–तसें.

१६५८. श्रमद, सं. (श्रम+द); श्रम देणारें ; दुःख देणारें. द्वि. त. स.

१६५९. श्रम, (श्रम्–थकणें); मेहनत, पीडा.

१६६०. श्रवण, सं. (श्रु–ऐकणें); कान.

१६६१. सुहृदुपदेश, सं. (सुहृद्+उपदेश); मित्राचा उपदेश. ष. त. स.

१६६२. सुहृद् (सु+हृद्); ज्याचें अंतःकरण चांगलें आहे ; मित्र.

१६६३. उपदेश, (उप+दिश्–सांगणें); सल्ला; शिकवणूक.

१६६४. वीट, सं. (विट–विट्–शाप देणें ; निंदा करणें); कंटाळा ; त्रास.

१६६५. कर्ण, सं. ( कृ–फेंकणें; ऐकणें); अंगदेशचा एक राजा.

१६६६. साधुनृप, सं. ( साधु+नृप); 'साधु' नामक राजा; क. स.

१६६७. साधु–विशेष नांव ( साध्–साधणें ); मोक्ष मिळणारा.

१६६८. नृप ( नृ+प ); राजा; मनुष्यांचें पालन करणारा.

१६६९. नृ ( नी–नेणें ); मनुष्य.

१६७०. धनी, सं. ( धन+इन् ); सावकार.

१६७१. उच्छिष्ट, सं. ( उत्+शिष्–बाकी रहाणें ); उष्टें.

१६७२. साध्वसदा, सं. ( साध्वस+द+आ ); भय देणारी.

१६७३. साध्वस–(साधु+अस) भय.

१६७४. वैश्यकुमारक, सं. ( वैश्य+कुमारक ); वाण्याचीं मुलें. ष. त. स. .

१६७५. वैश्य–( विश्+य ) वाणी.

१६७६. कुमारक ( कुमार+क ); लहान मुलें.

१६७७. कुमार–मूल.

१६७८. मांसौदन, सं. ( मांस+ओदन ); मासयुक्त भात. म. स.

१६७९. ओदन–भात.

१६८०. वडा, सं. ( वट=वट्–विभागणें ); पिठाचा विशेष पदार्थ.

१६८१. मांडा, सं. ( मंडक=मड्शोभणें ); पिठाचा विशेष पदार्थ.

१६८२. मधु–सं. मद्य; दारू.

१६८३. ... ... ... ... ... ...

१६८४. घृत, सं. ( घृ–पाझरणें; शिंपडणें ); तूप.

१६८५. पायस, सं. ( पयस्+अ ); दुधाची केलेली खीर.

१६८६. पयस्–( पय्–जाणें ); दूध; पाणी.

१६८७. वायस, सं –कावळा.

१६८८. पक्षी ( पक्षिन्=पक्ष+इन); ज्यांना पंख असतात; पांखरें.

१६८९. सवें, सं ( सह ); बरोबर.

१६९०. कदाचित्, सं. ( कदा+चित् ); एकदा; एके काळीं.

१६९१. मराळ, सं.–हंस.

१६९२. मुक्ताफळ, सं. ( मुक्ताफल=मुक्ता+फल ); क. स. मोतीं.

१६९३. बिसतंतु, सं. (बिस+तंतु); कमळाच्या देठांतील दोरे. स. त. स.

१६९४. बिस–कमळाचे देंठ.

१६९५. तंतु ( तन्–विस्तार पावणें ); दोरा; केसर.

१६९६. स्वोच्छिष्टपिंडपुष्ट, सं. ( स्व+उच्छिष्ट+पिंड+पुष्ट ); आपलें उष्टें खाऊन पोसलेला. स्वोच्छिष्ट–ष. त. स.; स्वोच्छिष्टपिंड–क. स.; स्वोच्छिष्टपिंडपुष्ट–तृ. त. स.

१६९७. फराळ, सं. ( फलाहार=फल+आहार ) ; फळें खाणें; फलभक्षण.

१६९८. सर्वखगश्रेष्ठ, सं. ( सर्व+खग+श्रेष्ठ ); सर्व पक्ष्यांत श्रेष्ठ.

१६९९. खग ( ख+ग ); आकाशांत जाणारा; पक्षी.

१७००. श्रेष्ठ–सर्वांत मोठा; उत्तम.

१७०१. सुदुष्ट ( सु+दुष्ट ); अत्यंत नीच, हलका. क. स.

१७०२. दुष्ट ( दुष्–दोष देणें ); वाईट, नीच.

१७०३. बालोक्त, सं. (बाल+उक्त); मुलांचें भाषण; बोलणें.

१७०४. बाल-( बल्-वांचणें ); मुलगा; मूल.
१७०५. उक्त ( वच्-बोलणें ); बोललेलें, भाषण.
१७०६. साचार, सं. ( सत्याकार-सत्य+आकार ); सत्य; खरें.
१७०७. सत्य ( सत्+य ); खरें.
१७०८. मलीमसाचार, सं. ( मलीमस+आचार ); वाईट आचरण करणारा. ष. ब. स.
१७०९. मलीमस—वाईट.
१७१०. आचार, ( आ+चर्=चालणें ); वर्तणूक.
१७११. मत्समीप, सं. ( मत्+समीप ); माझ्याजवळ.
१७१२. मत्-माझें.
१७१३. समीप-जवळ; पुढें.
१७१४. ठाकणें, म.-उभें रहाणें.
१७१५. खगापसद, सं (खग+अपसद ); पक्ष्यांमध्यें नीच. स. त. स.
१७१६. अपसद ( अप+सद्-वाईट रीतीनें जाणें ); नीच; हलका.
१७१७. चार, सं. ( चर्-चालणें, बोलणें ); चेष्टा; वर्तणूक.
१७१८. राय, सं. ( राजन्=राज्-शोभणें ); राजा.
१७१९. सुदूरपाती, सं. ( सु+दूर+पातिन् ); फार दूरवर उडणारा. अ. क. स.
१७२०. क्षीरधितीरविहारी, सं. ( क्षीरधि+तीर+विहारी ); क्षीरसमुद्राच्या तीरावर राहणारा. क्षिरधितीर-ष. त. क्षीरधि-विहारी. स. त. स.
१७२१. क्षीरधि (क्षीर्+धि ); क्षीरसमुद्र. द्वि. त. स.
१७२२. क्षीर-दूध.
१७२३. धि ( धा-पोसणें ); सांठा; संचय.
१७२४. तीर-( तॄ-तरणें ); कांठ.
१७२५. विहारी, सं. ( वि+ह-रमणें ); विहार करणारा.
१७२६. जळकेलि, सं. (जलकेलि-जल+केलि ); जलक्रीडा; पाण्यांत खेळणें. स. त. स.
१७२७. केली ( केल्-खेळणें ); खेळणें.
१७२८. वळिपुष्ट, सं. ( बलिपुष्ट-वलि+पुष्ट ); वळी खाऊन माजलेला. तृ. त. स.
१७२९. वलि ( वल्-वांचणें ); ग्रास; घास.
१७३०. समेत, सं. ( सम्+इ-जाणें ); बरोबर असलेला.
१७३१. व्यसनार्णव, सं. ( व्यसन+अर्णव ); दुःखसमुद्र. क. स.
१७३२. अर्णव-( अर्णस्+व ); समुद्र.
१७३३. अर्णस्-पाणी.
१७३४. हितवचन, सं. ( हित+वचन ); उपदेश; बोध; कल्याण करणारें भाषण क. स.
१७३५. वचन, ( वच्-बोलणें ); भाषण.
१७३६. कुत्सा, सं. ( कुत्स्-निंदा करणें ); निंदा.
१७३७. गर्वराशि, सं. ( गर्व+राशि); अति गर्विष्ट. ष. त. स.
१७३८. गर्व-( गर्व्-अभिमान धरणें ); अभिमान.
१७३९. राशि-रास; ढीग.
१७४०. खगम ( ख+गम्-जाणें ); आकाशांत उडणारा; पक्षी-

१७४१. गम (गम्-जाणें); जाणारा.
१७४२. पक्षवीर्य, सं. (पक्ष+वीर्य); पंखाचें बळ. ष. त. स.
१७४३. वीर्य (वीर+य); शक्ति; बळ.
१७४४. वीर (वीर्-पराक्रम करणें); पराक्रमी.
१७४५. तगणें, सं. (तकन-तक्-सहन करणें); टिकणें.
१७४६. उड्डीन, सं. (उत्+डी-वर उडणें); उडण्याचा प्रकार.
१७४७. अवडीन, सं. (अव+डी); खालीं उडणें.
१७४८. प्रडीन, सं. (प्र+डी); विशेष उडणें.
१७४९. संडीन, सं. (सम्+डी); उत्तम उडणें.
१७५०. विपक्षगर्व, सं. (विपक्ष+गर्व); शत्रूचा गर्व. ष. त. स.
१७५१. विपक्ष (वि+पक्ष); शत्रु. ष. व. स.
१७५२. निवडणें, सं. (निर्वंडन-नि+वंड्-वेगळें करणें); निराळें होणें;-करणें.
१७५३. भलता, सं. (भद्र)-कोणीएक; अमका.
१७५४. मानणें, सं. (मानन=मन्-वाटणें); वाटणें.
१७५५. ध्वांक्ष, सं (ध्वांक्ष्-ओरडणें); कावळा.
१७५६. तज्ज्ञाति, सं. (तत्+ज्ञाति); त्याची जात.
१७५७. ज्ञाति (ज्ञा--जाणणें); जातीची मंडळी.
१७५८. अतज्ज्ञ, सं. (न+तज्ज्ञ); ती गति न जाणणारा. न. त. स.
१७५९. शतपातपंडित, सं. (शत+पात+पंडित); उडण्याच्या शंभर गति जाणणारा. ष. त. स.
१७६०. पंडित, (पंडा+इत) शहाणा; सुज्ञ.
१७६१. अस्मन्मित्रबंधुकाक, सं. (अस्मद्+मित्र+बंधु+काक); आमचा मित्र आणि बंधु कावळा. क. स.
१७६२. अस्मद्-आमचा.
१७६३. मित्र, (मिद्-प्रेम करणें); स्नेही.
१७६४. बंधु-(बंध्-बांधणें); जातभाई.
१७६५. व्योम, सं. (व्ये-आछादणें; व्यापणें); आकाश.
१७६६. पातकालय, सं. (पातक+आलय); पातकाचें घर. ष. त. स.
१७६७. पातक-(पत्-पडणें); पाप.
१७६८. उड्डीनप्रमुख, सं -उड्डीन ही गति प्रमुख आहे ज्यामध्यें. स. व. स.
१७६९. प्रमुख, (प्र+मुख); मुख्य; श्रेष्ठ.
१७७०. शतसंख्य, सं. (शत+संख्या); ज्यांची संख्या शंभर आहे. ष. व. स.
१७७१. संख्या (सम्+ख्या-गणणें); गणति; मोजदाद.
१७७२. पतित, सं. (पत्-उडणें); उडणें; नीच; पापी.
१७७३. हंसप्रवर, सं. (हंस+प्रवर); हंसांत मुख्य. सं. त. स.
१७७४. प्रवर (प्र+वर-वृ--स्वीकारणें); मुख्य.
१७७५. स्वज्ञातिश्रेष्ठ, सं. (स्व+ज्ञाति+श्रेष्ठ); आपुल्या जातींत मुख्य. क. स., स. त.

१७७६. गतितांडव, सं. ( गति+तांडव ); उडण्याचा चमत्कार.

१७७७. तांडव–विशेष प्रकारचा नाच.

१७७८. हर्षभर, सं. ( हर्ष+भर ); आनंदाचा भर.

१७७९. हर्ष ( हृष्–आनंद पावणें ); आनंद.

१७८०. हेळसणें, सं. ( हेलन–हेल्–धिक्कारणें ); धिक्कारणें.

१७८१. खगकुलशिरोवतंस, सं. (खग+कुल+शिरस्+अवतंस); पक्षिकुळांतील मुगुटमणि.

१७८२. अवतंस–(अव+तंस्–शोभविणें ); भूषण.

१७८३. मृदुपात, सं. (मृदु+पात); सावकाश उडणें. क. स.

१७८४. मृदु–( मृद्–निसटून जाणें ); हळू; सावकाश.

१७८५. हानिशक्ति, सं. ( हीन+शक्ति ); निर्बल; निःशक्त. ष. ब. स.

१७८६. हीन ( हा–टाकणें ); विरहित; गेलेली; कमी.

१७८७. मुहूर्त, सं.–अडीच घटका; बारा क्षण; वेळ.

१७८८. भवज्ज्ञाति, सं. ( भवत्+ज्ञाति ); तुमचा जातभाई.

१७८९. भवत्–तुमचा.

१७९०. अवज्ञा, सं. (अव+ज्ञा–अपमान करणें); अपमान; निंदा.

१७९१. दिग्देश, सं. ( दिश्+देश); दिशेकडील भाग. ष. त. स.

१७९२. दिश्–( दिश्–दाखवणें ); दिशा.

१७९३. देश ( दिश्–दाखवणें );प्रदेश; भाग.

१७९४. मळधी, सं. ( मलधी=मल+धी);दुर्बुद्धीचा. ष. ब. स.

१७९५. जळधी, सं. (जलधि=जल+धि ); पाण्याचा सांठा; समुद्र.

१७९६. विरणें, सं. ( विरमण=वि+रम्–खिन्न होणें;नाहींसें होणें); खिन्न होणें; हुरूप जाणें.

१७९७. अग, स. ( न+ग ); न जाणारा; डोंगर; झाड;पर्वत.

१७९८. नाग, सं. ( न+ग ); न जाणारा; डोंगर; झाड; पर्वत.

१७९९. तग, सं. ( तंक=तक्–धीर धरणें ); टिकाव; धीर.

१८००. वाढणें, म. ( वह्–देणें; नेणें ); टाकणें.

१८०१. करटपती, सं. ( करटपति=करट+पति ); कावळ्यांत श्रेष्ठ. ष. त. स.

१८०२. करट–कावळा.

१८०३. पति–( पा–राखणें ); स्वामी.

१८०४. अत्यंतासन्नपतन, सं. (अत्यंत+आसन्न+पतन ); पडण्याच्या अगदीं बेतांत आलेला; आतां पडेल असा. ष. ब. स.

१८०५. अत्यंत ( अति+अंत ); फार; पुष्कळ.

१८०६. आसन्न ( आ+सद्–जाणें ); जवळ; असलेलें.

१८०७. गुह्य, सं. ( गुह्–लपविणें ); गुप्त; लपविण्याजोगें.

१८०८. सांगातें, सं. ( संगत=सम्+गम्–जाणें); बरोबर.

१८०९. तुंडाग्र, सं. ( तुंड+अग्र ); चोंचीचें शेवट. ष. त. स.

१८१०. पक्षयुग, सं. ( पक्ष+युग ) दोन पंख; पंखांची जोडी.

१८११. लक्षयोजनांबुधिपरतीर, सं. ( लक्ष+योजन+अंबुधि+पर+तीर ); चार लक्ष कोस लांबीच्या ह्या समुद्राचा पलीकडचा कांठ.

१८१२. योजन-( युज्-जोडणें ); चार कोस.

१८१३. अंबुधि ( अंबु+धि ); समुद्र; पाण्याचा सांठा.

१८१४. अंबु-( अंब्-शब्द करणें ); पाणी.

१८१५. क्षारोदक, सं. ( क्षार+उदक ); खारें पाणी. क. स.

१८१६. क्षार-( क्षर्-पाझरणें ); खारें.

१८१७. उदक-( उद्-ओलें होणें ); पाणी.

१८१८. विव्हळ, सं. (विव्हल-वि+व्हल्-दुःखी होणें ); दुःखी.

१८१९. आर्तस्वर, सं.(आर्त+स्वर); दीन वाणी.

१८२०. आर्त-पीडलेला; दुःखी.

१८२१. स्वर-(स्वर्-शब्द करणें ); वाणी; आवाज.

१८२२. प्राणोपायन, सं. ( प्राण+उपायन ); प्राणरूपी नजराणा.

१८२३. उपायन ( उप+इ-जवळ जाणें ); भेट, वक्षीस.

१८२४. प्राणदान, सं. ( प्राण+दान ); प्राणाचें दान. ष. त.

१८२५. दान ( दा-देणें ); देणें.

१८२६. दुस्तर, सं. ( दुस्+तर-तृ-तरणें ); तरण्यास ( पार जाण्यास ) कठीण.

१८२७. नदीन, सं. ( नदी+ईन ); नद्यांचा स्वामी; समुद्र.

१८२८. ईन-स्वामी.

१८२९. सदयजनोत्तंस, सं. ( सदय+जन+उत्तंस ); सदय जनांचें भूषण. सदयजन-क. स. सदय...उत्तंस-ष. त. स.

१८३०. सदय (स+दया); दयाळू. सहार्थी ब. स.

१८३१. उत्तंस-( उत्+तंस्-शोभवणें ); भूषण.

१८३२. पर्व, सं. ( पृ-भरणें ); पुण्य वेळ.

१८३३. परमोदार, सं. ( परम+उदार ); अति उपकारी; अतिपुण्य देणारें. क. स.

१८३४. उदार ( उद+ऋ-जाणें ); दाता.

१८३५. मज्जन, सं. ( मस्ज्-स्नान करणें ); स्नान.

१८३६. पिपासु, सं. ( पा-पिणें ); पिऊं इच्छिणारे ( ऐकूं इच्छिणारे ); तृषित; तहान लागलेले.

१८३७. महाभाग, सं. ( महत्+भाग ); मोठा भाग्यवान्; ष. ब. स.

१८३८. अदभ्र, सं. ( न+दम्भ्-ढोंग करणें ); अतिशय; अत्यंत.

१८३९. सद्य, सं. ( सद्यः ); लागलीच; तावडतोब.

१८४०. सज्जनश्रुतिश्रमद, सं. (सत्+जन+श्रुति+श्रम+द ) चांगल्या लोकांच्या कानास दुःख देणारें. सज्जनश्रुति-ष. त. सज्जनश्रुतिश्रम-ष. त. सज्जन-द-द्वि त. स.

१८४१. सज्जन, ( सत्+जन ) चांगले लोक. अ. पू. क. स.

१८४२ श्रुति, (श्रु—ऐकणें ); कान.
१८४३. अनवद्य, सं. ( न+अवद्य ); निर्दोष; बोलण्यास किंवा स्तुति करण्यास योग्य.
१८४४. अवद्य (न+वद्य—आ)दोषी.
१८४५. वद्य, ( वद्—बोलणें ) ;बोलण्याजोगें.
१८४६. पांगा, सं. ( अपांग=अप+अंग ); व्यंग.
१८४७. विभु, सं. ( वि+भू—होणें ); श्रेष्ठ; मोठा.
१८४८. शलभ, सं.—टोळ.
१८४९. मदाधिक, सं. ( मद्+अधिक );.मजहून श्रेष्ठ. पं. त.
१८५०. अधिक ( अधि+क ); ज्यास्त.
१८५१. कवळणें, सं. ( कवलन ); धरणें.
१८५२. ब्रह्मवाहन, सं. ( ब्रह्मन्+वाहन ); ब्रह्मदेवाचें वाहन. ष. त. स.
१८५३. ब्रह्मन्, सं. ( बृह्—वाढणें ); ब्रह्मदेव.
१८५४. यथागत, सं. ( यथा+आगत ); आले तसे. अ. क.
१८५५. आगत ( आ+गम्—येणें ); आलेले.
१८५६. आश्वासन, सं. ( आ+श्वस्—श्वास टाकणें; शांत करणें ); शांति; स्वस्थता.
१८५७. बहुमत, सं. ( बहु+मत ); पुष्कळांस मान्य. तृ. त. स.
१८५८. मत ( मन्—वाटणें ); मानलेला; विचार.

## ३९. मनुष्याच्या शरिराची रचना इ० (पृ० १४५).

१८५९. कांटा, म.—मानेचें हाड; मानेचा सांधा.

१८६०. मणका, सं. ( मणिक ) पाठीच्या कण्यांतील एक मणि.
१८६१. स्नायु, सं. ( स्ना—धुणें ); मोठी शीर; रक्त शुद्ध करण्याची शीर.
१८६२. मज्जारज्जु, सं. (मज्जा+रज्जु ); मज्जेचा तंतु.
१८६३. रज्जु—दोरी.
१८६४. लंबवर्तुल, सं. ( लंब+वर्तुल ); लांबट, वाटोळें. क. स.
१८६५. वर्तुळ—वाटोळें.
१८६६. फांसळी, सं. ( पाश ) + म. ( ळी ) ; बरगडी.
१८६७. कूर्चा, सं. ( कूर्च );कुंच्यासारखा जुडगा.
१८६८. जवा, सं. ( यव=यु—जोडणें ) ; जोड.

## ४०. आरोग्यरक्षणाचें महत्त्व ( पृ.१४८. )

१८६९. निर्विकार, सं. ( निर्+विकार ); विकाररहित ; निकोप. पं. ब. स.
१८७०. विकार, ( वि+कृ—वाईट करणें ) ; इजा ; पीडा.
१८७१. फुफ्फुस, सं.—श्वासोच्छ्वासाचें एक साधन.
१८७२. उपकारिता, सं. ( उप+कृ—साह्य करणें ); उपकार करण्याची बुद्धि ; इच्छा.
१८७३. सौजन्य, सं. ( सुजन+य ); सज्जनपणा.
१८७४. सुजन, ( सु+जन ) चांगला मनुष्य.
१८७५. अभाव, सं. ( न+भाव ); उणीव; व्यंग असणें; न. त.

१८७६. मांद्य, सं. ( मंद+य ); सुस्ती; आळस; अचंचलपणा.
१८७७. औत्सुक्य, सं. ( उत्सुक+य ); उत्साह; उत्कंठा.
१८७८. उत्सुक, ( उत्+सू-प्रसवणें ); उत्कंठित.
१८७९. व्यग्र, सं. (वि+अग्र); ज्याची वृत्ति चंचल झाली आहे.
१८८०. महत्वाकांक्षा, सं. ( महत्व+आकांक्षा); मोठेपणाची इच्छा.
१८८१. आकांक्षा, ( आ+कांक्ष् = इच्छिणें); इच्छा; आशा; हाव.
१८८२. व्यसनलंपटता, सं. ( व्यसन+लंपट+ता ); व्यसनांत निमग्न होण्याचा धर्म.
१८८३. रोगपरिहार, सं. ( रोग+परिहार ); रोगाचा नाश करणें.
१८८४. परिहार ( परि+हृ-नाश करणें ); नाश.
१८८५. दूषित, सं. ( दूष्-दोष देणें); वाईट; बिघडलेलें; अशुद्ध.
१८८६. मादक, सं. ( मद्-वेडा होणें); गुंगी आणणारा; वेडा करणारा.
१८८७. प्रासंगिक, सं. (प्रसंग+इक ); प्रसंगीं प्राप्त होणारें, वेळेपुरता.
१८८८. प्रसंग (प्र+सञ्ज्-जोडणें); वेळ; संकट.
१८८९. आत्मसंयमन, सं. (आत्मन्+संयमन ); आपलें मन ताब्यांत ठेवणें.
१८९०. संयमन, (सम्+यम्-स्वाधीन ठेवणें ); स्वाधीन ठेवणें.
१८९१. शमन, सं. ( शम्-शांत करणें ); शांति; नाश.

## ४१. देवी काढण्याच्या युक्तीचा बोध इ० ( पृ० १९१ ).

१८९२. गवळण, सं. (गोपालिनी); गुरें बाळगणारी.
१८९३. लस, सं. ( लसा किंवा लसिका=लस्-उत्पन्न होणें; प्रकाशणें ); लाळेसारखा अशुद्ध रस.
१८९४. कास, सं. ( कच्छ ) ओंटी.
१८९५. आंचळ, सं. ( अंचल=अंच्-जाणें ); कासेचा सड.
१८९६. फोड, सं. ( स्फोट=स्फुट्-फुटणें ); पुळी.
१८९७. अमोलिक, म. ( न+मोलिक ); ज्याचें मोल होत नाहीं असा. न. ब. स.
१८९८. कमिटी, इं.-मंडळी.
१८९९. वण, सं. ( व्रण=व्रण्-पीडा देणें ); खूण; डाग.
१९००. विद्याचारसंपन्न, सं. (विद्या+आचार+संपन्न ); ज्ञान आणि आचार यांणीं युक्त.
१९०१. संपन्न, ( सम्+पद्-श्रीमान् होणें ); पूर्ण; युक्त.

## ४२. अन्न, पाणी आणि हवा. ( पृ. १९३. )

१९०२. रासायनिक, सं. ( रसायन+इक ); रसायनसंबंधीं.
१९०३. सेंद्रियत्व, सं. ( सेंद्रिय+त्व ); ज्यास अवयव अथवा इंद्रिय आहेत असली स्थिति.
१९०४. सेंद्रिय, ( स+इंद्रिय ); इंद्रियांसहित.

१९०५. इयत्ता, सं. (•इयत्+ता); नेमस्तपणा.
१९०६. इयत्–इतकें.
१९०७. अंशुविक्षेप, सं. (अंशु+विक्षेप); किरण टाकणें.
१९०८. अवश्यमेव, सं. (अवश्यम्+एव); जरूर.
१९०९. एव–निश्चयानें.
१९१०. मलमूत्रस्वेदश्वासादि, सं. (मल+मूत्र+स्वेद+श्वास+आदि); मल, मूत्र, घाम, श्वास इ०. मलमूत्रस्वेदश्वास–द्वंद्व. मलमूत्र...श्वासादि–स. ब. स.
१९११. मूत्र–मूत.
१९१२. स्वेद, (स्विद्–घाम येणें); घाम.
१९१३. नैत्रोजनविहीन, हिं. (नैत्रोजन+विहीन); नैत्रोजना शिवाय.
१९१४. विहीन, सं. (वि+हीन); शिवाय; खेरीज.
१९१५. पेशी, सं. (पिश्–आकार देणें); मांसाची थैली; मांसपिंड.
१९१६. द्विदल, सं. (द्वि+दल); दोन डाळिंब्यांचें. ष, ब. स.
१९१७. स्नेहजातीय, सं. (स्नेह+जाति+ईय); तेलाच्या जातीचे.
१९१८. जाति–(जन्–उत्पन्न होणें); प्रकार, जात.
१९१९. स्टार्च, इं.–सत्व.
१९२०. तवकील, सं. (त्वक्क्षीर); विशेष पदार्थ.
१९२१. मेदोजनक, सं. (मेदस्+जनक); मेद अथवा चरबी उत्पन्न करणारा.
१९२२. मेदस् (मिद्–माखणें; चिकटणें); चरबी.
१९२३. रुधिराभिसरण, सं. (रुधिर+अभिसरण); रक्ताचें चलनवलन.
१९२४. रुधिर (रुध्–राखणें); रक्त.
१९२५. उद्दीपन, सं. (उत्+दीप्–पेटविणें; भूक उत्पन्न करणें; चेतवणें); चेतवणें; पेटवणें.
१९२६. शर्कराजातीय, सं. (शर्करा+जाति+ईय); साखरेच जातीचा.
१९२७. शर्करा–साखर.
१९२८. सुपचनीय, सं. (सु+पचनीय); लवकर पचणारा.
१९२९. पचनीय (पच्–शिजवणें); पचण्याजोगें.
१९३०. आमाशय, सं. (आम+आशय); ज्यांत खाल्लेलें अन्न प्रथम जातें तो पोटाचा भाग.
१९३१. आम (अम्–रोग होणें); कच्चा; हिरवा.
१९३२. आशय, (आ+शी–राहणें); जागा; स्थान.
१९३३. मांसाहारी, सं. (मांस+आहार+ई); मांसभक्षक किंवा मांस खाणारा.
१९३४. प्रादुर्भाव, सं. (प्रादुस्+भाव); उद्भव किंवा उत्पत्ति.
१९३५. प्रादुस्–स्पष्ट, उघड.
१९३६. परिवेष्टित, सं. (परि+वेष्टित); आच्छादित किंवा वेढलेलें.
१९३७. वेष्टित (वेष्ट्–गुंडाळणें); गुंडाळलेलें.
१९३८. अमंगळ, सं. (अमंगल=न+मंगल); घाणेरा; मळीण.

## ४३. प्राणिवर्गाचा व वनस्पतिवर्गाचा परस्परसंबंध. ( पृ० १६१ ).

१९३९. परस्परसंबंध, ( परस्पर+संबंध ); एकमेकांचा संबंध.
१९४०. संबंध (सम्+बंध्-बांधणें); योग; नातें.
१९४१. संमीलन, सं. (सम्+मील्-एक होणें ); मिश्रण; एक होणें.
१९४२. बुभुक्षित, सं. ( भुज्-खाणें ); भुकेलेला.
१९४३. गगनचुंबी, सं. ( गगन+चुंबी ); आकाशापर्यंत पोंहोचणारा.
१९४४. गगन-आकाश.
१९४५. चुंबी, ( चुंब्-स्पर्श करणें; ओढणें; मुका घेणें ); स्पर्श करणारा; पोंचणारा.
१९४६. शेवाळ, सं. ( शैवाल ); वनस्पतिविशेष; ओलाव्याला बारीक वनस्पति उगवते ती
१९४७. साधनीभूत ( साधन+ई+भूत ); साधन नसतां साधन होणारा.
१९४८. साधन ( साध्-उपयोगीं पडणें ); साह्य.

## ४४. व्यायाम. (पृ० १६३).

१९४९. ताकत, आ.-शक्ति; जोर
१९५०. गात्र, सं-शरीर; अवयव
१९५१. ऐन, आ.-भर; पूर्ण.
१९५२. गर्क, आ. ( गरक ); तल्लीन; मग्न.
१९५३. खुजा, सं. ( खर्व=खर्व्-जाणें);ठेंगणा; वाढ खुटलेला
१९५४. संक्रमित, सं. (सम्+क्रम्-जाणें; शिरणें ); कांतून दुसऱ्यांत गेलेला.
१९५५. वर्षानुवर्ष, सं. ( [illegible]+अ-नु+वर्ष ); वर्षामागून वर्ष; एकामागून एक वर्ष.
१९५६. आक्सिजनपूरित ( आक्सिजन+पूरित ); आक्सिजनानें ह्मणजे प्राणवायूनें भरलेलें.
१९५७. पूरित (पृ-भरणें); भरलेलें.
१९५८. शिथिल, सं. ( श्लथ्-ढिलें होणें ); सैल; ढिलें.
१९५९. वाताहत, सं. ( वात+आहत ); दाणादाण; नाश.
१९६०. आहत (आ+हन्-मारणें); मारलेला; पिडलेला.
१९६१. चांचल्य, सं. ( चंचल+य ); अस्थिरता; चंचलपणा.
१९६२. अल्पवयस्क, सं. ( अल्प+वयस्+क ); थोड्या [illegible]याचा. प. व स.
१९६३. वयस् ( वय्-जाणें ); आयुष्य.
१९६४. दिनचर्या, सं ( दिन+चर्या ); दिवस जाणें ).
१९६५. दिन (दी-प्रकाशणें) दिवस.
१९६६. चर्या ( चर्-चालणें ); वर्तणूक; क्रम; लक्षण.
१९६७. उचित, सं. ( वच्-बोलणें ); योग्य; ठीक.
१९६८. पर्याय, सं. ( परि+इ-बदलणें ); पालट; बदल; एका अर्थाचा.
१९६९. अनुक्रम, सं. ( अनु+क्रम ); पद्धत.
१९७०. दीर्घश्रम, सं: (दीर्घ+श्रम); विशेष श्रम; फार श्रम.

१९७१ दीर्घ–फार; मोठा.
१९७२ मांसपुष्टि, सं. ( मांस+पुष्टि ); मांस वाढविणें.
१९७३. पुष्टि (पुष्–पोसणें); पोषण.
१९७४. दृढता, सं. ( दृढ+ता ); भक्कमपणा.
१९७५. दृढ ( दृंह्–वळकट करणें ); भक्कम.
१९७६. अस्थिपंजर, सं. ( अस्थिन्+पंजर); हाडांचा पिंजर .
१९७७. अस्थिन्–हाड.
१९७८. व्यक्तिमात्र, सं. ( व्यक्ति+मात्र ) प्रत्येक मनुष्य.
१९७९. व्यक्ति(वि+अंज्–स्पष्ट करणें ); मनुष्य.
१९८०. प्रकृतिभिन्नत्व, सं. ( प्रकृति+भिन्नत्व); निरनिराळ्या प्रकृति असणें.
१९८१. भिन्नत्व ( भिन्न+त्व ); निराळेपणा.
१९८२. अपात्र, सं. ( न+पात्र ); अयोग्य.

## ४९. [illegible] (पृ० १६९).

१९८३ दृश्यपणा, सं. ( दृश्य )+( पणा ); उघडपणा; स्पष्टपणा.
१९८४. अनुकंपा, सं. ( अनु+कंप्–दया करणें ); कळवळणें; दया.
१९८५. अहित, सं. ( न+हित ); तोटा; नुकसान; शत्रु; अयोग्य.
१९८६. प्रवृत्ति, सं. ( प्र+वृत्–वळणें ); हेतु; कल.
१९८७. निर्विवाद, सं. ( निर्+विवाद); वादरहित. पं. व. स.
१९८८. विवाद ( वि+वद्–विशेष बोलणें ); भाषण; बोलणें.
१९८९. एकाग्र, सं. ( एक+अग्र ); ज्याचें चित्त एकाकडे लागलें आहे; स्थिर. ष. व.
१९९०. अल्पस्वल्प, सं. ( अल्प+स्वल्प ); लहानसान; थोडें; फार थोडें.
१९९१. स्वल्प ( सु+अल्प ); अतिथोडें; सोपें.
१९९२. बधिरता, सं.( बधिर+ता); बहिरेपणा.
१९९३. बधिर( बध्–तिरस्कार करणें ); बहिरा.
१९९४. श्रेयस्कर, सं. ( श्रेयस्+कर ) ; कल्याणकारक. द्वि. त. स.
१९९५. श्रेयस् (श्री–आश्रय करणे); कल्याण.
१९९६. रसधातु, सं. ( रस+धातु); रसरूपी धातु. क. स.
१९९७. धातु ( धा–पोसणें ); मूळ खनिज पदार्थ; मूळपदार्थ; पदार्थ.
१९९८. शरीरदुरुस्ती, हिं. (शरीर+दुरुस्ती ); शरीर ताजेंतवानें करणें.
१९९९. दुरुस्ती, फा.–नीट करणें.
२०००. तजेला, आ ( तजला ); तेज; कांति.
२००१. मस्तकशूलादि, सं. ( मस्तक+शूल+आदि ); माथेशूळ इत्यादि; माथेशूळ मुख्य आहे ज्यांमध्यें अशा. स. ब.
२००२. मस्तक–डोकें.
२००३. शूल–दुःख; कळ. मस्तकशूल–स. त. स.
२००४, अग्रेसर, सं. ( अग्रे+सर ); मुख्य; प्रधान; स. त. अग्रे हें सप्तमीचें रूप आहे.

२००५. शून्यचित्त, सं. ( शून्य+चित्त ); मनांत कांहीं घोटाळत नसणें.

२००६. अनवहित, सं. ( न+अवहित ); कोणत्याहि कामाकडे न लाविलेलें; मोकळें; स्वस्थ; रिकामें. न. त. स.

२००७. अवहित ( अव+धा-लक्ष देणें ); सलक्ष्य; सावध न; व्यग्र; गुंतलेलें.

२००८. गानवादन, सं. ( गान+वादन ); गाणेंबजावणें; गाणें व वाद्यें वाजविणें. द्वंद्व. स.

२००९. गान ( गै-गाणें ); गायन.

२०१०. वादन ( वद्-बोलणें ); वाजवणें.

२०११. शिणणें, सं. ( क्षीणन ); दमणें; थकणें.

२०१२. शुश्रूषा, सं. ( श्रु-ऐकणें ); सेवा; ( काम ) ऐकण्याची इच्छा.

२०१३. झोंप, सं. ( स्वाप=स्वप्-निजणें ) ; निद्रा; निजणें.

## ४६. इंद्रियांचें शिक्षण व संरक्षण. ( पृ० १७३ ).

२०१४. छायाभाग, सं. ( छाया+भाग ); छायेचा भाग.

२०१५. छाया ( छो-कापणें ); सावली.

२०१६. भासमान, सं. ( भास्-प्रकाशणें; वाटणें ); भासणारा; वाटणारा.

२०१७. वास्तव, सं. ( वस्तु+अ ); खरा.

२०१८. परंपरा, सं. ( पर+पर=पृ-भरणें ); मालिका; ओळ.

२०१९. स्वरसप्तक, सं. ( स्वर+सप्तक ); सात सुरांचा समुदाय.

२०२०. सप्तक ( सप्तन्+क ); सातांचा समुदाय.

२०२१. सप्तन्-सात.

२०२२. निर्णय, सं. (निर्+नी नेणें); निश्चय; निकाल; शेवट.

२०२३. अतिरिक्त, सं. ( अति+रिच्-मागें टाकणें; फार होणें ); अत्यंत; अतिशय.

२०२४. समीपदर्शित्व, सं. ( समीप+दर्शिन्+त्व ); जवळ पहाणाऱ्याचा धर्म.

२०२५. दर्शिन् ( दृश्-पाहणें ); पाहाणारा.

## ४७. नेत्राच्या रचनेविषयीं ( पृ० १८० ).

२०२६. नेत्रबाह्यपटल, सं. ( नेत्र+बाह्य+पटल ); डोळ्यांचा बाहेरील पडदा.

२०२७. नेत्र ( नी-नेणें ); डोळा.

२०२८. शृंगवत्पिधान, सं. ( शृंगवत्+पिधान);शिंगाच्या पदार्थाचें केलेलें झांकण.

२०२९. शृंगवत् ( शृंग+वत् ) शिंगाचें.

२०३०. पिधान ( अपिधान=अपि+धा-झांकणें ); झांकण.

२०३१. कनीनिका, सं. ( कन्-प्रकाशणें ); ज्यांतून प्रकाश आंत शिरतो किंवा बाहेरील पदार्थांची प्रतिमा ज्यांतून आंत उमटते तें डोळ्यांचें भोंक ( बाहुली ).

२०३२. इंद्रियविज्ञानशास्त्र, सं. ( इंद्रिय+विज्ञान+शास्त्र ); ज्या शास्त्रांत इंद्रियांची रचना व कार्ये वर्णन केलेलीं असतात.
२०३३. स्फटिकरूप, सं. ( स्फटिक+रूप ); स्फटिकासारखा.
२०३४. स्फटिक-विशेष प्रकारची काच.
२०३५. बाहिर्गोल, सं. ( बहिर्+गोल ); बाहेरून गोल.
२०३६. दर्पण, सं. ( दृप्-प्रकाशणें, चेतवणें ); आरसा.
२०३७. काचरूप, सं. ( काच+रूप ); काचेसारखा.
२०३८. काच ( काच्-प्रकाशणें ); भिंग.
२०३९. दर्शनज्ञानतंतु, सं. ( दर्शन+ज्ञान+तंतु ); पदार्थ बघण्याचा ज्ञानाचा तंतु.
२०४०. प्रसरणशील, सं. ( प्रसरण+शील ); वाढणारी. ष. ब. स.
२०४१. विसकळीत, सं. ( विस्खलित=वि+स्खल्-पडणें; सरणें ); अव्यवस्थित.
२०४२. दोष, सं. ( दूष्-दोष देणें ); व्यंग; न्यून.
२०४३. लेन्स, इं.-अंतर्गोल, बहिर्गोल, उभयगोल इत्यादि प्रकारचें भिंग.
२०४४. चापट, म.-थापटलेला-पातळ व पसरट आणि ज्याला गोलपणा नाहीं असें.
२०४५. चक्षुरिंद्रिय, सं. ( चक्षुस्+इंद्रिय ); डोळा. क. स.
२०४६. चक्षुस् ( चक्ष्-पाहणें ); डोळा.
२०४७. विजातीय, सं. ( वि+जाति+ईय ); विलक्षण; चमत्कारिक.
२०४८. भयाण, सं. ( भयानक=भी+आनक; भी-भिणें ); ज्यानें भितात तें.
२०४९. साक्षात्, सं.-डोळ्यांदेखत; खरोखर.
२०५०. तसबीर, आ.(तसवीर) चित्र.
२०५१. स्वत्व, सं. ( स्व+त्व ); मालकी; हक्क.
२०५२. अनिर्वाच्य, सं. ( न+निर्वाच्य ); बोलण्यास अतिशय कठीण.
२०५३. निर्वाच्य, ( निर्+वच्-बोलणें ); बोलतां-सांगतां येण्याजोगें, निर्दोष.

## ४८. कविता-अभिमन्युवध. ( पृ. १८८. )

२०५४. युधिष्ठिर, सं. ( युधि+स्थिर; युद्धांत स्थिर रहाणारा ( धर्म ). अ. स. त. स.
२०५४. (अ) युधि, ( युध्-लढणें ); युद्धांत, युध् शब्दाचें सप्तमीचें रूप.
२०५५. तपननयन, सं. ( तपन+नयन); सूर्याचे डोळे. स. त. स.
२०५६. तपन ( तप्-उष्णता देणें); उष्णता देणारा ( सूर्य ).
२०५७. नयन, ( नी-नेणें ); डोळा.
२०५८. त्यजणें, सं. ( त्यजन=त्यज्-टाकणें ); टाकणें; सोडणें.
२०५९. संगर, सं. ( सम्+गॄ-बडबड करणें ); युद्ध.
२०६०. महारथ, सं. ( महत्+रथ); मोठा योद्धा. ष. ब. स.
२०६१. रथ-गाडी.
२०६२. आजी, सं. ( अज्-जणें ); युद्ध; लढाई.

२०६३. चक्रव्यूह, सं.(चक्र+व्यूह); चक्राकार सैन्यरचना. क. स.
२०६४. चक्र (कृ–करणें); चाक.
२०६५. व्यूह, (वि+ऊह्–कल्पना करणें); सैन्यरचना.
२०६६. धीरवीरहीरप्रवरप्रकर, सं. (धीर+वीर+हीर+प्रवर+प्रकर); धैर्यवान् अशा शूरांतील उत्तम रत्नांचा समुदाय. धीरवीर–क. स., धीर–हीर क. स., धीर–प्रवर स. त., धीर...प्रकर–ष. त. स.
२०६७. हीर–हिरा. श्रेष्ठ.
२०६८. प्रकर–(प्र+कृ=मान देणें); समुदाय.
२०६९. खचणें, सं. (खच्–ठांसून वसविणें); बांधणें; रचणें; योजणें.
२०७०. सानुजनी, सं. (स+अनु+जनी); आपल्यामागून जन्मलेले (लहान धाकटे भाऊ) त्यांसह. अनुजनी. ष. ब. सानुजनी–सहा. व.
२०७१. जनी (जन्–उत्पन्न होणें); उत्पत्ति.
२०७२. रत्नसानु, सं. (रत्न+सानु); मेरुपर्वत. (रत्नांच्या शिखरांचा); ष. व. स.
२०७३. रत्न (रम्–रंजन करणें); हिरा, माणिक, मोतीं इत्यादि.
२०७४. सानु–शिखर.
२०७५. सौभद्र, सं. (सुभद्रा+अ); सुभद्रेचा मुलगा (अभिमन्यु).
२०७६. सुभद्रा–कृष्णाची वहीण.
२०७७. व्यूहपुरःस्थित, सं. (व्यूह+पुरः+स्थित); व्यूहाच्या पुढें किंवा तोंडीं उभा राहिलेला.
२०७८. स्थित, (स्था–रहाणें); उभा राहिलेला.
२०७९. कुरुकटकेश, सं. (कुरु+कटक+ईश); कौरवसैन्याचा स्वामी (द्रोणाचार्य).
२०८०. कुरु–कौरव.
२०८१. कटक–सैन्य.
२०८२. समन्यु, सं. (स+मन्यु); रागयुक्त; कोपयुक्त. सहा. व.
२०८३. मन्यु– मन्–विचार करणें), राग.
२०८४. न्यून, सं. (नि+ऊन); अत्यंत कमी.
२०८५. शरसा, सं. (शर)+म. (असा); बाणासारखा.
२०८६. युष्मत्पदप्रसाद, सं. (युष्मद्+पद+प्रसाद); तुमच्या पायांची कृपा.
२०८७. युष्मत्–तुमचे.
२०८८. प्रसाद (प्र+सद्–संतुष्ट होणें); कृपा.
२०८९. युष्मत्सपत्न, सं. (युष्मद्+सपत्न); तुमचे शत्रु.
२०९०. सपत्न–(सह+पत्–लढणें); शत्रु.
२०९१. त्वद्रचितद्वार, सं. (त्वत्+रचित+द्वार); तूं केलेला मार्ग.
२०९२. त्वत्–तूं.
२०९३. रचित, (रच्–रचणें); केलेला; रचलेला.
२०९४. स्वस्थैर्यधैर्य, सं. (स्व+स्थैर्य+धैर्य); आपलया आंगचा स्थीरपणा व धैर्य. स्थैर्यधैर्य–द्वंद्व. स्वस्थैर्यधैर्य–ष. त. स.
२०९५. स्थैर्य (स्थिर+य); स्थिरपणा.

२०९६. हेमाग, सं. (हेमन्+अग); सोन्याचा पर्वत. ष. त.

२०९७. हेमन्–सोनें.

२०९८. मतंगज, सं. (मतंग+ज); मतंगऋषीपासून उत्पन्न झालेला (हत्ती). ष. त.

२०९९. हरिपोत, सं. (हरि+पोत); सिंव्हाचा बालक.

२१००. पोत–बालक. ष. त.

२१०१. दंतियूथ, सं. (दंतिन्+यूथ); हत्तींचा कळप. ष. त.

२१०२. दंतिन्, (दंत+इन्); हत्ती. दंत–दांत.

२१०३. यूथ–कळप; समुदाय.

२१०४. दहन, सं. (दह्–जळणें); अग्नि.

२१०५. डोह, सं. (संदोह = दुह्-यथेच्छ देणें); नदींतील वगैरे पाण्याचा खोल भाग.

२१०६. जव, सं. (जू–लवकर जाणें); वेग; त्वरा.

२१०७. सूत, सं. (सू–प्रसवणें); सारथी.

२१०८. सुवीरसू, सं. (सु+वीर+सू), चांगला वीर प्रसवणारी. द्वि. त.

२१०९. सू (सू–प्रसवणें); प्रसवणारी.

२११०. आयुष्मन्, सं. (आयुस्+मत्); पुष्कळ दिवस जगणाऱ्या.

२१११. श्रितमति, सं. (श्रित+मति); आश्रितांची (सेवकांची) बुद्धि. ष. त.

२११२. श्रित, (श्रि–आश्रय करणें); आश्रय केलेला; चाकर.

२११३. शस्त्रजवन्हि, सं. (शस्त्र+ज+वन्हि); शस्त्रापासून निघालेला अग्नि. क. स.

२११४. शस्त्र (शस्–मारणें); हत्यार.

२११५. वन्हि–(वह्–नेणें); अग्नि.

२११६. व्यंगुल, सं. (द्वि+अंगुल); दोन वोटेंभर.

२११७. अंगुल–वोट.

२११८. कलेवर, सं. (कले+वर); देह. अ. स. त. स. कले हें कल शब्दाच्या सप्तमीचें रूप.

२११९. धड–सं. (धर–धृ–धरणें); सबंध.

२१२०. मंथाद्रि, सं. (मंथ+अद्रि); समुद्र घुसळण्याचा पर्वत. क. स.

२१२१. मंथ (मंथ्–घुसळणें); घुसळणारा, रवी.

२१२२. अद्रि–पर्वत.

२१२३. समुत्साह, सं. (सम्+उत्साह); मोठा उत्साह. क. स.

२१२४. उत्साह, (उत्+सह्–समर्थ होणें; उत्तेजन देणें); आवेश; धीर.

२१२५. असकृत्, सं. (न+सकृत्); अनेकदा; वारंवार. नञ्. त. स.

२१२६. सकृत्–एकदा.

२१२७. समुद्, सं. (स+मुद्); आनंदयुक्त. सहार्थी ब. स.

२१२८. मुद् (मुद्–आनंद होणें); आनंद; हर्ष.

२१२९. प्रफुल्लपुष्कर, सं. (प्रफुल्ल+पुष्कर); फुललेलें कमळ.

२१३०. प्रफुल्ल, (प्र+फुल्ल्–फुलणें); फुललेलें; टवटवीत.

२१३१. पुष्कर, (पुष्–पोसणें); कमळ.

२१३२. द्रौणि, सं. (द्रोण+इ) द्रोणाचा पुत्र; अश्वत्थामा.

२१३३. द्रोण–कौरवपांडवांचा गुरु.

२१३४. भट, सं. ( भट्–लढणें ); योद्धा.

२१३५. आटणें, म.–जिंकणें ; योजणें; घट्ट होणें.

२१३६. मूर्तवात, सं. (मूर्त+वात); मूर्तिमंत वारा. क. स.

२१३७. मूर्त–मूर्तिमंत; प्रत्यक्ष.

२१३८. रंभा, सं.–केळ; स्वर्गांतील एक अप्सरा.

२१३९. परिरंभ, सं. ( परि+रंभ्–आलिंगन देणें ); आलिंगन.

२१४०. कार्ष्णि, सं. ( कृष्णा+इ ); सुभद्रेचा मुलगा ( अभिमन्यु ).

२१४१. कृष्णा ( कृष्ण+आ ); सुभद्रा.

२१४२. मृगोत्तमाराव, सं. ( मृग+उत्तम + आराव ); सिंहाची गर्जना. ष. त.

२१४३. आराव, ( आ+रु.–ओरडणें ) ; शब्द ; गर्जना.

२१४४. आवांका, म.–धैर्य.

२१४५. आवांकणें, म.–योजणें.

२१४६. वमणें, सं. ( वम्–ओकणें ) ओकणें.

२१४७. आंव, म.–धैर्य; सामर्थ्य.

२१४८. अभेद्यकवच, सं. ( न+भेद्य+कवच ); ज्याचें कवच तुटण्यास कठीण. ष. ब. स.

२१४९. कवच–बाण वगैरे अंगास लागूं नयेत ह्मणून लोखंडाचा केलेला एक प्रकारचा आंगरखा.

२१५०. बीभत्सु, सं. ( बध्–निंदा करणें ); अर्जुन–( वाईट कामाची निंदा करणारा. )

२१५१. अंगप, सं. (अंग+प ); अंगदेशचा राजा.

२१५२. अक्षतधनु, सं. ( न+क्षत+धनुस् ); ज्याचें धनुष्य मोडलें नाहीं. ष. ब. स.

२१५३ क्षत ( क्षि–नाश पावणें.); मोडलेलें; छिन्न.

२१५४. धनुस्, ( धन्–मिळवणें ); धनुष्य.

२१५५. पितृमातुलसमशुद्धकीर्तिधौतमही, सं. ( पितृ+मातुल+ सम + शुद्ध + कीर्ति + धौत+मही ); ( आपला ) बाप अर्जुन व मामा कृष्ण यांच्याप्रमाणें शुद्ध कीर्तीनें ज्यानें पृथ्वी गौरवर्ण केली आहे असा [ ज्यानें त्याप्रमाणें कीर्तिध्वज उभारला आहे तो ( अभिमन्यु ) ]. पितृमातुल–द्वं. स. पितृसम–तृ. त. शुद्धकीर्ति–क. स. पितृ...कीर्ति–क. स. पितृ–धौतमही– त. ब. स.

२१५६. पितृ–बाप.

२१५७. मातुल–मामा.

२१५८. कीर्ति ( कृत्–सांगणें ; प्रसिद्ध करणें ); ख्याति ; प्रसिद्धि.

२१५९. धौत, ( धाव्–धुणें ); धुतलेली ; स्वच्छ केलेली.

२१६०. मही–( मह्–मान देणें ); पृथ्वी.

२१६१. खड्गचर्म, सं. ( खड्ग+चर्म ); ढाल; तलवार. द्वं. स.

२१६२. चर्म, सं. ( चर्मन्–चर्–जाणें ); ढाल ; कातडें.

२१६३. विहाय, सं. ( विहायस्= वि+हा–सोडणें ); आकाश.

२१६४. गाढ, सं. ( गाह्–स्नान करणें ); बळकट ; धैर्यवान्.

२१६५. त्सरु, सं,–तलवारीची मूठ.
२१६६. भेकमूषक, सं. ( भेक+मूपक ); बेडूक व उंदीर. द्वं. स.
२१६७. भेक–बेडूक.
२१६८. मूषक, ( मूष्–चोरणें ); उंदीर; चोर.
२१६९. प्रभाव, सं. ( प्र+भू–समर्थ होणें ); तेज; सामर्थ्य.
२१७०. दीप्ति, सं. ( दीप्–प्रकाशणें ); तेज.
२१७१. रथोपस्थ, सं. ( रथ+उपस्थ ); रथांतील पुढील बसावयाची जागा. ष. त. स.
२१७२. उपस्थ, ( उप+स्था–जवळ रहाणें ); स्थान; जागा.
२१७३. निजभुजभुजगप्रताप, सं. (निज+भुज+भुजग+प्रताप); आपले बाहू हेच कोणी सर्प त्यांचा पराक्रम. निजभुजभुजग–क. स.
२१७४. निज–आपले.
२१७५. भुजग– ( भुज+ग ) सर्प.
२१७६. प्रताप ( प्र+ताप=तप्–प्रकाशणें ); पराक्रम.
२१७७. रुचिर, सं. ( रुचि+र ); चांगला; गोडी देणारा. द्वि.त.
२१७८. रुचि, ( रुच्–आवडणें ); गोडी.
२१७९. र ( रा–देणें ); देणारा.
२१८०. सुचिर, सं. ( सु+चिर ); फार वेळपर्यंत.
२१८१. चिर–नेहमीं; सतत.
२१८२. प्रकटणें, सं. ( प्रकटन=( प्र+कट्–प्रसिद्ध होणें); दाखविणें; उघड करणें.
२१८३. महागद, सं. ( महत्+गदा ); मोठी गदावाले. ५. ब.
२१८४. गदा–आयुधविशेष.
२१८५. अदभ्रा; सं. ( अदभ्र+आ ) पुष्कळ; अतिशय.
२१८६. विवश, सं. ( वि+वश ); अत्यंत वश, व्याकुळ; मूर्छित.
२१८७. वश (वश्–स्वाधीन होणें); हस्तगत.
२१८८. दुष्परिहार्य, सं. ( दुस्+परिहार्य ); अनिवार्य; टाळण्यास कठीण. अ. क. स.
२१८९. परिहार्य ( परि+हृ–हरण करणें ); निवारण्याजोगें; टाळण्यास योग्य.
२१९०. प्रभोगदाघाली, सं. ( प्र+भोग+द+अघ+आली ); अतिशय दुःखें देणारी पातकपंक्ति.
प्रभोग–अ. त. प्रभोगद–द्वि. त. प्रभोगदाघ–क. स. प्रभोगदाघाली–ष. त. स.
२१९१. भोग ( भुज्–स्वीकारणें ); दुःख; अनुभव.
२१९२. अघ(अघ्-पाप करणें);पाप.
२१९३. आली–पंक्ति; ओळ.
२१९४. दौःशासनी, सं. ( दौःशासनि=दुःशासन+इ ); दुःशासनाचा पुत्र.
२१९५. दुःशासन–दुर्योधनाचा भाऊ.

## ४९. ज्वालामुखी पर्वत
## ( पृ० १९१ ).

२१९६. ज्वालामुखी, सं. (ज्वाला+मुख+इन् ); ज्यांतून ज्वाला निघतात अशा मुखाचा.
२१९७. मुख–तोंड.
२१९८. जागृत, सं. ( जागृ–जागणें ); चालू असलेला ( सतत पेटलेला ), जागा.

२१९९. मर्यादित, सं. ( मर्यादा+इत ); हद्द ठरवून दिलेलें, नियमित.

२२००. स्फोट, सं. ( स्फुट्–फुटणें ); उसळणें.

२२०१. प्रवाससाहसी, सं. ( प्रवास+साहसिन् ); पर्यटन करण्याचें धाडस करणारी.

२२०२. प्रवास, सं. ( प्र+वस्–फिरणें ); फिरणें.

२२०३. साहसी, ( साहस+इन् ); धाडस करणारी.

२२०४. साहस, ( सहस्+अ ) धाडस.

२२०५. सहस् ( सह्–सहन करणें ); शक्ति.

२२०६. सारांश, सं. ( सार+अंश ); तात्पर्य; गोषवारा.

२२०७. सार, ( सृ–जाणें ); अर्क; तत्त्व; बळ.

२२०८. व्यास, सं. ( वि+अस्–फेंकणें ); विस्तार ( मध्यरेषेचा ).

२२०९. इतस्तत, सं. ( इतः+ततः ); इकडून तिकडे.

२२१०. इतः–इकडे.

२२११. ततः–तिकडे.

२२१२. परिभ्रमण, सं. ( परि+भ्रम्–भोंवतीं फिरणें ); भोंवतीं फिरणें; हिंडणें.

२२१३. अग्निसरोवर, सं. ( अग्नि+सरोवर ); अग्नीनें भरलेलें मोठें तळें.

२२१३. ( अ ) सरोवर ( सरस्+वर ) मोठें तळें.

२२१४. सरस् ( सृ–जाणें ); तळें.

२२१४. ( अ ) देदीप्यमान, सं. ( दीप्–प्रकाशणें ); पुनः पुनः प्रकाशणारें.

२२१५. तज्जीनत, सं. ( तत्+जनित ); त्यापासून उत्पन्न झालेली.

२२१६. जनित, ( जन्–उत्पन्न होणें ); उत्पन्न झालेली.

२२१७. यथावत्, सं. ( यथा+वत् ); जसेंच्या तसें; हुबेहूब.

२२१८. हेमकांति, सं. ( हेमन्+कांति ); सोन्याचा रंग.

२२१९. कांति, ( कम्–इच्छिणें ); तेज; रंग.

२२२०. गर्त, सं. ( गृ–बोलणें; खाणें ); खाडा.

२२२१. जाज्वल्य, सं. ( ज्वल्–जळणें ); जागृत; पेटलेली.

२२२२. अंतस्थ, सं. ( अंत+स्थ ); आंत राहणारा.

२२२३. स्थ, ( स्था–रहाणें ); राहणारा.

२२२४. भूगर्भ, सं. ( भू+गर्भ ); पृथ्वीचें पोट.

२२२५. गर्भ–पोट.

२२२६. वृष्टि, ( वृष्–शिंपडणें ); वर्षाव.

२२२७. रसातल, सं. ( रसातल=रसा+तळ ); पृथ्वीचा खालचा भाग; पाताळ.

२२२८. रसा–पृथ्वी.

२२२९. उषःकाल, सं. ( उषस्+काल ); पहाटची वेळ.

२२३०. उषस्–पहाटे.

२२३१. संध्याराग; सं. ( संध्या+राग ); संध्याकाळचा आभाळाचा रंग.

२२३२. संध्या–सायंकाळ.

२२३३. राग, ( रंज्–रंगवणें ); तांबडा रंग.

२२३४. वर्णवैचित्र्य, सं. ( वर्ण+वैचित्र्य ); रंगाचा निरनिराळेपणा.

२२३५. वर्ण, ( वर्ण्–रंग देणें );रंग.
२२३६ वैचित्र्य, ( विचित्र+य ); निरनिराळेपणा; तरतऱ्हेची स्थिति.
२२३७. विचित्र–चमत्कारिक.
२२३८. तदनुषंग, सं. ( तत्+अनुषंग ); त्याचा संबंध.
२२३९. अनुषंग, (अनु+सञ्ज्–चिकटणें ); संसर्ग; संबंध.
२२४०. धूलिमय, सं. (धूलि+मय); धुळीनें भरलेलें.
२२४१. धूलि–धूळ; मळ.
२२४२. रक्षागत, सं. (रक्षा+गत); राखेस मिळालेलें; राख बनलेलें. द्वि. त. स.
२२४३. रक्षा–( रक्ष्–राखणें ); राख; भस्म.
२२४४. लुकण, म.––लिंपण; लिंपण्याचा पदार्थ.

## भूकंप. ( पृ० १९९. )

२२४५. उत्पात, सं. ( उत्+पत्–पडणें; प्राप्त होणें; उत्पन्न होणें); संकट; पीडा; अपशकुन.
२२४६. खेडें, सं. ( खेट=खेट्–खाणें ); लहान गांव.
२२४७. खाडा, सं ( खात=खन्–खणणें ); खणलेला खळगा.
२२४८. शेष ( शिष्–दुखविणें ); सर्पविशेष.

## ९१. दगडी कोळसा–भाग १ ला. ( पृ० २०४ ).

२२४९. भूस्तरविद्या,सं. (भू+स्तर+विद्या ); पृथ्वीच्या पृष्ठांचे थर कसे बनले याविषयींची विद्या.
२२५०. स्तर ( स्तृ–पसरणें ); थर.
२२५१. विद्राव्य, सं. ( वि+द्रु–विरघळणें ); वितळण्याजोगा; पातळ होण्या जोगा.
२२५२. प्राचुर्य, सं. ( प्रचुर+य ); विपुलता; पुष्कळपणा.
२२५३. कवळी, सं. ( कवल ); मिठी; वेंग; वेगेंत मावेल इतकें ओझें.
२२५४. निबिड, सं. ( नि+बिड्–ओरडणें); अत्यंत; गर्द; दाट.
२२५५. पुष्पगुच्छ, सं. ( पुष्प+गुच्छ ); फुलांचा गेंद.
२२५६. पुष्प–फूल.
२२५७. गुच्छ–गोंडा; झुबका.

## ९२. दगडी कोळसा–भाग २ रा. ( पृ० २०७ ).

२२५८. अतिपुरातन, सं. ( अति+पुरातन ); अतिशय जुनी.
२२५९. पुरातन ( पुरा+तन ); मागील; जुनी.
२२६० पुरा–पूर्वी.
२२६१. लायकोपोदिया, इं –शेवाळीच्या जातीची एक वनस्पति.
२२६२. बोगदा, फा.–बीळ.
२२६३. ज्वालाग्राही, सं. ( ज्वाला+ग्राहिन् ); पेट घेणारा.
२२६४. ग्राहिन्, सं. ( ग्रह्–घेणें ); घेणारा.

## ९३. चुनखडीचीं रूपांतरें–भाग १ ला. ( पृ० २११ ).

२२६५. चुनखडी, सं. ( चूर्णखटी=चूर्ण+खटी ); चुना करण्याची पांढरी माती.
२२६६. चूर्ण–( चूर्ण्–पूड करणें ); चुना, पूड.
२२६७. खटी–पांढरी माती.

२२६८. विद्रावण, सं. ( वि+द्रु–वितळणें ); विरघळवणें; वितळवणें.

२२६९. कणशः, सं. ( कण+शः ); एकेक कण.

२२७०. चक्ररचना, सं. ( चक्र+रचना ); चक्राकृति; वाटोळी आकृति. ष. त. स.

२२७१ रचना ( रच्–रचणें ); आकृति; आकार.

२२७२. साम्य, सं. ( सम+य ); सारखेपणा.

२२७३. पदार्थसंग्रहालय, सं.( पदार्थ+संग्रह+आलय ); पदार्थांच्या संग्रहाचें ठिकाण. ष. त. स.

२२७४. संग्रह, ( सम्+गृह्–राखून ठेवणें; वाळगणें ); सांठा; संचय.

## ९४. चुनखडीचीं रूपांतरें–भाग २ रा. ( पृ० २१९ ).

२२७५. असंख्यात, सं. ( न+संख्यात); अगणनीय; ज्यांची गणना होत नाहीं असे.

२२७६. संख्यात (सम्+ख्या–मोजणें ); गणलेले; मोजलेले.

२२७७. शिलातट, सं. ( शिला+तट ); खडकाळ प्रदेश.

२२७८. तट(तट्–उंच करणें); प्रदेश.

२२७९. नलिकाकार, सं. ( नलिका+आकार ); नळीच्या आकाराचें. ष. व. स.

२२८०. नलिका ( नल्–बांधणें ); नळी.

२२८१. प्रवालकीटक, सं. ( प्रवाल+कीटक ); पोंवळीं करणारा किडा. म. प. स.

२२८२. प्रवाल–पोंवळें.

२२८३. कीटक ( कीट्–रंगवणें ); किडा.

२२८४. अश्रांत, सं. ( न+श्रांति ); न थकतां. स. ब. स.

२२८५. श्रांति ( श्रम्–दमणें ); थकवा.

२२८६. लकदीव, सं. ( लक्षद्वीप=लक्ष+द्वीप); असंख्यात बेटें; लकदीव नांवाचीं बेटें.

२२८७. मालदीव, सं. ( मालाद्वीप=माला+द्वीप ); माळेच्या आकाराचीं बेटें;मालदीवनामक बेटें.

२२८७. (अ) सृष्टिनियंता,सं.(सृष्टि+नियंता); सृष्टि चालविणारा.

२२८८. नियंता ( नि+यम्–ता–ताब्यांत ठेवणें ); ताब्यांत ठेवणारा.

२२८९. पारंबी, सं. ( पारलंबी=पार+लंबिन् ); वरून खालपर्यंत लोंबणारें फांदीचें मूळ.

२२९०. लंबिन् ( लंब्–लोंबणें ); लोंबणारी.

## ९५ खनिज पदार्थ. पृ० ( २१९. )

२२९१. सोरा, फा.–(शोरा); विशिष्ट ज्वालाग्राही पदार्थ.

२२९२. तुरटी, सं. ( तुवरी ); विशेष तुरट माती.

२२९३. नकतेल, आ.–एक प्रकारचें खनिज तेल.

२२९४. शिलाजित, सं. ( शिलाजतु=शिला+जतु ); दगडांतून वाहणारा विशेष तेलकट पदार्थ.

२२९५. जतु–लाख.

२२९६. उपवर्ग, सं. ( उप+वर्ग ); पोटभेद; जाति.

२२९७. निरूपण, सं. ( नि+रूप्-सांगणें ); वर्णन; फोड करणें.

२२९८. शिल्पकाम, सं. ( शिल्पकर्म=शिल्प+कर्म ); कलाकौशल्याचें काम.

२२९९. शिल्प–कारागिरी.

२३००. जड्या,म. (सं.)(जड्–संपन्न होणें; झांकणें; वसवणें ); कोंदणांत हिरे वगैरे बसविणारा, जडणारा.

२३०१. फरासिस, इं. ( फ्रँक, फ्रेंच ); फ्रान्सांतील एक मनुष्य.

२३०२. तहांहयात, फा. ( तहां+हयात ); जन्मपावेतों; आजन्म.

२३०३. तहां–तोंपर्यंत.

२३०४. हयात–जीव; आयुष्य.

२३०५. वर्षासन, सं. ( वर्षाशन=वर्ष+अशन ); वर्षाचें अन्न.

२३०६. अशन ( अश्–खाणें ); खाणें, अन्न.

२३०७. माआजमा, आ. ( माअजमा–मा+अजम+आ); मोठेपणा पावणारी.

२३०८. अजम–श्रेष्ठ, मोठी.

२३०९. हादरणें, म.–धक्के बसणें.

## ५६. कांहीं प्रमुख धातूं-विषयीं. (पृ० २२४.)

२३१०. सूर्यकांत, सं. ( सूर्य+कांत ); सूर्यकिरणाच्या संयोगानें ज्यापासून अग्नि उत्पन्न होतो असा एक पाषाण; ष. ब. स.

२३११. सूर्य ( सृ–सरणें ); ज्याच्या योगानें दिवस होतो तो ग्रह.

२३१२. कांत ( कम्–इच्छिणें ); आवडता; प्रिय; नवरा.

२३१३. घनवर्धनीय, सं. ( घन+वर्धनीय ); हातोड्यानें ( ठोकिलें असतां ) वाढणारी. तृ. त. स.

२३१४. वर्धनीय ( वृध्–वाढणें ); वाढण्याजोगी.

२३१५. वर्ख, आ.–पान.

२३१६. कलाबतू, सं. ( कलावर्ती–कला+वर्ती ); धातूच्या तारेनें गुंडाळून तयार केलेला सुताचा धागा; जरतार.

२३१७. पाळ, म. ( पालि–पाल्–राखणें ); ओळ; तास; कड.

२३१८. पोलाद, फा.–मऊ लोखंड.

२३१९. झिलई, आ.–( जिल्हई ); चकाकी; तेज.

## ५७. कविता–नलोपाख्यान (पृ० २३५.)

२३२०. नलोपाख्यान, सं. ( नल+उपाख्यान ); नलाची कथा.

२३२१. नल–निषधदेशाचा एक राजा.

२३२२ उपाख्यान, सं. ( उप+आख्यान ); पोटकथा.

२३२३. आख्यान ( आ+ख्या=सांगणें ); कथा; गोष्ट.

२३२४. गंगातरंगसम, सं. ( गंगा+तरंग+सम ); गंगेच्या तरंगा (फेंसा) सारखा (शुभ्र). गंगातरंग–ष. त. स. गंगा... सम–तृ त स.

२३२५. गंगा–भागीरथी नदी.

२३२६. निजदेहवर्ण, सं. ( निज+देह+वर्ण ); आपल्या देहाची कांति.

२३२७. देह ( दिह्-रचणें ): शरीर.

२३२८. भृंग, सं.–भुंगा.

२३२९. जंघाल, सं. ( जंघा+ल ) लांबटांग्या; शीघ्र चालणारा.

२३३०. जंघा–मांडी; तंगडी.

२३३१. पवनसंगति, सं. ( पवन-संगति ); वाऱ्याची गति.

२३३२. संगति (सम्+गम्–जाणें बरोबर जाणें.

२३३३. सवें, म.–चाल; रीति.

२३३४. हय, सं. ( हय्–जाणें घोडा.

२३३५. वेंघणें, सं. ( विलंघन=वि-लंघ्–जाणें ); चढणें.

२३३६. उफळणें, सं. ( उत्फलन=उत्+फल्–उडी मारणें ) उडणें.

२३३७. लाहणें, सं. (लभन=लभ्-मिळणें ); लाभणें; मिळव[णें].

२३३८. धवलत्व, सं. ( धव[ल+]त्व ); पांढरेपणा.

२३३९. धवल–पांढरा.

२३४०. शींव, सं. ( सीमा ); सींदा; वार.

२३४१. उद्यान, सं. ( उत्+य[ा–]बाहेर जाणें ); बाग.

२३४२. मितसेवक, सं. ( मि[त+]सेवक ); थोडे नौकर.

२३४३ मित ( मा–मोजणें ); =जके; थोडे.

२३४४. सेवक ( सेव्–चाकरी क[र]णें ); चाकर.

२३४५. पनस, सं. ( पन्–स्तु[ति] करणें ); फणस.

२३४६. जंबू, सं.–जांभूळ; जांभळीचें झाड.

२३४७. जंबीर, सं.–साखरलिंबू किंवा त्याचें झाड.

२३४८. निंबू, सं.–लिंबू; लिंबोणी.

२३४९. कुंद, सं.–कुंदाचें झाड.

२३५०. माकंद, सं.–आंबा.

२३५१. सुदाडिंब, सं. ( सुदाडिम=सु+दाडिम );चांगली डाळिंबी ( झाड ) किंवा डाळिंब. क. स.

२३५२. दाडिम–डाळिंब.

२३५३. कदंब, सं.–कळंबाचें झाड; समुदाय.

२३५४. शुकसारिकाकदंब, सं. (शुक+सारिका+कदंब ); राघू आणि मैना यांचा समुदाय.

२३५५. शुक–राघू.

२३५६. सारिका–मैना.

२३५७. कालवा, सं. ( कुल्या ); लहान कृत्रिम नदी; पाट.

२३५८. मकरंद, सं.–फुलांतील रस.

२३५९. पराग, सं. ( परा+ग ); पुष्पांतील तंतूवरील उडणारें पीठ.

२३६०. रंगणें, सं. ( रंजन=रंज्–रंग देणें ; रंगयुक्त करणें; रंगवणें

२३६१. उपरि, सं.–वर; वरच्या बाजूस.

२३६२. सकंटक, सं. ( स+कंटक ) कांट्यांनीं व्याप्त. सहा. ब. स.

२३६३. कंटक–(कंट्–जाणें); कांटा.

२३६४. सांचा, सं. ( संच=सम्+चि–एकत्र करणें ); सांठा; गड्ड.

२३६५. षण्मास, सं. ( षष्+मास ); सहा महिने. क. स.

२३६६. षष्–सहा.
२३६७. मास–महिना.
२३६८. वरस, सं. ( वर्ष=वृष्-शिंपडणें ); वर्ष.
२३६९. तडाग, सं.–तळें; सरोवर
२३७०. तुडुंबणें, सं. ( तुंडोंभन-तुंड+उंभन ); तोंडापर्यंत भरणें.
२३७१. तामरसानपाय, सं. ( तामरस+अनपाय ); ज्यापासून कमळास अपाय होत नाहीं. पं. ब. स.
२३७२. तामरस–कमळ.
२३७३. अनपाय ( न+अपाय )= सुख नञ्. त. स.
२३७४. निरंतरामंद, स. (निरंतर+अमंद); सतत, पुष्कळ. क.स.
२३७५. अमंद ( न+मंद ); सावकाश नव्हे तें; अति वेगानें. नञ्. त.
२३७६. मरंद, सं.–पुष्परस.
२३७७. ताप, सं. ( तप्–तापणें )= उन्हाळा, दुःख, उष्णता.
२३७८. उदरंभर, सं. ( उदर+भर ); पोटभरू. द्वि. त. स.
२३७९. बंभर, सं.–भुंगा.
२३८०. इंदिरा, सं. ( इंद्–ऐश्वर्य असणें ); लक्ष्मी.
२३८१. सहस्रदळ, सं.–हजार पाकळ्या. क. स.
२३८२. सहस्र–हजार.
२३८३. कासार, सं.–सरोवर.
२३८४. वापिका, सं. ( वप्–पेरणें ); पायऱ्यांची विहीर.
२३८५. पोहे, सं. ( प्रहि. ); विहीर; पोई.
२३८६. नोहे, म. ( न+आहे )= नाहीं.
२३८७. कलहंस, सं.–हंसांतील एक जात.
२३८८. उपानह, सं. ( उपानह्= उप+आ+नह्–बांधणें ); जोडा; वहाण.
२३८९. डोर, म.–झगा.
२३९०. मौन, सं. ( मुनि+अ ); मुकेपण; गुपचिपपणा.
२३९१. वलय, सं. ( वल्–जाणें ); कडें.
२३९२. मणिबंध, सं. (मणि+बंध) मणगट.
२३९३. चंचु, सं.–चोंच.
२३९४. पंचू, सं.–चतुर राजा.
२३९५ तदितर, सं. ( तद्+इतर); त्याहून इतर (दुसरें). पं. त.
२३९६. इतर–दुसरें.
२३९७. भेण, सं. (भयन=भी–भय पावणें ); भय.
२३९८. वेगळाला, म. ( वेगळा+वेगळा ); निराळा.
२३९९. वेगळा, सं. ( व्यक्त ); निराळा.
२४००. उपवनजळकेली, सं. ( उपवन+जल+केली ); बागेंतील पाण्यांत पोहोण्याचा खेळ.
२४०१. उपवन ( उप+वन ); बाग.
२४०२. केली (केल्–खेळणें ); खेळ.
२४०३. झुंझार, सं. ( योद्धारः –युध्–लढणें);लढणारा; लढवय्या.
२४०४. मदीया, सं. ( मद्+ईय+आ ); माझी.
२४०५. नवप्रसव, सं. ( नव+प्रसव ); नुकतीच प्रसूत झालेली. ष. ब. स.
२४०६. प्रसव ( प्र+सू–बाळंत होणें ); बाळंत होणें.

२४०७. पाता, सं. ( पा-राखणें ); पालन करणारा.

२४०८. सजणा, सं. ( सजनी = सत्+जनी=जन्-उत्पन्न होणें ); कुलीन स्त्री.

२४०९. बाळा, सं. बाला = बल्-जगणें ); स्त्री.

२४१०. वेल्हाळा, सं. ( वेल्लहला ); स्वतंत्र स्त्री.

२४११. शोकशाळा, सं. ( शोकशाला-शोक+शाला ); शोकाचें घर ; शोकसागर.

२४१२. शोक (शुच्-शोक करणें); दु:ख; विलाप.

२४१३. परिसणें, सं. ( परिश्रवण= परि+श्रु-ऐकणें ); ऐकणें.

२४१४. पातणें, सं. पतन=पत्-पडणें; येणें ); प्राप्त होणें.

२४१५. हेलावणें, सं. ( व्हलन = व्हल्-हालणें ); उचंबळणें, हालवून देणें.

२४१६. पयोधि, सं. (पयस्+धि ); समुद्र; सागर. ष. त. स.

२४१७. विहरणें, सं. ( विहरण= वि+हृ-खेळणें ; रमणें.

२४१८. यथानिजमनोरथ, सं. ( यथा+निज+मनोरथ );आपल्या इच्छेप्रमाणें. निजमनोरथ-क. स. यथानिजमनोरथ-अ. स.

२४१९. मनोरथ ( मनस्+रथ ); इच्छा; वासना. ष. त. स.

२४२०. शालशाखा, सं ( शाल+ शाखा ); झाडाची खांदी.

२४२१. शाल-वृक्ष ; झाड.

२४२२. शाखा-खांदी.

२४२३. मुक्तिविश्रांति, सं. ( मुक्ति +विश्रांति);सुटका मिळाल्यानें झालेला विसावा. तृ. त. स.

२४२४. मुक्ति, ( मुच्-सोडणें ); मोकळीक.

२४२५. चाखणें, सं. ( चषण=चष्-खाणें ); अनुभवणें ; घेणें.

२४२६. लवलाह, सं. ( लवलाभ= लव+लाभ ); क्षणाचा लाभ; थोडा वेळ. ष. त. स.

२४२७. लव ( लू-तोडणें ); थोडा वेळ; किंचित् वेळ.

२४२८. स्कंध्, सं. ( स्कंध्-एकत्र होणें ); खांदा.

२४२९. क्षोणीपति, सं. (क्षोणि+पति ); पृथ्वीपति; राजा (नळ).

२४३०. क्षोणि-पृथ्वी.

२४३१. निखंदणें, सं. ( निषेधन = नि+षिध्-विरुद्ध होणें ); निंदा करणें.

२४३२. सकळ, सं. ( सकळ )-सर्व; सगळे.

२४३३. सत्यलोकाधिप, सं.(सत्य+ लोक+अधिप ); सत्यलोकाचा स्वामी ) ब्रह्मदेव ).

२४३४. सत्यलोक, ( सत्य+लोक ); ब्रह्मदेवाचा लोक. क स.

२४३५. अधिप ( अधि+प ); उत्तम रक्षण करणारा.

२४३६. रावा, म.-राघू.

२४३७. लगाम, फा.-आकर्षण ; आखडण्याचें साधन.

२४३८. मोल, सं. ( मूल्य=मूल्-स्थापन करणें ); किंमत; द्रव्य.

## मयूरकविकृत केका.
## ( पृष्ठ २४०. )

२४३९. केका, सं. ( के+कै-शब्द करणें ); मूर्धास्थानीं होणारा ध्वनि; मोराचें ओरडणें. अ. स. त. स.

२४४०. दयाब्द, सं. (दया+अब्द); दयेचा मेघ.

२४४१. अब्द ( अप्+द ); पाणी देणारा ( मेघ ).

२४४२. किमपि, सं. ( किम्+अपि ); कांहींहि, यत्किंचित्.

२४४३. भाविक, सं. (भाव+इक); भक्त.

२४४४ उवगणें, म.–कंटाळणें.

२४४५. अनन्यगतिक, सं. ( न+अन्य+गति+क ); ज्यास दुसरी गति नाहीं असा. नञ्. ब. स. अन्यगति–क. स.

२४४६. निरखणें, सं. ( निरीक्षण=निर्+ईक्ष्–पाहणें ); पाहणें; देखणें.

२४४७. सोपद्रव, सं. ( स+उपद्रव ); दुःखित. सहार्थी ब. स.

२४४८. उपद्रव, ( उप+द्रु–पीडा देणें ); पीडा; त्रास.

२४४९. करुणार्णव, सं. ( करुणा+अर्णव ); दयेचा सागर.

२४५०. करुणा–दया; माया.

२४५१. उमोप, सं. (उन्मापन=उत्+मापन=मा–मोजणें ); अतिशय; पुष्कळ.

२४५२ भवमहानदी, सं. ( भव+महत्+नदी ); संसाररूप मोठी नदी. क. स.

२४५३. भव, ( भू–होणें ); संसार.

२४५४. नाविक, सं. ( नौ+इक ); नावाडी.

२४५५. नौ–नाव.

२४५६. आतर, सं. ( आ+तॄ–तरणें ); नावेचें भाडें.

२४५७. विदित, सं. ( विद्–जाणणें ); ठाऊक; माहीत.

२४५८. सदाश्रम, सं. (सत्+आश्रम ); साधूंचा आश्रय. ष. स.

२४५९. आश्रम ( आ+श्रम्–थकणें ); आश्रय; वास.

२४६०. परिजन, सं. (परि+जन); चाकर.

२४६१. कायसें, म. ( काय+असें ); कोणतें.

२४६२. आयस, सं. (अयस्+अ); लोखंड.

२४६३. अयस्–लोखंड.

२४६४. भजकवार्हिमेघ, सं. ( भजक+वार्हि+मेघ ); भक्त हेच कोणी मोर त्यांस मेघ. च. त. स. भजकबर्हि–क.स.

२४६५. भजक ( भज्–सेवा करणें ); भजणारा; भक्त.

२४६६. वार्हि–मोर; मयूर.

२४६७. आधि, सं. ( आ+धा–स्थापणें; पोसणें ); मानसिक दुःख.

२४६८. चाक, सं. ( चक्र ); एक विशेष वाटोळा पदार्थ.

२४६९. कृतांतकटकामलध्वजजरा, सं. ( कृतांत+कटक+अमल+ध्वज+जरा ); यमाच्या सेनेची शुभ्र पताकारूप म्हातारपण. कृतांत–तृ. त. कृतांतकटक–ष. त. अमल–न. त. अमलध्वज–क. स. कृतांत...ध्वज–ष. त. कृतांत...जरा–क. स.

२४७०. कृतांत ( कृत+अंत ); शिक्षा देणारा; यम.

२४७१. अमल ( न+मल ); स्वच्छ.

२४७२. ध्वज–पताका.

२४७३. जरा–म्हातारपण.

२४७४. पुरःसरगद, सं. ( पुरः+सर+गद ); पुढें असणारे रोग.

२४७५. पुरस्सर (पुरस्+सर); पुढें सरणारें; पुढारी.

२४७६. गद (गद्–रोग होणें); रोग.

२४७७. झगडणें, म.–भांडणें.

२४७८. तनु (तन्–विस्तार पावणें); शरीर; देह.

२४७९. भागणें, म.–दमणें.

२४८०. आगळा, सं. (अग्र–अग्–जाणें); अधिक; फार.

२४८१ महाकामुक, सं. (महत्+कामुक); अति उत्सुक. क. स.

२४८२. कामुक (कम्–इच्छा करणें); इच्छिणारा.

२४८३. पटु, सं. (पट्–प्रकाशणें; बोलणें); हुशार; तरबेज; ज्ञाता.

२४८४. तर्पणें, सं. (तर्पण=तृप्–संतुष्ट होणें); संतुष्ट करणें.

२४८५. नमस्कृतिपर, सं. (नम्–म्+कृति+पर); नमस्कार करण्याविषयीं तत्पर. स. त.

२४८६. नमस्कृति (नमस्+कृति); नमस्कार करणें.

२४८७. नमन (नम्–लवणें); नमस्कार.

२४८८. कृति–(कृ–करणें); काम; क्रिया.

२४८९. जसा, सं. (यादृश); ज्याप्रमाणें.

२४९०. सुविद्य, सं. (सु+विद्या); चांगला विद्वान्. ष. व. स.

२४९१. अभद्र, सं. (न+भद्र); अशुभ. नञ्. त. स.

२४९२. भद्र–कल्याणकारक, कल्याण, रीति, चाल.

२४९३. केवळ, सं. (केवल=केव्–उपयोगीं पडणें); एकटें; स्वतः.

२४९४. भागवत, सं. (भगवत्+अ); भगवद्भक्त; देवाचा भक्त.

२४९५. भगवत्–(भग+वत्); देव.

२४९६. भग (भज्–सेवा करणें); ऐश्वर्य.

२४९७. यशोरस, सं. (यशस्+रस); कीर्तिरूप रस (महिमा). क. स.

२४९८. यशस्–कीर्ति.

२४९९. तारि, सं. (तॄ–तरणें); नाव; जहाज.

२५००. सुकर्णधार, सं. (सुकर्ण+धार); सुकाणूवाला; नावाडी. कर्णधार–द्वि. त. सुकर्णधार–अ. क. स.

२५०१. सुकर्ण (सु+कर्ण); सुकाणूं.

२५०२. धार, (धृ–धरणें); धरणारा; ओघ.

२५०३. सदंघ्रिकमळ, सं. (सत्+अंघ्रि+कमळ); साधूंचें चरणकमळ. सदंघ्रि–ष. त. स. सदंघ्रिकमल– क. स.

२५०४. अंघ्रि–पाय.

२५०५. कमळ (कमल); पुष्पविशेष.

२५०६. मुरडणें, सं. (मुद्रण); वळणें; परतणें; लाजणें.

२५०७. सदुक्तमार्ग, सं. (सत्+उक्त+मार्ग); साधूंनीं सांगितलेला मार्ग सदुक्त–तृ. त. सदुक्तमार्ग–क. स.

२५०८. मार्ग (मृग्–शोधणें); रस्ता.

२५०९. दुरित, सं. ( दुर्+इत=इ-जाणें ); पाप.

## ९८. पृथ्वीवर मनुष्यानें चालविलेली घडामोड. (पृ० २४२).

२५१०. घडामोड, ( घड+मोड ); घडणें व मोडणें.

२५११. घड, सं. ( घट=घट्-रचणें ); रचना.

२५१२. मोड, सं. ( मोट=मूट्-मोडणें ); मोडणें.

२५१३. कैची, उ.-टेका; थिरा.

२५१४. अनर्थावह,सं.( अनर्थ+आवह ); अनर्थकारक. द्वि. त.

२५१५. अनर्थ ( न+अर्थ ); संकट; प्रसंग

२५१६. आवह ( आ+वह्-धारण करणें ); उत्पन्न करणारी, बाळगणारी.

२५१७. सामुद्रधुनी, सं. ( सामुद्र+धुनी ); समुद्रांतील नदी; दोन जमिनींमधून जाणारा समुद्राचा फाटा.

२५१८. सामुद्र ( समुद्र+अ ); समुद्रसंबंधी.

२५१९. धुनी ( धु-कांपणें ); नदी.

## ९९ झाडाची तोड. ( पृ० २४६ ).

२५२०. झाडी, म. ( झाड+ई ); वृक्ष. समुदाय.

२५२१. झाड, सं. ( झाट=झट्-गुंतणें ); वृक्ष.

२५२२. स्वैरपणा, सं. ( स्वैर )+म. ( पणा ) ; आपल्या इच्छेप्रमाणे वागण्याची स्थिति.

२५२३. स्वैर ( स्व+ईर्-जाणें ) ; इच्छेप्रमाणें वागणारा.

२५२४. फन्ना, आ.-फडशा; लूट; नाश.

२५२५. लुप्त, सं. ( लुप्-नाहींसें होणें ); नष्ट; गुप्त.

२५२६. संसर्पण, सं. ( सम्+सर्पण=सृप्-जाणें ); जाणें.

२५२७. काबीज , आ.—जिंकून घेणें.

२५२८. अवर्षण, सं. ( न+वर्षण ); पाऊस न पडणें. नञ् .त. स.

२५२९. वर्षण(वृष्-शिंपडणें; पाऊस पडणें ); शिंपडणें; वर्षाव.

## ६० झाडीचें मोल ( पृ० २६१ ).

२५३०. आदिकालीन, सं. ( आदि+काल+ईन ) ; पहिल्या काळची, प्राचीन.

२५३१. प्रत्यहीं, सं. ( प्रत्यहर् )+म. ( ई ); ( प्रत्यहर्=प्रति+अहन् ); दररोज; दरदिवशीं; रोजच्या रोज.

२५३२ कारखाना, फा. ( कार+खाना ); कामाची जागा.

२५३३. कार-काम.

२२३४. खाना ( खान+आ ) मालकीचें ठिकाण.

२५३५. खान-मालक, गृहस्थ.

२५३६. स्वभावतः, सं. ( स्वभाव+तः ); स्वभावामुळें.

२५३७. स्वभाव ( स्व+भाव ) ; प्रकृति.

२५३८. अनुपयुक्त, सं. ( न+उपयुक्त ); निरुपयोगी. न. त.

२५३९. उपयुक्त, ( उप+युज्-योजणें, जोडणें ); उपयोगी, कामाचें.

२५४०. जतन, सं. ( यतन=यत्-प्रयत्न करणें ); संरक्षण.

१५४१. यच्चयावत्, सं. ( यत्+च +यावत् ); झाडून; सर्व; जें आणि जेवढें; जितकें.

२५४२. च–आणि; आणखी.

२५४३. यावत्–जितका.

२५४४. भौतिक, सं ( भूत+इक ); पृथि व इतर पंचमहाभूतां-संबंधीं.

२५४५. रूक्ष, सं. ( रुक्ष=रुक्ष्–वाळणें ); कोरडें; वाळलेले.

२५४६. सहजगत्या, सं. ( सहज +गति+आ ); अनायासें; विनश्रमानें. क. स.

२५४७. सहज ( सह+ज=जन्–उत्पन्न होणें ); आपोआप; स्वल्पतेनें; त्रासाखेरीज; अ. त. ( गत्या हें गति शब्दाचें संस्कृतांतील तृतीयेचें एक वचन ).

२५४८. भगीरथप्रयत्न, सं. ( भगीरथ+प्रयत्न ); भगीरथानें केलेल्या प्रयत्नांप्रमाणें प्रयत्न; महाप्रयास ; अतिश्रम. ष. त. स.

२५४९. भगीरथ–सूर्यवंशांतील या नांवाचा एक राजा. ( यानें आपले पूर्वज उद्धरण्याकरितां गंगा ही नदी तप करून स्वर्गांतून आणिली ).

२५५०. अनास्था ( न+आस्था ); हयगय; दुर्लक्ष्य. नञ्त स.

२५५१. आस्था ( आ+स्था–रहाणें ); काळजी; कळकळ.

२५५२. शक्यता, सं. ( शक्य+ता ); सामर्थ्य; शक्ति.

२५५३. दंडकारण्य, सं. ( दंडका+ अरण्य ) विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील अरण्य.

२५५४. प्रोफेसर, इं.(प्रोफेस्–वाणावाळणें ); विद्वान् गृहस्थ.

## ६१. अर्थशास्त्र–श्रीमंत आणि दरिद्री. पृ० २८४).

२५५५. रोजमुरा, आ.(रोज+मुरा); रोजचें वेतन.

२५५६. रोज–दिवस.

२५५७. अर्थशास्त्र, सं. ( अर्थ+शास्त्र ); द्रव्य योग्य रीतीनें खर्च करण्याविषयीं शास्त्र.

२५५८. यक्षिणी, सं. ( यक्षिन्+ई ) एक प्रकारची वनदेवता.

२५५८. ( अ ) यक्षित्–( यक्ष–मान देणें ); वनदेवता.

२५५९. प्रत–जाति; योग्यता.

२५६०. परिवार, सं ( परि+वृ–आवरणें ); विस्तार.

२५६१. शरण, सं. (शृ–विदारणें ); रक्षण करणारा.

२५६२. देवता, सं. ( देव+ता ); देवी; देव.

२५६३. देव ( दिव्–प्रकाशणें ); ईश्वर.

२५६४. मोकाशी, आ. ( मोकासा+ई ); ज्याला गांवच्या उत्पन्नांतील कांहीं अंश मिळतो व ज्याचा गांवावर कांहीं अधिकार असतो.

२५६५. मोकासा–गांवाचें उत्पन्न.

२५६६. शानदार, फा. ( शान+दार ); सुरेख; सुबक.

२५६७. शान–सौंदर्य; शोभा.

२५६८. पेहराव, फा. ( पेराहन ); पोशाख; लांब झगा.

२५६९. महाग, सं. ( महर्घ=महत् +अर्घ ); फार किमतीचें. प. व. स.

२५७०. अर्घ, सं. ( अर्घ्-किंमत पडणें ); किंमत; मोल.

२५७१. चैन, सं. ( चयन=चि-एकत्र करणें ); सुख; आनंद.

२५७२. मोठेंधोटें, म. ( मोटें+धोटें ); जाडेंभरडें.

२५७३. मोठें ( महत्=मह्-पूजा करणें; ) जाड.

२५७४. सामान, फा.-साहित्य.

२५७५. विलास, सं. ( वि+लस्-इच्छिणें ); सुख, आनंद.

२५७६. अरिष्ट, सं. ( रिष्-दुखापत होणें ); संकट; धोका; अनर्थ, सुख, आनंद.

२५७७. मागमूस, ( माग+मूस ); थांग व चोरी ( माल ).

२५७८. माग. सं. ( मार्ग ); पत्ता.

२५७९. मूस ( मोष=मुष्-चोरणें ); चोरी.

२५८० तलम, म.-बारीक व सफाईदार सुताचें.

२२८१. खराब, आ. ( खर+आब ); वाईट.

२५८२. चिरगूट, सं. ( चीरगंट=चीर+गंट-गुट्-गुंडाळणें ); वस्त्र, वेष्टण.

२५८३. अननस, पो.-विशेष झाड व त्याचें फळ.

२५८४. नांगर, सं. ( लाङ्गल ); शेतकीचे मुख्य आऊत.

२५८५. आठवडा, सं. ( अष्टवार=अष्टन्+वार; आठा दिवसांचा समुदाय.

२५८६. नुकसान, आ.-तोटा.

२५८७. लुगडें, सं. ( लक्तक ); बायकांचें नेसण्याचें वस्त्र.

२५८८. रासवट, सं, ( राशिवत्=राशि+वत् ); साधारण; राशींतलें.

२५८९. सुताडवजा, म. (सुताडा+वजा ); जाडेंभरडें विणलेलें असें, सुताड्यासारखें.

२५९०. सुताडा ( सूत्रित=सूत्-विणणें ); जाडें सुताचें वस्त्र.

२५९१. पडगी, सं. (पतद्ग्रह=पतत् +ग्रह ); पडतांना सांवरणारी किंवा न पडूं देण्याचें साधन; चौकी; वैठक.

२५९२. निखळणें, सं. ( निष्कीलन=निस्+कील-खिळे निघणें); वंधांतून निघणें; निसटणें.

२५९३. परळ, म.-मातीचें ताट.

२५९४. गांगरणें, म.-घोटाळणें; अस्पष्ट ध्वनि करणें.

२५९५. फांटें, सं. ( स्फंट=स्फंट्-फुटणें ): खांदी; जळाऊ लांकूड.

२५९६. गुडगुडी, म.-(गुरगुरी)गुरगुर असा ध्वनि करणारी ( चिलीम ); तंबाखू ओढण्याचें साधन.

२५९७. इलाज, आ.-उपाय; युक्ति

२२९८. वेलें, सं. ( बिल्व ); बेलाचें अगर नारळाचें पोखरलेलें फळ.

२५९९. दिक्कत, आ.-शंका.

२६००. गुडदी, सं. (गुड्दा); बूच; बुटणें.

२६०१. उदासवाणी, म. ( उदास +वाणी ); उदासासारखा; खिन्न; निरिच्छ.

२६०२. पस्तावा, सं. ( पश्चात्ताप=पश्चात्+ताप ); मागून वाटणारें दुःख; अनुताप.

२६०३. सुस्कारा, सं. ( श्वासकार= श्वास+कार–कृ–करणें ); उसासा टाकणें; श्वास टाकणें.

२६०४. हाहाकार. सं. ( हा+हा+ कार=कृ–करणें ); हाय हाय किंवा हा हा असा दुःखकारक ध्वनि.

२६०५. उसळणें, सं. ( उच्छलन= उत्+शल्–जाणें ); उत्पन्न होणें; वर येणें; उडणें.

२६०६. छोटेखानी, उ. ( छोटा+ खान+ई ); लहान; मध्यम प्रतीचा.

२६०७. छोटा–लहान.

२६०८. वकील, आ.–मध्यस्थ.

२६०९. शेर, तु.–विशेष माप.

२६१०. दरम्यान, फा.–मध्यंतरीं.

२६११. जमीनअस्मान, फा. ( जमीन+अस्मान ); पृथ्वी व आकाश यांतील.

२६१२. जमीन–पृथ्वी.

२६१३. अस्मान–आकाश.

## ६२. रोजमुरा. ( पृ० २६३ ).

२६१४. अद्ल, आ.–शिक्षा; परीक्षा; न्याय, ठेंच.

२६१५. धोतर, सं. ( धौत्र=धाव्–धुणें ); धुतलेलें अंगावर वापरण्याचें एक वस्त्र.

२६१६. सुप्रसन्न, सं. ( सु+प्रसन्न ); आनंदित; हर्षयुक्त.

२६१७. प्रसन्न ( प्र+सद्-खुश होणें; कृपा करणें ); खुश; आनंदित.

२६१८. नेहमीं, सं. ( नियम )+म. ( ई ) सदोदित; अक्षय्य.

२६१९. खप, सं. ( क्षप=क्षप्–टाकणें ); विक्री; खर्च.

२६२०. काची, सं., ( कच्छी=कच्छ+ई ); कच्छदेशांतील लोक, ( ते फळें वगैरे विकण्याचें काम करितात ).

२६२१. कच्छ–एक पाणथळ देश.

२६२२. इरादा, आ.–इच्छा. हेतु.

२६२३. एरवीं, म.–( एर+वीं ) इतर वेळीं.

२६२४. एर, सं. ( इतर ); अन्य.

२६२५. सफाई, आ.–पूर्णपणा; स्वच्छता.

२६२६. सफा–स्वच्छ; अगदीं स्वच्छ.

२६२७. दुकान, फा.–विकत देण्या घेण्याची जागा.

२६२८. बेकार, फा. ( बे+कार ); काम नसणारा; रिकामा; निरुद्योगी.

२६२९. कारभारी, सं. ( कार्यभारी–कार्यभार+इन् ); घरधनी; मालक; घरचें किंवा व्यापारांतलें किंवा राज्यांतलें सर्व काम करण्याचा भार डोक्यावर घेणारा.

२६३०. हिम्मत, आ.–धीर; धैर्य; उत्साह.

२६३१. थारा, सं. ( स्थैर्य=स्थिर+य ) स्वस्थता, आधार; आश्रय.

२६३२. तेजी, फा. ( तेझी ); चणचण; महागाई; तेज.

२६३३. जिव्हाळा, सं. ( जीवालय–जीव+आलय ); मर्म; नाजूक जागा.

२६३४. दिल, फा.–आत्मा; मन.

२६३५. निढळ, ( निटिल ); कपाळ; स्वकष्टार्जित.

२६३६. संस्कार, सं. ( सम्+स्+कृ-उपयुक्त करणें ); अनुभव.

## ६३. साक्रेतीम ग्लाको यास बुद्धिवाद सांगून इ० ( पृ० २७९ ).

२६३७. बुद्धिवाद, सं. ( बुद्धि+वाद ); शहाणपणा येण्याकरितां उपदेश. च. त. स.
२६३८. वाद-( वद्-बोलणें ) भाषण.
२६३९. सोफिस्त, ग्री.-पंडित.
२६४०. पट्टाईत, म. (पट+आईत); हुशार; निपुण; पट्टा मिळविलेला.
२६४१. बाणा, सं. ( बाण=वण्-शब्द करणें ); ऐट; शेखी; प्रौढी.
२६४२. उमेदवार, फा. (उमेद+वार ); होतकरू; उमेद बाळगणारा.
२६४३. कर्तृत्व, सं. ( कर्तृ+त्व ); बाकबगारी; शहाणपण; चातुर्य.
२६४४. कर्तृ ( कृ-करणें ); करणारा.
२६४५. लोकसत्ताक, सं. ( लोक+सत्ता+क ); लोकांच्या सत्तेचे; स. ब. स.
२६४६. मनन, सं. ( मन्-विचार करणें ); विचार; चिंतन.
२६४७. जमाबंदी, उ.-( जमा+बंदी ) देशाचें अगर प्रांताचें सरकारदेणें; धारा.
२६४८. जमा, आ.-लोकांकडील उत्पन्न.
२६४९. बंदी, उ.-एकंदर करणें.

२६५०. प्रबलता, सं. (प्रबल+ता); शक्ति; अधिकार; सामर्थ्य.
२६५१. बेधडक, उ. ( बे+धडक ); न भितां; बिनफिकिर. अ. स.
२६५२. धडक-भीति; धक्का.
२६५३. दिवाणदरबार, फा. ( दिवाण+दरबार ); चारचोघांत नेणें, पंचाईत.
२६५४. दिवाण-कारभारी.
२६५५. दरबार-सभा.

## ६४. कविता-भीष्मपर्वांतील. ( पृ० २७९ ).

२६५६. भीष्म,सं.-कौरवपांडवांचा आजा.
२६५७. कवण, सं. ( कोऽन्य=क+अन्य ); कोण; कोणता; भलता.
२६५८. येर, सं. ( इतर ) दुसरा.
२६५९. शरतल्पगत, सं. ( शर+तल्प+गत ); बाणाच्या बिछान्यावर निजलेला.
२६६०. तल्प-बिछाना.
२६६१. गुह, सं. ( गुह्-लपवणें ); कार्तीकस्वामी.
२६६२. देवव्रत, सं. ( देव+व्रत ); देवासारखें व्रत ( आचरण ) करणारा ( पक्का निश्चयी ); भीष्म. ष. ब. स.
२६६३. विशिखशयन, सं.-विशिख+शयन ); बाणांचा बिछाना.
२६६४. विशिख (वि+शिखा )बिनअग्राचा, किंवा आगकुचीचा बाण.
२६६५. पुत्रादर, सं. ( पुत्र+आदर ); पुत्राचा मान. ष. त.
२६६६. पुत्र-( पुम्+त्रै-राखणें ) मुलगा.

२६६७. आदर ( आ+दृ-मान देणें ); मान.

२६६८. अनिमिष, सं. ( न+निमिष ); डोळ्याचें पातें न लवतां. न. ब. स.

२६६९. परिस, सं. ( परतः ); पेक्षां.

२६७०. बा, सं. ( वप्र=वप्-पेरणें ); बाप.

२६७१. स्पर्धाकरिता, म. ( स्पर्धा+करिता ); हेवा करणारा.

२६७२. करिता, सं. ( कर्ता=कृ-करणें ); करणारा

२६७३. विप्रतीप, सं. ( वि+प्रतीप ); अति विरुद्ध वागणारा.

२६७४. प्रतीप, ( प्रति+आप्+अ ); उलट वागणारा; शत्रु.

२६७५. रविज, सं. ( रवि+ज ); सूर्यापासून उत्पन्न झालेला; ( कर्ण ).

२६७६. रवि-सूर्य.

२६७७. परमह, सं. ( पर+मह ); फार पूज्य; मोठा. प. ब. स.

२६७८. मह, ( मह्-पूजा करणें ); तेज.

२६७९. दुर्बोधतत्वकथन, सं. ( दुर्बोध+तत्व+कथन ); जाणण्यास कठीण अशा गोष्टींचें विवरण करणें. दुर्बोध-प. ब. स. दुर्बोधतत्व-क. स. दुर्बोधतत्वकथन-ष. त. स.

२६८०. दुर्बोध ( दुर्+बोध ); जाणण्यास कठीण. प. ब. स.

२६८१. कथन ( कथ्-सांगणें ); सांगणें.

२६८२. हव्यास, आ. ( हवस ); उत्साह; इच्छा.

२६८३. निष्ठुर, सं.-कठीण; निर्दय.

२६८४. तेजोवधनिमित्त, सं. ( तेजस्+वध+निमित्त ); उत्साहभंग होण्याकरितां. तेजोवध ष. त. स.

२६८५. वध, ( वध्-मारणें ); घात; हानि.

२६८६. निमित्त, ( नि+मिद्-कारण होणें ); करितां.

२६८७. अनय, सं. ( न+नय ); अनीति. नञ्त. स.

२६८८. अधिक्षेप, सं. ( अधि+क्षिप्-टाकणें ); निंदा; तिरस्कार.

२६८९. दुष्टजनसमागम, सं. ( दुष्ट+जन+समागम ); वाईट लोकांची संगति. दुष्टजन-क. स. दुष्टजनसमागम-ष. त.

२६९०. समागम ( सम्+आ+गम्-बरोबर जाणें ); संगति; स्नेह.

२६९१. हितरतगुरुमन, सं. ( हित+रत+गुरु+मनस् ); कल्याणाविषयीं तत्पर असलेल्या बापाचें मन. हितरत-स. त. हित...गुरु.-क. स. हित...मन-ष. त. स.

२६९२. रत ( रम्-रमणें ); तत्पर; तयार.

२६९३. गतसद्वृत्त, सं. ( गत+सद्वृत्त ); ज्याची उत्तम वर्तणूक नष्ट झाली. सद्वृत्त-क. स. गतसद्वृत्त-ब. ब. स.

२६९४. वृत्त ( वृत्-रहाणें ); वर्तणूक; वागणूक; इतिहास.

२६९५. गुरुकोप, सं. ( गुरु+कोप ); बापाचा राग. ष. त.

२६९६. कोप ( कुप्–रागावणें ); राग; क्रोध.

२६९७. भाव्यशिवपरिहार, सं. ( भाविन् + अशिव + परिहार ); पुढें होणाऱ्या अकल्याणाचा नाश. भाव्यशिव-क. स. भाव्य...परिहार-ष. त. स.

२६९८. भावि, (भाविन्-भू–होणें ); होणारें.

२६९९. अशिव ( न+शिव ); अकल्याण; नुकसान. नञ्त.

२७००. शिव–कल्याण. सांव.

२७०१. दिग्विजय, सं. ( दिश्+विजय ); दिशा जिंकणें. ष. त. स.

२७०२. विजय ( वि+जि—जिंकणें ); जय; पराक्रम.

२७०३. सत्या, सं. ( सत्य+आ ); खरी.

२७०४. वीरकुंजर, सं. ( वीर+कुंजर); वीरामध्यें श्रेष्ठ. स.त.

२७०५. कुंजर—हत्ती.

२७०६. संधा, सं. ( सम्+धा–प्रतिज्ञा करणें );प्रतिज्ञा; पण.

२७०७. रणरंग, सं. ( रण+रंग ); युद्धभूमि.

२७०८. रण ( रण्–शब्द करणें ); युद्ध.

२७०९. रंग ( रंज्–रंगणें ) ; सभा; जागा.

२७१०. अवीरा, सं. ( न+वीर ); जिला पुत्र किंवा भ्रतार नाहीं अशी स्त्री. नञ्व. स.

२७११. वत, सं.–दुःखदर्शक शब्द. हाय हाय.

२७१२. हंत, सं.–दुःखदर्शक शब्द; अरेरे. हाय हाय.

२७१३. कटकटा, सं.--त्रास; पीडा.

२७१४. भरतनायक, सं. ( भरत+नायक ). भरतकुळांत श्रेष्ठ ( भीष्म ). ष. त. स.

२७१५. भरत–एक चंद्रवंशीय राजा.

२७१६. नायक ( नी–नेणें ); श्रेष्ठ.

२७१७. स्वकृतज्ञत्व, सं. ( स्व+कृतज्ञ+त्व ); आपल्यावर केलेले उपकार जाणण्याचा धर्म. स्वकृत–तृ. त. स्वकृतज्ञ–द्वि. त. स.

२७१८. कृतज्ञत्व ( कृतज्ञ+त्व ); केलेले ( उपकार ) जाणण्याचा धर्म.

२७१८. ( अ ) कृतज्ञ ( कृत+ज्ञ ); केलेलें जाणणारा.

२७१९. कृतघ्नत्व, सं. ( कृतघ्न+त्व ); केलेले उपकार विसरण्याचा धर्म.

२७२०. कृतघ्न ( कृत+घ्न ); केलेलें न जाणणारा.

२७२१. घ्न ( हन्–मारणें ); मारणारा.

२७२२. सधनतनयदार, सं. ( स+धन+तनय+दारा ); द्रव्य, पुत्र, आणि स्त्री यांसहित. धनतनयदार-द्वं. स. सधन...दार–सहार्थी व. स.

२७२३. तनय ( तन्–विस्तार करणें ); मुलगा.

२७२४. आनृण्य, सं. (अनृण+य ); कर्जांतून मुक्त होणें.

२७२५. अनृण ( न+ऋण ); ज्याला कर्ज नाहीं. नञ् ब. स.

२७२६. वपु, सं. ( वपुस्=वप्–पेरणें ); शरीर; देह.

२७२७. मर्त्यजन, सं. ( मर्त्य+जन ); मरणारा मनुष्य. क.स.

२७२८. मर्त्य,(मृ–मरणें); मरणारा.

२७२९. पुरोग, सं. ( पुरस्+ग ); पुढारी. अ. त. स.

२७३०. आमय, सं. ( अम्–रोग होणें ; रोग; दुःख.

२७३१. सर्वक्षत्रक्षयसूचक, सं. ( सर्व+क्षत्र+क्षय+सूचक ); सर्व क्षत्रियांचा नाश सुचविणारें. सर्वक्षत्र–क स. सर्वक्षत्रक्षय–प. त. स. सर्वक्षत्रक्षयसूचक–ष. त. स.

२६३२. क्षत्र–क्षत्रिय; योद्धा.

२६३३. क्षय ( क्षि–नाश पावणें ); नाश.

२७३४. सूचक ( सूच्–सुचविणें ); सुचावणारें.

२७३५. हुत, सं. ( हु–होम करणें ); अग्नींत टाकलेलें.

२७३६. असाध्य, सं. ( न+साध्य ); साधण्याजोगा नाहीं ( अजिंक्य ); नञ् त. स.

२७३७. युष्मदनुमोदन, सं. ( युष्मद्+अनुमोदन ); तुमचा सल्ला.

२७३८. अनुमोदन, ( अनु+मुद्–आनंद पावणें ); सल्ला; मत.

२७३९. पुष्कलता, सं. ( पुष्कल+ता ); पुष्कळपणा.

२७४०. पुष्कळ ( पुष्–पोसणें ); फार.

२७४१. दग्धलता, सं. ( दग्ध+लता); जळालेली वेळ; क. स.

२७४२. दग्ध ( दह्–जळणें ); जळालेली; शुष्क.

२७४३. मदाज्ञा, सं. (मद्+आज्ञा); माझा हुकूम. अस्मद्बद्दल समासांत मद् रूप येतें.

२७४४. आज्ञा ( आ+ज्ञा–हुकूम करणे ); हुकूम.

२७४५. क्षत्रधर्मजितलोक, सं. ( क्षत्र+धर्म+जित+लोक ); क्षत्रियधर्माच्या आचरणानें जिंकिलेले (. मिळविलेले ) लोक ( परलोक ).

२७४६. जित ( जि–जिंकणें ); जिंकलेला.

२७४७. प्रशम, सं. ( प्र+शम ); तह; तंटा मिटविणें.

२७४८. विकल, सं. ( वि+कला ); व्याकुल; दुःखी; निस्तेज. पं. व. स.

## ६९. ज्योतिःशास्त्राचें महत्व. ( पृ० २८२. )

२७४९. ज्योतिष, सं. ( ज्योतिस्+अ ); आकाशांतील प्रकाशणाऱ्या गोलांचें शास्त्र.

२७५०. तारकापुंज, सं. ( तारका+पुंज ); ताऱ्यांचा समूह.

२७५१. तारका–तारा.

२७५२. प्रतिरात्र, सं. ( प्रति+रात्रि ) दररात्रीं; अ. स.

२७५३. रात्रि–रात्र.

२७५४. दैनंदिन, सं ( दिन+दिन+अ ); दर दिवसाची.

२७५५. एकांक, सं. ( एक+अंक ); मूळ आंकडा. क. स.

२७५६. अंक ( अंक्–खूण करणें ); चिन्ह; खूण.

२७५७. क्षीयमाण. सं. ( क्षि–नाश पावणें ); कमी होणारी,

२७५८. पुनरावृत्ति, सं. ( पुनर्+आवृत्ति ); दुसरा खेप.

२७५९. पुनर्–पुन्हां.

२७६०. आवृत्ति ( आ+वृत्–फेरा घेणें; फिरणें ); फेरा; खेप.

२७६१. नित्यचर्या, सं. ( नित्य+चर्या ); रोजचा क्रम.

२७६२. नित्य ( नि+त्य ) नेहमीं.

२७६३. अनंतत्व, सं. ( अनंत+त्व ); अमर्यादपणा.

२७६४. अनंत, ( न+अंत ); ज्याचा अंत नाहीं तें. ष. व. स.

२७६५. अगाध, सं. ( न+गाध ); खोल. नञ् त. स.

२७६६. गाध, ( गाध्-वलांडणें ); उथळ.

२७६७. चिरस्थायी, सं. ( चिर+स्थायिन् ); फार वेळ टिकणारी.

२७६८. स्थायिन् ( स्था-रहाणें ); रहाणारा; टिकणारा.

२७६९. नौकातरण, सं. (नौका+तरण ); नौकेनें अथवा जहाजानें जाणें.

२७७०. नौका-नाव.

२७७१. तरण, ( तॄ-तरणें ); तरून जाणें.

२७७२. पंचांग, सं. ( पंचन्+अंग); तिथि, वार, नक्षत्र, योग, करण यांचा समुदाय किंवा ज्या पुस्तकांत तो समुदाय सांगितलेला असतो तें.

२७७३. कप्तान, इं. ( कॅप्टन ); नाखवा; गलबतावरील एक अधिकारी.

२७७४. मूलप्रसारक, सं. ( मूल+प्रसारक ); मूळ गोष्टीचा प्रसार करणारा.

२७७५. प्रसारक, (प्र+सृ-पसरणें ); प्रसार करणारा.

२७७६. विवेकदृष्ट, सं. ( विवेक+दृष्ट ); विचारानें समजलेलें; तृ. त. स.

२७७७. विवेक, ( वि+विच्-सांगणें; उघड करणें ); विचार.

## ६६. ज्योतिःशास्त्राचा इतिहास. ( पृ० २८९ ).

२७७८. अर्वाचीन, सं. ( अर्वाच्+ईन ); अलीकडील; हल्लींचें.

२७७९. अर्वाच् ( अवर+अंच्-जाणें ); अलीकडे.

२७८०. सूर्यमध्यक, सं. ( सूर्य+मध्य+क ); जींत सूर्य मध्यें आहे; स. व. स.

२७८१. अश्रद्धेय, सं. ( न+श्रद्धेय ); विश्वास ठेवितां येणार नाहीं अशी; नञ् त स.

२७८२. श्रद्धेय, ( श्रद्धा+ईय ); विश्वास ठेवण्याजोगें.

२७८३. श्रद्धा, ( श्रत्+धा-विश्वास ठेवणें ); विश्वास.

२७८४. सार्थक, सं. ( सार्थक्य=सार्थक+य ); साफल्य; इष्ट हेतूची सिद्धि.

२७८५. मुत्सद्दीपणा, आ. (मुत्सद्दी) +म. ( पणा ) राज्यांतील हिशेब व कारकाई समजणें.

२७८६. कृतार्थता, सं. ( कृतार्थ+ता ); धन्यता.

२७८७. कृतार्थ, ( कृत+अर्थ ); धन्य. तृ. व. स.

२७८८. समकालीन, सं. (सम+काल+ईन ); एका काळीं झालेले.

२७८९. अपरिमित, सं. ( न+परिमित ); न मोजलेली; अत्यंत; मनस्वी; फार.

२७९०. परिमित, ( परि+मा-मोजणें ); मोजलेली.

२७९१. सर्वविश्रुत, सं. ( सर्व+विश्रुत ); सर्वांनीं ऐकलेलें; सर्वांस ठाऊक; माहीत; तृ. त

२७९२. विश्रुत (वि+श्रुत); ऐकलेलें.

२७९३. स्थापित, सं. ( स्था-रहाणें ); सिद्ध; तयार; ठरविलेलें.

२७९४. यथार्थत्व, सं. ( यथार्थ+त्व ); खरेपणा; सत्यता.
२७९५. कोणमान, सं. ( कोण+मान ); कोन मोजणें.
२७९६. कोण—कोपरा; कोन.
२७९७. रंगपट्टदर्शकयंत्र, सं. ( रंग+पट्ट+दर्शक+यंत्र ) रंगाचे पट्टे दाखविणारें यंत्र.
२७९८. पट्ट ( पट्—वेष्टणें; बांधणें ); पट्टा; पट्टी.

## ६७. विद्यानंदाविषयीं ( पृ० २९० ).

२७९९. प्रतिष्ठादायक, सं. ( प्रतिष्ठा+दायक ); मोठेपणा देणारी; प्रतिष्ठा देणारी.
२८००. प्रतिष्ठा ( प्रति+स्था—रहाणें; स्थापणें ); मोठेपणा.
२८०१. दायक ( दा—देणें); देणारी.
२८०२. उपद्व्याप, सं. ( उप+व्याप ); लचांड, पंचाईत.
२८०३. व्याप, ( वि+आप्—मिळणें ); धंदा.
२८०४. ग्राम्यविषयसुख, सं. ( ग्राम्य+विषय+सुख ); भिकार गोष्टींचा लाभ.
२८०५. ग्राम्य ( ग्राम+य ); गांवढळ; खेडेगांवांतील.
२८०६. ग्राम, ( ग्राम्—एकत्र करणें ); गांव.
२८०७. सुख ( सुख्—आनंद देणें ); आनंद.
२८०८. जडपदार्थविषयक, सं. ( जड+पदार्थ+विषय+क ); ज्यांत जड पदार्थांचा संबंध आहे असें. जडपदार्थ—क. स. जड..विषयक—स. व. स.
२८०९. जड, ( जल्—ड्=स्थापन करणें ); वजनदार.
२८१०. अंतर्भाव, सं. ( अंतर्+भाव ); समावेश.
२८११. दर्शनानुशासन, सं. ( दर्शन+अनुशासन ); प्रकाशविषयाचें शास्त्र.
२८१२. अनुशासन ( अनु+शास्—शिकवणें ); शिकवणें.
२८१३. रंगसामान्य, सं. ( रंग+सामान्य ); रंगांचा सारखेपणा. ष. त. स.
२८१४. सामान्य (समान्+य ) सारखेपणा.
२८१५. समान, ( सम+अन्—वांचणें ); सारखा.
२८१६. संकर, ( सम्+कृ—एकत्र करणें ); मिसळ.

## ६८. शिष्टसंप्रदाय पृ० २९६.

२८१७. शिष्टसंप्रदाय, सं. ( शिष्ट+संप्रदाय ) सुशील, सभ्य, व सुशिक्षित यांच्या चालीरीति.
२८१८. शिष्ट ( शास्—शिकविणें ); शिकलेला.
२८१९. संप्रदाय, ( सम्+प्र+दा—देणें ); चाल; रीत.
२८२०. देशपरत्व, सं. ( देश+परत्व ); देशाचा वेगळेपणा.
२८२१. परत्व (पर+त्व); वेगळेपणा.
२८२२. जातिविशिष्ट, सं. ( जाति+विशिष्ट); जातींत विशेष.
२८२३. भवका, हिं. ( भवका ); डौल; पोकळ मोठेपणा, वाफ.
२८२४. बुतांव, इं. ( बटन ); गुंडी.
२८२५. अदव, आ.—नम्रता.
२८२६. बीभत्स,सं (वध्—तिरस्कार करणें ); वाईट; निंद्य; तुच्छ.
२८२७. पाटलून, इं. ( पान्टॅलून ); विजार.
२८२८. प्रायव्हेट, इं.—खासगी.
२८२९. सेक्रेटरी, इं. चिटणीस.

# कवितांचा अन्वय व अर्थ.

## उत्तमगुणलक्षणें ( पृ० २६ ).

रामदास ह्मणून एक साधु होता. तो फार विरक्त असे. त्यानें लहानपणींच ऐहिक सुखाचा त्याग करून आपलें सर्व आयुष्य ईश्वरभजनांत घालविलें. तो रामाची भक्ति करित असे ह्मणून त्याचें रामदास असें नांव पडलें. त्यानें ओंव्या, श्लोक, वगैरे पुष्कळ केले आहेत. त्यांपैकीं खालीं दिलेल्या ओंव्या ह्या त्याच्याच 'दासबोध' नामक ग्रंथांतून वेंचून घेतल्या आहेत. रामदासाचा जन्म शके १५३० त झाला व तो शके १६०३ मध्यें निजधामास गेला. त्याची कविता सुलभ आहे व तींत भक्तिरस फार भरला आहे.

१ **श्रोतीं व्हावें सावधान**–**अर्थ**–ऐकणारांनीं सावध व्हावें.

,, **जेणेंकरितां बाणे खुण**–**अर्थ**–ज्याच्या योगानें सर्वज्ञपणाची खूण अंगीं बिंवते.

३ **मर्यादेविण हालूं नये इ०**–**अर्थ**–प्रत्येक व्यवहारांत मर्यादा असावी. अति कांहीं करूं नये, व कोणतेंहि काम कसाहि प्रसंग असला तरी विचार केल्याशिवाय करूं नये.

४ **चोरासि वोळखी पुसूं नये**–**अर्थ**–चोराला ओळख देऊं नये.

,, **एकाएकीं**–**अर्थ**–होतां होईतोंपर्यंत.

५ **जनीं आर्जव तोडूं नये**–**अर्थ**–लोकांवरोबर सरळ व्यवहार ठेवण्यास चुकूं नये.

६ **वक्तयास खंडूं नये**–**अर्थ**–कोणी वोलत असतां त्यास मध्येंच मोडून काढूं नये; त्याचें भाषण ऐकून घ्यावें.

८ **जिवलगासि खेदूं नये**–**अर्थ**–आपल्या जिवलगास खेद होईल असें वागूं नये.

१० **आळसें सुख मानूं नये**–**अर्थ**–आळशीपणांत सुख मानूं नये.

११ **सुखा अंग देऊं नये**–**अर्थ**–सुख भोगण्याकडे विशेष लक्ष देऊं नये.

१३ **कोणाचा उपकार घेऊं नये.**–**अर्थ**–आपल्यावर कोणाचा उपकार करून घेऊं नये.

१४ **व्यापकपण सोडूं नये**–**अर्थ**–सर्व कामांत नेहमीं लक्ष द्यावें.

१५ **अदेखणेपण करूं नये**–**अर्थ**–आपण दुसऱ्याचें किंवा त्यानें आपलें तोंड पाहूं नये असा दुष्टावा करूं नये.

१५ **अन्यायाविण गांजूं नये**–**अर्थ**–अन्याय नसतां ( विनाकारण ) कोणास छळूं नये.

१५ अंगबळें-अर्थ-दांडगाईनें, उद्दामपणानें, मनगटाच्या जोरानें.

१८ उणें अंगीं संचरूं नये-अर्थ-दुर्गुणास आपल्या अंगीं शिरूं देऊं नये.

२१ चहाडी चोरी धरूं नये-अर्थ-चहाडी करणें किंवा चोरी करणें हा दुर्गुण धरूं नये, किंवा दुसऱ्याच्या अंगीं असलेला तो गुण धरून देण्याचें काम करूं नये.

२२ समयीं याया चुकूं नये-अर्थ-ठरलेल्या वेळीं येण्याचें चुकवूं नये.

,, सत्वगुण सांडूं नये-अर्थ-दयाळूपणा, निर्लोभपणा, शांति इत्यादि निरुपद्रवी गुण सोडूं नयेत.

२५ सभा देखोनि गळूं नये-अर्थ-लोक जमलेले पाहून धैर्य सोडूं नये. (सभाधीटपणा अंगीं आणावा).

२७ अपकीर्ति सांडावी-अर्थ-आपले आंगचा दुर्लौकिक करणारा गुण टाकून द्यावा.

२८ न घेतां हे उत्तम गुण-अर्थ-हे उत्तम गुण जो न घेईल.

## तुकारामाचे अभंग (पृ० ५३).

तुकाराम हा देहू एथला राहणारा. याचें संसारांत मुळींच लक्ष नसे. तो कथा करी व लोकांस उपदेश करित फिरे. यानें पुष्कळ अभंग केले आहेत. हा शके १५२० त जन्मला व शके १५७१ त मरण पावला. याची कविता मोठी उपदेशपर आहे व ती चांगली मनावर ठसते.

१ तरिच जन्मा यावें इ०-अर्थ-ईश्वराची भक्ति करावयाची असली तरच जन्म घ्यावा;. नाहीं तर भक्ति न करणारीं अशीं कुतरीं, डुकरें का थोडीं आहेत? अंगीं कोणताहि दोष लावून घेतला नाहीं तर जन्मास आल्याचें सार्थक, व ज्यानें देव ओळखिला तोच धन्य समजावा, असें तुकाराम ह्मणतो.

३ ज्याचें अंतःकरण शुद्ध इ०-अर्थ-ज्याचें अंतःकरण शुद्ध आहे त्याला उपदेश करावयास नको, किंवा साधूचा शेजार नको. त्याच्या हृदयांत आपोआप दया उद्भवते. तुकाराम ह्मणतो, मलागिरीवर सुवासिक चंदनाचे वृक्ष असल्यामुळें तेथें साप साहजिक असतात.

५ खरें बोले जरी इ०-अर्थ-खरें बोलल्यानें देव अनायासें प्रसन्न होतो, असे सोपे उपाय सोडून जो दुसरें कांहीं करतो, त्याचें तें सर्व व्यर्थ होतें. दुसऱ्याबरोबर एक प्रेमळ भाषण केल्यानें दुसऱ्यावर मोठा उपकार होत असतो; ह्मणून, तुकाराम ह्मणतो, मनांतील क्रोधादिक विकार टाकून या ह्मणजे तंटा बखेडा कोठें राहणार नाहीं.

६ चिंतनासी नलगे वेळ इ०-अर्थ-ईश्वराचें नामस्मरण करण्यास अमुकच वेळ पाहिजे असें नाहीं. तें सर्वकाळ करावें. ज्याच्या भाषणांत (मुखांत) नेहमीं ईश्वराचें नामस्मरण आहे त्याचें मुख शुभदायक

समजावें. ईश्वराची भक्ति करावयास शिकावें, त्याशिवाय इतर सर्व व्यर्थ होय, असें तुकाराम सर्व लोकांस सर्वदां सांगतो.

**८ भिक्षापात्र अवलंबणें इ०**–**अर्थ**–भिक्षा मागायला लागणें मोठें लज्जेचें काम आहे. ईश्वर त्याजकडे दुर्लक्ष करितो. दीन होऊन दुसऱ्यावर संकट घालणें यासारखें दुसरें दुर्दैव नाहीं. त्या योगानें आपल्यावरचा विश्वास मात्र उडतो. देवावर पूर्ण विश्वास ठेविला असतां त्याला कांहीं उणें पडणार नाहीं. तात्पर्य, परमेश्वराचें दृढचिंतन करा, दुसरें कांहीं नको, असें तुकारामाचें सांगणें आहे.

**९ उदंड शाहाणे होत इ०**–**अर्थ**–मोठे विद्वान् व तर्कशास्त्री असले तरी त्यांस ईश्वराचा अंत कळत नाहीं. मोठे मोठे ग्रंथ रचिले तरी त्यांस ईश्वराचा मोठेपणा कळत नाहीं. भोळेपणानें ज्ञान होतें; इतर सर्व खटपट रिकामी होय, असें तुकाराम सांगतो.

**१० आपुला हा प्राण इ०**–**अर्थ**–आपण आपल्या प्राणावर जसें प्रेम करितों, तसेंच सर्व लोकांवर प्रेम केलें पाहिजे. ही गोष्ट पशूंना जशी कळत नाहीं तशी दुर्जनास कळत नाहीं. निर्दय मनुष्य लोकांना आनंदानें पीडा देतो, परंतु स्वतःवर प्रसंग येतो तेव्हां रडत बसतो, असें तुकाराम ह्मणतो.

**११ आह्मी तरी आस इ०**–**अर्थ**–आह्मी सर्व आशा सोडून देऊन अगदीं निरिच्छ झालों आहों. हा आमचा देह कोठें पडो किंवा श्रेष्ठपणा पावो. तुमचें ऐश्वर्य तुह्मास लखलाभ होवो. आह्मी आहों असेच असणार; मान व अपमान आणि सुख व दुःख हीं आमचीं सर्व गेलीं; याबद्दल आह्मांस अगदीं दुःख वाटत नाहीं; असें तुकाराम ह्मणतो.

**१२ अधीरा माझ्या मना इ०**–**अर्थ**–तुकाराम ह्मणतो, अरे माझ्या उतावळ्या मना, खायला कसें मिळेल अशी विवंचना सर्वकाळ कां करित असतोस? तुला एक गोष्ट सांगतों ती ऐक. अरे कित्येक पांखरें तुझ्याहून फार शहाणीं आहेत. पहा, चातकपक्षी भुईवरचें पाणी पीत नाहीं, ह्मणून भरउन्हाळ्यांत सुद्धां पाऊस पडून त्यास पाणी मिळतें. सर्व जातींमध्यें सोनार हा लुच्चा आहे, परंतु त्यावर झारेकरी निर्वाह करितो. तात्पर्य, प्राणी वनांत असो, किंवा पाण्यांत असो, त्याचा निर्वाह हा होतोच; त्याला सनदेसारखें कांहीं लिहून दिलेलें नसतें.

**१३ निंबाचिया झाडा साखरेचें आळें इ०**–**अर्थ**–कडू लिंबाच्या झाडाला साखरेचें आळें केलें ह्मणून तें आपलीं फळें गोड करित नाहीं. तसेंच नीच मनुष्य एकादी वस्तु कितीहि चांगली असली तरी ती ओकारीसारखी टाकून देतो. खापर परिसाला लावलें तरी खापरांत कांहीं बदल होत नाहीं. तसेंच चंदनाच्या वृक्षाजवळ वेळूचीं झाडें पुष्कळ असतात, ह्मणून ते चंदन का होतात?

**१५ जरी आलें राज्य मोळविक्या इ०**–**अर्थ**–मोळीविक्याला जरी राज्य मिळालें तरी तो आपला स्वभाव सोडणार नाहीं. कारण, लोभी मनुष्यांची आशा व इच्छा कधीं तृप्त होत नसतात, त्या एका कामाविषयीं

कमी झाल्या तर त्या दुसऱ्या कामाविषयीं वाटत असतात. वैभवाच्या सुखांत गुंग न होतां तें भोगण्याविषयीं इच्छा धर,' आणि कांहीं अडचण आलीच तर ती नाहींशी कर. सारांश, मरणाचें भय वाळग आणि त्यांतून पार पडण्याविषयीं तजवीज कर.

१६ **रणीं निघती शूर न पाहे माघारें इ०–अर्थ**–लढाईस जाणारा मनुष्य मागें घेत नसतो; याकरितां मला मोठा धीर देऊन संभाळ. मी संसाराच्या मागें लागल्यामुळें ईश्वरभक्तीस मुकलों आहें. ह्मणून नारायणा, कृपा कर, तुझें नामस्मरणरूपी हत्यार मी धरलें आहे हा मला अभिमान आहे. तथापि, त्या स्थितींतूनही मीं पळ काढिल्यास मला कमिजास्त साह्य करणें तुझ्याकडे आहे, असें तुकाराम ह्मणतो.

१७ **सर्व बाजागिरी वाटती इ०–अर्थ**–हा जादूचा सर्व तमाशा खरा वाटतो. खरोखरी पाहतां त्यांतील जाग्यावर कांहींच राहत नाहीं.

१८ **बरें झालियाचे अवघे सांगाती इ०–अर्थ**–चांगलें झालें ह्मणजे सर्व स्नेह करितात. वाइटाच्या वेळीं कोणाची ओळख नसते. आई, बाप, बायको किंवा मुलगा उपयोगीं पडत नाहीं, मग दुसऱ्याची गोष्ट कशाला हवी? लोक दुतोंडी जनावरासारखे आहेत. ते वेळ पडेल तसे वागतात.

१९ **दधिमाजी लोणी जाणती सकळ इ०–अर्थ**–दह्यांत लोणी आहे हें सर्वांस ठाऊक आहे. परंतु घुसळण्याची माहिती ज्याला आहे तोच तें वेगळें काढितो. लांकडांत अग्नि असतो हें सर्वांस ठाऊक आहे, परंतु घर्षणानें तो उत्पन्न केल्याखेरीज त्याला जाळण्याची शक्ति कशी येईल? मळलेला आरसा स्वच्छ केल्याशिवाय त्यांत तोंड कसें दिसेल? असें तुकाराम ह्मणतो.

## ज्ञानेश्वरींतील साधूचीं लक्षणें (पृ० ७६).

ज्ञानदेवानें भगवद्गीतेवर प्राकृत भाषेंत जी ओंवीबद्ध टीका केली आहे तिलाच 'ज्ञानेश्वरी' असें ह्मणतात. हा ग्रंथ ज्ञानेश्वरानें शके १२१२ ह्या वर्षी ह्मणजे आपल्या वयाच्या सोळावे वर्षी संपविला. ज्ञानदेव हा अलौकिक बुद्धीचा पुरुष होता. त्यानें वेदांतविषयपरही कविता केली आहे. हा शके ११९७ त जन्मला व अल्पवयांतच (शके १२३८ त) आळंदी एथें समाधिस्थ झाला.

१ **जो सर्वां भूतांचे ठायीं इ०–अर्थ**– जो प्राणिमात्राशीं द्वेष करित नाहीं व ज्ञानशक्तीला जसें आपलें व दुसऱ्याचें हें कांहीं नाहीं, तसें हें आपलें व हें दुसऱ्याचें हें ज्यापाशीं कांहीं नसतें.

२ **उत्तमातें धरिजे इ०–अर्थ**–चांगल्यास आश्रय द्यावा व वाइ-

टाचा अव्हेर करावा, हें जसें पृथ्वीच्या मनांत येत नाहीं ( हा भेदाभेद पृथ्वी करित नाहीं ), तसें ज्याच्या मनांत येत नाहीं.

३ कीं रायाचें देह चाळूं इ०-अर्थ-किंवा दयाळू प्राणास राजाचें शरीर यथास्थित चालवावें व गरीबाचें चालवूं नये हें जसें माहीत नाहीं तसें.

५ तैसें अवघिया भूतमात्रीं इ०-अर्थ-तसें सर्व प्राण्यांशीं सारखा वागून सर्वांवर जो सारखी कृपा करितो.

६ मी हें भाषण नेणें इ०-अर्थ-ज्यास अहंकाराची बाधा नाहीं व जो ही वस्तु माझी आहे असें मानित नाहीं व ज्यास दुःख आणि सुख ह्यांतील भेद कळत नाहीं.

१२ रिपुमित्रा दोहीं सरिसा पाड इ०-अर्थ-शत्रु आणि मित्र यांस जो सारख्या किमतीचे ( समान ) मानितो.

१४ जो खांडावया घाव घाली इ०-अर्थ-वृक्ष ज्याप्रमाणें तोडणारा व लावणारा या दोघांस सारखी छाया पाडतो तसें.

१५ ना तरी इक्षुदंडु इ०-अर्थ—ज्याप्रमाणें ऊंस राखणारास गोड व गाळणारास कडू होत नाहीं त्याप्रमाणें.

१६ तैसा एकाचि मान, शितोष्णीं जया इ०-अर्थ—त्याप्रमाणेंच ज्याला थंडी आणि उष्णता हीं दोन्ही सारखींच वाटतात तो.

१७ माधुर्यें चंद्रिका इ०-अर्थ—ज्याप्रमाणें चांदणें राजाला व गरिबाला सारखें संतोषकारक असतें, तसें जो प्राणिमात्रांशीं समान असतो.

१८ अवघिया जगा एक इ०—अर्थ-जसें सर्व जगाला पाणी ही उपयोगी वस्तु आहे, त्याप्रमाणेंच तिन्ही लोक ज्याची जरूरी वाळगतात.

१९ जो निंदेतें नेघे इ०-अर्थ-जसें आकाश मळाचा लेप लावून घेत नाहीं, त्याप्रमाणें जो निंदा किंवा स्तुति यांपासून अलिप्त राहतो.

२० तैसे निंदे आणि स्तुती इ०-अर्थ-त्याप्रमाणेंच जो निंदा आणि स्तुति सारखीच गणतो व वायूच्या गतिस्थितीप्रमाणें आपण लोकांत किंवा अरण्यांत वागतो.

२१ जो यथालाभें तोष इ०-अर्थ-जसा समुद्र पाऊस न पडल्यामुळें वाळत नाहीं, तसा जो मिळेल तेवढ्यांत संतुष्ट असतो व न मिळेल त्यावद्दल रागावत नाहीं.

२२ ऐसा भक्त मज आवडे इ०-अर्थ-असा भक्त मला जिवाच्या पलीकडे आवडतो. हा दृष्टांत ऐथें अगदीं उणा आहे, तो ( बरोवर शोभत नाहीं. )

२३ तया ऐसें दुसरें इ०-अर्थ-पांडवा ( अर्जुना ), त्यासारखें दुसरें आमचें आवडतें सोयरेंधायरें कोणी नाहीं, हें तुला खरोखर शपथपूर्वक सांगतो.

( मृच्छकटिक नाटकांतील. )

## वर्षाकालाचें वर्णन ( पृ० १०४ ).

या नाटकास मृच्छकटिक हें नांव देण्याचें कारण हेंच कीं, यांतील नायक चारूदत्त याचा मुलगा आपल्या सोबत्याचा एक सोन्याचा गाडा पाहून तसा सोन्याचा गाडा मला पाहिजे ह्मणून रडूं लागला. चारुदत्तास या वेळीं दरिद्रावस्था आली होती ह्मणून त्याच्या दासीनें त्या मुलास एक मातीचा गाडा करून दिला. परंतु तो गाडा तो घेईना. हें पाहून चारुदत्तावर अनुरक्त असलेल्या वसंतसेना नांवाच्या एका कलावंतिणीनें आपल्या आंगावरील दागिने त्या मुलास सोन्याचा गाडा करण्याकरितां दिले. पुढें एके दिवशीं वसंतसेनाही आपला मित्र चारुदत्त याजकडे जाण्यास निघाली असतां एकाएकीं आकाश मेघांनीं भरून गेलें व अतिशय पर्जन्य पडूं लागला. परंतु आपला निश्चय न ढळवितां ती चारुदत्ताच्या भेटीस गेली. हें नाटक संस्कृतांत शूद्रक नांवाच्या कवीनें केलें आहे. ती कथा मोठी आहे, परंतु एथें जेवढ्या गोष्टीचा संबंध आहे तेवढीच विद्यार्थ्यांचे सोयीकरितां दिली आहे. या आख्यानांत कवीनें त्या वेळच्या पर्जन्यसमयाचें वर्णन केलें आहे.

१ **मेघोदरांतून जलाच्या इ०-अर्थ**-ढगांतून ज्या पाण्याच्या धारा भुईवर झराझर पडत आहेत, त्या विजेच्या प्रकाशानें रुप्याच्या तारांप्रमाणें दिसत आहेत.

२ **होतां विद्युल्लतेचें स्फुरण इ०-अर्थ**-वीज चमकतांना त्या ( धारा ) क्षणोक्षणीं दिसतात व नाहींतशा होतात, आह्मी असें समजतों (असें वाटतें) कीं, त्या धारा नव्हत, तर त्या आकाशरूपी वस्त्राच्या जीर्ण झालेल्या ( जुन्या झालेल्या ) दशा खालीं गळून पडत आहेत.

३ **कांहीं हंस मयूर काक बकसे इ०-अन्वय**-वातें घन नभीं हालवितां कांहीं (ढग) हंसमयूरकाकबकसे वेगें उडों पाहती, कांहीं कांसव नक्र मीन सुसरी ( असे ) पाण्यामध्यें पोंहती, कांहीं पर्वत-वृक्ष-तुंग शिखर प्रासादसे दीसती, असे नानाकृती शोभती.

**अर्थ**-जेव्हां वारा ढगांना हालवितो तेव्हां त्यांना नानाप्रकारचे आकार येऊन, त्यांतील कांहीं ढग हंस, मोर, कावळे यांसारखे वेगानें उडूं पाहत आहेत असे दिसतात; कांहीं ढग कांसवें, नक्र, मासे, सुसरी यांसारखे पाण्यांत पोहत आहेत असे दिसतात; आणि कांहीं ढग डोंगर, झाडें, मोठमोठाल्या हवेल्या यांसारखे दिसत आहेत.

४ **होऊनि शैलशिखरावरि इ०-अन्वय**-हे घन शैलशिखरावरि लंबमान होउनि दुंदुभिच्या समान गर्जतात, शिखि ( तो ) शब्द ऐकोनि पक्षपातें उडती, ते मणिमयव्यजनें नभातें वीजती.

**अर्थ**-हे ढग जेव्हां पर्वतांच्या शिखरांवर लोंबून नगाऱ्याप्रमाणें शब्द करितात, तेव्हां मोर तो त्यांचा शब्द ऐकून पंखांच्या झपाट्यानें उडतात आणि ते आपल्या पंखरूपी रत्नजडित पंख्यानें आकाशाला वारा घालताहेत असें दिसतें.

**५ पवनांचि जवन तुरग ज्या इ०-अन्वय**-ज्या पवनांचि जवन तुरग, ज्या ज नमय धाराचि शस्त्रधारा, ज्या स्तनित दुंदुभि-ध्वनि, ज्या विद्युत् पताका शोभे

**अर्थ**-( कवि मेघास राजा कल्पून त्याचें वर्णन करतो. ) ज्या मेघराजाचा वारा हाच वेगवान घोडा, पर्जन्याच्या धारा ह्याच ज्याच्या शस्त्राच्या धारा, गडगडणें हाच ज्याच्या नौबतीचा शब्द व वीज हीच त्याची पताका शोभत होती.

**६ ता म घराज नेतो इ०-अन्वय**-जसा राजा अवल शत्रूचा करभार स्व-नगरीं नेतो, (तसा) तो मेघराज चंद्राचा कर-समूह हरुनि नभीं नेतो.

**अर्थ**-जसा राजा निर्बल शत्रूपासून खंडणी घेऊन आपल्या नगरास नेतो, तसा तो मेघराजा चंद्रापासून किरणसमुदायरूपी खंडणी घेऊन आकाशांत नेतो ( ढग आले असतां चांदणें न दिसें होतें ).

**७ विजेच्या चापल्यें इ०-अन्वय**-जैसे महार्णव ते उदधि अभ्यंतरिं खवळले, ( तैसे ) घन विजेच्या चापल्यें क्षुभित नीलाभ वळले, तिहीं गंधोद्दामा हरिततृणसस्यांकुरवती वसुमती धाराशरशतविदीर्णा केली, पहा.

**अर्थ**-तुफान वाऱ्याच्या योगानें जसे समुद्र आंतून खवळतात, तसे मेघ विजेच्या वारंवार लवण्यानें रागावून निळ्या रंगाचे झाले आहेत. त्यांनीं ( मेघांनीं ) जिला सुगंध अतिशय आहे व जिच्यावर गवताचे व धान्याचे हिरवेचार असे अंकुर आले आहेत अशा पृथ्वीस आपल्या पावसाच्या धारारूप बाणांनीं फाडून चिंध्या केल्या आहेत, पहा.

**८ मोरांनीं बहु आदरें करुनि जो इ०-अन्वय**-जो मोरांनीं बहु आदरें करुनि ये,ये, असा वाहिला, जो बळाकततिनें वेगें जाउनि सोत्कंठ आलिंगिला, जो हंसांनीं निजपंकजें त्यजुनियां त्रासानि पाहिला, तो हा मेघ नीलांबरें दिशांस झांकित नभीं राहिला

**अर्थ**-ज्याला मोरांनीं मोठ्या प्रेमानें ये, ये, असें करून बोलाविलें, ज्याला बगळ्यांचा थवा मोठ्या वेगानें जाऊन मनःपूर्वक भेटला, व ज्याकडे हंसांनीं आपलीं कमळें सोडून त्रासानें पाहिलें, तो हा मेघ आपल्या काळ्या वस्त्रानें सर्व दिशांस झांकून ( जिकडे तिकडे अंधेर पाडून ) आकाशांत राहिला आहे.

**९ उतरे चढेहि वर्षे इ०-अन्वय**-उतरे, चढेहि, वर्षे, गर्जे, घनांधकारातें पाडी; मेघ प्राप्तनवश्रीपुरुषापरि अनेक रूपांतें धरी.

**अर्थ**-नवीनच श्रीमान् झालेल्या मनुष्याप्रमाणें हा मेघराजहि खालीं उतरत आहे, वर चढत आहे, गर्जना करित आहे, वृष्टि करित आहे, व अतिशय अंधकारही पाडित आहे. ( तात्पर्य ) नानाप्रकारचीं रूपें धरित आहे.

**१० विद्युज्जिव्हा लांबवोनि इ०-अर्थ**-वीज हीच आपली जीभ

ती लांव करून, इंद्रधनुष्य हाच आपला हात तो वर करून व मेघ हीच हनुवटी ती खालीं करून, आकाश ( हा पुरुष ) जांभई देत आहे.

**११ वाटे विजांनीं जळतेंच इ०-अर्थ**-विजा चमकतात तेव्हां तें आकाश जळत आहे कीं काय? पावसाच्या धारा लागतात तेव्हां तें आकाश खालीं गळून पडतें आहे कीं काय? उडणाऱ्या बगळ्यांच्या पंक्तीकडे पाहिलें असतां तें ( आकाश ) हंसतें आहे कीं काय? व वाऱ्याच्या सोसाट्याकडे लक्ष दिलें तर तें ( आकाश ) श्वास टाकित आहे कीं काय? असें वाटतें.

**१. नद्यांला महावृष्टीनें पूर आले इ०-अन्वय**-नद्यांला महावृष्टिनें पूर आले, ते सर्वही नदीमार्ग बंद झाले, कर्दमाचा पसारा वहू मातला, सारा लोक मार्ग चालवया भितो.

**अर्थ**-पाऊस पडल्यामुळें नद्यांना पूर आले आहेत, त्यांतून जाण्याचे रस्ते बंद पडले आहेत, जिकडे तिकडे अति चिखल झाला आहे, त्यामुळें सर्व लोक रस्त्यांतून जाण्यास भीत आहेत.

## वामनी स्फुट श्लोक ( पृ० १०९ ).

भर्तृहरि ह्मणून एक राजा होता, त्यानें 'नीति,' 'वैराग्य' आणि 'शृंगार' यांवर तीन शतकें लिहिलीं. त्यांचें वामनानें पद्यात्मक भाषांतर केलें आहे. त्यांपकीं कांहीं निवडक श्लोक एथें दिले आहेत. वामन हा शके १५९५ त निवर्तला. याच्या जन्मकाळाचा बरोबर शोध लागत नाहीं.

**१. विपत्काळीं धैर्य इ०-अर्थ**-विपत्ति आली असतां धैर्य, मोठें ऐश्वर्य आलें असतां उत्तम क्षमाशीलता, सभेमध्यें मोठी विद्वत्ता, युद्धांत शौर्य, कीर्ति मिळविण्याची अत्यंत आवड व विद्या संपादण्याचें व्यसन, हे सहा गुण जे थोर त्यांच्या अंगीं स्वभावतांच असतात.

**२. वानोत निंदोत सुनीतिमंत इ०-अन्वय**-सुनीतिमंत वानोत, निंदोत; कमला गृहांत असो वा चलो; हो, मृत्यु आजीच घडो, युगांतीं घडो; भले सन्मार्ग टाकूनि न जाती.

**अर्थ**-सुज्ञ लोक स्तुति करोत किंवा निंदा करोत; घरांत संपत्ति असो अगर जावो; मृत्यु आज येवो किंवा कालांतरानें येवो; साधु ( सज्जन ) लोक चांगला मार्ग टाकून वाईट मार्ग कधीं धरित नाहींत.

**३. न चोराला लाधे इ०-अन्वय**-( जें ) चोराला न लाधे; ( जें ) प्रगट न दिसे; ( जें ) सदा सुख दे, ( जें ) देता दुणावे कीं; ( जें ) कदा किमपि लेशहि न सरे; ( जें ) कल्पांतीं निधन न पावे, असें विद्याभिध धन ज्याचें असे त्याशीं जे प्रतिभटति ( ते ) पामर पिसे.

**अर्थ**-जें चोराला मिळत नाहीं; जें प्रत्यक्ष दिसत नाहीं; जें सदा सुख देतें; जें दुसऱ्यास दिलें तर दुप्पट होतें; त्यांतील एकहि अंश कधीं नाहींसा होत नाहीं; प्रलयकाळींहि ज्याचा नाश होत नाहीं, असें जें वि-

थानामक धन तें ज्यापाशीं आहे त्याबरोबर जे स्पर्धा करितात ते नीच व मूर्ख होत.

४. जे कां ज्ञानें इ०–अन्वय–जे ज्ञानें सद्विचारा लाधले कां, त्यां-पुढें संपत्तीचा तोरा काय, ह्मणे, जो पद्माचा तंतु तो वारणाला वाराया-ला सिद्ध झाला पैं.

अर्थ–ज्यांना ज्ञानाच्या योगानें चांगला विचार प्राप्त झाला त्यांच्या पुढें संपत्तीची काय कथा? कमलाचा बारीक तंतु हत्तींना बांधायला तयार झाला ह्मणून कांहीं उपयोग होणार आहे काय? ( कमलाच्या बारीक तंतूनें हत्ती कधींहि बांधला जाणर नाहीं. त्याप्रमाणें साधू हा संपत्तीच्या योगानें मायापाशांत कधींहि सांपडणार नाहीं. )

५. सुनीतिपथ सेवणें इ०–अन्वय–ज्याला सुनीतिपथ सेवणें ( माने ); मलिन कर्म मानेचना; ( ज्याला ) मरण घडो, ( परि ) खलजनाप्रति प्रार्थना नावडे; जो विपत्तिसमयींहि दीनता प्रगटवीच ना, असें असिव्रत भल्याविण कोणता करूं शके.

अर्थ–चांगल्या मार्गानें चालणें; निंद्य कर्म करण्याचा तिटकार असणें; प्राण गेला तर जावो, परंतु नीच मनुष्याजवळ याचना नच करणें; अवघड प्रसंग आला असतांहि दैन्य न दाखविणें; असें तरवारीच्या धारेसारखें तीक्ष्णव्रत सज्जनाशिवाय कोणास करवेल.

६. जो तोषवी इ०–अन्वय–जो स्वजनकास तोषवी तोच सुपुत्र; जें पतिस सुख दे तेंच कलत्र; जो सुखदुःखपणीं एकरूप तोच गडी; हा लाभ पूर्वसुकृताविण होतो काय?

अर्थ–आपल्या बापास जो संतुष्ट करितो तोच उत्तम पुत्र; नवऱ्याला सुख देते तीच स्त्री; सुखदुःखाच्या प्रसंगीं जो सारखा उपयोगी पडतो तोच स्नेही; हीं तीन ( उत्तम पुत्र, स्त्री व स्नेही ) पूर्व पुण्याई-शिवाय प्राप्त होतात का.

७. विद्यासमन्वितहि दुष्ट परित्यजावा इ०–अन्वय–दुष्ट विद्यासमन्वितहि परित्यजावा, वुधें त्याशीं सहवास कधीं न करावा. ज्याच्या उत्तमांगीं विमल मणिहि असे तो अंतरीं खल सर्प न डसे काय?

अर्थ–दुष्ट मनुष्य महाविद्वान् असला तरी त्याशीं शहाण्यानें सहवास कधीं करूं नये, व त्याजबरोबर कधीं मैत्री करूं नये. डोक्यावर शुद्ध व उत्कृष्ट रत्न असतें ह्मणून तो मनाचा दुष्ट साप डसण्याचें सो-डील काय?

मलिन रुधिरमांसा इ०–अन्वय–मलिन व रुधिरमांसावेगळें हाड दैवें अवचट मिळतां श्वान संतोष पावे. क्षुधितहि गजहंता जंबुकातें न मारी, क्षुद्रता आणि थोरी अवसरिं समजावी.

अर्थ–मळलेलें व ज्याला रक्त किंवा मांस राहिलेलें नाहीं असें हाडूक कुत्र्याला दैवयोगानें अकस्मात् सांपडलें तर त्यास आनंद होतो. हत्तींना मारणाऱ्या सिंहाला भूक लागली तरी तो कोल्ह्याला

मारित नाहीं. ( सारांश ) मोठेपणाची व नीचपणाची पारख प्रसंगाशि-वाय होत नाहीं.

९ योजी हिताप्रति निवारुनि इ०-अन्वय—जो पापकर्मे नि-वारुनि हिताप्रति योजी; ( जो ) कुकर्मे झांकुनियां वरेच गुण वर्णी; जो आपणास असतां दे; ( जो ) व्यसनीं त्यजीना; असें सन्मित्रलक्षण वद-तात ( हें ) जाणा.

अर्थ—जो वाईट मार्गापासून मन वळवून चांगल्या मार्गास लावितो, अवगुण न सांगतां गुणांचें मात्र वर्णन करितो, जो संपत्ति असल्यास दुसऱ्याला देतो, जो कोणी संकटांत सांपडलेल्या मनुष्यास संकटांत टाकि-त नाहीं, त्याचें संकट दूर करण्यास साह्य करितो, असें खऱ्या मित्राचें लक्षण आहे असें सांगतात.

१० तोयाचें परि नावही न इ०-अन्वय-संतप्त-लोहावरी तोयाचें नांवही न उरतें, परि तें नलिनीदलावरि सन्मौक्तिकाचेपरी भासे, पहा; तें स्वातीस्तव अब्धि-शुक्ति-पुटकीं नेटकें मोतीं घडे, उत्तम-मध्यमाधम दशा संसर्गयोगें टिके, ( असें ) जाणा.

अर्थ—तापलेल्या लोखंडावर पाणी टाकलें असतां त्याचें नांवहि रहात नाहीं, परंतु तेंच कमळाच्या पानावर मोत्याप्रमाणें शोभतें. तेंच स्वातीनक्षत्राचें पाणी समुद्रांतील शिंपल्यांत पडलें असतां त्याचें उत्तम मोतीं बनतें. सारांश कनिष्ठ, मध्यम व उत्तम या अवस्था संगतीनें प्राप्त होतात.

११ पुष्पापरी दों परिचीच इ०-अन्वय-जे संभावित तयांची वृत्ति हे पुष्पापरी दो परिचीच साची ( असते ); एक ( पर ) लोकांचिये शिरीं असावें, एक ( पर ) वनींच सुकोनि जावें कां.

अर्थ—संभावित लोकांची वागण्याची रीति ही फुलांप्रमाणेंच दोन प्रकारची असते. एक शिरोभूषण व्हावें ( सर्वांत अग्रगण्य व्हावें ), किंवा अरण्यांत सुकून जावें ( एकीकडे अलग राहून कालक्रमणा करावी).

१२ भाग्याला सुजनत्व भूषण इ०-अन्वय-भाग्याला सुजनत्व भूषण असे, शौर्यास तें मौन कीं, ज्ञानाला शम, त्या श्रुतास विनय, द्र-व्यास जें दातृत्व, तपा अक्रोधत्व, प्रभुपणा क्षमा, धर्मास निर्दंभता, या सर्वांसहि मुख्य भूषण तत्वतां सच्छील हें, पहा.

अर्थ—भरभराटींत सज्जनपणा हेंच भूषण, पराक्रमाला उगीच बसणें ( व्यर्थ वडवड न करणें ) हेंच भूषण, विद्वत्तेला शांति असणें हेंच भूषण, ब्रह्मज्ञानाला नम्रपणा असणें, द्रव्याला ज्ञान हें भूषण, राग नसणें हें तपाचें भूषण, दया हें मोठेपणाचें भूषण, दांभिकपणा नसणें हें धर्माचें भूषण आहे, परंतु या सर्वांपेक्षांहि चांगला स्वभाव असणें, हें खरोखर मोठें भूषण होय.

१३ हे तों सत्पुरुष इ०-अन्वय-जे स्वकार्य त्यजिती, अन्यार्थही साधिती, हे तों सत्पुरुष, जे निजार्थ करनी अन्यार्थ संपादिती हे तों म-

ध्यम, जे स्वकार्याविषयीं अन्यार्थ विध्वंसिती हे तों राक्षस, जे क परार्थहानि व्यर्थ करिती ते दुर्मति कीं कोण ( न जाणें. )

**अर्थ**–आपलें कार्य न करितां दुसऱ्याचें कल्याण करणारे ते तर सत्पुरुष होत ; आपलें हित साधून दुसऱ्याचें हित करणारे ते अधम प्रतीचे लोक होत ; आपलें हित साधण्याकरितां जे दुसऱ्याची हानि करतात ते राक्षस होत; परतु आपलें हित नसतां जे दुसऱ्याचा नाश व्यर्थ करितात त्या दुष्टांस दुर्बुद्धि ह्मणावें किंवा काय नांव द्यावें हें कळत नाहीं.

**१४ श्रुतींच कीं श्रोत्र इ०–अन्वय**–श्रोत्र श्रुतेंचि साजे कीं, कुंडलानें न ; पाणि दानेंच साजे कीं, कंकणानें न ; तसा हा देहहि चंदनानें न साजे, आनें न साजे , परोपकारेंचि साजे.

अर्थ–कान बहुश्रुतपणानें ( अनेक विषय ऐकल्यानें ) जसा शोभतो, तसा कर्णभूषणानें शोभत नाहीं. हात धर्म करण्यानें जसा शोभतो तसा कंकणानें शोभत नाहीं. हा देह चंदनाची उटी लावल्यानें किंवा दुसऱ्या कशानें शोभत नाहीं, परोपकारानेंच शोभतो.

**१५ तें श्वान एक तुकड्यास्तव इ०–अन्वय**–तें श्वान जठरार्थ एक तुकड्यास्तव धन्यास नानाचार कसें दावी, पहाना ; जरि हास्तिप, बाप, भाई, आळवूनि घास दे ( तरी ) गजराज घेतोचि, कशी नवाई पहाना.

**अर्थ**–पोटाला एक तुकडा मिळावा ह्मणून तें कुत्रें कसें नानाप्रकारचे चार करितें तें पहा बरें ! दादा बाबा करून जेव्हां महा . विनवितो व घास देतो तेव्हांच तो हत्ती घास घेतो. यावरून थोरपणाचें लक्षण कसें आहे पहा.

**१६ प्रजा हाच वत्स इ० अर्थ**–अरे राजा, पृथ्वी हीच कोणी गाय ; या गायीचें प्रजा हेंच कोणी वासरूं, त्याचा चांगला संभाळ कर, ह्मणजे ही पृथ्वीरूप गांय आपल्या वासराच्या ममतेनें इच्छिलेलें फळ तत्काल देईल.

**१७ आरंभीं जे फार इ० अन्वय**–( जशी ) पूर्वार्धा दिनाची छाया आरंभीं फार, शेखीं कांहीं न, तेशी दुर्जनाची मैत्री ( असते ); ( जशी ) परार्धाची छाया जे आधीं थोडी, क्रमें फार, पाहीं, ( तैशी ) भल्याची मैत्री ( असते ).

**अर्थ**–दुपारापूर्वीची छाया जशी आरंभीं पुष्कळ व शेवटीं ( ऐन दोन प्रहरीं ) अगदीं नसते, तशी दुर्जनाची मैत्री असते. दुपारानंतरची छाया जसी प्रथम थोडी व पुढें वाढत जाते, तशी भल्या मनुष्याची मैत्री असते, पहा.

**१८ दे दान गुप्त इ०–अर्थ**–कोणाला न कळत दान देणें, दुसऱ्यावर उपकार करून मीं केला असें न बोलणें, योग्य गृहस्थ आपल्या घरीं आले असतां आनंद मानणें, संपत्तीचा गर्व न दाखविणें, दुसऱ्याचे गुण घेणें, असें हें तरवारीच्या धारेप्रमाणें कडक व्रत सज्जनाचें असतें ( तोच तें करूं शकतो ).

**१९ कीं तोडिला तरु फुटे इ०–अर्थ**–तोडिलेला वृक्ष पुनः जो

रानें वाढतो आणि कलाहीन झालेला चंद्र क्रमाक्रमानें वृद्धि पावतो, ह्मणून सज्जन लोक ज्यास निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे त्याचा कधींहि उपहास करित नाहींत.

**२० आली जरी कष्टदशा इ०-अर्थ**-कशीहि विपत्ति आली असतां थोर लोक आपलें धैर्य सोडित नाहींत. जळती मशाल वळेंच जरी खालीं वांकवली तरी तिच्या ज्वाळा खालीं न जातां वरच येतात.

## अन्योक्ति (पृ० १०९).

१ **वसंतसमयीं फुलें इ०-अन्वय**-जो वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि, जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्तीं थिजो, तया आम्रवृक्षा किती विहग सतत सेविती. परी एकला पिकचि मधुर वाणी लावे (ह्मणून तो) कृती होय.

**अर्थ**-वसंत ऋतूंत ज्याला फुलें येतात, ज्याच्या सुगंधानें सर्व दिशा भरून जातात, ज्याला पाहून कल्पवृक्ष सुद्धां मनांत लाजतो, अशा आंब्याच्या झाडाचा उपयोग किती पक्ष्यांना निरंतर होतो बरें. परंतु त्यांत एकट्या कोकिळालाच मधुर शब्द फुटतो ह्मणून तो धन्य होय.

**तात्पर्य**-एखाद्याला वैभव आलें असतां शेंकडों लोकांस सुख प्राप्त होतें; परंतु त्यांत एकादाच लौकिकास चढतो. उदाहरणार्थ जसा कोकीळ.

**२ कां वा सुस्वर इ०-अन्वय**-वा पिका, सुस्वर शब्द कां काढिशी ? उगा राहे, (सध्यां) तीव्र हिमें पानें वाळोनि झाडें जळाल्यापरि दीसती (आणि) त्यांवरी काकावली थोर कर्कश शब्द करूनी गर्जे, (ह्मणून) हा काळ लोटे तों कोठें तरीही तरुकोटरीं लपुनियां रहा.

**अर्थ**-अरे कोकिळा, मधुर शब्द कां काढितोस, उगीच रहा, सध्यां थंडीच्या कडाक्यानें पानें गळून जाऊन झाडें जळाल्यासारखीं दिसताहेत व त्यांवर कावळ्यांचा थवा अति कर्कश शब्द काढून ओरडत आहे, तर हा काळ जाई तोंपर्यंत कोठें तरी झाडाच्या ढोलींत लपून रहा.

**तात्पर्य**-योग्य वेळ आल्याखेरीज गुणाची चहा होत नसते.

**३ नवीं पद्में जेथें इ०-अन्वय**-जेथें नवीं पद्में विकसुनी सुगंध विखरती ऐशीं तळीं तोयें सतत भरलीं फार असती, तरी चातक पर्जन्याचे जलकणाचि कां पितो ? मातें गमे (कीं), मानी शिर नमविण्या लाज धरितो.

**अर्थ**-ज्यांत ताजीं कमळें फुलून चहूंकडे वास सोडित आहेत अशीं पुष्कळ तळीं सर्वकाळ पाण्यानें भरपूर भरलेलीं असतां चातकपक्षी पावसाचेच कण कां बरें पितो ? तर मला असें वाटतें कीं, त्या अभिमानी पक्ष्याला मान खालीं करण्यास लाज वाटते.

**तात्पर्य**-अभिमानी पुरुष होतां होईल तोंपर्यंत नम्र होत नाहींत.

**४ झाडें पेटुनि इ०-अन्वय**-झाडें पेटुनि कडकडां वाजती त्यांचा

ध्वनि होतसे; या ज्वाला राहुनि राहुनी उठति, ही विद्युल्लता नसे; नभीं बहु काळा धूर पसरला, हा खरा मेघ नोहे; हा दवानल असे, वर्षाकाळ न (असे); मोरा घरा पळें रें.

अर्थ–झाडें पेटल्यामुळें हा कडकड आवाज होत आहे; मधून मधून जाळ होत आहे, ती कांहीं वीज नाहीं; आकाशांत हा फार काळा धूर पसरला आहे, ते कांहीं खरे ढग नाहींत; (सारांश) हा वणवा पेटला आहे, पावसाळा नाहीं, याकरितां मोरा तूं आपल्या घरीं पळून जा कसा.

तात्पर्य–उतावळा मनुष्य खरी स्थिति न जाणून मनांतील गोष्ट होत आहे असें समजून फसतो. ह्मणून कोणतेंहि काम करितांना सावध असावें.

**५ फळें मधुर खावया** इ०–अन्वय–(जरी त्याला) खावया मधुर फळें नित्य असाति, तसे मेवे (असाति), तो हिरेजडित सुंदरीं कनकपंजरींहि वसे; तथापि तो शुक दुःखें मनांत अहर्निश झुरे, (आणि) स्वतंत्र वनवृत्तिच्या सुखातें घडिघडी स्मरे.

अर्थ–जरी त्याला रोज खावयास गोड गोड फळें व निरानिराळे मिष्ट पदार्थ असतात, जरी तो हिरेजडित सोन्याच्या पिंजऱ्यांत रहातो, तरी राघू हा आपलें रानांतील स्वतंत्रपणानें राहण्याचें सुख घटकोंघटकीं आठवून मनांत झुरत असतो.

तात्पर्य–परतंत्रतेंत कितीहि सुखें असलीं तरी तीं स्वतंत्रतेच्या सुखापेक्षां कमी समजलीं पाहिजेत.

**६ मेघांच्या गर्जनेनें खवळुनि** इ०–अन्वय–सिंह मेघांच्या गर्जनेनें खवळनि स्वभावें वरतीं पाही, काका, त्वां सारी भीति त्यजुनि तरुवरि मांसखंडास खावें, जो उन्मत्ता गजांच्या मस्तकांतें खरतर नखरीं फोडुनि, रक्त पिऊनि धाला, तो मृत–पशूंच्या कणांतें नच इच्छितो.

अर्थ—सिंह मेघाची गर्जना ऐकून आपल्या स्वभावाप्रमाणें (मोठ्या लोकांना दुसऱ्याचें वर्चस्व सहन होत नसतें) वर पहात आहे. अरे कावळ्या, तूं भिऊं नको, झाडावर बसून तूं मांसकण खुशाल खा. कारण माजलेल्या हत्तींचीं गंडस्थळें आपल्या तीक्ष्ण नखानीं फोडून त्यांतील रक्त पिऊन तृप्त झालेला सिंह मेलेल्या पशूंच्या मांसकणांची इच्छा करणार नांहीं. तसेंच श्रीमान हलकटाची वस्तु घेण्यास कधीं इछित नसतो.

तात्पर्य—हलकट मनुष्य दुसऱ्याची योग्यता न जाणून मनांत समजतो कीं तो आपलेंच ध्यावयास पाहत आहे.

**७ कृतींचीं आयाळें जडवुनि** इ०–अन्वय–श्वा, कृतीचीं आयाळें जडवुनि, गळा पुष्ट करुनी, सिंहाच्या पदीं बहुत आवेश धरुनी वसे; तरी जो (ध्वनि) ऐकोनी मत्तहि करी भिउनि पळती त्या नादातें तो पामर क्षणभरिहि कसा करी.

अर्थ–खोटीं आयाळें (मानेवरचे केस) लावून, मान मोठी करून, व सिंहाचें रूप घेऊन कुत्रें मोठ्या आवेशानें बसलें तरी, जो शब्द ऐकून मा-

जलेले हत्तीहि भिऊन पळतात, ती गर्जना क्षणभर तरी त्यास करितां येईल काय?

**तात्पर्य**-वेषाप्रमाणें वतावणी करितां आली नाहीं तर फार फजिती होते.

**८ ज्याची स्पर्धा कराया इ०-अर्थ**-ज्याची बरोबरी दुसऱ्या कोणत्याहि हत्तीनें केली नाहीं, विशेष काय सांगूं? ज्याला भिऊन सिंहहि रान सोडून गेले आहेत; तो हत्ती आज चिखलांत रुतल्यामुळें व त्यास त्यांतून निघण्याची युक्ति न सुचल्यामुळें नीच कोल्हीं सुद्धां कलकलाट करून त्याचा उपमर्द करित आहेत.

**तात्पर्य**-थोर मनुष्य पेंचांत सांपडला असतां त्याची स्थिति अति दुःसह होते.

**९ ज्याचे पल्लव मंगळप्रद इ०-अन्वय**-ज्याचे पल्लव मंगळप्रद, जयाची छाया शिणा हरी, ज्याचीं फुलें गंधें युक्त ( असती ), फळेंहि सुधेच्या परी असती; जो भला वनश्रीचे उर्वीवें रमणीय भूषण वाटे, त्या आम्रा पिक सेवितां समसमा संयाग झाला कीं.

**अर्थ**-ज्यांचीं पानें कल्याणकारक ( शुभकार्यास अंब्याच्या डहाळ्या लागतात ), सावली श्रम दूर करणारी, ज्याच्या फुलांना मधुर वास, ज्याचीं फळेंहि अमृतासारखीं गोड, जो अरण्यांतील शोभेचं सुंदर व उत्तम भूषण, अशा अंब्याच्या झाडावर कोकिळ बसला असतां, मला वाटतें, सारख्या सारख्यांचा योग जुळून आला असें समजावें.

**तात्पर्य**-सारख्या सारख्यांच्या गांठीचें महत्त्व मोठें.

**१० देखून उदया तुझ्या इ०-अन्वय**-भास्करा, तुझ्या उदया देखूनी द्विजकुळें अती हर्षुनी गाती, शार्दूलादिक सर्व दुष्ट गिर्यंतरीं जाऊनी दडती, परी ( तूं ) जसा वरिवरि नभीं येशी ( तसा ) ताप देशी. थोरही अत्युच्चीं पदिं विघडतो हा बाल खरा आहे.

**अर्थ**-अरे सूर्या, तूं उदय पावलास म्हणजे पक्ष्यांचे समुदाय फार आनंदित होऊन गाऊं लागतात आणि व्याघ्र वगैरे सर्व दुष्ट पशु पर्वताच्या गुहेंत जाऊन लपतात. परंत तूं आकाशांत जसा जसा वर येतोस तसा तसा ( लोकांना ) फार ताप देतास ( तुझें ऊन्ह असह्य होतें ). थोर पुरुषहि फार मोठ्या पदास पावला असतां बिघडतो म्हणून जें म्हणतात तें यावरून खरें होतें.

**११ पानांमाजीं तरूंच्या इ०—अन्वय**-राजहंसा ( जंवरी ) हे वर्षर्तुचे दिवस जाती, तंववरी तरूंच्या पानांमाजी, कुठें कसाहि लपुनि बस, सर्व कष्टांस साहीं. शारदश्री येऊनी पद्मवृंदें पुनरपि फुलतां तयांचा भोक्ता तुजविण दुसरा कुणीहि नाहीं, हा नेम साचा जाण.

**अर्थ**-अरे राजहंसा, हे पावसाळ्याचे दिवस जात तोंपर्यंत झाडाच्या पानांत कोठें तरी व कसा तरी लपून बस आणि सर्व दुःख सोस. शरदृतूची शोभा येऊन पुनः कमळें फुलूं लागलीं म्हणजे त्यांचा उपयोग करणार तुजवांचून दुसरा कोणी नाहीं, ही गोष्ट पक्की समज.

**तात्पर्य**–योग्य वेळ येईपर्यंत हाल सर्वांनीं सोसून दिवस लोटले पाहिजेत.

**१२ ज्याच्या तीरीं समंतात् इ० अन्वय**–ज्याच्या तीरीं समंतात् मधुर फळ–भरें वृक्ष भारी वांकले, ज्यामाजी पद्मखंडें फुलुनि चित्तापहारी गंध विखरती, त्या मानसातें त्यजुनि जेणें पंकिला पल्वलातें वरियलें, त्या हंसाच्या मस्तकीं बकांनीं जरि पद दिधलें (तरि) त्यांतें योग्य.

**अर्थ**–ज्याच्या कांठावर सभोंवतीं गोड फळांच्या भरानें झाडें फार लवली आहेत, व ज्यांतील कमळें फुलून त्यांचा मनोहर सुवास पसरला आहे, अशा **मानस** सरोवरास सोडून ज्यानें चिखलट डवकें पतकारिलें, त्या हंसाच्या डोक्यावर जर बगळे पाय देऊं लागले, तर तें योग्यच आहे. हंसाला त्याच्या नीचपणाबद्दल तीच शिक्षा योग्य आहे.

**तात्पर्य**–कोणी मनुष्य आपली योग्यता टाकून नीच कर्म करूं लागला आणि त्यांत त्याची अप्रतिष्ठा झाली तर त्याबद्दल दोष कोणास देतां येत नाहीं.

## हंसकाकीय कथानक (पृ० १४०).

भारती युद्धांतील भीष्म आणि द्रोण हे मोठे योद्धे मरण पावल्यानंतर राजा दुर्योधनानें आपल्या सैन्याचें आधिपत्य अंगदेशचा राजा कर्ण यास दिलें. कर्ण हा अर्जुनाप्रमाणेंच धनुर्विद्येंत निपुण होता, परंतु अर्जुनाचा सारथी भगवान् कृष्ण हा जसा रथ हांकण्यांत कुशल होता त्याप्रमाणे आपणास सारथी मिळाला असतां आपण पांडवांस सहज जिंकून टाकूं, हें मनांत आणून कर्णानें मद्रदेशाचा राजा शल्य यास माझें सारथ्य करावयास सांग अशी दुर्योधनास विनंति केली. सारथ्य करण्याच्या कामांत शल्य हा कृष्णाच्या बरोबरीचा होता. नाहीं, होय, ह्मणतां ह्मणतां, शल्यानें सरतेशेवटीं सारथ्य करण्याचें कबूल केलें, परंतु मी जें जें भाषण बोलेन तें कर्णान निमूटपणे सहन केलें पाहिजे, अशी त्यानें त्याजपासून भाक घेवविली. पुढें युद्धप्रसंगाचे वेळीं शल्य कर्णाची निर्भर्त्सना करून त्याचा उत्साहभंग करूं लागला, परंतु तें कर्णास सर्व सहन करावें लागलें. याच समयीं शल्यानें ही 'हंस व कावळा' यांची गोष्ट सांगितली आहे. यांत सत्पुरुषाशीं मत्सर न करितां चांगल्या मार्गानें वर्तन करावें हें सांगितलें आहे, अशी महाभारतांत कथा आहे. मोरोपंतानें भारतांतील १८ पर्वांचें पद्यात्मक भाषांतर केलें आहे; त्यांतील कर्णपर्वांतील हें आख्यान आहे. मोरोपंत हा शके १६५१ त जन्मला व शके १७१६ त निवर्तला.

**कथेचा सारांश**–कोणी एक कावळा एका वाण्याच्या मुलांनीं चारलेल्या उष्ट्या अन्नावर पोसला होता. तो सदा इतर पक्ष्यांबरोबर भांडत असे. एके दिवशीं त्या ठिकाणीं कांहीं राजहंस आले होते. तो उन्मत्त कावळा त्यांतील श्रेष्ठास बोलला कीं आपण दोघे आकाशांत उडून कोण उंच उडतो तें पाहूं. त्याचें तें गर्वाचें भाषण ऐकून हंसानें

उडण्याचें कबूल केलें व थोडक्याच वेळांत तो त्याचा गर्व नाहींसा केला.

**१ स्पर्धा साधु जनाशीं इ०–अन्वय**–( तूं ) मदें आत्मशक्ति नेणोनि साधु जनाशीं स्पर्धा लाविसि; तुज नीचासि गुरुचीं पथ्य तथ्य वचनें श्रमदें भासतीं.

**अर्थ**–( शल्य म्हणतो कर्णा ), तूं गर्वानें आपली शक्ति न जाणून सज्जनांबरोबर स्पर्धा करितोस, व तुला नीचाला श्रेष्ठ लोकांचीं हितकर व खरीं भाषणें त्रासदायक वाटतात.

**२ दृष्टांत सांगतों तुज इ०–अन्वय**–कर्णा याविषयीं तुज एक दृष्टांत सांगतों, श्रवण नीट दे, जरी कर्णा सुहृदुपदेश वीट दे ( तरी ) मन अटोपूनि धरीं.

**अर्थ**–अरे कर्णा, याविषयीं तुला एक गोष्ट सांगतों, चांगलें लक्ष दे, जरी मित्राचा उपदेश कानाला कठोर लागला तरी मन आंवरून धर.

**३ पूर्वी सागरतीरीं इ० अन्वय**–पूर्वी सागरतीरीं साधुनृपाच्या पुरांत एक धनी, सन्मान्य, वैश्य होतो; ज्याच्या मनीं स्वधर्म नीति नांदे.

**अर्थ**–पूर्वी समुद्रतिरीं साधूनामक राजाच्या नगरांत एक धनवान् व भला असा वैश्य रहात होता. त्याचें मन स्वधर्माकडे व नीतिकडे असे.

**४ त्या धनिका वैश्याचे इ०– अर्थ**–त्या धनिकाला पुष्कळ गुणी मुलगे व नातू होते. त्यांना सर्व दयाळू व साधु ( सज्जन ) लोक आशीर्वाद देऊन त्यांचा मोठा गौरव करित असत.

**५ त्या वैश्य कुमारांचे इ० अन्वय**–एक काक त्या वैश्य कुमारांचें उच्छिष्ट सदा भक्षी, बाळक उदारमतिनें साध्वसदा वाणी कदापि न वदति.

**अर्थ**–एक कावळा त्या वाण्याच्या मुलांचें उष्टें अन्न नेहमीं खात असे. तीं वाण्याचीं मुलें स्वभावानें उदार असल्यामुळें त्या कावळयाला भीति वाटेल असें कधींहि बोलत नसत. ( उष्टें खात असतां त्या कावळयास हांकून देत नसत ).

**६ देतीं वैश्य कुमारक इ०–अर्थ**–वाण्याचीं पोरें देत आणि कावळा मास, भात, शेवया, वडे, मांडे, मध, तूप, खीर खात असे; व इतर पक्ष्यांबरोबर भांडत असे.

**७ सागरतीरीं तेथें इ०–अन्वय**–कदाचित् तेथें सागरतीरीं जे मुक्ताफळ भक्षुनि भोजन करिती, ( आणि ) बिसतंतु भक्षुनि फराळ करिती, ( ते ) मराळ दैवें आले.

**अर्थ**–कोणे एके वेळीं तेथें समुद्रकांठीं, मोतीं खाऊन भोजन करणारे व कमळाचे तंतु खाऊन फराळ करणारे असे हंस सहज आले.

**८ पाहुनि हंसातें बाळ इ०–अन्वय**–ते बाळ हंसातें पाहुनि त्या स्वोच्छिष्टपिंडपुष्टातें सुदुष्टातें म्हणती, विहंगा, तूंचि सर्वखगश्रेष्ठ आहेस.

अर्थ–तीं मुलें हंसांना पाहून आपलें उच्छिष्ट खाऊन पोसलेल्या त्या दुष्ट कावळ्यास ह्मणालीं कीं, अरे पक्ष्या ( कावळ्या ), तूंच सर्व पक्ष्यांत श्रेष्ठ आहेस.

९ ग र्वें मूर्खपणें तो मानी इ०–अन्वय–तो मलीमसाचार गर्वें मूर्खपणें सर्व बाळोक्त साचार मानी; स्तवनें अधिकाचि माजे, विचार न करी.

अर्थ–त्या मुलांचें सर्व ह्मणणें त्या दुराचारी कावळ्यानें गर्वानें व मूर्खपणानें सर्व खरें मानिलें; आणि त्या मुलांच्या स्तुतीनें तर तो विचार न करितां फारच चढला.

१० जाणें त्या हंसांत इ०–अन्वय–तो काक त्या हंसांत (ज्यास) श्रेष्ठ जाणे त्यासि ह्मणे मत्समीप ये, ठाक, दोघे उडों, तुझें बळ पाहोंदे.

अर्थ–त्या हंसांमध्यें ज्याला तो कावळा मोठा समजला त्याला ह्मणाला, मजजवळ ये, उभा रहा; आपण दोघे उडूं, तुझें बळ मला पाहूंदे.

११ ऐसें वायस वदतां इ०–अन्वय–वायस ऐसें वदतां त्या खगापसदा ते हंस हांसति, कीं शुद्धासीं मूर्ख मत्सर करी. ज्यांत सदा ताप पाप ( असे ).

अर्थ–कावळ्याचें तें भाषण ऐकून पक्ष्यांमध्यें नीच अशा कावळ्यास ते हंस हंसूं लागले; कारण सज्जनांशीं मूर्ख मत्सर करितात व त्या योगानें त्यांस दुःख व पाप हीं प्राप्त होतात.

१२ ह्मणती हंस तयातें इ०–अन्वय–हंस तयातें ह्मणती, वायसा गर्वभरें चार करिसी. आह्मी मानसवासी सर्व खगांचेहि राय साचार ( आहोंत ).

अर्थ–हंस त्याला ह्मणतात, अरे कावळ्या, तूं गर्वानें फार चेष्टा करितोस, आह्मी मानसाकडले राहणारे, सर्व पक्ष्यांमध्यें श्रेष्ठ, असे खरोखर आहों.

१३ आह्मीं सुदूरपाती हंस इ०–अन्वय–नीचा, आह्मी हंस सुदूरपाती; खगांमाजी मुख्य खग, क्षीरधि-तीर-विहारी, गगनींच्या नदींत जळकेलि करूं.

अर्थ–अरे नीचा कावळ्या, आह्मी हंस फार दूरवर उडत जाणारे; सर्व पक्ष्यांत श्रेष्ठ; क्षीरसमुद्राच्या कांठीं विहार करणारे, व आकाशगंगेंत कर्मणूक करणारे, असे आहों.

१४ करिसी बरोबरी तूं इ०–अन्वय–वायसापसदा, तूं हंसाची बरोबरी करिसी काय, जो साप सदा गृहांत तो मारिलची, ( तसा ) तुझा मद ( तुला ) घात करितो.

अर्थ–अरे नीच कावळ्या, तूं हंसाची बरोबरी कशी करिशील ? घरांत सर्वकाळ राहिलेला साप डसावयाचाच, तसा हा तुझ्या ( अंतःकरणांतील ) गर्व तुझा नाश करील.

१५ रे बळिपुष्टा दुष्टा इ०–अर्थ–अरे टाकलेलें खाऊन माजलेल्या कावळ्या, हंसाशीं बरोबरीनें तूं कसा उडशील ? जर दांडगाईनें उडशील तर अविचारामुळें तूं मोठ्या संकटांत पडशील.

१६ वायस बहु हंसाच्या इ०–अन्वय–तो गर्वराशि वायस,

हंसाच्या हितवचनाची बहु कुत्सा करूनि त्याशीं पुनरपि हें उत्साहें वदता झाला.

**अर्थ**–तो अति गर्विष्ठ कावळा हंसाच्या हितकर भाषणाची मोठ्या धाडसानें निंदा करून त्यास असें बोलला.

**१७ शतपात जाणतों मी इ०–अर्थ**–मला उडण्याच्या शंभर गति ठाऊक आहेत; एकेका गतीनें मी शंभर गांवांपर्यंत उडेन. मजबरोबर उडतांना दुसऱ्या पक्ष्याच्या पंखांतील सर्व शक्ति नाहींशी होईल.

**१८ उड्डीन एक दुसरें इ०–अर्थ**–पहिलें उड्डीन, दुसरें अवडीन, इत्यादि शंभर उडण्याच्या गति दाखवून मी आपल्या शत्रूस जिंकीन.

**१९ गतिशत दाविन, तुह्मा इ०–अन्वय**–तुह्मा गतिशत दाविन तेव्हां माझें बळ साचें कळेल. पद्म (व) पळसाचें पुष्प दूर समचि, निकटाचि वर्ण निवडे.

**अर्थ**–कमळ व पळसाचें फूल हीं दुरून सारखींच दिसतात, परंतु जवळ आणिलीं असतां रंगावरून त्यांतील भेद कळतो. त्याप्रमाणें मी शंभर उडण्याच्या गति दाखविल्या ह्मणजे तुह्मांस माझ्या आंगचें खरें बळ दिसून येईल.

**२० गगनीं तुह्मांत एका इ०–अर्थ**–तुह्मांपैकीं कोणत्याहि हंसाबरोबर मी वर आकाशांत, आकाशगतीनें उडेन, तुह्मांस जी गति वाटेल ती सांगा अथवा मीच आपल्या शंभर गति दाखवितों.

**२१ हांसोनि एक हंस इ०–अर्थ**–एक हंस हांसून कावळ्यास ह्मणाला तुला शंभर गति माहीत आहेत. अ ह्मा सर्व हंसांना एकच गति ठाऊक आहे. जशा तुला ठाऊक आहेत तशा दुसऱ्या (उडण्याच्या) गति आह्मास ठाऊक नाहींत.

**२२ जाणें एका गतिला इ०–अर्थ**–मला एकच गति ठाऊक आहे व त्याच गतीनें मी आकाशांत उडेन, तुला वाटेल त्या गतीनें तूं ऊड असें हंस कावळ्याला बोलला.

**२३ तों बहु हांसति जे कीं इ०–अन्वय**–तों जे तज्ज्ञाति मिळोनि आले होते, (ते) बहु हांसति ती शतविध गतिहुनि अधिका परि अतज्ज्ञा तुच्छ वाटली कीं.

**अर्थ**–हंसाचें हें (वर सांगितलेलें) भाषण ऐकून त्याचे (कावळ्याचे) जमलेले जातभाई फार हंसूं लागले; खरोखरी हंसाची ती उडण्याची एक गति त्या कावळ्याच्या शंभर प्रकारच्या गतींहून श्रेष्ठ होती; परंतु त्या मूर्खांस ती क्षुल्लक वाटली.

**२४ शतपात पंडिताशीं इ०–अर्थ**–उडण्याच्या शंभर गतींत प्रवीण असा आमचा मित्र व बंधु कावळा याजबरोबर एकच गति जाणणारा हा हंस आकाशांत कसा उडेल?

**२५ एका पातांतचि हा इ०–अर्थ**–हा आमचा स्वजाति कावळा एका उड्डाणांत हंसाला जिंकून टाकितो, असें ह्मणून ते कावळे हंसूं लागल

परंतु सूर्य जसा काजव्यावर दया करितो त्याप्रमाणें (हंसानें) त्यांच्या बोलण्याकडे लक्ष्य दिलें नाहीं.

**२६ हंस उडे, तो त्याशीं इ०**—**अर्थ**—हंस उडाला, त्याबरोबर तो कावळाहि त्याजबरोबर आकाशांत ईर्ष्येनें उडाला आणि त्या पाप्यानें उडण्याच्या शंभर गति दाखविल्या. त्याचे प्रकार किती सांगूं!

**२७ उड्डीनप्रमुखें जीं इ०**—**अन्वय**—त्या पतितें उड्डीनप्रमुखें जीं शतसंख्य पतितें ठाऊक होतीं तीं सारीं हंसप्रवरापुढेंचि दाखविलीं.

**अर्थ**—त्या पाप्यानें उड्डीन (क० १८ पहा) आदिकरून ज्या उडण्याच्या शंभर गति माहीत होत्या त्या सर्व त्या हंसश्रेष्ठास दाखविल्या.

**२८. स्वज्ञातिश्रेष्ठाचें इ०**—**अन्वय**—काकांनीं स्वज्ञातिश्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि, का, का, का, का, अशा स्वहाकांनीं हर्षभरें नभ भरिलें.

**अर्थ**—कावळ्यांनीं आपल्या जातींतील श्रेष्ठ अशा त्या कावळ्याचें उडण्याचें कौशल्य पाहून त्याला का, का, का, का, अशा हाका मारून सर्व आकाश दणाणून टाकलें.

**२९ अप्रिय बोलति पुष्कळ इ०**—**अन्वय**—ते अमंगळ खळ, खगकुलशिरोवतंसातें हंसातें पुष्कळ अप्रिय बोलति, बहु हेळसोनि हांसति, अवमानिती.

**अर्थ**—ते अमंगळ दुष्ट कावळे, पक्ष्याच्या कुळांत श्रेष्ठ अशा हंसाला अतिशय वाईट भाषणें बोलले, त्याची अति निंदा करून हांसले. याप्रमाणें त्याचा धिक्कार केला.

**३०. मृदुपातें हंस उडे इ०**—**अन्वय**—हंस मृदुपातें उडे, काकाहुनि हीनशक्तिसा भासे, तों ऐसें मुहूर्तभरि दावी, तों काकमंडळी हांसे.

**अर्थ**—हंस सावकाश उडत होता, त्यामुळें तो कावळ्यापेक्षां कमी शक्तिवान् आहे असें वाटलें. असें त्यानें दोन घटका चालविलें. तेव्हां ती कावळ्याची मंडळी त्याला (हंसाला) हांसली.

**३१ हंसासि काक ह्मणती इ०**—**अन्वय**—काक हंसासि ह्मणती कीं हा भवज्ज्ञाति हारविलाचि; ती सर्व अवज्ञा त्या मराळोत्तमें दुरूनि आयकिली.

**अर्थ**—ते कावळे हंसास ह्मणूं लागले कीं, तो तुमचा जातभाई हरला (पराजय पावला) ना, अरेरे; ही निंदा त्या हंसश्रेष्ठानें दुरून ऐकिली.

**३२ मग पश्चिम दिग्देशीं इ०**—**अन्वय**—कर्णा, मग हंस जिकडे तो जलधि गंभीर, अपार खोल होता, (तिकडे) पश्चिम दिग्देशीं शीघ्र शिरे मळधी काकही शिरे.

**अर्थ**—कर्णा मग तो हंस जिकडे तो समुद्र ज्याची पलीकडील बाजू दिसत नाहीं असा, खोल व गंभीर होता तिकडे पश्चिमेकडे मोठ्या वेगानें वळला. तिकडे दुष्ट कावळाही वळला.

**३३ मागें धांवे वायस इ०**—**अन्वय**—हंस जसा तीर सोडिला (तसा) पुढें धांवे, काक मागें (धांवे); स्पर्धेंत, काक, तीर केवळ दूर राहिलें कीं नेणें.

**अर्थ**–हंस तीर सोडिल्याप्रमाणें पुढें धांवत होता. कावळा मागून धांवत होता. तीर फार दूर राहिलें हें चढाओढींत कावळयाला कळलें नाहीं.

**३४ पक्षांचें बळ सरलें इ०–अन्वय**–पक्षांचें वळ सरलें, मनींचा गर्व मनांताचि जिरला, काक धाक घे, सर्वत्र सागर निराश्रय दिसे, ( ह्मणून ) विराला.

**अर्थ**–त्या कावळ्याच्या पंखांतील सर्व शक्ति संपली, मनांतला गर्व मनांतच जिरून गेला, जिकडे तिकडे समुद्र पाहून तो कावळा भ्याला व आपणास आतां ( एथें ) थांबावयास आश्रय नाहीं असें पाहून फारच खिन्न झाला.

**३५ न दिसे अग नग इ०–अन्वय**–अंग, नग न दिसे, मग नीच खग गगनीं तग काढील काय ? चित्तीं ह्मणें हा समय मज काळाच्या मुखांत वाढील.

**अर्थ**–आपणास विश्रांतिकरितां वृक्ष किंवा पर्वत कांहींच दिसेना तेव्हां त्या दुष्ट कावळ्याच्यानें आकाशांत मुळींच धीर धरवेना व या समयीं मला मृत्यु प्राप्त होणार असें तो मनांत ह्मणूं लागला.

**३६ जाऊनि दूर आला इ०–अन्वय**–हंस दूर जाऊनि फिरे, ( कावळा ) आला कीं नाहीं असें पाहे; राहे; खळाची उपेक्षा न करी, काळजी वाहे.

**अर्थ**–हंस दूर जाऊन मागें फिरे आणि कावळा आला किंवा नाहीं तें पाही, आला नसल्यास थांवे. त्या मूर्खाकडे दुर्लक्ष्य न करितां तो त्याची काळजी वाहत होता.

**३७ आला हंसापाशीं इ०–अन्वय**–प्रतिक्षण क्षणिशक्ति करटपति हंसापाशीं आला, आतां पडेल असें जाणुनि मकर त्या खावया टपती.

**अर्थ**–प्रत्येक क्षणीं अधिक निःशक्त होत चाललेला तो कावळा हंसाजवळ आला. तो ( कावळा ) आतां खालीं पडेल असें समजून समुद्रांतील मगर त्यास खावयाकारितां टपून राहिले होते.

**३८ अवलोकितां मराळें इ०–अन्वय**–मराळें तो पामर अत्यंतासन्न–पतन अवलोकितां मग मनीं आणिलें कीं यावरि कृपा न करितां ( हा ) मरतो.

**अर्थ**–हंसानें हा नीच कावळा आतां ( समुद्रांत ) पडणार, असें पाहून मनांत आणिलें कीं मीं याचें रक्षण केलें नाहीं तर हा खरोखर मरेल.

**३९ रक्षावाचि उपेक्षा इ०–अन्वय**–संत व्यसनीं अरिचीहि उपेक्षा न करिती, ( अरि ) रक्षावाचि, आंगीं बळ असतां दीन जंतुचा अंत पाहोंचि नये.

**अर्थ**–साधु लोक संकटांत पडलेल्या शत्रूकडेहि दुर्लक्ष्य करित नाहींत. अशा प्रसंगीं शत्रूचें रक्षण करावेंच आंगांत सामर्थ्य असतां गरीब प्राण्याचा अंत पाहूं नये. ( नाश होऊं देऊं नये ).

**४० ऐसें सत्पुरुषव्रत इ०-अन्वय**-ऐसें सत्पुरुषव्रत आठविलें. मग मराळ ह्मणे अगा बहुगतिचतुरा काकखगा, शतप्रतितें कथिलीं, दाविलींहि.

**अर्थ**-हें ( वर सांगितलेलें ) सज्जनांचें व्रत मनांत आणून हंस ह्मणाला अरे उडण्याच्या अनेक गति जाणणाऱ्या कावळ्या, तूं सांगितलेल्या शंभर गति दाखविल्या खऱ्या.

**४१ परि जें निज गुह्य पतित इ०-अन्वय**-( आपण ) नभांत सांगातें दूर उडालों, परस्पर सख्य झालें, परि जें निज गुह्य पतित तें कां गा न सांगशीच.

**अर्थ**-आपण दोघे आकाशांत बरोबर व दूर उडालों, त्यामुळें तुझें व माझें ( आतां ) सख्य झालें, परंतु ती तुझी गुप्त ठेविलेली उडण्याची चाल अजून कां वरें सांगत नाहींस.

**४२ तुंडाग्रें पक्ष-युगें इ०-अन्वय**-काका, तुंडाग्रें, पक्षयुगें जळाला क्षणक्षण शिवशी, या गतिचें नाम कथीं. सर्व संशयमळाला टाकूनि दे.

**अर्थ**-कावळ्या, तूं आपल्या चोचीनें व पंखांनीं क्षणोक्षणीं ( समुद्राच्या ) पाण्यास स्पर्श करितोस, तर या तुझ्या गतीचें नांव काय तें मला सांग, मनांतील विकल्प टाकून दे.

**४३ वद काय नाम काका इ०-अन्वय**-काका, या पाताचें नांव काय? हा शतीं असे कीं, त्याहूनि वेगळाचि, वद, स्पष्ट कथीं, मौन एकदां टाकीं.

**अर्थ**-या तुझ्या उडण्याच्या गतीचें नांव काय? ही गति त्या शंभर गतींतील आहे किंवा त्यांहून वेगळी आहे? बोल, स्पष्ट सांग, मुकेपणा एकदांचा टाकून दे.

**४४ ये ये झडकरि हा मी इ०-अन्वय**-करटा, हा मी हंस तुझी वाट पाहतों, झडकरी ये, ये. आमुचा घरटा, या लक्षयोजनांबुधिपरतीरीं असे.

**अर्थ**-अरे कावळ्या हा मी हंस तुझी वाट पहात आहें. लवकर ये, ये. आमचें घरटें लक्ष योजनें लांब अशा या समुद्राच्या पलीकडे आहे.

**४५ नेत्रीं नाकीं कानीं इ०-अन्वय**-(ज्याचे) नेत्रीं, नाकीं, कानीं क्षारोदक शिरे, ( ज्याचे ) पक्ष ओले जाहले, ( जो ) केवळ विव्हळ, दुर्बल, तो खळ आर्तस्वरें असें बोले.

**अर्थ**-ज्याच्या डोळ्यांत, नाकांत, कानांत समुद्राचें पाणी शिरलें आहे, पंखहि ओले झाले आहेत, असा घावरा झालेला, व थकलेला तो दुष्ट ( कावळा ) दुःखाच्या स्वरानें असें बोलूं लागला.

**४६ का का शब्द करोनि इ०-अन्वय**-(जे) का, का, शब्द करोनि भ्रमति त्यांच्या कुळांत मी झालों. तो ( मी ) प्राणोपायन घेऊनि तुला आतां शरण आलों.

**अर्थ**-काव, काव, शब्द करून जे पक्षी फिरतात त्यांच्या कुळांत मी

उत्पन्न झालों आहें. तो मी प्राणरूपी नजराणा घेऊन तुला आतां शरण आलों आहें.

**४७ ने मज सागरतीरीं इ०–अन्वय**–हंसा, मज सागरतीरीं ने, दीनातें प्राणदान दे, उडतां व्याकुळ झालों, या दुस्तरा नदीनातें भ्यालों.

**अर्थ**–हंसा, मला समुद्राच्या कडेस ने, गरिबाचे प्राण राख, उडतां उडतां थकलों, तरून जाण्यास कठिण अशा या समुद्राची ( मला ) भीति वाटते.

**४८ ऐसें वदतां पडला इ०–अन्वय**–काक ऐसें वदतां धाक पावोनी सिंधुजळीं पडला; सदयजनोत्तंस हंस धावोनी त्याच्या समीप गेला.

**अर्थ**–कावळा असें बोलत आहे तों भिऊन समुद्रांत पडला. अत्यंत दयाळू हंस लागलाच त्याच्याजवळ धावून आला.

**४९ हंस ह्मणे रे काक इ०–अन्वय**–हंस ह्मणे रे शतपातपंडिता काक, इतुक्यांतचि भागलासि, अल्पा पथींच हा श्रम तुज कां गमला, मला सांग.

**अर्थ**–हंस ह्मणाला, अरे कावळ्या, उडण्याच्या शंभर गतींत तूं उत्तम माहितगार असतां इतक्यांत थकलास. थोडी वाट चाललों नाहीं तोंच तुला इतका थकवा कसा वरें आला, मला सांग.

**५० कीं पर्व अपूर्व असे इ०–अन्वय**–कीं, गा खगा, जें सुख द्यावया परमोदार, ( असें ) अपूर्व पर्व असे, ह्मणवुनि मज्जन करिशी, वद, हे कर्ण पिपासु झाले.

**अर्थ**–अथवा ज्यापासून विलक्षण सुख प्राप्त होणार अशी कांहीं पुण्य वेळ ( पर्वणी ) आहे ह्मणून तूं स्नान करित आहेस, सांग. मला ऐकण्याची फार इच्छा आहे.

**५१ काक ह्मणे मी भक्षुनि इ०–अन्वय**–काक ह्मणे, वा, गा, महाभागा हंसोत्तमा, मी उच्छिष्टें भक्षुनि फार मातलों, मी आपणासि गरुडचि मानीं.

**अर्थ**–कावळा ह्मणाला अरे श्रेष्ठा हंसा, मी उष्टीं खाऊन फार माजलों आणि मी आपल्याला मनांत गरुडच ( सर्व पक्ष्यांत श्रेष्ठ ) मानित होतों.

**५२ म्यां काक अन्य खगाहि इ०–अन्वय**–म्यां अदभ्र मदें अन्य काक, खगहि पुष्कळ अवमानिले. वा, तुजही सज्जनश्रुतिश्रमदें दुर्वाक्यें ऐकविलीं.

**अर्थ**–मीं अत्यंत गर्वानें इतर कावळे व पक्षी यांचा अतिशय अपमान केला व चांगल्या लोकांना न ऐकवणारीं अशीं निंदास्पद भाषणें तुलाहि ऐकवायाला लावलीं.

**५३ केली तुजशीं स्पर्धा इ०–अन्वय**–तुजशीं स्पर्धा केली, तत्फळ हें सद्या व्यसन पावलों. शरणागतासि रक्षीं, तुझी जनांत अनवद्या कीर्ति हो.

**अर्थ**–तुझा हेवा केला त्याचें फळ हें मी दुःख भोगित आहें. मी

शरण आलों आहें. माझें रक्षण कर. तुझी लोकांत निष्कलंक अशी कीर्ति होवो.

**५४ हो वेट भेट हंसा इ०-अन्वय**-हंसा, तूं वेट हो, भेट, आंगें रक्षणीं दक्ष अससी; संत व्यसनीं दीन, मुके, बधिर, आंधळे, पांगे, पाळिती.

**अर्थ**-हंसा तूं मला वेट ( आश्रय देणारा ) हो, मला भेट, माझें रक्षण करण्यास तूं स्वतः समर्थ आहेस. साधु लोक निराश्रित, मुके, बहिरे, आंधळे व पांगळे हे दुःखांत पडले असतां त्यांस रक्षितात.

**५५ सदया निज देशाप्रति इ०-अन्वय**-सदया, विभो, मज जरि निज देशाप्रति नेशील तरी, मग मी शलभींहि नम्र होईन, वा मदधिकीं खगमीं सांगों काय ?

**अर्थ**-दयाळा हंसा, जर मला तूं माझ्या देशास नेशील, तर मग मी टोळाशीं ( क्षुल्लक प्राण्यापुढें ) हि नम्र होईन. मग मजहून जे श्रेष्ठ पक्षी आहेत त्यांशीं नम्र होईन हें कशाला सांगूं.

**५६ ऐसें वदे रडे बहु इ०-अन्वय**-ऐसें वदे, बहु रडे, जळांत गटकळ्या खाय, का, का, करी, मराळ धावे, काका चरणीं कवळुनि क्षणांत वरी काढी.

**अर्थ**-असें बोलून तो कावळा फार रडूं लागला, पाण्यांत गटंगळ्या खाऊं लागला व काव काव असें आरडूं लागला. हंसानें लागलेंच धांवून जाऊन त्या कावळ्याला पायांनीं धरून लागलेंच वर काढिलें.

**५७ वाहे त्या दीनातें इ०-अन्वय**-तो सर्व सज्जनावतंस हंस ब्रह्मवाहनहि त्या दीनातें पृष्ठीं वाहे; ( व ) सागरतीरातें घेउनि गेला.

**अर्थ**-तो सर्व सज्जनांत श्रेष्ठ असा हंस ब्रह्मदेवाचें वाहन असूनहि त्या दीन झालेल्या कावळ्यास ( आपल्या ) पाठीवर घेऊन समुद्राच्या अलीकडील तीरीं घेऊन आला.

**५८ हंस यथागत गेले इ०-अन्वय**-साधु-संगाचें माहात्म्य दावुनि, त्या विहंगाचें आश्वासन करुनि, ( व त्यातें ) पूर्व-स्थानीं स्थापुनि, हंस यथागत गेले.

**अर्थ**-सज्जनांशीं मैत्री केली असतां काय लाभ होतो हें दाखवून त्या कावळ्यास निर्भय करून व त्यास आपल्या पहिल्या ठिकाणीं आणून ठेविल्यावर ते हंस आल्या मार्गानें परत गेले.

**५९ काक मराळ-द्वेषें इ०-अन्वय**-काक ( जसा ) मराळ-द्वेषें वळ-सर्व गर्व-हानि होतां वळे; तसा कर्णा ( तूं ) असाधु श्रमदा दुराग्रहा त्यजुनि निवळे.

**अर्थ**-जसा कावळा हंसाची स्पर्धा केल्यामुळें सर्व बळ व सर्व गर्व जाऊन शुद्धीवर आला, तसा कर्णा, तूं वाईट, दुःख देणारा दुराग्रह टाकून शुद्धीवर ये.

**६० जैसे ते वैश्यात्मज इ०-अन्वय**—ते वैश्यात्मज जैसे बलि-

पुष्टा उच्छिष्टें पुष्ट करिति तैसेचि धार्तराष्ट्र तुज दुष्टा स्वोच्छिष्टें पोशितात.

**अर्थ**–त्या वाण्याच्या मुलांनीं जसा तो कावळा आपलें उष्टें खायाला घालून पोसला होता, तसाच तुला दुष्टालाहि धृतराष्ट्राचे मुलगे आपलें उष्टें खावयाला घालून पोशित आहेत.

**६१ स्वसमातें अधिकातें इ०–अन्वय**–दुष्ट काक स्वसमातें अधिकातें अवमानी तसा तूंहि ( अवमानिसी ); तो वैश्यसुतीं बहुमत तसा तूंहि धृतराष्ट्राच्या सुतांसि ( आहेस ).

**अर्थ**–तो दुष्ट कावळा आपल्या बरोबरीचे व आपणाहून जे थोर त्यांचा अपमान करी, तसा ( कर्णा ), तूंहि निंदा करितोस. त्या वाण्याच्या मुलांना जसा तो कावळा अत्यंत मान्य झाला होता .तसाच तूं धृतराष्ट्राच्या मुलांना ( कौरवांना ) मान्य झाला आहेस.

## अभिमन्युवधप्रकरण ( पृष्ठ १८८ ).

भीष्माचार्य शरपंजरीं पडल्यानंतर कौरवांनीं द्रोणास सेनापति केलें. द्रोणानें चक्रव्यूह रचिला. त्यांत कोणास शिरतां येईना. धर्म, भीम वगैरे योद्धे भ्याले. अर्जून त्या वेळेस दुसरीकडे संशप्तकांबरोबर युद्धास गेला होता. अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु यानें चक्रव्यूहांत शिरण्याची युक्ति आपला मामा कृष्ण याचे तोंडून गर्भांत असतांच ऐकिली होती. त्याप्रमाणें तो चक्रव्यूह फोडून आंत गेला परंतु बाहेर निघण्याचें माहीत नसल्यामुळें मरण पावला. ही कथा द्रोणपर्वांत आहे.

**१ तिसरे दिवशीं प्रातः इ०–अन्वय**–राजा तिसरे दिवशीं प्रातःकाळीं द्रोणासि वंदन करोनि ह्मणे गुरुजी माझा आशाभंग कां करितसां.

**अर्थ**–( द्रोण सेनापति होऊन कौरव व पांडव यांच्या युद्धास पुनः अरंभ झाला व दोन दिवस युद्ध झाल्यानंतर ) तिसरे दिवशीं राजा ( दुर्योधन ) द्रोणास नमस्कार करून ह्मणाला गुरु, आपण माझ्या आशेचा भंग कां करितां ?

**२ प्राप्त युधिष्ठिर झाला इ०–अन्वय**–युधिष्ठिर काल प्राप्त झाला असतां तुह्मीं कां न धरिला, ( तुह्मी ) तेजें तपनयनेंहि झांकाल, काळासहि न वांकाल.

**अर्थ**–काल युद्धांत धर्म आपल्या हस्तगत होण्याचा समय आला असतां तुह्मीं त्यास कां धरिलें नाहीं. ( तुह्मामध्यें सामर्थ्य नाहीं ह्मणावें तर तुह्मी ) आपल्या प्रतापानें सूर्याचे डोळे दिपवाल व प्रत्यक्ष काळ ( समोर आला ) असतांहि त्याला तुह्मी शरण जाणार नाहीं.

**३ द्रोण ह्मणे इ०–अन्वय**–द्रोण ह्मणे राया, कुमति त्यजुनि सन्मतिसीं संग करुनि रम, तुजकरितां संगर करुनि जरि मराया सजलों ( तरि ) कां निंदिसि ?

**अर्थ**–द्रोण ह्मणाला, राजा, तूं वाईट बुद्धि सोडून चांगली बुद्धि धरून सुखानें रहा. तुजकरितां युद्ध करून मरावयास जरी सिद्ध झालों आहें तरी माझी कां निंदा करितोस ? ( तर तुला सांगतों ):–

**४ पाडीन निश्चयें मी इ०—अन्वय—**आजी मी कोणा एका महारथा निश्चयें पाडीन. आजी सर्वथा ऐशी होईल (कीं) जिला सत्कवि गातील.

**अर्थ—**आज कोणातरी एका महायोध्यास (युद्धांत) मी खचीत पाडीन; व तें युद्ध असें होईल कीं ज्याचें वर्णन चांगले चांगले कवि करितील.

**५ ऐसें वदोनि चक्र इ०—अन्वय—**ऐसें वदोनि जो धीर-वीर-हीर-प्रवर प्रकरें करोनिया खचिला (असा) सुदुर्भेद्य चक्रव्यूह युक्तिनें, रचिला.

**अर्थ—**असें बोलून द्रोणानें धैर्यवान् योद्धयांतील निवडक अशा पुष्कळ सरदारांची जींत योजना केली आहे व जी फोडून जाण्यास अति कठीण अशी सैन्याची चक्राकार रचना मोठ्या चतुराईनें केली.

**६ व्यूहातें भेदाया इ०—अन्वय—**सानुजनी धर्म व्यूहातें भेदाया यत्न करुनि झटे, परि जेंवि रत्नसानु तपना (प्रतापा) जनीं लोपवी (तेंवि) गुरु प्रतापा लोपवी.

**अर्थ—**धर्मानें बंधूंसह तो चक्रव्यूह फोडण्याकरितां फार प्रयत्न केला, परंतु रत्नांच्या शिखरांचा जो मेरुपर्वत, तो ज्याप्रमाणें सूर्याचें तेज लोकांवर पडूं देत नाहीं, त्याप्रमाणें द्रोणानें धर्मराजाचा सर्व यत्न निष्फळ केला.

**७ धर्म ह्मणे सौभद्रा इ०—अन्वय—**धर्म ह्मणे, सौभद्रा, व्यूह दुर्भेद्य (आहे), यत्न चालेना, व्यूह-पुरस्थित अस्मद्गुरु कुरुकटकेश लेश हालेना.

**अर्थ—**धर्म ह्मणाला, अरे अभिमन्यु, चक्रव्यूह फोडण्यास फार कठीण आहे, कांहीं प्रयत्न चालत नाहीं; कारण त्या व्यूहाच्या तोंडीं आपला गुरु व कौरवांचा सेनापति जो द्रोण तो उभा असून थोडा सुद्धां तेथून हालत नाहीं.

**८ गुरुनें सकळ पळविले इ०—अन्वय—**जेवीं समन्यूनें मृगेश्वरें गज (पळवावे तेंवि) गुरुनें सकळ पळविले; गुरुदया पूर्ण नव्हतां न्यूनें तयासम कैसें व्हावें?

**अर्थ—**खवळलेला सिंह ज्याप्रमाणें हत्तींस पळवून लावितो त्याप्रमाणें द्रोणाचार्यांनें सर्वांस पळवून लाविलें. (संजय ह्मणतो अरे धृतराष्ट्रा), गुरुची कृपा झाल्याशिवाय हलक्या शिष्याला त्याची बरोबरी कशी करवेल?

**टीप—**धृतराष्ट्र हा आंधळा होता ह्मणून युद्धांतील सर्व वर्तमान संजय त्यास सांगत असे. संजय हा धृतराष्ट्राचा सारथी होता. हा निस्पृह व स्पष्टवक्ता असे. व्यासाच्या प्रसादानें त्यास सर्व गोष्टी बसल्याजागींच समजत असत.

**९ अभिमन्यु ह्मणे चिंता इ०—अन्वय—**अभिमन्यु ह्मणे, हो तात, हे चिंता व्यर्थ करितां; या वाक्यें तुमचेचि पाय बहु लज्जित होतात कीं.

**अर्थ—**अभिमन्यु ह्मणाला, अहो काका, तुह्मी ही चिंता व्यर्थ कां

करितां ? असलें भाषण तुह्मांसारख्यांस लाज आणणारें आहे (योग्य नाहीं).

१० **व्यूहीं शिरेन शरसा** इ०–**अन्वय**–( मी ) व्यूहीं शरसा शिरेन, एक पदही मागें न परतेन. युष्मत्पदप्रसादें युष्मत्सपत्न मदहीन होतील.

**अर्थ**–अभिमन्यु ह्मणाला मी चक्रव्यूहांत बाणासारखा शिरेन. एक पाऊलभर मागें सरणार नाहीं. तुमच्या पायाच्या कृपेनें तुमच्या शत्रूंचा गर्व नाहींसा होईल ( तुमचे शत्रु जिंकून मी यश संपादीन ).

११ **धर्म ह्मणे त्वद्रचित द्वारें** इ०–**अन्वय**–धर्म ह्मणे हे आह्मी समस्त त्वद्रचितद्वारें तुज रक्षाया मागें येतों, हेमागें स्व–स्थैर्य–धैर्य ( तुज ) द्यावें.

**अर्थ**–धर्म ह्मणाला आह्मी हे सर्वजण तूं चक्रव्यूहास पाडिलेल्या भोंकानें तुझ्या पाठीमागें रक्षण करण्याकारितां येतों. मेरु पर्वतानें आपला स्थिरपणा व धैर्य हीं तुला द्यावीं. ( मेरु पर्वत हा आपणावर इंद्रानें कितीहि वज्रप्रहार केले किंवा वृष्टि केली तरी ज्याप्रमाणें आपलें स्थान सोडित नाहीं व धैर्यानें तें सर्व सोशितो, त्या प्रकारचें धैर्य व स्थिरता तुझ्या आंगीं येवो ).

१२ **सौभद्र ह्मणे शिरतों** इ०–**अन्वय**–सौभद्र ह्मणे जसा मतंगज डोहीं, वा हरिपोत दंतयूथीं, किंवा पतंग जवा करुनियां दहनीं शिरतो तसा व्यूहीं शिरेन.

**अर्थ**–अभिमन्यु ह्मणाला, ज्याप्रमाणें हत्ती डोहांत शिरतो, किंवा सिंहाचा बच्चा हत्तींच्या समुदायांत शिरतो, किंवा पतंग दिव्यावर वेगानें उडी घालितो त्याप्रमाणें मी व्यूहांत शिरतों.

१३ **ज्येष्ठ पित्याला देउनि** इ०–**अन्वय**–तो सुवीर ज्येष्ठ पित्याला अभय देउनि सूतातें ह्मणे, हूं, रथ हाक, तातें माय सुभद्रा सूवीरसू ह्मणावी.

**अर्थ**–तो वीर अभिमन्यु धर्माला आश्वासन देऊन सारथ्यास ह्मणाला अरे, रथ हाक. माझी आई सुभद्रा हिच्या पोटीं मोठा योद्धा जन्मला आहे असें माझ्या बापाला ( अर्जुनाला ) ह्मणूं दे. ( माझा पराक्रम त्याला पाहूं दे हा अर्थ ).

**टीप**–ज्येष्ठपिता=धर्म. बापाचे भाऊ ते बापाप्रमाणेंच पूज्य आहेत असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे. धर्म हा अर्जुनाचा वडील भाऊ होता.

१४ **तों सूत सुमित्र ह्मणे** इ०–**अन्वय**–तो सुमित्र सूत ह्मणे भो आयुष्मन्, आपण कुमार कीं, ( मी ) अरिवरि हरि हांकीन, परि कुरुगुरुशीं गांठि. हा पण कठिण कीं.

**अर्थ**–तों सुमित्र नांवाचा सारथी ह्मणाला महाराज, आपण अजून मूल आहां. मी घोडे शत्रूंवर हांकितों, परंतु द्रोणाचार्याशीं गांठ आहे, संभाळा. मला तुमचा हा पण कठीण दिसतो.

**टीप**–राजे लोकांच्या मुलांना त्यांचे वृद्ध चाकर नांवानें हाका न मारितां ‘ आयुष्मन्, जात, सुपुत्र ’ वगैरे बहुमानार्थी पदवी देऊन हाका मारित असत.

१५ **तन्निबंधें नीटाचि इ०–अन्वय**–सूतें तन्निबंधें रथ विमानसाचि नीट चालविला. जेंवि कुलजा सासूतें मान ( दे ) तेंवि श्रितमति प्रभूक्तितें देती.

**अर्थ**–सारथ्यानें अभिमन्यूच्या आग्रहामुळें रथ अगदीं विमानाप्रमाणें नीट चालविला. ज्याप्रमाणें कुलीन सून आपल्या सासूच्या वचनास मान देते, त्याप्रमाणेंच ( चांगले ) चाकर आपल्या धन्याच्या ह्मणण्याप्रमाणें वागतात.

१६ **भीमादि सबळ सर्वहि इ० अन्वय**–ते भीमादि सबळ सर्वहि व्यूह फोडाया उठले. इकडुनि कौरवकटकही शत्रुसैन्य झोडाया पुढें होय.

**अर्थ**–ते भिम आदिकरून सर्वजण सैन्यानिशीं व्यूह फोडण्याकरितां तयार झाले. इकडे कौरवांचें सैन्यही शत्रूचें सैन्य झोडण्याकरितां तयार झालें.

१७ **रथ भडकले धडकले इ०–अन्वय**–रथ धडकले, हय भडकले, शस्त्रज वन्हि वरते धडकले. ते अन्योन्य कलेवर द्व्यंगुलहि धड न राहों देती.

**अर्थ**–जेव्हां रथ भिडले, घोडे बेफाम निघाले व शस्त्रांतील अग्नि पेटले, तेव्हां त्या उभयतांनीं ( कौरव व पांडव यांजकडील योध्यांनीं ) शरिराचे दोन बोटांएवढें देखील तुकडे धड राहूं दिले नाहींत.

१८ **व्यूहीं गर्भ सुभद्रा इ०–अन्वय**–जेंवि गजयूथांत बालहरि ( पडती ), तेंवि त्यावरि सेना पडल्या.

**अर्थ**–ज्याप्रमाणें हत्तींच्या कळपांत सिंहाचा छावा शोभतो, त्याप्रमाणें सुभद्रेचा मुलगा अभिमन्यु त्या व्यूहांत दिसे. समुद्रमंथनाच्या वेळेस रवी केलेल्या मंदराचलावर जशा समुद्राच्या लाटा उसळल्या, त्याप्रमाणें अभिमन्यूवर तें सैन्य तुटून पडलें.

**टीप**—पूर्वीं देवदैत्यांनीं समुद्रमंथन केलें त्या वेळेस मंदरपर्वताला रवी ( घुसळण्याचें साधन ) केलें होतें, व ती रवी ओढण्याकरितां शेषनांवाचा सर्प ही दोरी केली होती. अशा तऱ्हेनें समुद्र घुसळून देवदैत्यांनीं समुद्रांतून चौदा रत्नें काढिलीं ही कथा सुप्रसिद्धच आहे.

१९ **बहुतांसा एकाकी इ०—अन्वय**—एकाकी सौभद्र बहुतांसीं समुत्साहें कलह करी. सूतासि असकृत् ह्मणे, समुत् साहें, समर सुयशस्कर हो.

**अर्थ**—एकटा अभिमन्यु मोठ्या आवेशानें पुष्कळ योध्यांबरोबर युद्ध करित होता, व वारंवार आपल्या सारथ्यास ह्मणे कीं तूं आनंदानें सहन कर, कीर्ति मिळविण्यासारखी लढाई होऊं दे.

२० **तेव्हां त्वत्पुत्रांचीं इ० अन्वय**—तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें रणांत रसें शुष्क झालीं, अभिमन्युमुख विजयोत्साहें प्रफुल्ल पुष्करसें शोभे.

**अर्थ**—संजय ह्मणतो, हे धृतराष्ट्रा, अभिमन्यु अशा प्रकारचें युद्ध

करित असतां तुझ्या मुलांच्या तोंडांवरची टवटवी नाहींशी होऊन तीं सुकलीं. अभिमन्यूचें मुख जय मिळाला ह्मणून फुललेल्या कमळाप्रमाणें दिसूं लागलें.

**२१ द्रोणद्रौणिकृपादि इ०-अन्वय**--द्रोणद्रौणिकृपादि प्रबळ बहु भटांसही तो न आटे, तद्दृष्टिपुढें बळ फाटे; जलदीं मूर्तवातसा वाटे.

**अर्थ**-द्रोण, अश्वत्थामा, कृपाचार्य आदिकरून महाशूर योध्यांचें त्याच्यापुढें चालेना. अभिमन्यूला पाहून शत्रूचें सैन्य पळूं लागलें. शत्रूच्या सैन्यरूप मेघास तो मूर्तिमंत वाराच वाटला. (वारा ढग नाहींसे करितो)

**२२ कुरु सैन्यांत गमे इ०-अन्वय**-हो, ज्यापरि रंभाकाननांत वारा, (त्यापरि तो) कुरुसैन्यांत गमे; विजयश्री त्या नातवा परिरंभा देऊनि कां न राहो.

**अर्थ**--अहो, ज्याप्रमाणें केळीच्या वनांत वारा शिरतो आणि जी स्थिति होते, त्याप्रमाणें अभिमन्यु शत्रुसैन्यांत शिरला तेव्हां त्याची (सैन्याची) अवस्था झाली. (संजय ह्मणतो, धृतराष्ट्रा,) अशा त्या तुझ्या नातवाला (अभिमन्यूला) विजयश्री आलिंगन दिल्याशिवाय कां बरें राहील?

**२३ द्रोण द्रौणि बृहद्बळ इ०-अन्वय**-द्रोण, द्रौणि, बृहद्बळ, कृतवर्मा, कर्ण, कृप असे हे सा घनसे वळले. त्यांतें तो महावातसा कार्ष्णि न साहे.

**अर्थ**-द्रोण, अश्वत्थामा, बृहद्बळ, कृतवर्मा, कर्ण, कृप, असे सहाजण मेघांप्रमाणें त्या (अभिमन्यू) वर कोसळले, परंतु त्या महावाऱ्यापुढें (अभिमन्यूपुढें) त्यांचा (द्रोणादिक मेघांचा) टिकाव लागला नाहीं.

**२४ शकुनि ह्मणे इ०-अन्वय**-शकुनि ह्मणें, कुरुनाथा, हा सर्वांहि मिळोनि मारावा, जसे गजशिशु मृगोत्तमारावा भीति (तसे) भट यास भ्याले.

**अर्थ**-शकुनि ह्मणाला दुर्योधना, सर्वांनीं मिळून या अभिमन्यूस मारावा. सिंहाच्या गर्जनेस जशीं हत्तींचीं पोरें भितात त्याप्रमाणें योद्धे याला भ्याले आहेत.

**टीप**-शकुनि हा दुर्योधनाचा मामा. याच्याच साहाय्यानें दुर्योधनानें पांडवांस कपटद्यूत खेळावयास लावून त्यांचें सर्व वित्त हरण केलें.

**२५ द्रोणासि कर्ण हि ह्मणे इ०-अन्वय**-कर्णहि द्रोणासि ह्मणें, गुरुजी, मज तो आवांका नमेचि, (तुह्मी) युक्ति आवांका, हा तुह्मासहि आ करुनि वांका न ह्मणो.

**अर्थ**-कर्णहि द्रोणास ह्मणाला, गुरुजी, मला तर शक्ति नाहीं. तुह्मी एकादी युक्ति काढा. हा तुह्माला आ पसरून वांकायला न लावो (हतवीर्य न करो), ह्मणजे झालें.

**२६ गुरुहि ह्मणे कर्णा इ०-अन्वय**-गुरुहि ह्मणे, कर्णा, हा तक्षकाचि आ करुनि गरल वमला, (मी) संकोचें आहें, परि आव मला मघांचि सोडुनि गेला.

**अर्थ**-द्रोणाचार्य ह्मणाला, कर्णा, हा अभिमन्यु केवळ तक्षक आहे. तो तोंड पसरून विष ओकला आहे (ह्या अभिमन्यूचा प्रताप दुःसह आहे). मी वेतावेतानें युद्ध करित आहें, परंतु माझें धैर्य केव्हांच गळलें आहे (मी हतवीर्य प्रथांच झालों आहें.)

**२८ स्पष्ट अभेद्य कवच इ०-अन्वय**-अंगपा, हा वीभत्सुकुमार अभेद्य कवच स्पष्ट ल्याला, कीं याचें सुकुमार अंग अभिनवा पाल्यालाहि भ्यावें.

**अर्थ**-द्रोणाचार्य ह्मणाला, कर्णा, ह्या अर्जुनपुत्रानें कधीं न फाटणारें असें चिलखत खास आंगांत घातलें आहें; नाहीं तर याचें अंग इतकें कोमल आहे कीं कोंवळा पाला देखील त्याजवर टाकला तर त्यास तो सोसणार नाहीं (मग बाणवृष्टि कोठून).

**टीप**-कर्णानें दुर्योधनास बहुतप्रसंगीं साहाय्य केलें, यामुळें दुर्योधन राजा संतुष्ट होऊन त्यानें कर्णास अंगदेशाचें राज्य दिलें होतें. ह्मणून त्यास अंगप ह्मणतात.

**अक्षत-धनु तोंवरि इ०-अन्वय**-जोंवरि अक्षत-धनु तोंवरि हें वीरशिरोरत्न आवरायाचें न, यास्तव सर्वहि यत्न करून आज रायाचें नांव रक्षूं.

**अर्थ**-जोंपर्यंत याच्या (अभिमन्यूच्या) हातीं हें धनुष्य कायम आहे तोंपर्यंत हा वीरश्रेष्ठ (अभिमन्यु) आपणांस आटोपणार नाहीं. याकरितां आपण सर्वजण मिळून व खटपट करून आज आपल्या राजाचें नांव राखूं (याचें धनुष्य वगैरे तोडून त्याचा पराभव करूं व यश संपादूं).

**२९ मारी हरींस सहसा इ०-अन्वय**-कृतवर्मा हरींस सहसा मारी, गौतम सारथीसहि, परि पितृमातुलसमशुद्धकीर्तिधौतमही तो न गडबडे.

**अर्थ**-कृतवर्म्यानें अभिमन्यूच्या रथाचे घोडे तेव्हांच मारून टाकिले, कृपाचार्यानें सारथीहि मारून टाकिला. तथापि ज्यानें आपला बाप अर्जुन व मामा कृष्ण यांच्यासारख्या निर्मळ कीर्तीनें पृथ्वी शुभ्र केली आहे (यश संपादन केलें आहे) असा तो अभिमन्यु तिळमात्रहि डगमगला नाहीं. (कीर्तीचा रंग पांढरा असें मत ठरलें आहे.)

**३० सौभद्र विरथ होतां इ०-अन्वय**-सौभद्र विरथ होतां धर्मज्ञहि शस्त्रवृष्टीतें करिती, तें निष्कृपत्व पाहुनि बहु सदय साधु दृष्टीतें झांकिति.

**अर्थ**-(सारथी व घोडे मारल्यानंतर) अभिमन्यूला युद्ध करण्यास रथ नाहींसा झाला तरी (युद्धांतील) धर्म जाणणाऱ्या योद्ध्यांनींहि त्यावर बाणवृष्टि चालविली होती. तो अत्यंत निर्दयपणा पाहून दयाळू साधु लोकांनीं आपले डोळे झांकिले.

**३१ ह्मणती हाणा मारा इ०-अन्वय**-तोंडा काय पाहतां? हाणां, मारा, पाडा, ध्या, कोंडा, जसा कर्दमीं धोंडा (बुडे), तसा बाळ प्राणव्यसनीं बुडों, (असें) ह्मणती.

**अर्थ**-अहो तोंडाकडे काय पहातां? या अभिमन्यूला हाणा, मारा, पाडा, पकडा, ( चोहोंकडून ) अडवा; ज्याप्रमाणें चिखलांत घोंडा बुडतो तसा या मुलाला मृत्युरूपी चिखलांत बुडूं द्या, असें ते योद्धे आपसांत बोलूं लागले.

**३२ तो खड्गचर्म घेउनि इ०-अन्वय**-तो वीरनायक खड्गचर्म घेउनि, विहाय अवलंबी, कवि संकट पडतां धैर्यासि सोडुनि हाय झणेल काय?

**अर्थ**-तो महा शूर अभिमन्यु ( धैर्य न सोडतां ) ढाल तरवार घेऊन आकाशांत उडाला. संकट आलें असतां शहाणा मनुष्य धैर्य सोडून दुःख करित बसेल काय?

**३३ केवळ हृदयीं भ्याले इ०-अन्वय**-गा ( धृतराष्ट्रा ), जे जे त्या पविपरीस गाढाला केवळ हृदयीं भ्याले ते रथातळीं शिरले. मग शिरीं ढाला न घेतील काय?

**अर्थ**-अरे धृतराष्ट्रा, इंद्राच्या वज्रापेक्षांहि कठीण अशा त्या अभिमन्यूस जे भ्याले ते आपले रथ सोडून रथाखालीं लपले. मग आपले प्राण वांचविण्यास डोक्यांवर ढाला कां वरें धरणार नाहींत?

**३४ खड्ग क्षितिवरि पाडी इ०-अन्वय**-द्रोण नवत्सरुस च्छेदूनियां खड्ग क्षितिवरि पाडी, चित्तीं ह्मणें वत्स न रुस, त्रिभुवन तुला धन्य ह्मणो, मला न ( ह्मणो ).

**अर्थ**-द्रोणानें अभिमन्यूच्या हातांतील तरवारीची नवी मूठ तोडून तरवार जमिनीवर पाडिली आणि मनांत ह्मटलें कीं, बाळा अभिमन्यू, ( मीं हें कृत्य केलें यावद्दल ) रागावूं नको. तुझ्या पराक्रमाबद्दल सर्व लोक तुझी वाहवा करोत. माझी न करोत. ( कारण तूं जो पराक्रम केला त्यापुढें मीं एवढी काय ती तुझ्या तरवारीची मूठ तोडिली, यांत मोठें तें काय केलें. )

**३५ वारिति जसें प्रयत्नें इ०-अन्वय**-जसें सर्व संत एकमतें प्रयत्नें परचक्र वारिती, तसें कर्णद्रोणादि वहु तें स्वअंतपरचक्र खंडिती.

**अर्थ**-( द्रोणानें तरवारीची मूठ तोडल्यानंतर अभिमन्यूनें रथाचें चाक घेऊन युद्ध सुरू केलें ) ज्याप्रमाणें सर्व चांगले लोक एकमतानें व प्रयत्न करून आपणावर आलेल्या संकटाचें निवारण करितात, त्याप्रमाणें कर्ण, द्रोण वगैरे पुष्कळ योद्ध्यांनीं आपले प्राणनाशक असें तें अभिमन्यूनें घेतलेलें चाक मोडून टाकिलें.

**३६ मग भेक-मूषकां जें इ०-अन्वय**-मग क्षुधित क्रोधी महाभुजग भेक-मूषकां जें दुःसह भय दे, तें तो महाभुज गदेतें करीं धरुनि आह्मां दे.

**अर्थ**-( संजय सांगतो राजा, ) रथाचें चाक मोडल्यानंतर त्या महाप्रतापी अभिमन्यूनें हातीं गदा घेतली आणि भुकेलेला व रागावलेला साप बेडूक व उंदीर यांस जसें भय देतो त्याप्रमाणें त्यानें आह्मांस ( कौरवांच्या सैन्यास ) अत्यंत भीति उत्पन्न केली.

**३७ तेणें हय सुत वधुनि इ०—अन्वय**—तेणें हय, सुत वधुनि अश्वत्थाम्याप्रति प्रभावातें दावूनि, जशी दीपकप्रभा वातें ( हरावी ) ( तशी ) कौरवदीप्ति हिरिली.

**अर्थ**—अभिमन्यूनें त्या गदेनें अश्वत्थाम्याच्या रथाचे घोडे व सारथी मारून पराक्रम दाखविला, आणि ज्याप्रमाणें वाऱ्याच्या योगानें दिव्याची ज्योत जाते, त्याप्रमाणें त्यानें ( असा पराक्रम करून ) कौरवांच्या तोंडचें पाणी पळविलें.

**३८ पाहुनि संमुख जेव्हां इ०—अन्वय**—जेव्हां सौभद्र गुरुनंदन संमुख पाहूनि रागें सिंहसा धांवे, तेव्हां ( तो ) रथोपस्थ त्यजुनि तीन पावलें मागें सरे.

**अर्थ**—अश्वत्थाम्याला समोर पाहून जेव्हां अभिमन्यु रागानें त्याजवर सिंहासारखा धांवला, तेव्हां अश्वत्थामा आपली रथांतील बसण्याची जागा सोडून तीन पावलें मागें सरला.

**३९ त्या सौभद्रावरि इ०—अन्वय**—बलसागर दुःशासनसुत गदेसि गरगर फिरवित, निजभुज-भुजग-प्रताप मिरवीत त्या सौभद्रावरि धांवे.

**अर्थ**—दुःशासनाचा महाबलवान् पुत्र आपली गदा गरगर फिरवित व आपल्या बाहुरूप सर्पाचा पराक्रम दाखवित त्या अभिमन्यूवर धांवला.

**४० युद्धचमत्कार रुचिर इ०—अन्वय**—बा ( धृतराष्ट्रा ), ते महागद भ्रात रुचिर युद्ध-चमत्कार सुचिर प्रकटूनि, अन्योन्यकृताघातें अदभ्रा मूर्च्छा पावले.

**अर्थ**—संजय ह्मणतो धृतराष्ट्रा, मोठ्यामोठ्या गदा घेतलेले ते दोघेहि भाऊ, बराच वेळपर्यंत चांगलें युद्ध केल्यावर एकमेकांच्या गदांच्या तडाक्यांनीं अत्यंत मूर्च्छा येऊन पडले.

**४१ आधीं उठोनि उठतां इ०—अन्वय**—प्रभो, ( ते दोघे ) उठतां ( दुःशासनपुत्र ) आधीं उठोनि सौभद्रशिरीं गदा घाली. जेंवि प्रभोगदाघाली ( मनुष्या विवश करी, तेंवि ) ती दुष्परिहार्या (गदा अभिमन्यूस ) विवश करी.

**अर्थ**—संजय ह्मणतो, राजा धृतराष्ट्रा, ते दोघे सावध होताहेत तों दुःशासनाच्या मुलानें आधीं उठून अभिमन्यूच्या डोक्यांत गदा घातली. अतिशय दुःख देणारी पातकपंक्ति ज्याप्रमाणें मनुष्यास व्याकुळ करून सोडिते त्याप्रमाणें टाळण्यास कठीण अशा त्या गदेनें अभिमन्यु अगदीं निश्चित पडला.

**४२ आधीं श्रम बहु झाला इ०—अन्वय**—हो ( धृतराष्ट्र ), आधीं श्रम बहु झाला होता, त्यांतही तो असावध, दौःशासनिनें धर्मनय त्यजुनियां असा वध केला हो.

**अर्थ**—अरे धृतराष्ट्रा, तो ( अभिमन्यु ) आधींच युद्ध करून फार थकलेला असून, गैरसावध असतां, दुःशासनाच्या मुलानें, नीति सोडून त्याचा प्राण घेतला ! !

## नलदमयंतीस्वयंवर (पृ० २३९)

**निषध** देशचा राजा नळ हा एके दिवशीं करमणुकीकरितां थोडे लोक बरोबर घेऊन एका बागेंत गेला. तेथें त्यानें एक सोन्याचा हंस धरिला, परंतु त्याच्या विनवणीवरून त्यानें त्यास सोडून दिलें. एवढी कथा या आख्यानांत आहे. पुढें त्या हंसानें राजास दमयती नांवाची एक राजकन्या प्राप्त करून देऊन त्याचें दुःख दूर केलें. हें काव्य मूळ संस्कृतांत आहे. त्याचा कर्ता श्रीहर्ष होय. रघुनाथ पंडित ह्मणून एक मराठी कवि होऊन गेला त्यानें हें मराठी भाषेंत रचिलें. ह्या कवीचें वृत्त कांहींच माहीत नाहीं, परंतु शके १७०० च्या अखेरीस हा होता असें ह्मणतात.

**१ गंगातरंगसम जो इ०-अन्वय**-जो निजदेहवर्णीं गंगातरंगसम; जयास कर्णीं भृंगापरि रुचिर कांति; जो जंघाल, पवनसंगतीची सवे घे, शृंगारिला हय तयावरि भूप वेंघे.

**अर्थ**-ज्याच्या अंगाचा रंग गंगेच्या फेंसाप्रमाणें पांढरा, ज्याचे कान भुंग्याप्रमाणें काळेभोर, जो लांबटांग्या, जो वाऱ्यासारखा धांवणारा व शृंगार घातलेला, अशा घोड्यावर ( नळ ) राजा बसला.

**२ जो अंबरीं उफळतां इ०-अन्वय**-जो अंबरीं उफळतां खुर लागलाहे, तो डाग चंद्रमा निज तनूवरि लाहे, जो या यशास्तव धवलत्व कसें नेघे, शृंगारिला हय तयावरि भूप वेंघे.

**अर्थ**-जो घोडा पूर्वीं आकाशां उडाला तेव्हां त्याची टाप चंद्रास लागली त्यामुळें चंद्राच्या आंगावर काळा डाग पडलेला आहे, ज्याचा ह्या कीर्तीमुळें पांढरा रंग कसा होणार नाहीं ( चंद्र आकाशांत इतका उंच असतांहि त्यास ह्या घोड्याची टाप लागली ह्यामुळें त्याची कीर्ति वाढून रंग पांढरा झाला आहे ) अशा शृंगारलेल्या घोड्यावर राजा चढला.

**३ सर्वे सेना भूपाळ इ०-अन्वय**-भूपाळ सर्वे सेना (घेऊन) निघालाहे, शींव लंघुनि एक उद्यान पाहे, तेथें रिघे, मित सेवकांसि वाहे, सारी फौज बाहेर उभी राहे.

**अर्थ**-राजा सेना बरोबर घेऊन निघाल्यावर शिवेच्या पलीकडे जातो तों त्यास एक बाग दिसला. त्यांत तो गेला. जातांना त्यानें आपल्या बरोबर कांहीं थोड्या चाकर लोकांस बोलाविलें होतें. बाकीची सर्व फौज बागेबाहेर उभी राहिली होती.

**४ पनस जंबू जंबीर इ०-अन्वय**-पनस, जंबू, जंबीर, विविध निंबें, कुंद, चंदन, माकंद, सुदाडिंबें, तुंग नारिंगें, कदंबें विकसलीं. तेथें शुक-सारिका-कदंबें वसति.

**अर्थ**-त्या बागेंत फणस, जांबूळ, साखरलिंबोण्या वगैरे नानाप्रकारच्या लिंबांचीं झाडें, कुंद, चंदन, आंबे, उत्तम डाळिंब्या, उंच वाढलेल्या नारिंग्या व फुललेले कदंबवृक्ष होते, त्यांवर पुष्कळ राघू व मैना वसल्या होत्या.

**५ लतेतळीं रुंद निरुंद इ०-अन्वय**-( त्या वागेंत.) लतेतळीं रुंद निरुंद कालवे ( होते ), तेथें मकरंद गळोनि कालवे, तयांत परागही सांद्र रंगती, भृंगतती फुलांसवें तरंगती.

**अर्थ**-त्या वागेंत वेलींखालीं लहान व मोठीं अशीं आळीं केलेलीं होतीं; त्यांत फुलांतील रस गळून मिसळलेला होता व त्यांतील पाण्यांत फुलांतील पराग अतिशय पडून पाण्यास रंग आला होता व पाण्यांत पडलेल्या फुलांवर भुंगे वसून तरंगत होते.

**६ उपरि सकंटक साचे इ०-अन्वय**-( त्या वागेंत ) उपरि सकंटक साचे, परंतु जयांत सुरसाचे साचे असे फणसांचे घोंस कित्येक षण्मासांचे ( व ) कित्येक वरसांचे होते.

**अर्थ**-त्या वागेंत वाहेरून कांट्यांनीं भरलेले परंतु ज्यांच्या आंत उत्तम रसाचे गरे, असे कांहीं सहा महिन्यांचे व कांहीं वर्षाचे असे फणसांचे घड होते.

**७ तया वनीं एक तडाग इ०-अन्वय**-तया वनीं एक तडाग तामरसानपायें तोयें तुडुंबलें, ( त्यांत ) मरंद निरंतरामंद वाहे, यास्तव ( तें ) तापांतहि रिक्त नोहे.

**अर्थ**-त्या वागेंत ज्यापासून कमळांना उपद्रव होणार नाहीं अशा पाण्यानें तुडुंब भरलेलें एक तळें होतें. ज्यांत त्या कमळांतून एकसारखा इतका मकरंद ( रस ) पडत असे कीं उन्हाळ्यांत सुद्धां तें तळें कोरडें पडत नसे. ( तें तळें नेहमीं पाण्यानें भरलेलें असे )

**८ पीतां मरंद उदरंभर-इ०-अन्वय**-जें इंदिरेचें सुंदर मंदिर, तें मरंद पीतां उदरंभरवंभराचेंहि ( मंदिर ) होय; जें तेथिल पद्म सहस्रदळां धरी तें प्रत्यक्ष सूर्यकिरणांस विसाववीतें.

**अर्थ**-जें लक्ष्मीचें नेहमींचें राहण्याचें स्थान तें कमळ फुलांतील रस पीत असतां पोटभरू भुंग्याचेंहि राहण्याचें ठिकाण झालें होतें. तेथील कमळांस हजार पाकळ्या होत्या, त्या योगानें तें सूर्याच्या किरणांसहि विसांवा देत होतें. ( सूर्याला हजार किरण आहेत असें वर्णन आहे, म्हणून तें कमल आपल्या हजार पांकळ्यांचा प्रकाश पाडून प्रत्यक्ष सूर्यकिरणांस विसांवा देत होतें. असा कवीच्या ह्मणण्याचा अर्थ.)

**९ तया कासारीं राजहंस इ०-अन्वय**-तया कासारीं राजहंसांचा कळप पोहताहे, ( असें ) राजहंस पाहे, हे वापिका नळें तयासाठीं पोहे केली हें कोण नोहे ह्मणेल?

**अर्थ**-त्या राजश्रेष्ठ नळानें त्या तलावांत राजहंसांचा कळप पोहत आहे असें पाहिलें. हा तलाव नळानें त्यांच्याकरितां पाणपोई करून ठेविली आहे असें कोण ह्मणणार नाहीं.

**१० त्यांतील एक कलहंस इ०-अन्वय**-त्यांतील एक कलहंस तटीं निजेला, जो जळविहार विशेष केला, ( ह्मणून ) भागला, ( जो ) एक पद पोटींच ( ठेवी ), तो दुजा ( पद ) लांबविला, ( जो ) तनु पक्षीं लपवी, तया भूप पहातो.

**अर्थ**–त्या राजहंस पक्ष्यांपैकीं एकजण फार पोहून दमल्यामुळें त्या तलावाच्या कांठावर निजला होता. त्यानें आपला एक पाय पोटाखालीं ठेवला होता व दुसरा लांब केला होता. तसेंच त्यानें आपलें शरीर पंखाखालीं झांकून घेतलें होतें. अशा स्थितींत राजानें त्या (एकट्या) राजहंसास पाहिलें.

११ **टाकी उपानह पदें इ०–अन्वय**–(नळ) उपानह टाकी, पदें अतिमंद ठेवी, विजार वरि केली, डौरहि (वर केला), मौन सेवी, करीं वल्य उंच सारी. अशा उपायीं भूपें कलहंस पायीं धरिला.

**अर्थ**–त्या राजानें आपल्या पायांतील जोडा काढून ठेवला. हळू हळू चालत गेला विजार व झगा हीं आंवरून वर धरिलीं व हातांतील कडें वर सारिलें. अशी व्यवस्था करून मोठ्या युक्तीनें त्या राजहंसाचा पाय राजानें धरिला.

१२ **कलकल कलहंसें इ०–अन्वय**–कलहंसें सुटाया कलकल फार केला, उडाया निजपक्षीं फडफड दाविलें कीं, (तो) नृपतिस मणिबंधीं चंचू टोंचिता होय. पंचू जया सदढ धरी त्या सोडील काय ?

**अर्थ**–त्या राजहंसानें सुटण्याकारितां पुष्कळ कलकलाट केला ; उडयाकरितां पंखांनीं पुष्कळ फडफड केली ; राजाच्या मणगटास चोंचाहि टोंचिली ; पण व्यर्थ. चतुर पुरुष ज्याला धरील त्यास सोडील कसा ?

१३ **तदितर खग भेणें इ०–अन्वय**–जे तदितर खग उपवनजळकेली कराया मिळाले (ते) भेणें वेगळाले पळाले. जो स्वजन गवसला त्याजपाशीं तो नसे. कठिण समय येतां कोण कामास येतो.

**अर्थ**–त्या हंसाशिवाय त्या बागेमध्यें जलक्रीडा करण्याकरितां जे दुसरे हंस आले होते ते सर्व भिऊन निरनिराळ्या मार्गानें पळून गेले. आपल्या मंडळींतला एक धरला होता, ह्मणून त्याजवळ कोणी रहावें, परंतु कोणी राहिला नाहीं. (कवि ह्मणतो ठीकच आहे) संकट आलें असतां कोणीहि कोणास मदत करित नाहीं.

१४ **न सोडी हा नळ भूमिपाळ इ०–अन्वय**–हा नळ भूमिपाळ मातें न सोडी असें जाणोनि हंस त्यातें वदे, राया तुझ्या हातें हंसाहिंसा नच घडो, सोड, स्वस्थळातें जाईन.

**अर्थ**–हा नळ राजा आपल्याला सोडित नाहीं असें पाहून तो हंस राजाला ह्मणतो, राजा, तुझ्या हातून हंसाचा घात न होवो, (मला) सोड, मी आपल्या घरीं जाईन.

१५ **जागजागीं आहेत इ०—अन्वय**—भलें झुंजार, जया शक्तिहि मोठी, (असे) वीर कोटी जागजागीं आहेत. तया माराया पोटीं धैर्य धरीं. पांखरूं मारणें हे बुद्धि खोटी.

**अर्थ**—जे मोठे योद्धे, ज्यांचें सामर्थ्य मोठें, असे ठिकाठिकाणीं असंख्यांत शूर आहेत. त्यांना मारण्याविषयीं धाडस केल्यास ठीक. पाखरूं मारण्याविषयीं इच्छा धरणें फ़ार वाईट.

१६ **वधुनि माझी हे इ०–अन्वय**–राजा, हे माझी कनकरूप काया

वधुनि कटकमुकुटादिक भूषणें कराया तुला आशा कशी उपजली, तुजला दयामाया नाहीं काय?

**अर्थ**—या माझ्या सुवर्णाच्या शरिराचा नाश करून कडीं, मुगूट वगैरे अलंकार करण्याविषयीं तुला कशी इच्छा झाली. तुला दया माया कांहीं नाहीं का?

**१७ म्हातारी उडतां नयेचि** इ०—**अन्वय**—मदीया माता म्हातारी, तिजला उडतां नयेचि अशी (असे); कांता काय वदों, ते नवप्रसव, साता दिसांची तशी; त्या उभयांस मी पाता, विधी मज घातास योजीतसे; नृपा, तुझ्या हातामाजि गवसलों, आतां कसें करावें?

**अर्थ**—राजा, माझी आई म्हातारी, तिला उडतां येत नाहीं अशी आहे. काय सांगूं, बायको तर नुकतीच प्रसूत झालेली आहे, तिला सात दिवस झाले आहेत अशी ती आहे. त्या दोघींचा पालनकर्ता मी एकटा आहें, आणि माझा तर दैव घात करित आहे. राजा, तुझ्या हातीं सांपडलों आहें. आतां कसें करूं?

**१८ सखे माझे परतोनि** इ०—**अन्वय**—माझे सखे परतोनि घरा जातां, सजणे तुवां हा समाचार घेतां, तया शोकें हृदय घायाळ होतां कशी होशिल तें आतां आठवितों.

**अर्थ**—हे प्रिये, माझे मित्र घरीं परत गेल्यावर तूं त्यांस माझा समाचार विचारला असतां झालेल्या गोष्टींच्या शोकानें तुझी कशी अवस्था होईल तें आतां मी आपल्या मनांत आणितों.

**१९ थोर होतिल बाळकें** इ०—**अन्वय**—बाळे, वेल्हाळे, तुझीं बाळकें थोर होतिल, तुला कामा येतील. (पण) माझी माय शोकशाळे बैसेल, तिचें हृदय मला आठवितां पोळे.

**अर्थ**—अगे सुंदरी, स्वतंत्र-स्त्रिये, तुझीं मुलें मोठीं होऊन तुझ्या उपयोगीं पडतील व माझ्या दुःखाचा तुला विसर पडेल. परंतु माझी म्हातारी आई मात्र शोकानें व्याकूळ होईल व तिचें हृदय माझी आठवण झाली असतां करपून जाईल.

**२० सदय हृदय याचें** इ०—**अन्वय**—हा भूप तापहारी, याचें हृदय सदय म्हणूनि परिसतों, मी एथें विहारी होय, जो पातकी मजहि वध कराया पातला, असा पति वरुनि ही भूमि कैसी न लाजे.

**अर्थ**—हा राजा मोठा दयाळू व लोकांचें दुःख निवारण करणारा आहे असें ऐकिल्यावरून मी या बागेंत करमणूक करण्यास आलों. मजसारख्या गरीब पक्ष्याचाहि प्राण घेण्यास जो पापी प्रवृत्त झाला अशा राजाला वरिलें (पतकरिलें) म्हणून पृथ्वीला कशी बरें लाज वाटणार नाहीं?

**टीप**—पृथ्वी ही राजाची एक स्त्री असें कल्पिलें आहे

**२१ एणेंपरी परिसतां** इ०—**अन्वय**—एणेंपरी अति दीन वाचा परिसतां दयारसाचा पयोधि नळ हेलावला, (तो त्यास) सोडी, म्हणे हंसराया विहर अथवा फिराया जा, यथा निजमनोरथ राहें.

**अर्थ**–याप्रमाणें त्या राजहंसाचें दीन भाषण ऐकून त्या अत्यंत दयाळू नळ राजाला गहिंवर आला. त्यानें त्याला सोडून दिलें व ह्मटलें, अरे हंसा, जा, खेळ अथवा फिरायाला जा, अथवा वाटेल तें कर.

**२२ सुटुनि खग पळाला इ०–अन्वय**–खग सुटुनि पळाला, शालशाखे बैसला, निजदेहीं क्षणभरि मुक्तिविश्रांति चाखे, तंव तयाचे स्वजन भोंवतालीं मिळाले, निजबंधु कवळिती, बाष्प–बिंदू गळाले.

**अर्थ**–राजानें सोडल्याबरोबर तो राजहंस तेथून उडाला व एका झाडाच्या खांदीवर जाऊन बसला. तेथें त्यानें आपली सुटका झाली हा हर्ष मानून थोडा वेळ विश्रांति घेतली. इतक्यांत त्याचे जातभाई त्याच्या भोंवतीं मिळाले व त्याला मिठ्या मारून रडूं लागले.

**२३ विसांवा घे कांहीं इ०–अन्वय**–हंस कांहीं विसावा घे, लवलाहीं उडुनि परतला, नृपाळाच्या स्कंधीं वसुनि मणिबंधीं उतरला. क्षोणिपतिस ह्मणे, तुजसम कोणी नसे, देवा, हा दयेचा ठेवा तुजजवळि वसतसे.

**अर्थ**–तो हंस कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर पुनः चटकन् उडून येऊन राजाच्या खांद्यावर बसला. नंतर मणगटावर उतरत येऊन राजास बोलूं लागला कीं, राजा, तुझ्यासारखा दुसरा कोणी नाहीं, हें दयेचें भांडार तुझ्याजवळच आहे.

**२४ एक राया तूं इ०–अन्वय**–राया, ऐक, तूं थोर, दयासिंधु, तूं नीतिसागर, दीनबंधुहि, ( मी ) निंदोनी बोलिलों, निंदूं नको, जरी वदसी ( तरी आह्मी ) सकळ तुझे पाय वंदूं.

**अर्थ**–राजा ऐक, तूं उदार मनाचा व अत्यंत दयाळू, नीतिमान् व गरिबांचें रक्षण करणाराहि तूंच आहेस. मी तुला टाकून बोललों ह्मणून तूं माझी निंदा करूं नकोस. सांगशील, तर आह्मी सर्व हंस तुझ्या पायां पडतों ( क्षमा कर ).

**२५ पारधीमाजि खगा इ०–अन्वय**–गा ( राजा ), राजे पारधीमाजी खगां मृगां जी हिंसा करिती तीच बरी साजे, तुवां जे मज मोकळीक दिधली, ( व ) दया केली, ही तुझी कीर्ति साजे.

**अर्थ**—राजे लोक शिकारींत पशुपक्ष्यांना मारितात तें त्यांस शोभतें. तसेंच राजा तूं मला सोडून देऊन मजवर दया केली हें तुझ्या कीर्तीला शोभतें.

**२६ हंस मिळणें हें इ०–अन्वय**–हंस मिळणें हें महीलोकीं कठिण, तो सोनियाचा हें नवल विलोकीं, तशा मजलाही तुवां सोडिलें कीं, ऐसा तुझा उपकार मी न झाकीं.

**अर्थ**—या पृथ्वीवर हंस मिळणें दुर्लभ आहे, त्यांत सोन्याचा हंस सांपडणें फारच नवल आहे. असें असून तूं तसल्या मला सोडून दिलें, अशा तुझ्या उपकारावर मी कधीं झांकण घालणार नाहीं ( सदा ध्यानांत जागृत ठेवीन ).

**२७ तुझा करपंजर होय इ०–अन्वय**–तुझा करपंजर मला थारा

होय, तुझ्या वचनाचा ओघ ( मज ) दुग्धधारा ( होय ). गा उदारा, तुझें मानस बहु थोर, गुणागारा, तूं सत्यलोकाधिपचि ( होय ).

**अर्थ**–तुझा हात मला राहण्याला आधार ( पिंजरा ) झाला व तुझें भाषण हीच मला दुधाची धार झाली. अरे उदारा, तुझें मन फार थोर आहे. अरे गुणसागरा, तूं सत्यलोकाचा स्वामी आहेस ( ब्रह्मदेव आहेस, ह्मणजे आमचा यजमान आहेस. हंस हें ब्रह्मदेवाचें वाहन होय ).

**टीप**—ज्याप्रमाणें शिव कैलासांत, विष्णु वैकुंठांत, व इंद्र स्वर्गांत राहतो त्याप्रमाणें ब्रह्मदेव हा सत्यलोकीं राहतो.

**२८ किती रांवे असतील इ०–अन्वय**–नृपा, तुझ्या धामीं किती रांवे असतील, किती कोकिळा, सारिका ( असतील ), तसा मी ( असेन ). ( माझें ) चित्त तूझिया लगामीं लागियलें. आपुलिया कामीं मज योजीं.

**अर्थ**–राजा, तुझ्या घरीं अनेक राघू, मैना व कोकिळ असतील तसा मी ( एक ) असेन. माझें सर्व चित्त तुजकडे वेधलें आहे तर तूं मला आपलें कांहीं काम सांग.

**२९ हें पाखरूं मजसि इ०–अन्वय**–पूरितलोकामा नृपा, हें पांखरूं मजसि काय कामा येईल, ऐसें न वद; मोलें उणें तें व्यजन पुढारी धरितां छाया करी, तपनदीप्तिसही निवारी.

**अर्थ**–लोकांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या राजा, ह्या पांखराचा मला काय उपयोग, असें ह्मणूं नको. अल्प किंमतीचा पंखाहि तोंडापुढें धरिला असतां सावली पाडतो व ऊन लागूं देत नाहीं.

## मयूरकविकृत केका ( पृ० २४० ).

मोराच्या ओरडण्यास केका ह्मणतात. मयूरपंतानें भक्तास मोराची उपमा देऊन ईश्वरास मेघाची उपमा दिली आहे. आणि मेघ ज्याप्रमाणें वृष्टि करून मोरास संतोष देतो त्याप्रमाणेंच आह्मा भक्तरूप मयुरावर तूं दयेची वृष्टि कर, असें मोरोपंतानें ह्मटलें आहे. ह्या केका सुमारें १०८ आहेत.

**१ दयाब्द वळशील तूं इ०–अन्वय–तूं** दयाब्द वळशील तरि चातकां सेवकां किमपि उणें न, तूं देव भाविकां कां उबगशील? करुणार्णवा, अनन्यगतिका जना सोपद्रवा निरखितांचि तुझेंचि मन उमोप द्रवा धरी.

**अर्थ**–मोरोपंत ह्मणतात, देवा, तूं दयारूप मेघ आमच्याकडे वळलास तर आह्मा भक्तरूप चातकांस कांहीं कमी पडावयाचें नाहीं. तूं देव भक्तजनांचा कसा कंटाळा करशील? अरे दयाळा! ज्यांना तुझ्याशिवाय दुसरा आधार नाहीं, अशा लोकांस संकटांत पाहून तुलाच त्यांची करुणा येईल.

**२ तरेन तुमच्या बळें इ०–अन्वय**–नाविका, तुमच्या बळें भवमहानदी तरेन, मग तुह्मीच आतरास्तव सुदीना मला विका. मज सदाश्रमींचा वासही विदित असे. दया करा, गुण पहा, मज चाकरा सदाश्रमीं सवें करा.

**अर्थ**-अरे नावाड्या (ईश्वरा)! तुमच्या सामर्थ्यानें मी ही संसार-रूप मोठी नदी उतरून जाईन. मग तुह्मीच नावेच्या भाड्याबद्दल गरि-वाला एकाद्यास विका. चांगल्या लोकांच्या घरीं कसें रहावें हें मला माहीत आहे. मजवर दया करा. मी चांगला वागतों किंवा नाहीं याची प्रतीति पहा, नंतर मला सदा श्रम करण्याची संवय लावा.

३ **धना परिजना घरीं** इ०-**अन्वय**-तुमचिया घरीं परिजना धना कायसें उणें. मणिहेमभूपतिस आयसें जोडिल्या लाभ न; परि प्रभुहि सकल वस्तुला संग्रहीं ठेविती. गुणा उणा न ह्मणतां अधिक आदरें सेविती.

**अर्थ**-मोरोपंत ह्मणतात (ईश्वरा) तुमच्या घरीं चाकर लोक व द्रव्य यांची कमतरता नाहीं. ज्यापाशीं सुवर्ण व रत्नें पुष्कळ अशा राजास लोखंड मिळविल्यापासून फायदा नाहीं. परंतु समर्थ लोक सर्व वस्तु संग्रहास ठेवितात आणि हा पदार्थ कमी उपयोगाचा आहे व हा ज्यास्त उपयोगाचा आहे असें समजत नाहींत.

४ **ह्मणा मज उतावीळा** इ०-**अन्वय**-मज उतावीळा ह्मणा, गुणाचि घेतला, वा भजकबर्हिमेघा! मन असेंचि धावरें असो; हें सर्व क्षणिक दिसे, मन घडीचा भरवसा कसा धरील, (तें) बहु आधिनें चाकसें परिभ्रमें.

**अर्थ**-मोरोपंत देवास ह्मणतात—हा माझा भक्त फार उतावळा आहे, असें तुह्मी ह्मणाल तर ह्मणा. परंतु उतावीळ झालों हा मी गुण घेतला असें समजा, अरे भक्तरूप मयुरास आनंद देणाऱ्या मेघा (देवा)! माझें मन नेहमीं असेंच उतावीळ राहो, कारण, हें जग जर क्षणभंगुर दिसत आहे तर माझ्या मनाला एका क्षणाचा तरी भरवसा कसा लागेल. तें दुःखानें फार व्याकूळ होऊन चाकासारखें एकसारखें फिरत आहे, स्थिर रहात नाहीं.

५ **कृतांतकटकामलध्वज** इ०-**अन्वय**-कृतांतकटकामलध्वजजरा दिसों लागली. तनु पुरःसरगदासवें झगडितां भागली. तुजविणें बळें आगळा दुसरा सहाय नसे. जरी उतावीळा न हों (तरी) स्मररिपु हा गळा कापितो.

**अर्थ**-(मोरोपंत आणखी उतावीळ होण्याचें कारण सांगतात.- त्यांनीं या श्लोकांत वार्धक्यावर रूपक केलें आहे). यमाच्या सैन्याचें पांढरें निशाण असें ह्मातारपण येऊं लागलें (ह्मातारपणामुळें केंस पांढरे होऊं लागले), शत्रूच्या सैन्यांतील जिलबीच्या रोगरूपी शत्रूबरोबर भांडतां, भांडतां शरीर दमून गेलें. आतां या शत्रूपासून मला संरक्षण कर-णारा व बळानें श्रेष्ठ असा तुज (ईश्वरा) वांचून दुसरा कोणी नाहीं. मी जर उतावीळ न होईन तर हा माझा शत्रु माझा गळा कापित आहे (सर्वस्वी घात करित आहे.)

**टीप**-ज्याची उपमा द्यावयाची त्याचा धर्म ज्यास उपमा द्यावयाची त्यावर पूर्णपणें स्थापित करणें यास रूपक अलंकार ह्मणताण. एथें

वार्धक्यावर रूपक आहे. ह्मातारपण सैन्याची पताक कल्पून सैन्यास लागणाऱ्या इतर वस्तु सादृश्यानें वर्णिल्या आहेत.

६ **प्रभुस्तुति न ठाऊकी इ०–अन्वय**–प्रभुस्तुति ठाऊकी न, परि तिच्या महाकामुका मला कृपण, सकाम मुका बहु हाका मारितो, असें मनीं ह्मणा; लेंकरा प्रथम नीट कसें ये. स्वयें पटु, सुपथीं हळू हळू लावियेलें करा.

**अर्थ**–( मोरोपंत ह्मणतात ) तुमची प्रार्थना कशी करावी हें मला माहीत नाहीं, परंतु मला स्तुतिप्रियाला हा कृपण मुका मोठी आशा धरून पुष्कळ हाका मारित आहे असें पाहिजे तर ह्मणा; कारण लहान मुलास प्रथमच एकादें काम नीट कसें साधेल असें मनांत आणून तुह्मी स्वतः कुशल शिक्षक असल्यामुळें चांगल्या मार्गास हळू हळू लावा, (ह्मणजे देवाची भक्ति कशी करावी हें मला कळेल ).

७ **निजस्तुति तुह्मा रुचे इ०–अन्वय**–तुह्मा निजस्तुति रुचे, स्तविति त्यां वरें तर्पितां; असा तुमचा स्वभाव याचका विदित जाहला. जसा तसा स्तव करूं, याच जना फळ कां न्व्हे ?

**अर्थ**–देवा ! तुह्माला तुमची स्तुति आवडते; ह्मणून जे तुमची स्तुति करितात त्यांस तुह्मी वर देऊन त्यांची इच्छा पुरवितां. असा हा तुमचा स्वभाव मला याचकाला माहीत झाल्यामुळें येईल तशी मी तुमची स्तुति करित असून मला एकट्यालाच तिची फलप्राप्ति कां होऊं नये.

८ **प्रभो शरण आलियावरि इ०–अन्वय**–प्रभो ! (तुह्मास कोणी) शरण आलियावरि ( तुह्मी ) वांकडे कधीं नव्हा, ह्मणोनि जीवाकडे इतु-केंचि हें स्वहित कृत्य ( असे ), वापा, प्रसाद करितां विलंब पळ नसे, घनांवु पांखरें उघडिल्याविना मुखीं न पडे खरें.

**अर्थ**–देवा ! तुह्मास कोणी शरण आल्यावर तुह्मी त्याचें कधीं वाईट करित नाहीं; ह्मणूनच तुह्मास शरण जावें हेंच प्राणिमात्राचें हिताचें कर्तव्य कृत्य आहे. बापा ! तुह्मी भक्तावर कृपा करावयास लागलां असतां तुह्मांस एक क्षणभरहि उशीर लागत नाहीं. ( परंतु आह्मीच तुह्मांला शरण आलों नाहीं तर तुमचा काय दोष ). चातकपक्ष्यानें तोंड उघडिल्याशि-वाय त्याच्या तोंडांत मेघाचें पाणी पडणार नाहीं हें खरें आहे.

**टीप**–चातकपक्षी मेघोदकाशिवाय दुसरें पाणी पीत नाहीं असें ह्मणतात.

९ **सुविद्य धन मेळवी इ०–अन्वय**–सुविद्य, धन मेळवी, वचन आयके, प्रपंचभर शिरीं घे व आंवरी, त्यावरी पिता कृपा करि. असा जरि नसे तरि तो अभद्र क्षण न रुचे; तसा तुजचि आवडे, तूंचि तद्र-क्षण करिशि.

**अर्थ**–चांगला विद्वान्, पैसे मिळविणारा, आपल्या हुकमांत वागणारा व जो प्रपंचाचा भार आपल्या डोक्यावर घेऊन तो आंवरतो, असा जो मुलगा असेल त्यावर बाप लोभ करितो. परंतु तसा जर मुलगा नसेल

तर तो दुर्दैवी मुलगा बापास क्षणभरहि आवडत नाहीं. ( देवा ), तुह्माला तो कसाहि असला तरी आवडतो व तुह्मीच त्याचें रक्षण करितां.

**१० तुझें यशचि तारितें इ०—अन्वय**—तुझें यशचि तारितें परि केवळा न तारवे, असिला सहाय असे तरिच शत्रुला मारवे. भागवत न भेटतां, सत्संगतीहि न घडतां तशीं अज्ञ हृदयें तव यशोरसीं न रंगती.

**अर्थ**—जशी एकटी तरवार सहायावांचून ( ती कोणी हातीं घेतल्यावांचून ) शत्रूस मारित नाहीं, तशी तुझी कीर्ति जरी संसार समुद्रांतून मनुष्याका पार पाडते तथापि तिला एकटीला पार पाडवत नाहीं. तर ईश्वरभक्तांची भेट व साधूंचा समागम झाल्याशिवाय तसलीं अज्ञानी लोकांचीं मनें तुझ्या भक्तीकडे वळणार नाहींत.

**११ बुडे बुडवि सागरीं इ०—अन्वय**—तरी सुकर्णधाराविना सागरीं बुडे, बुडवि. सहाय नसतां ती स्वयें परतटास दाविना, भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां सहाय करी, तईच भवोदधितटीं जना लौकरी उतरी.

**अर्थ**—चांगल्या सुकाण्यावांचून नाव समुद्रांत बुडते व लोकांसहि बुडविते. सहायावांचून ती स्वतः दुसऱ्या तिरास पोंचत नाहीं. त्याप्रमाणेंच ईश्वरभक्तांना जेव्हां तुझें ( तुझ्या नामस्मरणाचें ) पाठबळ मिळतें, तेव्हांच ते लोक संसारसमुद्रांतून तरून जातात ( मोक्ष पावतात ).

**१२ सुसंगति सदा घडो इ०—अन्वय**—( मला ) सदा सुसंगति घडो, ( माझ्या कानीं ) सुजनवाक्य ( सदा ) पडो, माझ्या मतिचा कलंक झडो, ( मला ) विषय सर्वथा नावडो, ( माझें ) मन सदंघ्रिकमळीं दडो, ( त्यास ) मराडितां ( तें ) हटानें अडो, ( तें ) वियोग घडतां रडो, ( तें ) भवचरित्रीं जडो.

**अर्थ**—( मोरोपंत ह्मणतात देवा ), मला नेहमीं साधूंचा समागम व्हावा, साधूंचें भाषण ( उपदेश वगैरे ) माझे कानीं ( ऐकावयास ) सदा पडावें, बुद्धीचा दोष जाऊन ती शुद्ध व्हावी, विषयसुख कधींहि आवडूं नये, माझ्या मनानें चांगल्या लोकांच्या पायांपाशीं लीन व्हावें, व तेथून त्यास पलीकडे लोटल्यास त्यानें तेथेंच अडून बसावें ( निघूं नये ), साधूंच्या चरणांचा वियोग झालाच तर त्यास खेद व्हावा व त्यानें निरंतर तुझ्या कथाकीर्तनांत ( भक्तीविषयीं ) लीन व्हावें.

**१३ न निश्चय कधीं इ० अर्थ**—( मोरोपंत ह्मणतात ) देवा, ईश्वरभक्तीविषयीं माझा निश्चय कधींहि चळूं नये, दुष्ट लोकांच्या संगतीची पीडा मला न व्हावी, माझें चित्त तुमच्या कथाकीर्तनांत सदा असावें, बुद्धीनें चांगल्या मार्गास लागावें ( चांगल्या लोकांनीं घालून दिलेल्या मार्गानें जावें ), माझ्या मनास आपल्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान ( मी कोण आहें व कशाकरितां जन्मास आलों इत्यादि ज्ञान ) व्हावें, खोटा अभिमान सर्वांशीं नाहींसा व्हावा, शुद्ध झालेल्या मनानें पुनः पापकर्मास प्रवृत्त न व्हावें व सर्व पातक आत्मज्ञानानें ( आपल्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान झाल्यानें ) जळून जावें, ( अशी माझी प्रार्थना व इच्छा आहे ).

# आर्या मोरोपंती-भीष्मपर्वांतील ( पृष्ठ २७९ ).

भीष्म शरपंजरीं पडल्यानंतर कौरव पांडव नेहमीं त्याचे दर्शनास जात असत. एके दिवशीं सर्व लोक गेल्यानंतर कर्ण हा त्याचे दर्शनास आला. त्या वेळीं भीष्मानें कर्णास युद्ध सोडून देण्याविषयीं कसा उपदेश केला व तें न सोडून देण्याचें कारण कर्णानें काय सांगितलें हा प्रसंग या आख्यानांत वर्णिला आहे.

ही कथा भीष्मपर्वांतील आहे.

**१ त्या उपरि किंचिदागतभय इ०-अन्वय**—त्या उपरि किंचिदागत-भय कर्ण हळूचि जवळ ये, राहे, पाहुनि मनीं ह्मणें हे शर येरा कवणा कवळ न करितील.

**अर्थ**—( भीष्म शरपंजरीं पडला असतां त्याचें दर्शन घेऊन राजे निघून गेल्यावर कांहींसा भ्यायलेला कर्ण भीष्माच्या जवळ आला आणि उभा राहून मनांत ह्मणाला कीं, या बाणांनीं दुसरा कोणी असता तर त्यास गिळून टाकिलें नसतें काय ( त्याचा प्राण घेतला नसता काय ), भीष्मानें ह्मणूनच हा बाणाचा बिछाना सहन केला आहे.

**टीप**.—भीष्म हा इच्छामरणी होता. त्याच्या मरणसमयीं दक्षिणायन होतें. दक्षिणायनांत प्राणी मरण पावला असतां त्यास उत्तम गति प्राप्त होत नाहीं असें शास्त्रांत सांगितलें आहे. त्यावरून तो उत्तरायण लागेपर्यंत बाणांच्या बिछान्यावर पडून राहिला होता.

**२ तो शर तल्पगत प्रभु इ०-अन्वय**—तो शरतल्पगत प्रभु जसा शरवनीं गुह पडला तसा गमला, महात्मा कर्ण, जा शोकासि कधींच न सांपडला, ( तो ) रडला.

**अर्थ**—तो बाणाच्या बिछान्यावर पडलेला भीष्म दर्भाच्या अरण्यांत पडलेल्या कार्तीकस्वामीप्रमाणें दिसला. तें पाहून ज्याला शोक कसा तो ठाऊक नाहीं असा तो उदार कर्ण रडूं लागला.

**टीप**.-कार्तीकस्वामीचा जन्म झाला तेव्हां तो या दर्भाच्या अरण्यांत पडलेला होता तेथें सहा कृत्तिकांनीं त्यास वाढविलें.

**३ कर्ण ह्मणें इ०-अन्वय**-कर्ण ह्मणें, देवव्रत, अजि विशिखशयनीं निजलां काय हो. जो कण होउनि तुमच्या नेत्रीं सर्वकाळ खुपतो तो हा ( आलों आहें ).

**अर्थ**—कर्ण ह्मणाला, अहो भीष्म, बाणांच्या शय्येवर आज आपणांस निद्रा आली काय ? सदा सर्वदा तुमच्या डोळ्यांत कणाप्रमाणें खुपणारा हा मी कर्ण आलों आहें.

**४ नेत्रें उघडूनि रक्षक इ०-अन्वय**-( हें भाषण ऐकून ) भीष्मानें आपले डोळे उघडून चाकरांस बाहेर जाण्यास सांगून व तेथ दुसरें कोणी नाहीं असें पाहून कर्णाच्या गळ्यांत एक हात घालून बाप ज्याप्रमाणें मुलास पोटीं धरितो त्याप्रमाणें भीष्मानें कर्णास प्रेमानें आलिंगिलें.

**५ पुत्रास जसा प्रेमें इ०-अन्वय**—जसा वा चंद्राहि परिस पुत्रास

प्रेमें अनिमिष पाहे, ( तसा ) तो पाहे आणि एक भुज गळां घालुनि भीष्म वदे, बापा हे बोल परिस.

**अर्थ**–जसा बाप आपल्या मुलाकडे द्वितीयेच्या चंद्रापेक्षां जास्त प्रेमानें व डोळ्याचें पातें न मिटवितां ( एकसारखी टक लावून ) पाहतो त्याप्रमाणें भीष्मानें कर्णास पाहिलें आणि त्याचे गळ्यांत एक हात घालून भीष्म ह्मणाला बाबा कर्णा, माझ्या गोष्टी ऐक

**टीप**—द्वितीयेचा चंद्र शुभदायक ह्मणून त्याचें दर्शन सर्व लोक, मोठ्या उत्सुकतेनें घेतात.

**६ ये ये मजसीं स्पर्धा इ०-अन्वय**–ये, ये, तूं मजसीं स्पर्धा करिता, मोठा विप्रतीप आलासि कीं. धन्य होसिल, म्यां द्वेष त्यजिला, तूंहि तो टाकीं.

**अर्थ**—भीष्म ह्मणाला कर्णा ये, मजजवळ ये, तूं माझी स्पर्धा करणारा व माझा मोठा शत्रु मजकडे आलास? बरें झालें. तुझें कल्याण होईल. तुजविषयींची माझ्या मनांतील द्वेषबुद्धि मीं टाकून दिली, तूंहि आतां मजशीं द्वेष करूं नको.

**७ जरि काय इ०–अन्वय**—कर्णा, जरि काय तूं आजि मजकडे न. येतास, समय चुकतास तरिं कविमत असोनि केवळ कल्याणाला मुकतात.

**अर्थ**—कर्णा, जर कां तूं आज मजकडे आला नसतास तर तूं सज्जनांच्या स्तुतीस पात्र असूनाहे आपल्या हिताला मुकला असतास.

**८ तूं रविज असें लोकीं इ०—अन्वय**—ज्याचा दुर्बोधतत्त्वकथनीं सर्वत्र परम हव्यास, जो ( या ) लोकीं मूर्त परगह व्यास, ( तो ) तूं रविज ( आहेस ), असें वदला.

**अर्थ**—न कळणाऱ्या गोष्टींचें विवरण करण्याची ज्यास सदा हौस, त्या सर्व श्रेष्ठ मूर्तिमान् व्यास मुनीनें तुझी उत्पत्ति सूर्यापासून आहे असें सांगितलें आहे.

**टीप**—पाण्डवांचा बाप पण्डुराजा ह्याची स्त्री कुंती हिनें सूर्य, यम वायु, इंद्र आणि अश्विनीकुमार हे प्रसन्न करून घेण्याकरितां दुर्वास ऋर्षीपासून विवाहापूर्वीं मंत्र मिळविले होते, त्या मंत्रांची प्रचीति पाहण्याकरितां तिनें तो मंत्र जपून सूर्याची आराधना करितांच सूर्यानें येऊन तिला पुत्र दिला. लग्नापूर्वीं ( बालवयांत ) पुत्र झाला याबद्दल लौकिकांत वाईट दिसेल ह्मणून तिनें त्यास पेटींत घालून गंगेंत सोडून दिलें. ती पेटी **ययातीच्या** वंशांतील कोणी **अधिरथ** नांवाच्या गृहस्थास सांपडली. त्यानें इंद्राला आपलीं कवच कुंडलें आपले आंगचीं कापून दिलीं ह्मणून त्यास कर्ण हें नांव पडलें. पुढें दुर्योधनाची व त्याची मैत्री झाल्यावर दुर्योधनानें त्यास अंगदेशाचें राज्य दिलें. यम, वायु व इंद्र ह्या देवतांचे मंत्र जपून धर्म, भीम व अर्जुन हे पुत्र अनुक्रमें उत्पन्न झाले व भ्रताराच्या आज्ञेवरून कुंतीनें

आपली सवत माद्री हिला अश्विनीकुमार यांचे मंत्र दिले. त्या मंत्रांच्या योगानें माद्रीस नकुल व सहदेव असे दोन पुत्र झाले. अशी पौराणिक कथा आहे.

९ **न तुझ्या ठाई इ०—अन्वय**—तुझ्या ठाई माझा द्वेष न हें खरें मनांत आणावें, ( जें ) सभेंत निष्ठुर वदलों तें तेजोवधनिमित्त जाणावें.

**अर्थ**—भीष्म म्हणतो कर्णा, मी खरोखर तुझा द्वेष करित नाहीं. कृष्ण-शिष्टाईच्या वेळेस राजे लोकांची सभा भरली असतां, मी तुला कठोर शब्द बोललों त्याचें कारण इतकेंच कीं तुझा उत्साह कमी होऊन त्या कामांतून तूं आपलें अंग काढून घ्यावें.

१० **करिसि अधिक्षेप इ०—अन्वय**—जेवि लोक निमित्तास्तव अनयांचा तिरस्कार करितात, तसा निमित्त नसतांहि पांडु-तनयांचा अधिक्षेप करिसि.

**अर्थ**—लोक योग्य कारणामुळें अनीतीचा तिरस्कार करितात, परंतु तूं कांहीं कारण नसतां पांडवांचा द्वेष करितोस.

११ **संस्कार धर्मलोपें इ०—अन्वय**—संस्कार धर्मलोपें, दुष्टजनसमागमें शुद्धी उडे, मग गुणवंतांचीहि सदधिक्षेपीं बुद्धि प्रवर्तती.

**अर्थ**—शिक्षण व धर्म न पाळल्यानें व दुष्ट लोकांच्या संगतीनें शुद्ध मार्गाचा गंधहि राहत नाहीं, आणि तो गुणवान असला तरी त्याची बुद्धि साधूंचा छल करण्याविषयीं प्रवृत्त होते.

१२ **हितरत गुरुमन इ०—अन्वय**—गतसद्वृत्ता मुलास पाहुनि हितरत-गुरुमन कळकळतें, गुरुकोप भाव्यशिवपरिहारार्थचि ( असे ). कर्णा, हें सकळ तुला कळतें.

**अर्थ**—आपला मुलगा वाईट रीतीनें आचरण करितो असें पाहून त्याच्या कल्याणाकरितां झटणाऱ्या बापाच्या मनास फार वाईट वाटतें, व तो आपल्या मुलास रागें भरतो. तें केवळ मुलांचें अकल्याण होऊं नये म्हणून असतें. कर्णा, हें सर्व तुला माहीत आहेच.

१३ **बा तूंचि एक इ०—अन्वय**—बा अनेक ( दाते ) झाले व होतील, परि तूंचि एक दाता. तव यश परिसुनि ते ( दाते ) कर जोडुनि तुजचि बहुधा धन्य म्हणतील.

**अर्थ**—कर्णा, दान देणारे पुष्कळ लोक मागें झाले व पुढेंही होतील, परंतु तूंच एकटा खरा दाता आहेस. दातृत्वाविषयीं तुझी कीर्ति ऐकून दानशूर म्हणविणारे लोक तुजपुढें हात जोडून तुलाच अनेक प्रकारें धन्य म्हणतील.

१४ **काशिपुराप्रति जाऊनि इ०—अर्थ**—तूं एकट्यानें काशीपुरास जाऊन, बाणांचा वर्षाव करून, शत्रूंस जिंकिलें व दुर्योधन राजास लावण्यवती नवरी मिळवून दिली.

**टीप—काशीपुरांत चित्रांगद** नांवाच्या राजानें आपल्या मुलीचें स्वयंवर मांडिलें होतें. तेथें इतर राजांप्रमाणें दुर्योधनही गेला होता. त्यानें त्या मुलीस तेथून पळविलें तेव्हां त्याशीं

करितां चित्रांगद व इतर राजे आले. कर्णानें दुर्योधनास साह्य केलें, व एकट्यानें सर्व शत्रु जिंकून ती मुलगी दुर्योधनास मिळवून दिली.

**दिग्विजयाची केली इ०-अन्वय**-वीरकुंजरा, त्वां दिग्विजयाची संधा सत्या केली. रणरंगीं तुजपुढें जरासंधा गुणें उणेपण आलें.

